# वसाहतीचें स्वराज्य

लेखकः—त्र्यं. र. देवगिरीकर

—१९४०—

किंमत १। रुपया

मुद्रक व प्रकाशक :
राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ, पुणें लि. यांचेसाठीं
**हरि मोरेश्वर जोशी**

लोकशक्ति छापखाना,
लोकशक्ति मंदिर २९१ शनिवार पेठ, पुणें नं. २

# प्रस्तावना

पुस्तकाला सुरवात करतांना पार्लमेंटमध्यें सर सॅम्युएल होअर व लॉर्ड झेटलंड यांच्या घोषणा झाल्या होत्या. त्या घोषणांत हिंदुस्थानचा दर्जा वसाहतीप्रमाणेंच समानतेचा राहील असें म्हटलें होतें.

हिंदुस्थानला वेस्ट मिन्स्टरचा कायदा लागू होईल किंवा नाहीं याबद्दल कोणींच स्पष्टपणें उल्लेख केला नव्हता. पण जानेवारीच्या १० तारखेला व्हाईसरॉयनीं मुंबईत भाषण करून हिंदुस्थानला ' संपूर्ण वसाहत स्वराज्य देणें हें आमचें ध्येय आहे व तें वेस्ट मिन्स्टरच्या कायद्याच्या जातीचें देऊं'* अशी घोषणा केली. अर्थात ही घोषणा स्पष्ट आहे. तिच्यांत एक बारीकशी उणीव आहे. वेस्टमिन्स्टरच्या कायद्याच्या जातीचें स्वराज्य व वेस्टमिन्स्टरचें-स्वराज्य यांत थोडा फरक आहे. पण तो उपेक्षणीय आहे. पुस्तक छापून झाल्यानंतर ही घोषणा केली गेल्यामुळें ह्या पुस्तकांत जरा निराळी विचारसरणी मला मांडावी लागली.

व्हाईसरॉयनीं घोषित केलेलें स्वराज्य घ्यावयाचें कां नाहीं हा हिंदुस्थानपुढें प्रश्न आहे. वास्तविकपणें ह्या स्वराज्यांत स्वेच्छाप्रवेश असल्यामुळें आणि स्वातंत्र्य अभिप्रेत असल्यामुळें आपण त्याला विरोध करण्याचें कारण नाहीं. आम्हाला हिंदुस्थानच्या रक्षणाकरतां ब्रिटिशांची मदत काहीं दिवस पाहिजे असल्यामुळें 'तूर्त व तात्पुरतेंच' तें स्वराज्य घ्यावें आणि आपण संरक्षणक्षम झालें म्हणजे कॉमनवेल्थमधून बाहेर पडावें. हिंदुस्थान जर म. गांधींच्या तत्त्वज्ञाना-प्रमाणें अहिंसेनें आत्मरक्षण करूं शकला असतां तर हिंदुस्थानला ब्रिटिशांचें संरक्षण घेण्याची जरूरीच उरली नसती.

ब्रिटिशांच्या बरोबरचा दर्जा मिळाला तर त्यांत अपमानकारक कांहीं

---

**Their objective for India is full Dominion status—Dominion status too of the statute of westminster variety.*

आहे असें म्हणता यावयाचे नाहीं.साम्राज्यशाही राष्ट्राच्या बरोबरीचा दर्जा हा नैतिक दृष्ट्या गौण आहे; पण तो दूर करणें आपल्या हातीं आहे. ब्रिटिश सरकार आम्हाला हा दर्जा जर ताबडतोब घटना परिषदेच्या द्वारां देत असेल, तर आपण तूर्त तो फेटाळून देण्याचें कारण नाहीं. पण खरी अडचण जी आहे ती काळाची. जें प्रांतिक स्वराज्य आपण १९२० सालीं मान्य केलें असतें, ते १९३५ सालीं आपल्याला अपुरें वाटू लागलें. त्याचप्रमाणें जें वासाहतिक स्वराज्य आम्ही १९४० सालीं नाइलाजानें पत्करूं तें १९४१ सालीं पत्करूंच असें नाहीं. काळ जसा बदलतो तशा गरजाहि बदलतात आणि बदलत्या गरजांप्रमाणें चळवळी कराव्या लागतात. सध्यांच्या युद्धांतून काय निर्माण होणार आहे याचीहि कल्पना नाहीं; तेव्हां वसाहतींचें स्वराज्य हें ब्रिटिशांचें अंतिम ध्येय असलें तरी ती आमची आजची व निकटची विश्रांतीची जागा आहे. आमचा प्रवास स्वातंत्र्याच्या पुढेंहि जावयाचा आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक पुनर्घटना आम्हाला करावयाची आहे व ब्रिटिशासारख्या हिंसाप्रधान साम्राज्यांना भांडवलशाही समाज रचनेंतून मुक्त करावयाचें आहे.

म. गांधी म्हणतात डोमिनिअन स्टेटस म्हणजे विहिरींतल्या बेडकाचा दर्जा आहे. (Frog in the well status) दुसरा एक लेखक म्हणतो तो दर्जा म्हणजे हिमागारांतील दर्जा आहे (Cold storage status) आहे. हे दोन्ही आक्षेप बरोबर आहेत. कूपांतील मंडूकाला किंवा हिमागारांतील सजीव पदार्थाला जर मुक्त होण्याचें स्वातंत्र्य नसेल तर आपणहून या वसाहतसाम्राज्यांत कोंडून घेण्याचा मूर्खपणा कोणी करणार नाहीं. तेव्हां वसाहतस्वराज्यांत कितपत स्वराज्य मिळते हें जनतेनें पारखून घेतलें पाहिजे म्हणूनच हा प्रयत्न केला आहे.

डोमिनिअन स्टेटस याचा अर्थ आपण वसाहतींचें स्वराज्य असा करतों.पण कलोनिअन सेल्फ गव्हर्मेंट म्हणजे वसाहतींचें स्वराज्य होय. तेव्हां डोमिनिअन स्टेटस याचा अर्थ वसाहतींचें स्वराज्य असा नसतांहि मी तो शब्द वापरला आहे. पण याचें कारण कांहीं रूढ शब्दांनीं मनांत

बसविलेला अर्थ होय. सार्वभौमत्वाचा दर्जा असा शब्द यापुढें रूढ केला जावा। अशी माझी विनंती आहे. वसाहत दर्जा किंवा वसाहत स्वराज्य हा शब्दप्रयोग उपयोगांत आणला तर तो मध्यमपदलोपी समास आहे असें समजावें. वसाहतींना प्राप्त झालेला सार्वभौमत्वाचा दर्जा किंवा वसाहतीना प्रात झालेलें सार्वभौमत्वाचें स्वराज्य असा त्याचा विग्रह केला जावा म्हणजे शद्बप्रयोगांतील विसंगती दूर होईल.

गतवर्षी फेडरेशनवर जेव्हां मी पुस्तक लिहिलें, तेव्हां मला जशी शब्दांची अडचण भासली, तशी याहि पुस्तकांत भासली. प्रीअँबल्ला मी हेतुवाक्य, हेतूकथन, असें आलटूनपालटून पर्याय दिले आहेत. उद्देशविधान असाहि शब्द माझ्या वाचनांत आला. पण हे शब्द सुट-सुटीत नाहींत व योग्य अर्थ प्रतिपादन करणारे नाहींत. तसेंच कॉन्स्टी-टयुशनल पोझिशन, स्टॅटयूट, वगैरेंनाहि चांगले प्रतिशब्द नाहींत. पण राजकारण शास्त्रावरील ग्रंथ जसजसे निर्माण होऊं लागतील तसतसे कांहीं कांहीं शब्द रूढ होतील व आजचें भाषेचें दारिद्य दूर होईल.

अत्यंत अल्प काळांत हें पुस्तक लिहून तयार केलें असल्यामुळें त्यांत कांहीं चुका असण्याचा संभव आहे. त्या कोणी माझ्या नजरेस आणल्या तर मी त्यांचा आभारी होईन. माझें मित्र श्री. र. के. खाडीलकर यांनीं हस्तलिखीत पाहून कांहीं उपयुक्त सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. ह. मो. जोशी यांनीं लोकशक्ती छापखान्यांत हें पुस्तक छापावें अशी विनंती केली व ती मी मान्य केली. त्यानीं अल्पावधींत सुंदर छपाई करून दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. पुस्तक प्रकाशनाचें कामहि त्यानीं करावयाचे ठरविल्यामुळे मी त्यांचा अधिकच आभारी आहे.

याशिवाय ज्यांनीं ज्यांनीं मला आधार ग्रंथांच्या व अन्य बाबतींत सहाय्य केले त्यांचें आभार मानून मी हें प्रास्ताविक कथन संपवितों.

पुणें ता. २६-१-४०. } त्र्यं. र. देवगिरीकर.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| भाग १—प्रास्ताविक...... | | १ |
| भाग २—वसाहतींचा राजकिय विकास | | ६ |
| भाग ३ | वसाहतींतील अंतर्गत स्वातंत्र्य | २६ |
| भाग ४ | वेस्ट मिन्स्टरचा कायदा | ५४ |
| भाग ५ | वसाहतींचे आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य | ६८ |
| भाग ६ | साम्राज्यांतून विभक्त होण्याचा हक्क | ७८ |
| भाग ७ | वसाहतीं व साम्राज्याचे संबंध | ९५ |
| भाग ८ | आंतरराष्ट्रीय व आंतरवासाहतिक संबंध | १०६ |
| भाग ९ | हिंदुस्थान व वसाहतीचा दर्जा | १११ |
| भाग १० | दर्जा ठरला पण पुढें काय? | १४४ |
| भाग ११ | घटना परिषदा | १६० |
| भाग १२ | हिंदुस्थान व घटना परिषद | १७६ |
| भाग १३ | समारोप | १८७ |

# वसाहतींचें स्वराज्य

नगर वाचनालय
ता.
सातारा.

# वसाहतीचें स्वराज्य

## म्हणजे काय ?

## भाग १ ला.

### प्रास्ताविक.

युरपखंडांत महायुद्धाला सुरवात झाल्यापासून जगांतील सर्वच देश कमीअधिक प्रमाणांत हादरले. लवंगी फटाकड्याच्या सराला उदबत्ती लावली म्हणजे सारे फटाकडे जसे फाडफाड फुटूं लागतात, तसें आधुनिक जग झालें आहे. हिटलरनें पोलंडवर स्वारी केली खरी; पण त्या स्वारीचे चटके जगांतल्या प्रत्येक देशाला बसूं लागले.

हिंदुस्थानांतहि ही आग यावयास फारसा वेळ लागला नाहीं. इंग्लंडनें जर्मनीबरोबर युद्ध जाहीर केलें आणि हिंदुस्थान हा त्यांचा अंकित देश असल्यामुळें त्याच्या होकारनकाराची वाट न पहातां इंग्रजांनीं हिंदुस्थानतर्फेहि युद्धाची तोफ शिलगावून दिली. पण १९१४ चें महायुद्ध

व १९३९ चें महायुद्ध यांत काळाच्या दृष्टीनें जसा फरक पडला, तसा जागृतीच्या व सामर्थ्याच्या दृष्टीनेंहि पडला. १९१४ सालीं हिंदुस्थानला फक्त वाणीचें, व तेंहि दबकत, घाबरत बोलण्याचें सामर्थ्य होतें. १९३९ सालीं, प्रांतिक स्वायत्तता सुरू झाली असल्यामुळें ११ हि प्रांतांत जनतेचें राज्य स्थापन झालेलें होतें. या ११ प्रांतांपैकीं, ८ प्रांत काँग्रेसनेंच व्यापले होते त्यामुळें १९३९ सालीं वाणीबरोबर शक्तिहि हिंदुस्थानांत होती. अशा परिस्थितींत हिंदी जनतेची उपेक्षा करावी ही वृत्ती ब्रिटिश सरकारला ठेवतां येणें अशक्य झालें. पोलंडमध्यें युद्धाचा डोंब उठतांच व्हॉईसरॉय साहेबानीं म. गांधी, जिनाप्रभृतींना मुलाखतीकरतां बोलावलें व युद्ध-परिस्थिती निवेदन केली. हिंदुस्थाननें साम्राज्यसरकारला युद्धांत मदत करावी, ही तर त्यांची इच्छा होतीच. कारण आम्ही युरोपांत जें युद्ध सुरू केलें तें आमच्या साम्राज्याकरतां केलें नसून लोकशाहीच्या रक्षणार्थ केलें आहे, असें ब्रिटिश मुत्सद्दी म्हणूं लागले. हिटलरच्या सुलतानशाहीचा पोलंड-मधील लोकशाहीबरोबर झगडा सुरू झाल्यामुळें हिंदुस्थानची सहानुभूति लोकशाहीच्या बाजूला असणें यांत तर गैर कांहींच नव्हतें. आणि हिंदु-स्थान चालू युद्धांत ब्रिटिशांना सहाय्य करो, न करो हिंदी लोक नाझी पंथाचे पुजारी कधींच होणार नाहींत. कारण नाझीपंथ हा एका व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि त्या व्यक्तीचें म्हणणें प्रभावी व्हावयास त्याला आपलें हिंसात्मक हत्यार सारखें जय्यत ठेवावें लागतें. अशा पंथांत लोकांना मतप्रदर्शन करण्यास बिलकूल परवानगी नसल्यामुळें गोरगरीब जनता त्रस्त होते व तिला एखाद्या गुलामाप्रमाणें वागविलें जातें.

काँग्रेस ही हिंसामार्गी नाहीं, तिला एकट्यादुकट्या व्यक्तीचें राज्य नको असून, देशांतील प्रत्येक सज्ञान माणसाचें राज्य हवें आहे. त्यामुळें काँग्रेसनें पोलंडबद्दल हळहळ व्यक्त केली. पण त्याचबरोबर ब्रिटिशांना असा प्रश्न विचारला कीं, आपण आम्हाला पोलंडची लोकशाही संकटांत सांपडली म्हणून मदतीकरितां आवाहन करता; पण आम्ही कोण आहोंत अगर होणार आहोंत याची कांहीं कल्पना द्याल का? एक गुलाम दुसऱ्या

गुलामाचें रक्षण कसें करणार? कपड्यावर पडलेला काळा डाग शाईनें स्वच्छ होत नाहीं. तेव्हां आपण हें युद्ध केवळ पोलंडकरतां सुरू केलें आहे, कां जगांत पोलंडप्रमाणें सुल्तानशाहीखालीं, आणि साम्राज्य-शाहीखालीं जीं अनेक राज्यें चिरडलीं गेलीं आहेत, त्यांच्या रक्षणार्थ सुरू केलें आहे याचें असंदिग्ध शब्दांत स्पष्टीकरण करा. तसेंच हिंदुस्थानचें भवितव्य युद्धानंतर काय होणार, हेंहि आम्हांला निवेदन करा. हिंदुस्थानला लोकशाहीचे संपूर्ण हक्क मिळणार आहेत, कां हिंदुस्थान आजच्याप्रमाणें पारतंत्र्याच्या साखळदंडांनीं जखडलेला रहाणार आहे याचें उत्तर कॉंग्रेसनें मागितलें.

दुर्दैवानें दोन्ही प्रश्नाचीं उत्तरें आम्हाला समाधान वाटेल, जर्मनी-विरुद्ध इंग्रजांना मदत करण्यास स्फुरण चढेल, अशी नव्हतीं. अर्थात हिंदुस्थान जी मदत करणार होता ती नैतिक होती. ब्रिटिश सरकारकडून युद्धहेतू स्पष्ट करून घेण्यांत अगर हिंदुस्थानच्या भवितव्याचें आश्वासन मिळविण्यांत कोणतीहि अडवणूक नव्हती. तुम्ही आतां आमच्या पदरांत स्वराज्य टाका, नाहींतर आम्ही तुम्हांला मदत करीत नाहीं, असा सौदाहि त्यांत नव्हता. तुमच्यावरचें संकट टळल्यावर ह्या गोष्टी तुम्ही करा; पण त्याचें दिग्दर्शन आज करा, इतकेंच कॉंग्रेसचें म्हणणें होतें.

ब्रिटिश सरकारनीं, युद्धहेतू हे आतां सांगणें अवघड आहे असें उत्तर दिलें. कारण ब्रिटिशांना आपल्या ताब्यांतील सर्व देश जसे बंधमुक्त करावयाचे नव्हते, तसें फ्रान्सलाहि आपल्या ताब्यांतील देश सोडून द्या असें सांगण्याची त्यांची तयारी नव्हती. कदाचित् इटलीसारखा तिसरा देश दोस्तराष्ट्रांत सामील होणार असला तर त्याला नुक्ताच जिंकलेला ॲबिसिनिया आणि आल्बनिया हातून सोडण्याचें दिव्य करावें लागेल-आणि तो जर्मनीच्या बाजूला जाईल याहि भीतीनें युद्धहेतू जाहीर करण्याचें त्यांनीं टाळलें असावें. रहाता राहिला प्रश्न हिंदुस्थानचा. हिंदुस्थानचा दर्जा ठरलेलाच आहे, ते म्हणाले. त्यांत नवीन काय सांगावयाचें? तुम्हाला १९१९ सालीं, व १९२९ सालीं आम्ही सांगितलेंच आहे कीं, हिंदु-

स्थानला वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा प्राप्त होणार आहे. तो केव्हां प्राप्त होईल हें मात्र सांगण्याचे त्यानीं टाळले. काँग्रेसच्या पुढाऱ्यांना मागील ग्रंथ वाचता येत नव्हते असें नाहीं. तसेंच इंग्रजांच्या गुलामगिरींत आम्ही शतकानुशतकें राहणार नाहीं हेंहि त्यांना ठाऊक नव्हते असेंहि नाहीं. पण ज्या वसाहतीच्या स्वराज्याचें हक्क ब्रिटिश देऊं म्हणत होते त्याचें साल तरी त्यांनीं कळवावयास हवे होते. उलट तुमच्यांत अनेक जाती, अनेक पंथ, अनेक वर्ण, अनेक वर्ग आहेत हें जुनेंच रडगाणें त्यांनीं नव्या सुरावर गाऊन दाखविले. स्वराज्यप्राप्ती ही लॉटरीच्या तिकिटाप्रमाणें जणूंकाय दैववशात् प्राप्त होणारी गोष्ट आहे असें हिडीस स्वरूप त्यानीं आमच्या प्रश्नाला आणले. अशा उत्तरानें काँग्रेसचें समाधान होणें शक्य नव्हते. नाहीं म्हणावयास व्हाईसरॉयनीं मध्यवर्ती कायदेमंडळांत जनतेचे प्रतिनिधी घ्यावयाचें औदार्य दाखविले, आणि जखमेवर मीठ चोळावें त्याप्रमाणें, हिंदु मुसल्मान प्रतिनिधी एकत्र आले म्हणजे तुमचे जातीय कलह कमी होतील असा आशावाद प्रकट केला ! काँग्रेसला अशा युद्धांत सहकारी व्हावयाचें नसल्यामुळें आठहि प्रांतांतील काँग्रेसच्या मंत्रीमंडळानीं आपल्या जागांचे राजिनामे दिले व सात प्रांतांत गव्हर्नर्सनीं आपल्या हातांत सत्ता घेतली.

काँग्रेसनें ब्रिटिशांना हिंदुस्थानचा दर्जा काय असा नुसता प्रश्नार्थक सवाल केला नसून आपल्याला काय पाहिजे आहे हें स्पष्टपणें कळविले आहे. हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य पाहिजे आहे आणि अल्पसंख्याकांचें हितरक्षण ज्यांत होईल अशा प्रकारची घटना बनविण्याकरतां घटना परिषद पाहिजे आहे. ह्या दोन्ही गोष्टी करणें ब्रिटिशांना अशक्य नाहीं. त्यांनीं अशा प्रकारचें स्वातंत्र्य व घटना बनविण्याचे अधिकार वसाहतीना दिले आहेत, त्यांत नवे व भिऊन जाण्यासारखें कांहींच नाहीं. काँग्रेसनें असें कोठेंहि जाहीर केले नाहीं कीं, आम्हाला ताबडतोब आतांच्या आतां साम्राज्यांतून फुटून जावयाचे आहे, आम्हाला तुमच्या बरोबर

व्यापारी संबंध ठेवावयाचा नाहीं, किंवा आमच्या रक्षणा करतां तुमच्या आरमारी व वैमानिक दलांची आम्हाला जरुरी नाहीं.

तेव्हां कॉंग्रेसचें मागणें पूर्णपणें न्याय्य, सनदशीर व होअरसाहेब म्हणतात त्याप्रमाणें त्यांची साम्राज्यशाही वृत्ती खरोखरच सुटली असली तर ताबडोब मान्य होण्यासारखें आहे.

युद्धाच्या या प्रसंगानें वसाहतीच्या स्वराज्याचा आणि वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटचा फार गाजावाजा झाला आहे. तेव्हां वसाहतीचा दर्जा म्हणजे काय ? वेस्टमिन्स्टरचा कायदा काय सांगतो याची माहिती व्हावी म्हणून पुढील निवेदन केलें आहे.

---

# भाग २ रा.

## वसाहतींचा राजकीय विकास.

ब्रिटिशांचें साम्राज्य फार मोठें आहे, त्या साम्राज्याची व्याख्या करणेंहि कठीण आहे. अनेक प्रकारच्या राज्यघटना त्यांत चालू आहेत. या साम्राज्यांतील अनेक देशांत समान कांहीं असेल, तर राजा. राजाची सत्ता मान्य करण्यापलीकडे या साम्राज्याला एकतंत्री असें स्वरूप नाहीं. एका अर्थानें खुद्द इंग्लंड हीसुद्धां एक वसाहत आहे. ज्या राजानें १०६६ इसवीमध्यें इंग्लंड जिंकलें तो नॉर्मंडीचा ड्यक मूळचा चॅनल आयलंडचा राजा होता. पण पुढें इंग्लंडांत सत्ता बळावू लागली आणि मूळ देशाला पार्लमेंटचे कायदे लागू होऊ लागले. चॅनल आयलंड्सनीं आम्ही कोणाचेंहि अंकित नाहीं व कोणाची सत्ता मानणार नाहीं असा पुकारा केला. पण त्यांचा हक्क अमान्य करण्यांत आला. तथापि ब्रिटिश साम्राज्याचें मूळ चॅनल आयलंड्स आहे हें कोणीहि अमान्य करू शकत नाहीं.

दर्यावर्दीपणाला सुरुवात झाल्यावर इंग्लंडमधील धाडशी खलाशी बाहेरील जगांत मुलूखगिरी करण्याकरतां आपली जहाजें हाकारूं लागले. त्यांनीं निरनिराळे देश जिंकले. त्यांच्या

पाठीमागें इंग्लंडचें सामर्थ्य असल्यामुळें प्रतिस्पर्धी सत्तांना प्रतिकार करणें कठीण जाऊं लागलें. या बाहेर देशांत जाऊन राहिलेल्या इंग्लंडच्या रहिवाशांनीं ज्या वसाहती स्थापन केल्या, त्या वसाहतींत कोणत्या प्रकारचा राज्यकारभार असावा याबद्दल चर्चा होऊं लागली. इंग्लंड म्हणूं लागलें या वसाहतींत राज्य जें चालवयाचें तें आमच्या कायद्यांनीं चाललें पाहिजे. इंग्लंडमध्यें जे कायदे होतील तेच कायदे वसाहतींत लागू झाले पाहिजेत. वसाहती या साम्राज्यसरकारच्या पूर्णपणें अंकित आहेत, त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं; म्हणून स्वयंशासनाचे अधिकार त्यांना बिलकूल नाहींत.* इंग्लंडच्या प्रभुत्वाचें आस्तित्व जरी या वसाहती मान्य करीत होत्या, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत इंग्लंडची सत्ता तितकी चालत नसे हें येथें सांगणें जरूर आहे. एक तर वसाहतींत असणारे लोक इंग्लंडचेच असल्यामुळें त्यांच्याबद्दल अविश्वास दाखविण्याचें कारण नसे. दुसरे जे अधिकारी त्या वसाहतींत जात, तेहि साम्राज्यसरकारला विघातक होईल असें कांहीं करीत नसत. लिखित कायद्यापेक्षां अलिखित रूढी ही जास्तजास्त क्षेत्र व्यापूं लागली. अंतर्गत कारभार हा त्यामुळेंच पार्लमेंटांतील मंत्र्यांच्या हुकमांनीं वसाहतींच्या ताब्यांत येऊं

*The said Colonies and Plantations in America have been, are, and of right ought be to, subordinate to and dependent upon, the Imperial Crown and Parliament of Great Britain;and that the king's majesty by and with the consent and advice of the Lords spiritual and temporal, and commons of Great Britain, in Parliament assembled, had, hath and of right ought to have full power and authorjty to make laws and statutes of sufficient force and validity to bind the colonies and people of America, subjects of the Crown Of Great Britain in all cases whatsoever'
( Declaratory act.1766

लागला. इंग्लंड व वसाहतींचा खटका एका गोष्टींत उडत असे. बाहेर देशांशीं जहाजांतून होणाऱ्या व्यापारावर इंग्लंडचें पूर्ण नियंत्रण असावें याबद्दल इंग्लंड जागरूक असे. तेव्हां वसाहतींना जरी अंतर्गत जबाबदारीचें स्वराज्य मिळणें सोपें होतें, तरी बाह्यसंबंध निश्चित करण्याबद्दल त्यांचे हात बांधलेले असत. वसाहतींत जी स्वराज्याची वाढ झाली, ती रूढींनीं जितकी झाली, तितकी कायद्यांनीं झाली नाहीं. स्वकीयांच्या देशांत ही वाढ व्हावयास हरकत नसते; पण परकीयांच्या देशांत रूढीची वाढ होऊं दिली जात नाहीं. तथापि इंग्लंडसारख्या हट्टी, दुराग्रही देशाबरोबर या वसाहतींना आपल्या हक्कांची शाबिदी करून घेण्याकरतां १५० वर्षें झगडावें लागलें. या झगड्यांत प्रथम अमेरिका स्वतंत्र झाली व तेथें इंग्लंडचें स्वामित्व उरलें नाहीं. १९२६ सालीं हा अनेक वर्षांचा झगडा संपला व वसाहती स्वतंत्र झाल्या असें म्हणावयास हरकत नाहीं.

ज्यांना वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा आज फक्त ६ च वसाहती आहेत. १ कानडा, २ ऑस्ट्रेलिया, ३ न्यू-फौंडलंड, ४ न्यू-झलिंड, ५ युनियन ऑफ साऊथ आफ्रिका आणि ६ आयर्लंड. या सहा वसाहतींपैकीं, कानडाचे समानत्वाचे हक्क फार पूर्वी मान्य केले गेले आणि आयर्लंडचे फार उशीरां मान्य केले गेले.

प्रत्येक वसाहतीचा इतिहास या ठिकाणीं द्यावयाचा नाहीं, व त्याचा प्रस्तुत प्रश्नाशीं तितकासा संबंधहि नाहीं. पण या वसाहतींच्या राजकीय घटनेंतील टप्प्यांचा निर्देश करणें उद्बोधक झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

### १ कानडा.

दोन कानडांच्या इतिहासांतच आधुनिक घटनांचें मूळ सांपडतें. तेव्हां तो इतिहास आपण अवलोकन करूं. १६०८ सालीं फ्रेंचांनीं कानडामध्यें वसाहत स्थापली. त्यांचें व ब्रिटिश वसाहतवाल्यांचें युद्ध होऊन १७६० सालीं ती वसाहत ब्रिटिशांनीं जिंकली. १७६३ सालीं

पॅरिसला तह झाला व कानडा ब्रिटिश वसाहत झाली व ती क्वेबेकचा प्रांत म्हणून समजण्यांत आली. तेथें ब्रिटिश गव्हर्नर्स नेमले जाऊं लागले. या गव्हर्नर्सना असें सांगण्यांत आलें होतें कीं, त्यांनीं एक कौन्सिल नेमावें व प्रांतांतील जमीनदारांचें एक मंडळ बोलवावें. तेथें वाढत चाललेले अल्पसंख्याक ब्रिटिश वसाहतवाले म्हणू लागले कीं, गव्हर्नरला सल्ला देण्याचा अधिकार आमचा आहे आणि तेथील कारभार चालविण्याला आम्हालाच हक्क आहे. फ्रेंच व इंग्लिश अशा दोघांमध्यें तेथें झगडा सुरू झाला व विचित्र परिस्थिती निर्माण झाली. या झगड्याचा अंत १७७४ च्या क्वेबेकचा कायदा करून झाला. या कायद्यानें कॅथॉलिकांना बरेच धार्मिक हक्क मिळाले. गव्हर्नरनें कौन्सिल नेमावें; पण या कौन्सिलच्या वट हुकमांना इंग्लंडनें मान्यता द्यावी व कर वसूली कौन्सिलनें करावी असें ठरलें. कानडाच्या राज्यघटनेचा हा पहिला टप्पा होता.

त्यानंतर अमेरिकेनें स्वातंत्र्य युद्ध पुकारलें व ती इंग्लंडपासून फुटून निघाली. अमेरिकेंतील कांहीं राजनिष्ठ लोकांना तेथें रहाणें मानवलें नाहीं व ते कानडांत आले. त्यांनीं आपलीं घरेंदारें, मालमिळकतीवर पाणी सोडलें, पण ते आपले राजकीय हक्क सोडण्यास तयार नव्हते. त्यांना प्रातिनिधीक संस्थांची व राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्याची संवय होती. अमेरिकेनें ज्या कराच्या हक्काकरतां युद्ध केलें ते हक्क व राज्यकारभारावरील तो ताबा त्यांना हवा होता. याच्या उलट फ्रेंचांची स्थिति होती. त्यांना अशा प्रातिनिधीक संस्थांची संवय नव्हती. ते म्हणत, या संस्था म्हणजे कर वसूल करणाऱ्या इंग्रज संस्था आहेत. तें खरेंहि होतें. कारण इंग्लिश अल्पसंख्याक म्हणत, हा आमचा अधिकार आहे व आम्ही फ्रेंचांना समानत्वानें वागवणार नाहीं. हीं त्यांचीं भांडणें शेवटीं १७८८ सालीं लंडनपर्यंत गेलीं. लंडनमध्यें गेलेल्या ब्रिटिश अल्पसंख्याकांनीं क्वेबेकचा कायदा रद्द करा, प्रातिनिधीक संस्था सुरू करा व त्यांच्या हातीं कराचे अधिकार द्या असें सांगितलें. त्यामुळें नवा घटना कायदा १७९१

सालीं पास झाला. हा कायदा कानडाच्या राज्यघटनेचा दुसरा टप्पा होता.

ह्या कायद्यानें कानडाचे दोन भाग केले. एक वरचा व दुसरा खालचा. प्रत्येक भागांत निवडणुकीनें स्थापन होणारें एकेक कायदेमंडळ निर्माण केलें व त्यांना कायदे करण्याचे अधिकार दिले. एकेक सरकारनियुक्त वरिष्ठ गृहहि त्याच वेळीं निर्माण करण्यांत आलें. या नव्या कायद्यानें कार्यकारी मंडळाच्या हातांत सत्ता गेली. हें कार्यकारी मंडळ गव्हर्नर नेमीत असे व तें मंडळ, खालच्या सभागृहाला जबाबदार नसे. खालचे कायदेमंडळ आपल्या हक्काकरतां भांडू लागलें. त्यांनीं आम्ही कायदे करावेत व ते सरकारनीं मान्य करावेत असा हट्ट धरावा. त्यामुळे झगडे होऊं लागले. गव्हर्नरनीं हें कायदेमंडळ अनेक वेळा रद्द केलें. खालच्या व वरच्या कानडांत अशीं भांडणें चालू असत व राज्यकारभार खुटून जाई. ४६ वर्षेंपर्यंत ही हाणामारी चालू होती. याचा शेवट दोन्ही कानडांनीं बंडें करण्यांत झाला.

या कलहांत तीन दर्यावर्दी प्रांतहि समभागी होते. हें तीन प्रांत नोव्हास्कोशिया, न्यू ब्रन्सविक व प्रिन्स एडवर्ड बेट होत. त्यांनाहि कार्यकारी मंडळाची सत्ता असह्य झाली होती. अशा परिस्थितींत लॉर्ड डरहॅम यांची १८३८ सालीं गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. हे गव्हर्नर जनरलसाहेब सुलतानशाही गाजविण्याकरितांच तेथें गेले. त्यांच्या सुलतानशाहीमुळें त्यांना नोव्हेंबरमध्यें म्हणजे सात आठ महिन्यांनीं परत बोलावण्यांत आलें. त्यांच्याबरोबर लंडनला चर्चा झाली. डरहॅम साहेबांनीं तेथें कांहीं विधायक सूचना केल्या. त्यांतील तीन महत्वाच्या होत्या. कानडा एक करावेत अशी पहिली सूचना, कायदेमंडळाला जबाबदार असें कार्यकारी मंडळ नेमावें ही दुसरी सूचना व गव्हर्नरनीं कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानें चालावें ही तिसरी सूचना. ही शेवटची शिफारस दर्याकाठच्या तीन प्रांतांनाहि लागू करावी असें त्यानें सांगितलें. दर्याकाठच्या प्रांतानीं स्वेच्छेनें या संयुक्त राज्यांत यावें, असेंहि त्यानें सुचविलें. डरहॅमच्या शिफारसीनीं वसाहतीच्या स्वराज्याचा पाया घातला

असें म्हणतां येईल. या सूचनेचा विचार करण्याकरतां दर्याकाठचे तीन प्रांत चार्लटौऊनला १ सप्टेंबर १८६४ रोजीं जमले. या परिषदेकरितां कानडा सरकारनें आपलें शिष्टमंडळ त्या तीन प्रांतांना मोठ्या संघांत येण्यास विनंती करण्याकरतां पाठविलें. त्याचा परिणाम होऊन दोन कानडा व दर्याकाठचे तीन प्रांत यांची घटनापरिषद भरली. या परिषदेला घटनापरिषद असें नांव नसलें तरी ती घटनापरिषदच होती. ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी तेथें आले नव्हते. या परिषदेनें घटनेचा खर्डा तयार न करतां ७२ ठराव केले. या ठरावांत फेडरेशन मान्य करण्यांत आलें. दोन कानडांना स्वतंत्र प्रांतिक राज्यें आणि दर्याकाठच्या तीन प्रांताना तीन प्रांतिक राज्यें असावीं असें ठरलें. या संघराज्यांत इतरांना यावयास दार मोकळें ठेवलें होतें. हे ठराव पुढें प्रत्येक प्रांतानें आपापल्या कायदेमंडळापुढें ठेवले व त्यांत यत्किंचित फरक न करतां पण मोठीं भांडणें होऊन पास झाले. नंतर त्यांनीं एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविलें व इंग्लंडच्या पार्लमेंटनें त्या ठरावाला अनुसरून बिल तयार केलें. त्या कायद्याला ब्रिटिश नॉर्थ अमेरिका ॲक्ट असें म्हणतात. या कायद्यानें चार प्रांतांत संयुक्त राज्य झालें. पुढें त्यांत इतर प्रांत येऊन कानडाचें ९ प्रांतांचें फेडरेशन झालें. १९०५ मध्यें हें फेडरेशन पूर्ण झालें. ही घटना करण्यांत ब्रिटिश सरकारचा बिलकूल हात नव्हता. कानडांत ९ प्रांत आले ते:--१ क्वेबेक, २ ऑंटेरिओ, ३ न्यूब्रन्सविक, ४ नोव्हास्कोशिया, ५ एडवर्ड आयलंड, ६ मॅनिटोबा, ७ सासकाचेवान, ८ आल्बर्टा, ९ ब्रिटिश कोलंबिया.

१८६७ च्या कायद्याचा उद्देश निरनिराळ्या प्रांतांना जबाबदारीचें स्वराज्य द्यावें व सर्व प्रांतांचें एक संयुक्त राज्य करावें असा होता. फेडरेशनमध्यें येणें न येणें ही ऐच्छिक गोष्ट होती. फेडरेशनमध्यें येण्याशिवाय ह्या भांडखोर प्रांतांना गत्यंतरच नव्हतें. कारण स्वतंत्र झालेला अमेरिका आपल्यावर स्वारी करील, ही भीति त्यांना वाटत होती. तसेंच

अमेरिकेनें आपल्या देशांत येणाऱ्या मालावर संरक्षक जकाती बसविल्या-मुळें त्यांना आत्मरक्षणाकरतां भांडणें सोडून देणें क्रमप्राप्त झालें. १८७० पासून १९०५ पर्यंत म्हणजे ३५ वर्षेपर्यंत निरनिराळ्या प्रांतांना फेडरे-शनमध्यें यावयाचा विचार करावयास लागलीं. कानडाच्या राज्यांत अशा प्रकारें ९ प्रांतांचीं नऊ व मध्यवर्ती एक अशीं १० राज्यें आहेत. प्रत्येक प्रांत आपल्या कायदेमंडळाला जबाबदार आहे. मध्यवर्ती व प्रांतिक कारभाराची वाटणी करून टाकण्यांत आली आहे. फेडरेशनचें हें मुख्य तत्त्व तेथें लागू करण्यांत आल्यामुळें कानडाचें फेडरेशन हें आतां चांगलें कार्यक्षम झालें आहे. मध्यवर्ती सत्तेला प्रांताच्या कारभारांत हात घालतां येत नाहीं; कारण प्रांतिक राज्यें हीं मध्यवर्ती सत्तेनें निर्माण केलेलीं नाहींत. कानडाच्या स्वराज्याला अशा प्रकारें १८६७ च्या नॉर्थ अमेरिकन ॲक्टनें जन्म दिला आणि तेथें संपूर्ण स्वायत्तता व जबाबदारीचें राज्य सुरू झालें. त्यांच्या बाह्य सत्तेला काय काय बंधनें आहेत तीं यथास्थळीं आपण पाहूंच.

## २ न्यू फौंडलँड.

न्यू फौंडलँडला १८३२ मध्यें प्रातिनिधिक सत्ता दिली गली आणि १८५५ सालीं तेथें जबाबदारीचें राज्य सुरू करण्यांत आलें. १९३४ पासून ही घटना त्यांच्याच सांगण्यावरून तात्पूरती तहकूब केली गेली.

## ३ ऑस्ट्रेलिया.

१९०० सालापूर्वी ऑस्ट्रेलियांत कानडा किंवा दक्षिण आफ्रिकेप्रमाणें भिन्न भिन्न वर्णांचा झगडा नव्हता. ऑस्ट्रेलियांतील गोरी लोकवस्ती एकाच वर्णाची होती व ती ब्रिटिश बेटांतून जाऊन राहिलेल्या लोकांची बनली होती. दक्षिण व पश्चिम ऑस्ट्रेलिया, न्यू साऊथ वेल्स, व्हिक्टो-रिया, क्विन्सलँड, टास्मानिया, न्यू झिलंड येथील वसाहतींत ब्रिटिश लोकच रहात असत. त्यांच्यांत आर्थिक प्रश्नाबाबत भिन्नता होती. पण कानडा जसा अमेरिकेच्या आक्रमणाला भिऊन एक झाला, त्याप्रमाणें पॅसिफिक महासागरांत जर्मनी व जपानची वाढती सत्ता पाहून तेथील

ब्रिटिश लोक एक झाले. ऑस्ट्रेलेशियामधील सर्व वसाहती जर एकवटल्या तर त्या ब्रिटिश साम्राज्यावर पॅसिफिक समुद्रांतील वसाहतींच्या हक्क सवलतींसंबंधीं जितकें दडपण आणूं शकतील तितकें एकेकट्या वसाहती आणू शकणार नाहींत, हें त्यांनीं पाहिलें. त्याचप्रमाणें या निरनिराळ्या वसाहतींनीं आपल्याभोवतीं संरक्षक जकातींचे इतके तट उभे केले होते कीं, त्यामुळें व्यापार करणें कठीण होऊं लागलें होतें. या व इतर कारणांमुळें ऑस्ट्रेलेशियांतील वसाहतींनीं इंग्लंडकडे फेडरेशनची मागणी केली. कानडामध्यें प्रांतांना प्रथम स्वराज्य द्यावें लागलें आणि नंतर त्या प्रांतांचें संयुक्त राज्य झालें. ऑस्ट्रेलेशियांतील निरनिराळ्या वसाहती या पूर्णपणें स्वतंत्र होत्याच. त्यांना फक्त एकत्रित करण्याकरतां ब्रिटिश सरकारच्या फेडरेशनची जरूरी होती.

१८९१ सालीं ऑस्ट्रेलेशियाची कन्व्हेंशन भरली व तिनें एक घटना तयार करून पार्लमेंटाकडे कायदा करण्याकरतां पाठविली. पण ही घटना मोडली. कारण न्यू सौथ वेल्सनें तिला मान्यता देण्याचें नाकारलें. इतर वसाहतींनींहि त्याबद्दल उत्साह दाखविला नाहीं. १८९४ सालीं दुसरा प्रयत्न करण्यांत आला. या वेळीं कन्व्हेंशनकरतां जे निरनिराळे प्रतिनिधी येतील, त्यांची निवड पार्लमेंटनें न करतां वसाहतींतील लोकांनीं करावी, असें ठरलें. कारण लोकांनीं उत्साह दाखविल्याशिवाय हें काम होणार नाहीं, असें त्यांनीं पाहिलें. क्विन्सलँड व न्यू झीलंड, शिवाय सर्व प्रतिनिधी या परिषदेला आले. १८९४ ची ही परिषद म्हणजे घटनापरिषदच होती असें म्हणतां येईल. तेथें पास झालेल्या घटनेला निरनिराळ्या वसाहतींतील लोकांची मान्यता घेतली. १९०० सालीं त्या ठरावावर आधारलेलें बिल ब्रिटिश पार्लमेंटनें पास केलें. त्याला कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया कॉन्स्टीट्यशन ॲक्ट म्हणतात.

१८९४ च्या परिषदेंत फेडरेशनचें महत्व वर्णन करण्यांत आलें. पण या परिषदेंतून पुढें आणखी एक, दर वसाहतींतून दहा अशा ६० जणांची

दुसरी कन्व्हेंशन भरविण्यांत यावी असें ठरलें. ही कन्व्हेंशन २३ मार्च १८९७ रोजीं भरली. तिनें घटनेचा खर्डा तयार केला. तो प्रत्येक वसाहतीच्या कायदेमंडळांतून चर्चिला गेला व दुरुस्त होऊन आला. या कन्व्हेंशनची शेवटची बैठक २० जानेवारी १८९८ रोजीं झाली व १६ मार्चला त्याला अखेरचें स्वरूप आलें. पुढें वर वर्णन केल्याप्रमाणें १९०० सालीं कायदा पास झाला.

या ऑस्ट्रेलियाच्या घटनेंत सहा प्रांत अंतर्भूत झाले. त्या फेडरेशनमध्यें नवे प्रांत अंतर्भूत करावयास परवानगी आहे. तथापि न्यू झीलंड या कॉमनवेल्थमध्यें आला नाहीं. ऑस्ट्रेलियाचें फेडरेशन हे अमेरिकेच्या धर्तीवर आहे. ऑस्ट्रेलियांतील कॉमनवेल्थला कांहीं ठराविक अधिकार दिले आहेत व त्यांत हस्तक्षेप करतां येत नाहीं. कानडांत प्रांतांना ठराविक अधिकार आहेत व शषाधिकार डोमिनिअनला आहेत. कानडांत डोमिनिअन सरकार ले. गव्हर्नर्स नेमूं व काढूं शकतें आणि प्रांतांना अमुक कायदे करू नका असें सांगू शकते. ऑस्ट्रेलियांतील घटकांचे गव्हर्नर्स बादशहा नेमतो व त्यांच्या अधिकारांत कॉमनवेल्थ हात घालूं शकत नाहीं. कानडाच्या घटनेचा अर्थ ब्रिटिश प्रीव्हि कौंसिल करते. पण ऑस्ट्रेलियांत हा अधिकार हायकोर्टाकडे दिला आहे. कानडाच्या घटनेंत दुरुस्ती करावयाची असली तर ब्रिटिश पार्लमेंटाकडे जावें लागतें. पण ऑस्ट्रेलियाच्या घटनेंत तेथील सरकार व लोक दुरुस्ती करू शकतात.

हे फरक दाखविण्याचें कारण इतकेंच आहे की, वसाहतीचें स्वराज्य म्हटलें कीं, चहूंकडे एकच राज्यपद्धत आहे असें मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक वसाहतीनें आपली घटना आपल्या परंपरेप्रमाणें, इतिहासाप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें बनविली आहे. नवे नवे प्रश्न बदलत्या काळांत निर्माण होतात व त्यांचीहि व्यवस्था वेळोवेळ करावी लागते. त्यासंबंधींचे बारिकसारिक नियम हे साऱ्या वसाहतींत कसे सारखे असूं शकतील?

## ४ न्यूझीलंड.

चवथी वसाहत न्यूझीलंडची. वास्तविक न्यूझीलंडचा समावेश ऑस्ट्रेलियांतील कॉमनवेल्थमध्येंच व्हावयास पाहिजे होता. पण भिन्न आर्थिक हितसंबंधामुळें हा छोटासा विभाग स्वतंत्र राहिला आणि त्यानें फेडरेशनमध्यें आत्मार्पण केलें नाहीं. न्यूझीलंडकरतां ऑस्ट्रेलियानें दार उघडें ठेवलें आहे; पण त्यानें अजूनपर्यंत तशी इच्छा प्रदर्शित केली नाहीं.

ऑस्ट्रेलियांत १९०० च्या कायद्यापूर्वी जीं अनेक राज्यें होतीं, त्यांतील न्युझीलंड हें एक होतें. ऑस्ट्रेलियांतील सहा राज्यांत १८२३ पूर्वी सुलतानशाही ( autocratic rule ) च चालू असे. पण १८२३ पासून तेथील एकेका वसाहतींत प्रातिनिधिक स्वरूपाचें व नंतर जबाबदारीचें राज्य सुरू झालें. न्यूझीलंड ही १८४१ सालीं स्वतंत्र वसाहत म्हणून स्थापन झाली. तिला १८५२ सालीं साम्राज्यसरकारनें प्रातिनिधिक राज्य दिलें आणि १८५६ सालीं तेथें पूर्ण जबादारीचें राज्य स्थापन झालें.

## ५ दक्षिण आफ्रिकेचा संघ.

दक्षिण आफ्रिकेच्या संघांत चार वसाहती समाविष्ट झाल्या आहेत. केप कॉलनी; नाताळ; ट्रान्सवाल; आणि ऑरेंज रिव्हर कॉलनी. यांतील पहिल्या दोन वसाहतींत इंग्रजांचें संख्याधिक्य आहे आणि दुसऱ्या दोन-मध्यें बोअर लोकांचें संख्याधिक्य आहे. या भिन्नतेमुळें दोघांमध्यें सलोखा क्वचितच असे. बोअर लोकांवर म्हणजे ट्रान्सवाल व ऑरेंज रिव्हर कॉलनीवर इंग्रजांचें राज्य होतें. १९०२ च्या लढ्यानंतर या दोन्ही वसाहती 'क्राऊन कॉलनीज' म्हणून मानल्या जाऊं लागल्या. त्यांना अनुक्रमें १९०६ व १९०७ सालीं जबाबदारीचें राज्य मिळालें. पण तशी स्थिति केपची व नाताळची नव्हती. १८१४ मध्यें केप ऑफ गुडहोप दक्षिण आफ्रिकेंत सामील करून घेण्यांत आलें. त्याला १८५३ सालीं प्रतिनिधीक राज्य व १८७२ सालीं जबाबदारीचें राज्य देण्यांत आलें. खुद्द इंग्लिश लोक

आपल्या रक्तामांसाच्या लोकांना जबाबदारीचें राज्य द्यावयास पन्नास साठ वर्षें लावतात ह आश्चर्य नव्हे काय? नाताळ १८४३ सालीं खालसा केला गेला; १८४५ सालीं ती स्वतंत्र वसाहत झाली. १८५६ मध्यें त्यांना प्रातिनिधिक राज्य दिलें व १८९३ मध्यें जबाबदारीचें राज्य देण्यांत आलें. अशा प्रकारें १८७२, १८९३, १९०६, १९०७ या सालांत तेथील चारहि वसाहती जबाबदारीचें स्वराज्य उपभोगूं लागल्या. भौगोलिक व आर्थिक दृष्ट्या या वसाहती कानडा किंवा ऑस्ट्रेलियापेक्षां अधिक निकटच्या अशा होत्या. ह्या वसाहती व्यापारधंद्याकरतांच स्थापन झाल्या असल्या-मुळें अंतर्गत खुला व्यापार आणि रेल्वेच्या वहातुकीची जरूरी त्यांना भासूं लागली. पण या वसाहती एकत्र येईनात. त्यांच्यांत जातीय भांडणें होतींच. शिवाय हिंदी व आफ्रिकन लोकांचाहि प्रश्न त्यांच्या पुढें होता. तथापि औद्योगिक प्रगतीकरतां एकत्र येण्यावांचून त्यांना गत्यंतरच नव्हतें. फेडरेशनची कल्पना त्याना पसंत पडणारी नव्हती. कारण ऑस्ट्रेलिया किंवा कानडांत त्या पद्धतीचें राज्य मोठेसें यशस्वी झालें नव्हतें. 'राजकीय दृष्ट्या जर अधिक निकट येण्याची संघटना अव्यवहार्यच ठरत असेल, तरच फेडरेशनसारखी उधळेपणाचा व कार्य-क्षमताविहीन अशी पद्धत समर्थनीय ठरते' * असें जेनिंग्स व यंग हे लेखकद्वय म्हणतात.

तेव्हां आफ्रिकेंत फेडरेशनसंबंधीं आतुरता फारशी दिसली नाहीं. त्यांना या चारहि वसाहतींचा एकजिनसी संघ करावयाचा होता. त्यासंबंधींचा पहिला प्रयत्न १८५८ सालीं झाला. १८७७ सालीं

---

*"Fedearation is an extravagant and inefficiant form of government to be justifed only where a closer form of organisation is politically impractica-ble" by jennings and young.*

*( Constitutional laws of British Empire. p.236*

' ॲक्ट ऑफ युनियन ' हा पासहि झाला. पण बोअर व इंग्लिश यांच्या भांडणांत हा संघ जीव धरूं शकला नाहीं. बोअर युद्ध होऊन जाईपर्यंत एक संघ बनविण्याचे सारे प्रयत्न वांझ ठरले. १९०७ सालीं लॉर्ड सेलबोर्न या हायकमिशनरनें एक योजना तयार केली व तींत संघाच्या नफ्यातोट्याची वाटाघाट केली. बोअर व इंग्लिश यांची वैरें शमलीं असल्यामुळें दोघेहि संयुक्त राज्याला तयार झाले. १९०८ सालीं त्यांची कन्व्हेंशन भरली व तेथें राज्यपद्धतीचा विचार झाला. कांहींनीं फेडरेशनबद्दल अनुकूलता दाखवली; पण बहुमत युनियनच्या बाजूचें होतें. चारहि वसाहतींचें एकच सभागृह असावें व त्यावर एकच सत्तेचें नियंत्रण असावें, असा वादविवादाचा सूर वहात होता. काळ्या लोकांचें काय करावें हा प्रश्नहि या चर्चेच्या वेळेला निघाला. त्या प्रश्नानें चांगलेंच भंडावून सोडलें. पण काळ्या लोकांना कोण विचारतो ? फेडरेशनमध्यें वर्णीय भांडणें कमी होतात आणि युनियनमध्यें जास्ती होतात असें नसल्याचें अनुभवी सांगूं लागले. शेवटीं 'फेडरेशन ' ऐवजीं ' युनियन 'च स्थापावी असें ठरलें. वसाहतींची सारी सत्ता हिरावून घेणें चांगलें नाहीं हें तडजोडीनें मान्य होऊन त्यांच्या हवालीं कांहीं कांहीं अधिकार करण्याचें कबूल केलें.

१९०९ च्या फेब्रुआरींत वरील धोरणानुसार झालेली घटना चारहि वसाहतींच्या सरकाराकडे मान्यतेकरतां पाठविण्यांत आली. त्यांत दुरुस्त्या वगैरे केल्या जाऊन मे महिन्यांत चारहि वसाहतींनीं आपली अनुकूलता व्यक्त केली. नाताळमध्यें तर साऱ्याच लोकांचें मत घेतलें गेलें. नंतर चारहि वसाहतींचे प्रतिनिधी लंडनला गेले, बादशहाना त्यांनीं विनंति केली व या विनंतिनुसार पार्लमेंटनें १९०९ चा दक्षिण आफ्रिकेचा कायदा केला.

दक्षिण आफ्रिका ही ' फेडरेशन ' नाहीं ' युनियन ' आहे. याचा अर्थ तेथें वरिष्ठपणा कोणाचा असेल तर तो मध्यवर्ती सत्तेचा आहे,

घटकांचा नाहीं. फेडरेशनमध्यें ज्याप्रमाणें घटक राज्यांना सत्ता विभागून दिली असतें व त्या सत्तेंत फेडरेशनला हस्तक्षेप करतां येत नाहीं, तसा प्रकार युनियनमध्यें नाहीं. कलम ५९ म्हणते "( Union ) Parliament shall have full power to make laws for the peace, order and good Government of the union." तडजोडीनें घटक वसाहतींना जी काय सत्ता मिळेल तीच त्यांना उपभोगतां येते. अशी सत्ता तेथं वाटून देण्यांत आलेली आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटला सुद्धां १९३१ च्या वेस्टमिन्स्टर कायद्यानंतर या युनियनकरता कायदे करण्याचा अधिकार नाहीं.

आफ्रिकेनें ही घटना बनवितांना बाह्यतः कितीहि सभ्यता दाखविली असली, तरी त्या घटनेमध्यें तेथील मालकांना म्हणजे आफ्रिकन लोकांना शक्य तितके कमी अधिकार मिळावेत म्हणून मोर्चेबंदी केली आहे. केप-कॉलनी ही सर्वांत वस्ताद आहे. तिनें फेडरेशनबद्दल आग्रह धरला होता. कारण काळ्या लोकांचा उपसर्ग फेडरेशनमुळें लागणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. पण ट्रान्सवॉल ही युनियनची मोठा आग्रही असल्या-मुळें ट्रान्सवालचें म्हणणें मान्य झालें. अर्थात काळ्या लोकांचा शक्य तितका कमी प्रवेश युनियनच्या पार्लमेंटांत व्हावा म्हणून मतदानाची लायकी वगैरे बाबतींत सर्व खबरदारी घेतली आहे. ज्या लोकांचा देश त्यांना मात्र तेथें हक्क नाहींत आणि हे परके लोक तेथें जाऊन राज्य करतात आणि घटनाहि बनवतात !

## आयर्लंड

वरील पांचहि वसाहती या खऱ्या वसाहती आहेत. इंग्लंडमधील लोक कानडा, न्यू फौंडलंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षीण आफ्रिकेंत गेले; तेथें त्यांनीं वसाहती केल्या आणि तेथील मूळच्या रहिवाशांची पर्वा न बाळगतां त्यांनीं आपल्या क्षेमस्थैर्य ऐश्वर्याकरतां घटना तयार केल्या' आयर्लंडचें तसें नाहीं. आयर्लंडच्या उत्तरेला म्हणजे अल्स्टरमध्यें इंग्रज वसाहतवाले जाऊन राहिले खरे पण त्यांना सारा आयर्लंड व्यापता

आला नाहीं. त्यांनीं फक्त अल्सटर प्रांत आपल्याकडे ठेवला आणि आजहि आयर्लंड स्वतंत्र झाला असला तरी उत्तर आयर्लंड हा स्कॉट-वेल्सप्रमाणें ब्रिटिश बेटांचा एक विभाग आहे.

आयर्लंडमध्यें ७०० वर्षेपर्यंत स्वातंत्र्याकरितां झगडा चालू होता. इंग्रजांनीं कोठेंहि केली नाहीं इतकी दडपशाही आयर्लंडमध्यें केली. जित व जेते यांची आघात व प्रत्याघाताचीं साधनें हिंसाप्रधान असल्यामुळें आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा झगडा हा रक्तरंजित झाला. शेवटपर्यंत इंग्रजांनीं आयर्लंडला तरवारीच्या पात्यावर खेळवलें आणि शूर आयरिशांनीं तितक्याच निकरानें इंग्लंडला तोंड दिलें. इंग्रजांनीं जसे आयरिश ठार करावेत तसें आयरिशांनीं इंग्लिश ठार करावेत. इंग्रजांनीं आयर्लंडच्या बाबतींत अत्यंत अन्याय व क्रूरपणा केला. इंग्लंडमधील मुत्सद्यांची बुद्धि एकंदरींत भ्रष्ट झाली होती असें दिसतें. नाहींतर त्यांना या देशांवर आग पाखडण्याचें कांहींच कारण नव्हतें. या प्रकारामुळें जगाचा इतिहास जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत इंग्रजांच्या दुष्कृत्याचा डाग पुसला जाणार नाहीं हें निश्चित आहे. १७८३ सालीं ग्रॅटनच्या नेतृत्वाखालीं आयरिशानीं प्रचंड चळवळ करून स्वतःच्या देशांत पार्लमेंट स्थापन करून घेतलें. आयर्लंडमध्यें प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक यांचें उभें वैर होतें. इंग्लंड प्रॉटेस्टंटाच्या बाजूचें होतें आणि आयर्लंड हें कॅथॉलिक ( अल्स्टर सोडून ) असल्यामुळें कॅथॉलिकावरील मतदानाचें, प्रतिनिधीत्वाचे हक्क मिळावे म्हणून झगडत राहिलें. १७८३ मध्यें पार्लमेंट स्थापन झालें खरें; पण कॅथॉलिकांना मतदानाचा हक्कहि नसल्यामुळें सत्ता प्रॉटेस्टंटाच्या हातीं गेली. त्यामुळें आयरिश लोक क्रुद्ध झाले. १७९८ सालीं वुल्फटोनचें बंड झालें. या बंडाला फ्रेंचांची मदत होती. इंग्रजांनीं ७०००० आयरिश ठार मारून हें बंड मोडून टाकलें आणि त्य बरोबरच आयर्लंडच्या स्वतंत्र पार्लमेंटाचें विसर्जन केलें. स्वार्थी आयरिश लोकांना नादी लावून, नोकऱ्यांचें वचन देऊन,अधिकाराची लालूच दाखवून त्यांच्याकडूनच आपल्याला स्वतंत्र पार्लमेंट नको असा कायदा करून

घेतला. १८०१ मध्यें ॲक्ट ऑफ युनियन पास झाला आणि आयर्लंडचे १०० प्रतिनिधी इंग्लंडच्या पार्लमेंटांत घेण्याचें ठरलें. पार्लमेंटांतील ६०० सभासदांत आयर्लंडचे १०० सभासद अडवणूकीशिवाय कांहींहि करूं शकत नव्हते. तेव्हां त्यांनीं 'होमरूल'ची म्हणजे आम्हांला स्वतंत्र 'गृहराज्य' पाहिजे अशी चळवळ सुरूं केली. ती चळवळ १०० वर्षांपेक्षां जास्त काळ चालवावी लागली. कधीं कधीं होमरूल बिल पास होण्याच्या बेतांत येई पण पुनः कांहीं तरी संकट येऊन तें लोटलें जाई. एकदां तर कॉमन्स सभेनें तें बिल पासहि केलें; पण लॉर्डसनीं तें फेटाळलें. अशा प्रकारें आयर्लंडच्या स्वातंत्र्याची वावडी हवेंत गिरक्या खातखात महायुद्धापूर्वी स्थिरावली. १९१२ सालीं होमरूल बिल पार्लमेंटांत आलें. त्या बिलामध्यें परराष्ट्रीय राजकारण, जकाती, संरक्षण, जमीनखरेदी व ६ वर्षेपर्यंत पोलीस इतकीं खातीं सोडून आयर्लंडला स्वराज्य द्यावयाचें बिलानें ठरविलें. पण अल्स्टरचें रहिवाशी म्हणू लागले, हें बील पास झाले तर आपण बंड करूं. त्यांनीं प्रतिकाराकरतां एक लाख स्वयंसेवक तयार केले. या स्वयंसेवकांना तोंड देण्याकरतां आयर्लंडनेंहि लाख स्वयंसेवकांची सेना तयार केली. अशा प्रकारें उभय सैन्यें उभी असतां महायुद्ध पुकारलें गेलें. इंग्लंड अडचणींत सांपडलें. आतां आयर्लंड काय करणार असा प्रश्न उत्पन्न झाला. पण आयर्लंड तर्फे रेडमंडनें ता. ३ ऑगस्ट १९१४ रोजीं इंग्लंडला मदत देण्याची पार्लमेंटांत घोषणा केली. या घोषणेमुळें व युद्धाच्या संकटामुळें इंग्लंडचा दृष्टिकोण बदलला आणि १९ सप्टेंबर १९१४ रोजीं फार वर्षें भिजत पडलेलें होमरूल बिल पास झालें. पण युद्ध संपेपर्यंत या बिलाचा अंमल करूं नये, अशी मेख त्यांत मारून ठेवली. आयर्लंडमधील लोक रेडमंडच्या वचनामुळें व इंग्लंडच्या कावेबाजपणामुळें खवळले. देशांत प्रतिकाराकरतां तयारी होऊ लागली. १९१६ ईस्टरचे अयशस्वी बंडहि झाले. त्यानीं सैन्य भरती विरुद्ध प्रचार केला.

युद्धसमाप्तीनंतर असल्या चिलाची आयर्लंडला यत्किंचित पर्वा वाटेनाशी झाली. त्यांना 'रिपब्लिक' पाहिजे होते. सिनफेन पक्ष त्याकरतां निर्माण झाला. इंग्लंडची स्थिती १९१८ सालीं फारच केविलवाणी झाली होती. महायुद्धांत पराभव पावण्याची पाळी त्यांच्यावर आली होती. तेव्हां आयर्लंडचा प्रश्न सोडविण्याकरतां एक परिषद भरविण्याचें त्यांनीं ठरविलें. ह्या परिषदेंत सिनफेनर्स पुढील अटीवर भाग घेण्यास तयार होते. १ पूर्ण स्वातंत्र्याचा विचार, २ बहुमतानें ठरलेल्या गोष्टी मान्य करूं अशी इंग्लंडनें अमेरिकेला व युरपला खात्री देणें, ३ प्रतिनिधींची निवड सर्व वयांत आलेल्या आयरिशांनीं करणें. पण या अटी मान्य झाल्या नाहींत. आयरिशांनीं त्यानंतर डेल एरीनची स्थापना केली. पार्लमेंटवर बहिष्कार घातला. १९१९ ते १९२१ पर्यंत अंगावर रोमांच उभे रहातील अशी भयंकर चळवळ तेथें झाली. शेवटीं त्यांच्या अनेक शतकांच्या त्यागाला व कष्टाला फळ येऊन २१ जून १९२१ रोजीं बादशहानें तहाकरतां आयर्लंडकडे विनंती केली. अशा प्रकारें आयर्लंडचा स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीचा थोडक्यांत इतिहास आहे.

आयर्लंडमध्यें घडत गेलेल्या घटना ह्या हिंदुस्थानला बऱ्याच प्रमाणांत लागू असल्यामुळें त्याचा विस्तारशः विचार करावयास हवा. आयर्लंडची घटना ही इतर वसाहतींच्याप्रमाणें नाहीं. तींत बरेंच वैशिष्ट्य व नाविन्य आहे. आयर्लंडच्या लढ्याची परिसमाप्ति तहानें झाली ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. तह हा समानतेच्या भूमिकेवरूनच होऊं शकतो; विषमतेच्या भूमिकेवरून होऊं शकत नाहीं. याचा अर्थ असा कीं, इंग्लंड व आयर्लंड यांचें जेते व जित असें जें नातें होतें तें संपलें आणि उभय राष्ट्रें बरोबरीचीं झालीं. ही समानता मान्य झाल्यानंतर मग दोघांचे संबंध काय असावेत हें तहान्वयें ठरविण्यांत आलें. हा तह शब्द उगाच गौरवार्थ वापरला नसून तो पार्लमेंटनें मान्य केला आहे.

बादशहांच्या घोषणेनंतर त्यावेळचे मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांनीं



२

डी. व्हॅलेराला आपले प्रतिनिधी लंडनमध्यें पाठविण्याबद्दल पत्र पाठविले. डी. व्हॅलेरानें या पत्राप्रमाणें ग्रिफिथ, कॉलीन्स प्रभृतींना वाटाघाटीकरतां लंडनला पाठविलें. तेथें तह झाला; पण आयर्लंडच्या डेल एरीनमध्यें ह्या तहाला मान्यता घेणें जरुर होते. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ज्या डी. व्हॅलेरानें ग्रीफीथ कॉलीन्सला तहाच्या वाटाघाटीकरतां लंडनला पाठविलें, तो डी. व्हॅलेरा तह करून आलेल्या पुढाऱ्यावर उलटला. आपल्याला तह मान्य नाहीं, आयर्लंडमध्यें रिपब्लिक स्थापन केलें पाहिजे असें तो म्हणूं लागला. रिपब्लिकच स्थापावयाचें होतें तर लंडनला प्रतिनिधी पाठविण्याचा मूर्खपणा डी. व्हॅलेराला करण्याचें कारण नव्हतें. पण डेलनें डी. व्हॅलेराविरुद्ध कॉलीन्स ग्रीफीथना पाठिंबा दिला व हा तह ६४ विरुद्ध ५७ मतांनीं पास झाला.

आयर्लंडची मान्यता मिळाल्यानंतर इंग्लंडच्या पार्लमेंटांत ह्या तहाला मान्यता घेणें जरूर होतें. इंग्लंडच्या पार्लमेंटांत ह्या तहाला कायदेशीर स्वरूप देण्याकरतां एक कायदा ता. ३१ मार्च १९२२ रोजीं पास झाला. कायदा झाल्यानंतर आयर्लंडांत तात्पुरती सत्ता निर्माण करणें जरूर होतें. नाहीं तर ह्या तहाच्या अटी अंमलांत कोण आणणार ?

तहाच्या १७ व्या कलमांत बारा महिने अस्तित्वांत रहाणाऱ्या तात्पुरत्या सरकारची योजना केली होती. हें तात्पुरतें सरकार कोणाचें बनवावयाचें ? इंग्लंडच्या पार्लमेंटांत पाठविण्याकरितां जे सभासद निवडून आले असतील त्यांचें पार्लमेंट बनवावयाचें होते. या पार्लमेंटाचीं सभा ताबडतोब बोलावून त्यांतून एक तात्पुरतें सरकार स्थापन करावयाचें, हें तात्पुरतें सरकार आयरिश पार्लमेंटला जबाबदार रहावयाचे व त्या सरकारचे हातांत ब्रिटिशांनीं सत्ता द्यावयाची असें ठरविण्यांत आले. संक्रमणावस्थेंतील तरतूदी ह्या अशा प्रकारें करण्यांत आल्या. त्याचा पाया इंग्लिश पार्लमेंटांत निवडून जाणारे सभासद समजण्यांत आला. आयरिशांचें या वरील भाष्य स्वतंत्र होतें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत 

यानंतरचा प्रश्न आयर्लंडची घटना बनविण्याचा होता. आयर्लंडची घटना आयरिश लोकानींच बनविली पाहिजे असें सिनफेन पक्षाचें फार दिवसांचें म्हणणें होतें. १ नोव्हेंबर १९१७ रोजीं सिनफेन पक्षानें आपल्या सभेंत ही गोष्ट स्पष्ट केली. 'सिनफेनचें ध्येय स्वतंत्र आयरिश रिपब्लिकला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविणें हें आहे. हा दर्जा मिळाल्यावर आयरिश लोक रेफरेंडमनें आपली राज्यघटना ठरवतील. हा हेतु साध्य करण्याकरतां आयरिश लोक ब्रिटिश किंवा कोणत्याहि परक्या सत्तेला आपल्याकरतां कायदे करण्याचा हक्क देणार नाहींत.....आयरिशांच्या हिताच्या दृष्टीनें राज्यघटना तयार करावी म्हणून सिनफेनच्या कार्यक्रमाप्रमाणें घटना परिषद (Constituant assembly) बोलावली जाईल.*

आयर्लंड व इंग्लंड यांच्यामध्यें जो तह झाला, त्यांत आयरिश पार्लमेंटानें घटनापरिषद बोलवावी व आपली घटना तयार करावी असें कलम नाहीं. पण आयर्लंडचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आल्या-नंतर घटना कशी बनवावी हें स्वतंत्र कलमानें निर्दिष्ट करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. पण जी घटना आयरिशांनीं केली तिला इंग्लिश पार्लमेंटानें कानामात्रेचा फरक न करतां मान्यता दिली. ह्या घटनेंत तहाच्या अटीशीं विसंगत अगर विरोधी कांहीं असेल तर तें आपोआप रद्द होईल, असें म्हटलें होतें. तेव्हां घटना बनविण्याचा हक्क हा सर्वस्वीं आयरिशांचा असल्यामुळें व तो ब्रिटिश पार्लमेंटानें मान्य केल्यामुळें त्याचा निराळा उल्लेख अनवश्यक होता. ब्रिटिश पार्लमेंटानें ती घटना मान्य करावयाची होती व ती त्यांनीं केलीहि.

आयरिशांचे जुन्या कायद्याप्रमाणें नवें पार्लमेंट निवडणुकीनंतर स्थापन झालें व तेंच पार्लमेंट घटनापरिषद या नात्यानें बसलें. ९ सप्टेंबर १९२२ रोजीं घटना परिषद भरली व तिनें आयर्लंडची घटना तयार केली. ह्या

*आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास पान ८७.

घटनेला परिशिष्टांत स्थान मिळालें व या परिशिष्टासह पार्लमेंटनें १९२२ चा ' आयरिश फ्री स्टेट कॉन्स्टीटयुशनचा ' कायदा केला. बादशहानें त्या कायद्याला ५ डिसेंबर १९२२ रोजीं मान्यता दिली.

या घटनेमध्यें व पार्लमेंटच्या कायद्यामध्यें कोणकोणत्या कलमाचा अंतर्भाव करण्यांत आला आहे, हें आपण पुढें पाहूं. पण आयर्लंडमध्यें झालेल्या एकंदर घटनामध्यें आपल्याला पुष्कळ घेण्यासारखें आहे.

प्रथम आयर्लंड व इंग्लंडचा समानतेच्या नात्यानें झालेला तह हा लक्षांत घेतला पाहिजे. हा तह झाल्यामुळें आयर्लंडला कोणत्याहि अश्वासनांची अगर जाहीर घोषणाची जरूरी उरली नाहीं. त्याचा ब्रिटिश साम्राज्यांतील दर्जा या तहान्वयें स्पष्ट झाला. आयर्लंड हें स्वतंत्र राज्य आहे असें पार्लमेंटनें मान्य केलें. त्यानंतर दोन प्रश्न सुटावयाचे होते. इंग्लिशांनीं आपली सत्ता कोणाच्या ताब्यांत द्यावयांची याचाच अर्थ संक्रमण कालांत काय व्यवस्था करावयाची हा त्यापुढील प्रश्न होता. त्याची विल्हेवाट कशी लावली हें आपण पाहिलें. त्यानंतरचा प्रश्न घटना तयार करण्याचा त्यांत ब्रिटिशांचा बिलकूल संबंध ठेवला नाहीं. आयरिश लोकांनीं पूर्वीच्या निवडणूकपद्धतीच्या आधारावर घटना परिषद बोलावली, आपली घटना तयार केली व ती ब्रिटिश पार्लमेंटला जशीच्या तशीच मान्य करावयास लावली. आयर्लंडच्या लढ्याचें थोडक्यांत असें स्वरूप आहे.

अशा प्रकारें आपण कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू फौंउलंड, न्यूझीलंड दक्षिण आफ्रिका व आयर्लंड यांच्या राजकीय विकासांचा इतिहास थोडक्यांत अवलोकन केला. या इतिहासावरून त्या त्या वसाहती अंतर्गत कारभाराच्या बाबतींत पूर्णपणें स्वतंत्र झाल्या असें आपणास कळून आलें. त्यांच्या घटना त्यांनींच तयार केल्या. या घटना घटना परिषदेसारख्या परिषदांच्या मार्फत तयार केल्या गेल्या. वसाहतीच्या वाढीचा हा इतिहास हिंदुस्थानला पुष्कळच उद्बोधक होईल. ह्या इति-

हासावरून आपणास असेंहि दिसून येते कीं, मुख्य मुख्य वसाहतीमध्यें एकच प्रकारची राज्यपद्धत नाहीं.भिन्न भिन्न प्रकारची योजना त्यांत दिसते. कानडांत फेडरेशन आहे, तर ऑस्ट्रेलियांत कॉमनवेल्थ आहे, आफ्रिकेंत युनियन आहे तर आयर्लंडात फ्री स्टेट आहे. शेवटच्या दोन राष्ट्रांत फेडरेशन्स नाहींत. आयर्लंड लहान देश असल्यामुळें तेथें फेडरेशनची जरूरी नाहीं. उत्तर आयर्लंड अगर अल्स्टर प्रांत त्यांत समाविष्ट झाला तर फेडरेशन त्यांना करावें लागेल. आफ्रिकेंत फेडरेशन करणें अवश्य असतांहि त्यांनीं फेडरेशन केलें नाहीं. कानडामध्यें व आस्ट्रेलियांत फेडरेशन्स आहेत. पण कानडांचें फेडरेशन हें ऑस्ट्रेलियापेक्षां निराळें आहे. बाकीच्या ज्या दोन वसाहती आहेत त्यांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. अशा प्रकारें चार वसाहतींत चार प्रकार आपणास आढळून येतात.

नगर वाचनालय सातारा
नगर वाचनालय
ता.
सातारा

# भाग ३ रा.

## वसाहतींतील अंतर्गत स्वातंत्र्य

डोमिनिअन स्टेटस याचा अर्थ सर्वसामान्यपणें वसाहतींचा दर्जा असा करण्यांत येतो. पण तो अर्थ बरोबर नाहीं. कॉलनी व डोमिनिअन हे शब्द समानअर्थी नाहींत. डोमिनियन याचा अर्थ वरिष्ठ सत्ता सार्वभौमसत्ता असा आहे. तो अर्थ ' वसाहतीच्या दर्जा'नें व्यक्त होत नाहीं. इंग्रज लोकांनीं बाहेर देशांत वसाहती स्थापल्या अगर जिंकल्या आणि तेथील वसाहतवाल्यांना कांहीं मर्यादेपर्यंत स्वयंशासनाचे अधिकार दिले पण प्रथम सार्वभौम सत्ता ही इंग्रजांनीं आपल्या हातीं ठेवली होती त्यामुळें वसाहती ह्या कांहीं काळ दुय्यम, गौण, कनिष्ठ दर्जाच्या होत्या वसाहतींनीं बरींच वर्षे कमी प्रतीच्या दर्जानें काढलीं; पण महायुद्धानंतर वसाहती ह्या ब्रिटिश सरकारच्या बरोबरीच्या मानण्यांत येऊं लागल्या आणि त्यामुळें पूर्वी वसाहतींचें स्वराज्य म्हणण्यांत जी कनिष्ठ प्रकारची भावना होती ती नष्ट होऊं लागली. तेव्हां आपणहि वसाहतीच्या स्वराज्याला गौणत्वाचा अर्थ चिकटला आहे हें लक्षांत ठेवावें आणि 'डोमिनिअन स्टेटस' म्हणजे सार्वभौमत्वाचा, आधिपत्याचा दर्जा असा अर्थ समजावा, हें जास्त

चरे. डोमिनियन शब्दानें व्यक्त होणाऱ्या हीनत्वाच्या भावनेमुळें गैरसमजाच्या भावनेला जागा राहते. काँग्रेसमध्यें डोमिनिअन स्टेटससंबंधीं कांहींची ही भावना आहे. पण वसाहतींचा दर्जा हा १९३१ नंतर ब्रिटिश सरकारच्या बरोबरीचा समजण्यांत येत असल्यामुळें त्या शब्दानें बिचकून जाण्याचें कारण नाहीं. ब्रिटिशांच्या बरोबरीचा दर्जा असणें यांत कमीपणा असतां कामा नये.यावर कोणी असें विचारतील कीं,ग्रेट ब्रिटनला डोमिनिअन स्टेटस आहे असें म्हणता येईल का ? ग्रेटब्रिटन ही साम्राज्यसत्ता आहे; ती वसाहतसत्ता नाहीं. सर्व सत्तेचें मूळ ग्रेट ब्रिटन आहे. तेव्हां ग्रेट ब्रिटनला हा शब्द लावतां येणार नाहीं. मुलगा बरोबरीचा झाल्यामुळें वडील जसें मुलाला सारखेपणानें वागवतात, तसा संबंध साम्राज्यसत्ता व वसाहतींची सत्ता यांचा आहे. एखादी नदी मुळांत लहान असते. तिला अनेक नद्या येऊन मिळतात; पण तेवढयानें दोहोंत उच्चनीचपणा मानण्याचें कारण नाहीं. मूळ नदीला उपनद्यांचें नांव देतां येत नाहीं. ग्रेटब्रिटनला डोमिनिअन न म्हणण्याचें कारण एक तर ती प्रचलीत अर्थानें कोणाची वसाहत नाहीं; आणि दुसरे असें कीं, ग्रेट ब्रिटनच्या साम्राज्यसत्तेखालीं अद्याप अनेक अंकित देश आहेत. त्यामुळेंहि हा शब्दप्रयोग त्यांना लागू होणार नाहीं.

डोमिनिअन स्टेटस ऊर्फ ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीबरीचा दर्जा म्हणजे काय याचा आपण आतां विचार करूं. डोमिनिअन स्टेटस ही कांहीं एक ठराविक राज्यपद्धत नाहीं; तिची घटनाहि ठरलेली नाहीं. विद्यमान राजकीय घटनेला कायदेशीर मान्यता असें तिचें विवरण करतात. त्यामुळें अमुक देशाला हा दर्जा प्राप्त झाला म्हणजे त्या देशाला सर्वसंमत अशी एखादी घटना दिली असा अर्थ होत नाहीं. ही घटना प्रत्येक वसाहतींत क्रमाक्रमानें विकसित होत गेलेली आहे. म्हणून अमुक देशाला आधिपत्याचा दर्जा आहे एवढयावरून त्या देशाची घटना विशिष्ट प्रकारची असली पाहिजे असें नाहीं. निरनिराळ्या वसाहतींनीं आपले हक्क झगडून भांडून कधीं कायद्यानें व जास्त रूढीनें प्रस्थापित करून घेतले आहेत. आणि

आपापल्या परिस्थितीप्रमाणें आपल्या घटना बनविल्या आहेत. अशा प्रकारची दर्जासंबंधींची अनिश्चितता फार वर्षे चालू होती. साम्राज्य-सरकार ह्या वसाहतींना आपल्या अंकित समजत असे; आणि वसाहती स्वतःला स्वतंत्र मानीत असत. पण १९१४ चें महायुद्ध झालें आणि वसाहतींनीं ह्या प्रश्नाची शहानिशा करून घेण्याचें ठरविलें. वसाहतींना चार प्रश्नांचीं उत्तरें पाहिजे होतीं. (१) अन्तर्गत कारभाराबद्दल त्यांचे हक्क. (२) आंतरराष्ट्रीय संबंधाविषयीं त्यांचा दर्जा. (३) साम्राज्य-सरकारशीं त्यांचा संबंध. (४) दुसऱ्या वसाहतींशीं त्यांचें नातें.* साम्राज्य सरकार; इतर देश; दुसऱ्या वसाहती ह्या तीन राष्ट्राबाहेरील संबंधाचें महत्त्व युद्धाचे वेळीं जास्त तीव्रतेनें त्यांना भासूं लागलें.

अंतर्गत सत्ता पूर्णपणें हातांत आल्याशिवाय बाहेर देशांचे प्रश्न हे उद्भवतच नाहींत. जर स्वतःच्या देशांत वसाहतींना स्वातंत्र्य नसेल, तर बाहेरच्या देशांत त्यांना कोण विचारणार? स्वतःच्या देशावर पूर्ण सत्ता असणें हा आधिपत्याच्या दर्जाचा आत्मा आहे. ही सत्ता कोणत्याहि कारणानें मर्यादित होतां कामा नये. ती सत्ता जर नसेल आणि बाहेरचें एखादें सरकार त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करीत असेल, तर त्या देशाला स्वराज्य मिळालें आहे असें समजण्याचें कारण नाहीं. प्रत्येक देशांत कमीअधिक प्रमाणांत गुंतागुंतीचे प्रश्न असतात. जितका देश मोठा तितके प्रश्नहि जास्त भानगडीचे. निरनिराळ्या जाती, धर्म, वर्ग, या सर्वांना सुरक्षितपणा वाटेल अशा प्रकारें ते प्रश्न सोडवावे लागतात. व्यापारधंदे, संरक्षण, प्रजेचे मूलभूत हक्क वगैरेसारखे किती तरी प्रश्न प्रत्येक राज्याच्या कारभारांत उद्भवतात. ह्या प्रश्नांत जर परकीय सत्ता अगर साम्राज्यसत्ता हस्तक्षेप करूं लागली तर त्या देशाचें स्वातंत्र्य हें खोटें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

*Internal: International; Interimperial; Inter Dominions.

१९१४ सालापूर्वी आज ज्या स्वयंशासित वसाहती दिसतात, त्या स्वतंत्र नव्हत्या. त्या वसाहतींत जबाबदार शासन राज्यपद्धति होती; पण जबाबदार राज्यपद्धती याचा अर्थ स्वातंत्र्य आहे असा करतां येत नाहीं. साम्राज्यसरकार त्यांच्या हक्कामध्यें ढवळाढवळ करूं शकत असे. वसाहतींना कायदे करण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य नसे. इंग्लंडचे राजे आपल्या मंत्र्याच्या सल्ल्यानें वसाहतींत पास झालेला एखादा कायदा अमांन्य करूं शकत. एखाद्या देशाशीं युद्ध पुकारणें किंवा तह करणें हें वसाहतीच्या गव्हर्नर जनरलचे अधिकारांत येत नसे. ती सत्ता राजाला असे. राजे वसाहतीतर्फे युद्ध जाहीर करूं शकत असत. १९३९ सालीं ज्याप्रमाणें हिंदुस्थानच्यातर्फे जर्मनीबरोबर साम्राज्यसरकानें युद्ध पुकारलें, त्याप्रमाणें १९१४ सालीं वसाहतीतर्फे ब्रिटिश सरकारनें त्यांना न विचारतां युद्ध जाहीर केलें. पण वसाहतींच्या कायद्याप्रमाणें वसाहती बांधल्या गेल्या होत्या. साम्राज्यसरकारनें त्यांच्यातर्फे युद्ध जाहीर केलें, म्हणून त्या युद्धांत भाग घेण्याची कायदेशीर अगर रूढीनें प्रस्थापित अशी जबाबदारी त्यांच्यावर नव्हती. त्यामुळें साम्राज्यसरकारनें कांहींहि ठरविलें असलें तरी वसाहतींनीं आपल्या मदतीच्या मर्यादा निश्चित केल्या.

युद्धाप्रमाणेंच तहाचेंहि आहे. लहानसहान किरकोळ बाबतींत वसाहतींना तह अगर करारनामे करावे लागत. अमुक वसाहतीची मासळी कोणी घ्यावी, कोणत्या देशाच्या मालावर जकाती बसवाव्या, असे क्षुल्लक प्रश्न निर्माण झाले तरी साम्राज्यसरकार पूर्वी त्यांत आपली सत्ता गाजवित असे. वसाहतींनीं केलेल्या तहांना राजा आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें मान्यता देई आणि तो तह पाळण्याची जबाबदारी आपली आहे असें मानी. अशा प्रकारें स्वतःच्या देशांतले कायदे असोत किंवा बाहेर देशाबरोबर तहयुद्ध असो, साम्राज्याच्या रथाला वसाहती जुंपलेल्या असत.

ही परावलंबी स्थिति वसाहतींना असह्य झाली, म्हणून महायुद्धाच्या चार वर्षांच्या काळांत वसाहतींनीं तक्रार केली. त्यापूर्वी १९११ मध्यें

राज्ञ० १०३ अ



साम्राज्यपरिषद भरली होती. त्या परिषदेंत वसाहतींना जागा देत. महायुध्दाचे वेळीं भरलेल्या परिषदेंत वसाहतींनीं आपल्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला आणि आपण ब्रिटिश साम्राज्याच्या अंकित नसून बरोबरीच्या आहोंत असें ठरवून घेतलें. युद्धाचें वेळीं स्थापन झालेल्या साम्राज्ययुद्धमंडळांत वसाहतींना घेतलें होतें. युद्ध-समाप्तीनंतर जेव्हां पॅरिसला शांततापरिषद भरली, तेव्हां वसाहतींनीं असा हट्ट धरला कीं, आम्हाला त्या परिषदेंत स्वतंत्र प्रतिनिधित्व पाहिजे. ही त्यांची मागणी मान्य झाली. त्यांनीं स्वतंत्र राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून त्या तहावर सह्या केल्या. पुढें स्थापन झालेल्या राष्ट्रसंघांतहि हे वसाहतींचे ( न्यू फौंउलंडशिवाय ) प्रतिनिधी तहपरिषदेचे सभासद म्हणून आपोआप गेले आणि अशा प्रकारें त्यांना जगांतील देशांत स्वातंत्र्याचें स्थान मिळून त्यांचा स्वतंत्र दर्जा मान्य करण्यांत आला.

१९१९ च्या शांततापरिषदेंत आणि नंतर राष्ट्रसंघांत हिंदुस्थानला स्वतंत्र जागा दिली, यावरून हिंदुस्थानचा स्वतंत्र दर्जा मान्य करण्यांत आला असें कांहीं कायदेपंडित म्हणतात. कोर्टांत मांडावयाला अगर कागदावर लिहावयाला हा मुद्दा ठीक आहे; पण ब्रिटिशांनीं अद्याप ही समानता कृतींत उतरवली नाहीं हें आपण जाणतोच.

वसाहतींच्या इतिहासांत १९२६ हें साल खरें महत्त्वाचें आहे. या सालांतच वसाहतींचा दर्जा स्पष्टपणें जाहीर करण्यांत आला. वसाहती व साम्राज्यसत्ता यांच्यामध्यें अगदीं कायदेशीर रीत्या शासित व शास्ते असा पूर्व संबंध असला तरी आणि परराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतींत ब्रिटिश सरकारला जरी वरिष्ठपणाचा अधिकार चालवावा लागत असला तरी वसाहती व साम्राज्यसत्ता यांच्यामध्यें समानता आहे हें निश्चित ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें वसाहतींना अंतर्गत कारभागांत पूर्ण स्वातंत्र्य आहे असें मान्य करण्यांत आलें. पण युद्धासारख्या समान हितसंबंधांचे प्रसंगीं कायदेशीर हक्कासंबंधीं न भांडतां परस्परांनीं आपसांत करार

करून त्या गोष्टींचा निर्णय लावावा असें ठरलें. ' ग्रेट ब्रिटन व अधिराज्यें ह्या ब्रिटिश साम्राज्यांतील स्वयंशासित संस्था ( Communities ) आहेत; दोघांचा दर्जा सारखा आहे; वसाहती व ग्रेट ब्रिटन राजाच्या समान निष्ठेनें जरी संलग्न झाल्या असल्या आणि ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नॅशन्समध्यें त्या स्वेच्छेनें सभासद म्हणून एकत्र आल्या असल्या तरी अंतर्गत किंवा परराष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतींत एक दुसरीपेक्षां कनिष्ठ दर्जाची नाहीं. '*

वसाहतींना अंतर्गत बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य होतें असें वर सांगितलें आणि १९२६ च्या घोषनेनें त्यांना साम्राज्यांतहि समानतेचा दर्जा मिळाला असें आपण पाहिलें. या दोन प्रश्नाबरोबरच जगांत, राष्ट्रसंघांत आणि परस्परांत वसाहतींना स्थान कोणतें हें आपण बघितलें पाहिजे. तेव्हां आपण प्रथम अंतर्गत बाबतींत त्यांना जें संपूर्ण स्वातंत्र्य आहे म्हणतात, तें कितपत खरें आहे व त्याला कांहीं मर्यादा आहेत कीं काय हें बघूं.

वसाहतींत सारी सत्ता राजाची ( म्हणजे पार्लमेंटची ) हा मूळ सिद्धांत. राजाचीं कामें तीन. १ कायदे करणें, २ कायद्यांची अंमलबजावणी करणें, ३ न्याय देणें. हीं तीनहि कामें पूर्वी वसाहती आणि साम्राज्यसरकार कडून होत असत. इंग्लंडांतील प्रीव्ही कौंसिलकडे अपिलें जाणें हें अंत-

---

**Great Britain and the Dominions are autonomous communities within the British Empire equal in status, in no way subordinate one to another in any aspect of their domestic or external affairs, though united by a common allegiance to the crown, and freely associated as members of the British Commonwealth of Nations.*

*Balfour declaration 1926.*

गेंत स्वायत्ततेला कमीपणा आणणारें असे; तसेंच राजेसाहेबांनीं आपल्या मंत्रिमंडळाच्या सहाय्यानें वसाहतींचीं बिलें मंजूरनामंजूर करणें हाहि गौणत्वाचा प्रकार आहे. अंमलबजावणीच्या बाबतींत साम्राज्यसरकारनें आपण नेमलेल्या गव्हर्नरच्या द्वारें ढवळाढवळ करणें हेंहि स्वायत्ततेला मुरड घालणारें कृत्य आहे. पण वसाहतींत जेव्हां जबाबदार राज्यपद्धत सुरू झाली, तेव्हां राजाचा प्रतिनिधी जो गव्हर्नर त्यांची सत्ता काढून घेऊन ती मंत्रिमंडळाच्या हातीं देण्यांत आली. त्यामुळें वसाहतींत पास झालेलें एखादें बिल राजा नाकारीनासा झाला. न्यायाधिशांची नेमणुक वसाहत मंत्रिमंडळ करूं लागलें, त्यामुळें न्यायदानावरील ब्रिटिश पार्लमेंटचा ताबा संपला. तथापि प्रिव्हिकौंसिलकडे अपिलें पाठविण्याची जुनी परंपरा नष्ट झाली नाहीं. तसेंच गव्हर्नरनीं वसाहतमंत्र्यांचा सल्ला ऐकलाच पाहिजे. असा कायदाहि करण्यांत आला नाहीं. परंपरेवर सर्व भिस्त असे. त्यामुळें जुना सांगाडा कायम राहिला; पण त्याचें स्वरूप नव्या रूढीनें बदलून टाकलें. पार्लमेंटचा हा अंतर्गत कारभारांत विशिष्ट प्रसंगीं लुडबूड करण्याचा अधिकार सर्वच वसाहतींना तापदायक व चीड आणणारा वाटूं लागला. १९२६ पासून १९३० पर्यंत वसाहतींनीं खटपटी करून साम्राज्यसरकारचें अंतर्गत कारभारांतील स्थान नष्ट केलें. पण इतकें असून सुद्धां कांहीं कांहीं प्रसंगच असे उद्भवतात कीं, ज्या वेळीं साम्राज्यसरकारला मध्यें पडावें लागतें; आणि त्यामुळें संपूर्ण स्वातंत्र्याचा अंमल हा अपुराच आहे असें म्हणणें भाग पडतें. *

---

**Even yet the establishment of Complete sovereignty in the sense of independence of Imperial intervention is not wholly complete. But the essential elements of such sovereignty have been attained. A. B, Keith page 16 constitutional law of British Dominions.*

वसाहतींना कोणकोणत्या बाबतींत किती स्वातंत्र्य आहे अगर असावयास पाहिजे हें पाहिलें पाहिजे.

## गव्हर्नर जनरल

संपूर्ण स्वातंत्र्याला पहिला व सर्वांत मोठा अडथळा करणारा गव्हर्नर जनरल. हा गव्हर्नर जनरल पूर्वी राजेसाहेब ब्रिटिश मंत्र्यांच्या सल्लयानें नेमीत असत. तो स्वतः ला राज्यकारभाराचा प्रमुख समजत असे आणि स्थानिक परिस्थितीनुरूप वागण्याऐवजीं इंग्लंडच्या हितसंबंधांना अनुसरून कारभार चालवी. ही घटना अत्यंत अनुचित व स्वातंत्र्याला मारक असे.

त्याशिवाय तो स्थानिक कारभारांतहि ढवळाढवळ करी. १९२६ सालीं वसाहतींची परिषद भरली असतां या प्रश्नाची चर्चा झाली. त्या वेळीं कानडाचें एक उदाहरण त्यांच्यापुढें होतें. कानडाचा गव्हर्नर-जनरल लॉर्ड बिंग यानें तेथील मुख्य प्रधानानें पार्लमेंटगृह बरखास्त करा व नव्या निवडणुका करा असें सांगितले असतां ऐकलें नाहीं. इंग्लंड-मध्यें मुख्य प्रधानाच्या सल्ल्यानें राजा वागतो; त्याप्रमाणें राजाच्या प्रतिनिधीनें वागावयास पाहिजे. लॉर्ड बिंगनें विरोधी पक्षाचा नेता जो मैधन त्याचें ऐकून त्याला मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें. त्यानें मंत्रिमंडळ बनविलें, पण त्याला तें टिकवितां येईना. तेव्हां शेवटीं नाइलाज म्हणून लॉर्ड बिंगनें फेर निवडणुकांचा हुकूम दिला. त्यांत जुना पक्षच बहुमतानें निवडून आला. अशा प्रकारें लॉर्ड बिंगनें पार्लमेंटरी परंपरा मोडून जो पक्षपातीपणा केला, त्याविरुद्ध १९२६ च्या परिषदेंत मत व्यक्त झालें. गव्हर्नरजनरलनें मुख्य प्रधानाच्या सल्ल्याप्रमाणें चाललेंच पाहिजे, असें तेव्हां ठरलें. पण त्यापुढें एक अडचण उरली होती. ग. जनरलची नेमणूक इंग्लंडच्या राजानें तेथील पार्लमेंटच्या सल्ल्यानें करावी असा कायदा असे. तथापि प्रत्यक्ष व्यवहारांत डोमिनिअन्सच्या सल्ल्यानेंच राजा ह्या नेमणूका करीत असे. आयर्लंडच्या फ्री स्टेटची पहिली नेमणूक आयरिश पार्लमेंटच्या सल्ल्यानें झाली. त्यामुळें जुना शिरस्ता मोडला.

ग. जनरल हा इंग्लिश पार्लमेंटचा प्रतिनिधी नसून राजाचा प्रतिनिधी आहे असें १९२६ च्या परिषदेंत ठरलें. पण त्यांत एक कायदेशीर अडचण आली. ग. जनरलची नेमणूक वसाहतमंत्र्यांच्या सहीशिक्क्या-निशीं व्हावी लागे. पण ही मामुली अडचण दूर करणें कठीण नाहीं असें ठरलें आणि वसाहतमंत्र्यांच्या सहीशिक्क्याची अट काढून टाकली गेली. एतावता ग. जनरल हा वसाहतींच्या इच्छेनें नेमला जावा व त्याला राजानें संमती दिलीच पाहिजे असें मान्य करण्यांत आलें.

यांत दुसरी एक अडचण असे. पण ती अंतर्गत आहे. मंत्रिमंड-ळानें एखादें नांव सुचविलें, तर विरोधी पक्ष त्याविरुद्ध आरडाओरड करी. उद्यां हिंदुस्थानांत जर बहुमताच्या कॉंग्रेसनें एखाद्या ग. जनरलचें नांव सुचविलें तर विरोधी पक्ष ओरड करील. अशी ओरड ऑस्ट्रेलियांत झाली. पण त्याला इलाज नाहीं.

अशा प्रकारें स्वायत्त वसाहतींत ग. जनरल हा मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें नेमला जातो व त्यांच्याच सल्ल्यानें काढला जातो. ए. बी. कीथ म्हण-तातः–The Dominions enjoy now virtually unfettered freedom in selecting and removing the head of the Executive subject only to such moderating influence as might be exercised by the King, by whom appointment and removal must formally be approved*

वसाहतींमध्यें ग. जनरल हा लोकांच्या निवडीनुरूप नेमला जातो व वागतो. वसाहती जर पूर्णपणें स्वतंत्र आहेत, तर राजाच्या सल्ल्यानें तरी ग. जनरल कां नेमावा असा प्रश्न विचारला जाईल. पण वसाहतींनीं राजाचें अस्तित्व मान्य केलें आहे. हें अस्तित्व जोंपर्यंत झुगारून दिलें

---

*Constitutioal law of British Dominions by A. B. Keith page 18.*

नाहीं, तोंपर्यंत त्याचा प्रतिनिधी असणें हें क्रमप्राप्तच आहे. पण आयर्लंडनें त्यापुढें उडी मारून ग. जनरलचें अस्तित्वच अमान्य केले.

## बिलावर नियंत्रण

यानंतरचा प्रश्न बिलसंबंधींचा. एखादें बिल कायदेमंडळानें मान्य केलें तर तें बिल ग. जनरल राजाच्या संमतीकरतां पाठवूं शके. सर्वच बिलें पाठवावीं लागत असें नाहीं. कांहीं बिलें ग. जनरल आपल्या अधिकारांत फेटाळूं शके; पण त्याच्यावर गहजब उडे. पण ग. जनरलला जर तशीच कांहीं शंका आली तर तो राजाच्या मान्यतेकरतां बिलें राखून ठेवी. तें बिल मान्य करणें अगर अमान्य करणें हें राजेसाहेब मंत्र्यांच्या सल्ल्यानें ठरवीत असत. हे मंत्रि राजाला असाहि सल्ला देऊं शकत कीं, त्या बिलांत इतके इतके फेरफार करावेत. पण काहींहि असलें तरी वसाहतींच्या सार्वभौमत्वाचा दर्जा त्यामुळे बाधित होई. म्हणायच्या स्वतंत्र वसाहती आणि त्यांनीं हुकूम मानायचा इंग्लंडच्या पार्लमेंटचा! हें वसाहतींना विसंगत वाटलें. १९२६ च्या परिषदेंत त्यांनीं ह्या प्रश्नाची चर्चा केली. पण त्यांना त्या वेळीं ब्रिटिश पार्लमेंटचा हा हक्क हिरावून घेण्याइतकें धाडस झालें नाहीं. घटना दुरुस्ती किंवा इतर महत्वाचे प्रश्नांत ब्रिटिश मंत्र्याना हात घालूं नका असें कसें सांगावें हें त्यांना कळेना.

पण १९२९ च्या परिषदेंत वसाहती अधिक धाडशी झाल्या. येथें एक गोष्ट सांगणें जरूर आहे. ग. जनरलची किंवा इतर ज्या सूचना झाल्या व दुरुस्त्या केल्या गेल्या, त्यांत कानडानें पुढाकार घेतला होता. कानडाच्या पुढाकारामुळें नंतर आफ्रिका धीट झाली आणि शेवटीं आयर्लंडनें तर कोणालाच भीक घातली नाहीं. १९२९ च्या परिषदेंत असें ठरलें कीं, राजानें गव्हर्नर जनरलला अमुक बिल माझ्या संमती-करतां राखून ठेवा असें सांगणें योग्य नाहीं. मंत्र्यांनींच जर हें बिल राजाच्या संमतीकरतां ठेवा असें गव्हर्नरला म्हटलें तर वेगळें. अशा राखीव बिलाचा निकाल वसाहतसरकारच्या सल्ल्यानें करावा. ब्रिटिश पार्लमेंटच्या सल्ल्यानें करता कामा नये. कांहींहि असलें तरी वसाहत

सरकारचें म्हणणेंच हें शेवटलें समजण्यांत यावें, पार्लमेंटचा त्यांत संबंध असता कामा नये. हा सिद्धांत १९३० च्या परिषदेनें मान्य केला व तशी रूढी प्रस्थापित झाली.

पण यांत एक कायदेशीर अडचण येतें. राखीव बिलांना संमती जी द्यावयाची ती ऑर्डर इन कौंसिलनें ( पार्लमेंटच्या मंत्र्यांच्या फर्मानानें ) द्यावी व त्याकरतां मंत्र्यांनीं राजाला विनंती करावी असा इंग्लंडचा नियम आहे. तेव्हां वसाहतींची इच्छा जर मंत्र्यांची त्यांत ढुडबूड नसावी अशी असेल तर त्यांनीं आपल्या घटनेंतून ' राखीव बिलें ' हा शब्द-प्रयोगच काढून टाकला पाहिजे. हा फरक करणें वसाहत सरकारच्या किंवा पार्लमेंटच्या अखत्यारांत आहे. काहीं वसाहतींत बिलें राखून ठेवण्याची तरतूद आहे आणि कांहींत नाहीं. कानडा व आयर्लंडमध्यें ही राखीव भानगडच नाहीं. साम्राज्य-सरकारला जोंपर्यंत वसाहतींत निष्कारण गोंधळ माजवण्याची इच्छा नसेल, तोंपर्यंत ही भानगड काढल्यानें त्यांचें नुकसान होणार नाहीं. हिंदुस्थानांत उदाहरणार्थ तें जर असें म्हणूं लागले कीं, संस्थानिकासंबंधीं किंवा अल्पसंख्याकासंबंधींचीं जबाबदारी आमच्यावर आहे व त्यांच्या संबंधींची बिलें राजाच्या संमतीकरितां राखून ठेवलीं पाहिजेत, तर त्याचें म्हणणें मान्य होतां कामा नये. १९३५ च्या हिंदी कायद्यांत राखीव बिलांची बरीच गर्दी आहे; ती इतःपर रहाणें इष्ट नाहीं. कोणतेंहि बिल राज्याच्या संमतीकरतां राखून ठेवलें जाऊं नये.

## नामंजुरी.

राखीव बिलांच्याप्रमाणेंच राजाला दुसरी एक सत्ता असते. ती म्हणजे पास झालेल्या बिलांना संमती न देण्याची. आयर्लंडनें जेव्हां आपली नवी घटना बनवली, तेव्हां आपल्या घटनेंत बिलें नाकारण्याचें कलमच घातलें नाहीं. राजाला जरी ही सत्ता असली तरी त्यानें या सत्तेचा उपयोग अद्यापपर्यंत कोठल्याहि वसाहतबिलांच्या बाबतींत केला नाहीं. तेव्हां जी गोष्ट कधींच झाली नाहीं ती कायद्यांत ठेवण्यानें

तरी काय साधारण? तथापि वसाहतींना हें निर्जीव कलम काढून टाकणें शक्य आहे व सोपेंहि आहे.

पण त्याला एक अडचण आहे. एखाद्या वसाहतीनें कर्जरोखे काढले व त्या रोख्यांत इंग्लंडमधून भांडवल गुंतविण्याचें ठरलें, तर इंग्लंडमधील भांडवल गुंतविणारा असें म्हणेल कीं, माझ्या भांडवलाच्या सुरक्षिततेकरतां वसाहतींनीं असें कायदे करतां कामा नयेत कीं, जे माझ्या भांडवलाला धोका पोहोंचवतील. इंग्लंडचे भांडवल गुंतविणारे असेंहि म्हणतील कीं, वसाहतींना अशी गडबड करण्याची सत्ता राहूं नये; म्हणून त्यांचे या विषयींचे कायदे अमान्य करण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारला असावा. हे ब्रिटिश फडणिशीखात्याचें म्हणणें नेहमींच पुढारलेली भूमिका घेणाऱ्या कानडानें मान्य केलें! त्यामुळें वसाहतींच्या हातांतील एक उत्तम बाण गेला. कानडाच्या प्रांतिक सरकारनीं व आयर्लंडच्या फ्री स्टेटनें उभारलेल्या कर्जांना इंग्लंड विश्वस्त म्हणून रहात नाहीं, कारण उभय सरकारांनीं ब्रिटिश पार्लमेंटला कायदे फेटाळण्याची सत्ता दिलेली नाहीं.

यावर प्रो. किथ म्हणतात, वसाहतींनीं कायदे फेटाळण्याची सत्ता ब्रिटिश सरकारला एकाहि बाबींत देणें म्हणजे आपलें सार्वभौमत्वावर गदा आणणें आहे. त्यामुळें सर्वसाधारण बाबतींतहि कायदे फेटाळण्याची सत्ता काढून टाकणें कठीण होते. कर्ज देणाऱ्याला द्यावयाचें संरक्षण हें मामुली आहे, खरें नाहीं. तेव्हां तेवढयाकरितां साम्राज्यसरकारच्या हातांत सारे कायदे फेटाळण्याची सत्ता जातां कामा नये. त्याऐवजीं एखादा वादाचा प्रश्न निघाला, तर त्याचा निकाल त्रयस्थांच्या लवादामार्फत व्हावा. पण तेवढ्याकरतां ब्रिटिशांच्या हातीं ही जबरदस्त सत्ता नसावी.*

हा पार्लमेंटचा व राजाचा हक्क नष्ट व्हावयास हवा आहे, कारण तत्वशः तो सार्वभौमत्वावर गदा आणणारा आहे. वसाहती तसा कायदा करू शकतील.

अशा प्रकारें दोन प्रश्नांची वासलात लागली. राजाच्या संमतीकरतां बिलें

*Constitutional Law page 23.*

राखून ठेऊं नयेत हें ठरलें आणि पार्लमेंटचा चिलें अमान्य करण्याचा हक्कहि नष्ट झाला नाहीं हेंहि ठरलें. पण तो हक्क वसाहती आपल्या कायदेमंडळांत कायदा करून काढून टाकूं शकतील. त्यानंतर आणखी एक प्रश्न उद्भवतो. वसाहतींनीं कोणतें कायदे करावे व कोणते करूं नयेत ह्याला कांहीं निर्बंध आहेत कीं काय हेंहि आतां बघितलें पाहिजे.

## कोणते कायदे करतां येतात.

वसाहतींना कायदे करण्याचे बाबतींत किती स्वातंत्र्य आहे, यावर त्यांचें सार्वभौमत्व अवलंबून आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणतेंही राष्ट्र अनिर्बंधपणें कायदे करूं शकत असेल, तरच ते राष्ट्र स्वतंत्र आहे असें आपण म्हणूं शकूं. तेव्हां वसाहतींच्या दर्जाचा विचार करतांना खालील प्रश्न उत्पन्न होतात. त्या जर पूर्णपणें स्वतंत्र असतील तर त्यांच्यावर इंग्लंडच्या पार्लमेंटचें बंधन असतां कामा नये. असें बंधन जितक्या प्रमाणांत असेल तितक्या प्रमाणांत त्यांचें स्वातंत्र्य मर्यादित होतें. ह्या प्रश्नाचा विचार करतांना आपल्याला १९३१ चा वेस्ट मिनिस्टर स्टॅट्यूट विचारांत घेतला पाहिजे. ह्या कायद्यानेंच वसाहती व युनाटेड किंगडम यांचा दर्जा सारखा आहे असें ठरलें. पण त्याला इंग्लंडच्या कायद्याच्या ज्या अडचणी आल्या त्याचाही कायद्याच्या दृष्टीनें आपण विचार केला पाहिजे.

पहिला सर्वमान्य सिद्धांत असा आहे कीं, इंग्लंडच्या पार्लमेंटची कायदे करण्याची सत्ता कोणीही मर्यादित करूं शकत नाहीं. ब्रिटिशांच्या कोर्टामध्यें ज्या ज्या वेळेला हे प्रश्न निघाले त्या त्या वेळेला न्यायाधीशांनीं असेंच निकाल दिले कीं, पार्लमेंटला वाटेल ते कायदे करतां येतात. पार्लमेंट हे कायदेशीर भाषेमध्यें सार्वभौम आहे असा डायसी प्रभृती कायदे-पंडितांनीं निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयावरून पार्लमेंटचा कोणताही कायदा कोणीही बेकायदा ठरवूं शकत नाहीं. अशा परिस्थितीमध्यें वसाहतींच्या बाबतींत पार्लमेंटला कायदे करतां येत नाहींत हें कसें सिद्ध व्हावें?

त्यानें ब्रिटिश पार्लमेंटच्या सार्वभौमत्वाला कमीपणा येतो. सार्वभौम सत्ता म्हटली कीं, तिला कोणत्याही प्रकारचें बंधन असतां कामा नये. याच सर्वाधिकारांचा अर्थ असा करण्यांत आला कीं, पार्लमेंटला स्वतःचे कायदे स्वतःच रद्द करतां येतात किंवा त्यांत बदल करतां येतो. कायदेशीर रीत्या मात्र सार्वभौम सत्तेला बंधन घालण्याचा सिद्धांत मान्य करता येत नाहीं. अशा प्रकारें कायदा आणि सार्वभौमत्व यांत विसंगति निर्माण झाली. सार्वभौम सत्तेनें कोर्टाला असें सांगितलें कीं, तुम्ही हा आमचा सिद्धांत मान्य केला पाहिजे; कारण जर पार्लमेंट वसाहतींच्याकरतां कायदे करूं शकत असेल आणि स्वतःचीही सत्ता कमी करूं शकत नसेल तर इंग्लंडचें पार्लमेंट आणि वसाहती यांच्यांत कायदे करण्याच्या सत्तेबद्दल समानता रहाणार नाहीं. याचा अर्थ असा–पार्लमेंटनें वसाहतींना समानत्वाचा दर्जा देण्याकरतां स्वतःची सत्ता सोडून दिली पाहिजे तरच वसाहती व इंग्लंड यांचेमध्यें सारखेपणा स्थापन होईल.

असें करण्यांत आणखी एक अडचण उद्भवते ती अशी. राजा हा ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व अधिकारी सत्तांचा एक अंश आहे. त्या राजाची पदवी आणि त्या गादीवर येणाऱ्या व्यक्ति या इंग्लंडच्या पार्लमेंटच्या कायद्यानें ठरतात. हा कायदा जर एखाद्या वसाहतीच्या पार्लमेंटनें आपल्या कायद्याच्या कक्षेतील एक भाग म्हणून रद्द केला अगर दुरुस्त केला तर इंग्लंडला राजा एक आणि प्रत्येक वसाहतीला राजा निराळा अशी चमत्कारिक परिस्थिति निर्माण होईल. एवढ्याकरतां या दोन्ही प्रश्नांचा घोटाळा होऊं नये व अनवस्था प्रसंग येऊं नये म्हणून १९३१ च्या कायद्यांत हेतु कथन ( Preamble ) केलें आहे.

या भागांत असें म्हटले आहे कीं, ' १९३१ चा जो कायदा आम्ही करीत आहों तो साम्राज्यपरिषदांच्या शिफारशीवरून करीत आहों तसेंच निरनिराळ्या वसाहतींनीं इंग्लंडच्या पार्लमेंटला विनंती केल्यावरून व हा कायदा करा अशी पार्लमेंटच्या कायदे करण्याच्या अधिकाराला मान्यता दिल्यावरून हा कायदा केला जात आहे. ' वसाहतींची मान्यता

असल्याशिवाय पार्लमेंटनें वसाहतींच्या करतां कायदे करूं नयेत अशी जी सनदशीर रूढी आहे ती रूढी या योजनेनें अबाधित राखली जाते. हेतु कथन म्हणजे कायदा नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तें वाक्य कायद्याचा हेतु काय आहे हें स्पष्ट करीत असतें. पण १९३१ च्या या हेतु-वाक्याचा उद्देश तसा नाहीं. इंग्लंडच्या पार्लमेंटला आपली सत्ता कमी करतां येत नाहीं असा आक्षेप कायदे पंडित घेतील तो घेतला जाऊं नये म्हणून ही तरतूद करण्यांत आली आहे. त्यावरून एक घटनात्मक रूढी स्थापित झाली आहे कीं, इंग्लंडचा कायदा कांहींहि असला तरी वसाहतींच्या संमतीशिवाय इंग्लंडला वसाहतींच्या करतां कायदा करतां येत नाहीं. त्यामुळें इंग्लंडचें सार्वभौमत्व कायम राहून वसाहतींच्या सार्वभौमत्वाला सुद्धां इंग्लंडनें मान्यता दिली.

आतां राजेसाहेबांच्या गादीवर येण्याचा प्रश्न उरतो. त्याबद्दल असें सांगण्यांत आले आहे कीं या कायद्यांत जर बदल करावयाचा असेल तर तो बदल करावयास नुसत्या इंग्लंडच्या पार्लमेंटाची मान्यता पुरेशी पडणार नसून सर्व वसाहतींची एकवाक्यता असावयास पाहिजे. राज-सत्तेवर झालेलें हें वसाहतींचें आक्रमण कांहीं इंग्लिश पंडितांना मान्य नाहीं. पण या बाबतींत जर वसाहतींना स्वातंत्र्य मिळालें नाहीं तर त्यांचा समानत्वाचा दर्जा शिल्लक उरत नाहीं म्हणून इंग्लंडला ही आपत्ती ओढवून घ्यावी लागली. त्या हेतुवाक्यामध्यें निर्दिष्ट केलेल्या गोष्टींना कायद्याचें स्वरूप नाहीं. कारण हेतुवाक्य कायदा ठरूं शकत नाहीं; पण तींत रूढी अगर परंपरा काय असावी, हें सांगितलेलें असतें. ही रूढी पवित्र व बंधनकारक मानली जाईल, असें वसाहतींच्या काय-द्यांत म्हटलें आहे.

अशाप्रकारें ज्या गोष्टी कायद्यानें करतां आल्या नाहींत, त्या रूढीनें मान्य केल्या. इंग्लंडचें सार्वभौमत्व हें व्यापक व अमर्याद आहे असा कायदा. तो कायदा कायम ठेवावयाचा म्हणजे वसाहतींचा दर्जा गौण

आहे, हें मान्य करावयाचें अशा प्रकारें कायदा व वसाहतींचें समानत्व यांत लढा उत्पन्न झाला.

कायदा मानायचा, तर समानत्व जातें आणि समानत्व मानायचें तर कायदा भ्रष्ट होतो. या अडचणींतून मार्ग काढण्याकरतां इंग्लीश कायदे-विशारदांनीं एक तोड काढली. त्यांनीं कायदा कांहींहि असला तरी आम्ही अमुक अमुक रूढी प्रस्थापित करीत आहों असें सांगितलें आणि या रूढीला कायद्याइतकेंच पवित्र मानलें पाहिजे, हा नवा सिद्धांत प्रस्थापित केला.

हा दुय्यम मार्ग व्यवहाराला ठीक असला, तरी कायद्याच्या सिद्धांताला संमत नाहीं व इंग्लंडचे कायदेपंडित कोर्टांत खटला नेला तर मान्यहि करणार नाहींत. वास्तविकपणें इंग्लंडनें सहा वसाहतीपुरतें आपलें सार्वभौमत्व सोडून दिलें असें म्हणावयास पाहिजे होतें. पण इंग्लंडला तें सार्वभौमत्व न सोडतां दुसरें दुय्यम दर्जाचें सार्वभौमत्व निर्माण करावयाचें होतें व तें त्यांनीं केलें इतकाच याचा अर्थ होतो.

१८६५ सालीं कलोनिअल व्हॅलिडिटी ॲक्ट पास झाला. ह्या कायद्या-पूर्वी, इंग्लंडच्या कायद्याला विरोधी असणारा असा कोणताहि कायदा वसाहतींना करण्याची परवानगी नव्हती. १८६५ च्या ह्या कायद्यानें ही असंदिग्धता काढून टाकली; आणि असें सांगितलें कीं, इंग्लिश कायद्याप्रमाणें ज्या तजविजी होतात, अगर हुकूम निघतात, त्या तज-विजींना विरोधी असा वसाहतींचा कायदा असेल, तरच तो गैरलागू होईल. इंग्लंडचे कायदे हे वसाहतीकरतां फारसें नाहींतच. पण कांहीं कांहीं कायदे वसाहती व इंग्लंड या दोघांनाहि लागू असणारे केले जावेत. इंग्लंडमधून वसाहतींत पळून गेलेल्या माणसाला पकडावें असा इंग्लंडचा कायदा असला, तर वसाहतीचा कायदा असा असूं शकणार नाहीं कीं, पळालेल्याला अभय द्यावें. नौकानयन, दिवाळखोरी, कॉपीराइट, आरमार खात्याचें अधिकारक्षेत्र वगैरेबद्दल इंग्लंडला हुकूम काढावे लागत. पण वसाहतींत समानत्व

आल्यानंतर इंग्लंडनें कायदे करायचे व वसाहतींनीं ते पाळायचे ही परिस्थिती मुळावरच आघात करणारी दिसूं लागली. तेव्हां १९३१ च्या वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटनें ही विषमता काढून टाकली. आणि १८६५ चा कायदा इतःपर वसाहतींना लागू होणार नाहीं असें म्हटलें. याचा अर्थ इंग्लंडच्या कायद्याशीं विरोधी असणारा कायदा वसाहतींनीं केला तर तो वाया गेला असें समजण्याचें कारण नसल्याचें सांगितलें गेलें. पण ब्रिटिश सरकार ज्याप्रमाणें आपल्या देशाच्याबाहेर असणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनांना लागू असणारे कायदे करूं शकते, त्याप्रमाणें वसाहतींत रहाणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनाकरतांहि त्यांना नवे कायदे करतां येतील व असलेले कायदे लागू करता येतील. वसाहतीहि आपल्या बाहेरदेशांतील प्रजाजनाकरितां असे कायदे करूं शकतात. पूर्वी कायद्यांची अंमलबजावणी वसाहतींच्या कोर्टांत होई. यापुढें ब्रिटिश कोर्टांतच त्यांचा अंमल होऊं शकेल. मात्र हीं ब्रिटिश कोर्टें त्यांच्या वसाहतींत असावयास हवींत.

## व्यापारी नौकानयन.

हिंदुस्थानला किनाऱ्यावर जहाजांची वहातुक करतांना किती कष्ट पडतात हें आपण पहातोंच. आमच्या किनाऱ्यावर व्यापार करतांना परक्यांना सवलती मिळतात. वसाहतींनाहि हीं परावलंबनाचीं दुःखें कांहीं काळ भोगावीं लागलीं. पण १९३१ च्या कायद्यानंतर त्यांत बरीच सुधारणा झाली. नौकानयनाच्या बाबतींत दोनतीन प्रश्न प्रामुख्यानें उद्भवतात. आपल्या किनाऱ्यावर परक्यांना सवलती किती द्यावयाच्या, दुसऱ्यांच्या किनाऱ्यावर आपल्याला किती सवलती मिळायच्या आणि नौकानयनाच्या बाबतींत झालेल्या गुन्ह्यांची चौकशी कोणीं करावयाची.

नौकानयनासंबंधींचे जे कायदे पूर्वी होते ते रद्द अगर दुरुस्त करण्याचा अधिकार १९३१ च्या कायद्यान्वयें वसाहतींना मिळाला. इंग्लंडच्या कायद्यांना विरोधी असे कायदे पूर्वी करतां येत नसत. पण वसाहतींचा दर्जा समानत्वाचा मानला गेल्यानंतर ते हक्क त्यांना प्राप्त झाले, हें वर आलेंच आहे. १९३१ च्या पूर्वी १८९४ चा मर्चंट शिपींग ॲक्ट व

१९०६ सालची त्यांतील दुरुस्ती, ह्या साम्राज्यसरकारच्या कायद्यानें वसाहतींचा व्यवहार चाले. म्हणजे वसाहतीकरतां साम्राज्यसरकारनें कायदे केलेले असत. या वसाहतीकरतां केलेल्या कायद्यानुसार, वसाहतींत नोंदलेल्या आणि वसाहतींच्या किनाऱ्यावर व्यापार करणाऱ्या जहाजांचें नियंत्रण होई. पण ब्रिटिश व परक्या जहाजांचें नियंत्रण साम्राज्य-सरकारच्या कायद्यांनीं होत असे.

परक्या जहाजावरील नियंत्रणाच्या सत्तेचा अभाव वसाहतींना अपमान-कारक वाटूं लागला. तो आपल्या सार्वभौमत्वाला कमीपणा आणणारा आहे असें त्या म्हणूं लागल्या. १९२९ च्या परिषदेंत ह्या प्रश्नाची चर्चा झाली आणि असें ठरविण्यांत आलें कीं, वसाहतींना सर्व जहाजासंबंधीं कायदे करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. पण नौकानयनांच्या निरनिराळ्या कायद्यांत घोटाळा होऊं नये म्हणून, साम्राज्याच्या सर्व घटकांनीं आपसांत एक करार करावा म्हणजे तो कायदा निर्दोष होईल. १० डिसेंबर १९३१ रोजीं हा करार झाला. ह्या करारानंतर वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटचें ५ वें कलम अंमलांत आलें.

त्या कलमाला अनुसरून अशी स्पष्ट तजवीज करण्यांत आली आहे कीं, कॉमनवेल्थमधील कोणत्याही एका घटकानें दुसऱ्या भागांत नोंदलेल्या जहाजांना, स्वतःच्या इच्छेनुरूप आपल्या किंवा परक्या जहाजांच्याप्रमाणें वागवावें. आपल्या भागाबाहेर बांधल्या गेलेल्या जहाजावर जकाती बस-विण्यास त्यानें प्रतिबंध होत नाहीं; किंवा त्या भागांत नोंदविलेल्या जहाजांना आर्थिक मदत देण्यास हरकत येत नाहीं. किनाऱ्यावरील व्यापार, मासळी व मासळीचा व्यापार या बाबतींत वसाहतींचें स्वातंत्र्य अमर्यादित आहे.

जहाजासंबंधीं जी चौकशी करावयाची ती ब्रिटिश कोर्टाचा अधिकार दूर सारून करावी असें ठरलें. पूर्वी असे खटले वसाहतींतील ब्रिटिश कोर्टांत होत असत. पण आतां तो निर्बंध राहिला नाहीं. यासंबंधींचे तपशीलवार नियम करण्यांत आले आहेत व वसाहतींना संपूर्ण काय-

याचे अधिकार दिले आहेत. पूर्वी असे निर्णय इंग्लंडचें कोर्ट देई व ते निर्णय वसाहती मान्य करीत. हिंदी खलाशांना नुकत्याच परक्या कोर्टांत झालेल्या शिक्षा आमच्या गौण दर्जामुळें तेथें झाल्या हें लक्षांत ठेवले पाहिजे.

ब्रिटनमध्यें जहाजांचें एक सर्वसाधारण रजिस्टर असतें. या रजिस्टर-मध्यें ब्रिटनमधील व वसाहतींतील सर्व जहाजांची नोंद असते. त्यांत त्यांना विशिष्ट हक्क व सवलतीहि मिळतात. पण वसाहतींत उपऱ्या आलेल्या जर्मन किंवा जपानी माणसानें जर जहाजें बांधलीं तर त्याला ह्या सवलती मिळणार नाहींत. म्हणून अशा जहाजांची नोंद वसाहतींनीं आपल्या जहाजांच्या बरोबरीनें करूं नये असें सांगितलें आहे. ब्रिटिश रजिस्टरमध्यें नोंदलेल्या सर्व जहाजांना समान दर्जा दिला आहे. त्या जहाजावरील निशाणें हीं त्या त्या वसाहतींनीं ठरवावयाचीं आहेत. ऑफिसर्सना मिळावयाची सर्टिफिकिटें हीं त्यांची विशिष्ट समान लायकी पाहून मिळावी व त्यांना साम्राज्यांत मान्यता असावी, असेंहि ठरलेलें आहे.

मर्चंट शिपिंग ॲक्टच्या ७३५ व ७३६ कलमांप्रमाणें वसाहतींत जहाजासंबंधीं जीं बिलें पास होतील, त्यांना ब्रिटिश सरकारची मान्यता लागे. पण १९३१ च्या कायद्यानें ही बंदी उठवली आणि वसाहतींना वाटेल ते कायदे करण्यास परवानगी दिली. तसेंच वसाहतींनीं ब्रिटिश जहाजांना आपल्या जहाजा इतक्याच सवलती द्याव्या असें कायदेशीर बंधन आतां उरलें नाहीं. बंधन असलेंच तर तें नैतिक आहे व तें आपसां-तील करारान्वयें मान्य झालेलें आहे.

पण वसाहतींना जरी या बाबतींत संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें असलें तरी त्याचा अविचारानें उपयोग करणें हें ब्रिटिश जहाजांच्या हिताला घातक होणार असल्यामुळें आणि वसाहतींची इच्छा ब्रिटिश जहाजांचे नुकसान व्हावें अशी नसल्यामुळें कानडानें असें सुचविलें कीं, आपण नेहमींच एकत्र बसून कायद्याच्या फेरफाराचा विचार करावा आणि नंतरच, ते फेरफार करावे. जोपर्यंत वसाहतींनीं सध्याचे कायदे बदलले नाहींत

तोंपर्यंत कायद्याची अंमलबजावणी साऱ्या साम्राज्यांत एकसारखीच होत असते व ते हुकूम ब्रिटिश वकील आणि आरमारी कोर्टें अंमलांत आणतात. पण हा दोष वसाहतींचा आहे. कायद्याचा नाहीं. कायद्यानें दिलेलें स्वातंत्र्य उपभोगण्याची वसाहतींची इच्छा नसेल तर त्याला कायदा काय करणार ? हे अधिकारी वसाहतींच्या अंमलाखालीं नसूनहि ते पूर्वींप्रमाणेंच अंमल गाजवीत आहेत. ही वसाहतींची दुर्बलता फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं; निदान टिकावी असें वाटत नाहीं.

वसाहतींच्या जहाजाबाबद केलेले हे नियम हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशाला लागू नाहींत हें सांगणें नकोच.

वसाहतींच्या स्वराज्यांत जहाजांच्यासंबंधीं काय बदल झाले व त्यांत किती स्वातंत्र्य मिळालें हें आपण पाहिलें. किनाऱ्यावरील व किनाऱ्या-बाहेरील नौकानयनावर वसाहतींचें संपूर्ण वर्चस्व स्थापित झालें. ब्रिटि-शांच्या कोर्टांत जहाजासंबंधीचे खटले जाऊं नयेत, असें ठरलें. साम्राज्यां-तील घटकामध्यें कांहीं समान गोष्टींबद्दल करार झाले असले तरी वसाहतींना वाटल्यास त्या वाटेल त्या प्रकारानें आपलें सामर्थ्य वाढवू शकतील. आज ह्या वसाहती धीट नाहींत व त्यांना ब्रिटिशांची जहाजा-वरील सत्ता उलथून पाडावयाची नाहीं, एरवीं त्यांना इतर राष्ट्रें ज्याप्रमाणें ब्रिटिशांशीं वागतात, त्याप्रमाणें वागणें अशक्य नाहीं.

## अपिलें

वसाहतींना आरमारासंबंधीचें कायदे पूर्वी राजाकडे संमतीकरतां पाठवावे लागत. आतां वसाहतीकडे सार्वभौमत्व आल्यामुळें त्या स्वतःच यासंबंधीं कायदे करूं शकतात व त्याचा अंमलहि करूं शकतात. त्यामुळें आंतरराष्ट्रीय जगामध्यें वसाहतींचें स्वातंत्र्य प्रत्ययास येऊं लागलें.

वसाहतींतील खटल्यांच्या अपिलांचा आपल्या सल्लागारांच्या सल्ल्यानें राजेसाहेबांनीं अखेरचा निर्णय द्यावा अशी पद्धत होती. ह्या पद्धतीला पुढें कायद्याचें स्वरूप आलें आणि त्याकरतां प्रीव्हि कौंसिल या नांवाची एक कायदेशीर कमिटी नेमली गेली. ही कमिटी वसाहतींच्या अपिलासंबंधीं

निर्णय काय द्यावेत हे राजांना सुचवी. वसाहतींतील कोणतीं अपिलें घेऊं नयेत याला ब्रिटिशसरकार कायद्यानें बंधन घालू शके. कानडाच्या बाबतींत हा अपवाद् करता येत नाहीं. त्यांच्या स्थानिक कायदेमंडळालाहि हा अधिकार काढून घेतां येत नाहीं. पण इतर वसाहतींच्या बाबतींत निरनिराळे नियम आहेत. ऑस्ट्रेलियांत प्रीव्हि कौंसिलकडे अपिलें पाठविण्यास हायकोर्टानें संमती द्यावी लागते. पण तेथील अपिलें खासगी नसतात, सरकारी असतात. आफ्रिकेंत असाच नियम आहे. आयर्लंडमध्यें पूर्वी अपिलें राजाकडे जात; पण आयर्लंडच्या डेलनें एक कायदा पास करून आयर्लंडमधील अपिलें प्रीव्हि कौंसिलकडे जाण्यास बंदी केली. अपिलें ऐकण्याची राजाची ही सत्ता काढून घेणें वसाहतींच्या हातीं आहे. वसाहतींनीं आपल्या पार्लमेंटांत हा कायदा केला म्हणजे झालें. तथापि राजाच्या ह्या अधिकारामुळें वसाहतींचें सार्वभौमत्व कमी होत नाहीं हें निश्चित आहे.

वसाहतीवर आपलें सार्वभौमत्व आहे हें दाखविण्याचें आणखी दोन प्रकार आहेत. फांशीची शिक्षा झालेल्यांना अगर अन्य गुन्हेगारांना माफी देणें आणि मानसन्माननिदर्शक पदव्या, किताब देणें हा राजाचा अधिकार मानला जातो. प्रजेचे ज्याप्रमाणें कांहीं जन्मसिद्ध हक्क आहेत, त्याप्रमाणें राजांचे कांहीं जन्मसिद्ध हक्क असतात. दया दाखविण्याचा हा हक्क राजेसाहेबांनीं वसाहतींच्या गव्हर्नर जनरला देऊन टाकला व तो आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें त्याची अंमलबजावणी करतो. वसाहती आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें ग. जनरल नेमीत असल्यामुळें हा हक्क आतां परक्याकडे राहिला नसून वसाहतीकडेच आलेला आहे.

पदवीदानासंबंधींचा प्रश्नहि असाच आहे. इंग्लंडमध्यें उत्तम कामगिरी करणारांना राजेसाहेब पदव्या देतात. आपल्या ताब्यांतील वसाहतींतहि त्यांनीं तोच प्रकार सुरू केला. हा हक्क राजेसाहेबांचा अगदीं खास आहे. तो दया दाखविण्याप्रमाणें दुसऱ्यांना देतां येण्यासारखा नाहीं. तो एक तर चालू ठेवला पाहिजे, नाहीं तर बंद केला पाहिजे. कानडा,

दक्षिण आफ्रिका व आयर्लंडनें पदव्या स्वीकारण्याबद्दल नाखुषी दर्शविल्यामुळें आणि नांवांची शिफारस न केल्यामुळें तेथें पदवीदान होण्याचें थांबलें. पण पदवीदान करूं नये असें १९३१ च्या स्टॅट्यूटमध्यें सांगितलें नाहीं. वसाहतींना जर पदव्या द्यायच्या असतील तर त्यांना तसा कायदा करून पदवीदान करतां येईल; किंवा राजेसाहेबानांहि ते अशी विनंति करूं शकतील कीं, तुम्ही स्थानिक पदव्या निर्माण करा व मंत्र्यांच्या सल्लयानें त्यांचें दान करा. या पदव्या जर बंद करायच्या असतील, तर वसाहती तसा कायदा पास करूं शकतील. हिंदुस्थानांतील काँग्रेस मंत्रिमंडळांनीं ह्या पदव्या बंद कराव्या असे ठराव केले; पण ह्या ठरावांना कांहीं कायदेशीर आधार नसल्यामुळें ते ठराव नुसते शिफारसवजा होतात. पण वसाहतींत तसें नाहीं. त्या स्वतंत्र आहेत व त्यांना पदव्या थांबवितां येतील.

बापाच्या मृत्युनंतर मुलालाहि वंशपरंपरेनें कांहीं किताब मिळतो. इंग्लंडांत लॉर्ड किंवा हिंदुस्थानांत राजा हा किताब असा आहे. पण तसे किताबहि वसाहती बंद करूं शकतात. त्याचप्रमाणें दिलेले किताब, पदव्या त्यांना परतहि घेतां येतात. आपल्याकडील सरदार, जहागिरदार वगैरे किताब अशा प्रकारचे आहेत.

इंग्लंडच्या राजेसाहेबांना वसाहतींत हे किताब व पदव्या देतां येतात एवढ्यावरून वसाहतींचें सार्वभौमत्व कमी झालें असें होत नाहीं.

### परक्या देशांतील प्रजाजनांचे कायदे

ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें येण्यानें नागरिकत्वाचे समान हक्क निर्माण होतात हें खरें आहे. वसाहतींतील कोणताहि प्रजाजन ब्रिटिश प्रजाजन म्हणून बाहेर देशांत ओळखला जातो. पण कांहीं वसाहतींना ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घ्यायचें नाहीं व त्या हक्कांची त्यांना पर्वाहि नाहीं. पूर्वी ब्रिटिश प्रजाजन हा वसाहतीबाहेर असला म्हणजे त्याच्यावर ब्रिटिश कायद्याचा अंमल चाले. चीनमध्यें कोणाहि ब्रिटिश प्रजाजनावर अंमल चालायचा असला तर तो ब्रिटिश कायद्यांचा चाले. हा अंमल चाल-

विण्यांत आम्हाला सार्वभौमत्व सिद्ध करायचे नाहीं, तो एक सोईचा प्रश्न आहे असें ब्रिटिश मुत्सद्दी म्हणत होते. पण वसाहतींनीं ही भूमिका मान्य केली नाहीं. त्यांनीं सांगितलें कीं, आमचा प्रजाजन हा बाहेर देशांत असला तर त्याच्यावर ब्रिटिश कायद्याचा अंमल न चालतां वसाहतींच्या कायद्याचा अंमल चालला पाहिजे. अखेर ही मागणी मान्य झाली व वसाहतींची सत्ता बाहेर देशांतील आपल्या प्रजाजनावर आहे हें वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यांत अंतर्भूत झालें. पण या कायद्याला मर्यादा आहेत हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. प्रत्येक देशानें ब्रिटिशांच्या सवत्या सुभ्याला मान्यता दिलेली नाहीं. चीन, मस्कत, इजिप्त, मोरक्को वगैरे ठिकाणीं जे ब्रिटिश प्रजाजन आहेत, त्यांच्यावर तेथील ब्रिटिश कोर्टांत ब्रिटिश कायद्याचा अंमल चालतो. ही ब्रिटिश प्रजाजनावर अंमल चालविण्याची सत्ता राजाची आहे व ती वेस्टमिन्स्टरच्या कायद्यानें नष्ट होत नाहीं. ब्रिटिश सरकारनें आपलीं कोर्टें तेथें स्थापन करून घेतलीं व तेथें चालणारे कायदे पास केले. हे कायदे फेटाळण्याची सत्ता वसाहतींना नाहीं. वसाहतींना या परक्या देशांत आपल्या नागरिकांच्या बरोबरींचे हक्क आम्ही दिले, हा वसाहतींवर आम्ही उपकार केला असें ब्रिटिश सरकार म्हणेल. हें जर ब्रिटिश प्रजाजनाचे हक्क आयर्लंडनें झुगारून दिले तर त्यांच्यावर चीन किंवा मोरक्कोचे कायदे अंमल चालवूं लागतील. तेव्हां ब्रिटिश कायदे पाहिजेत, कां चीन मस्कतचे कायदे पाहिजेत, याचा विचार वसाहतींनीं करावा. त्यांना या सवत्या सुभ्यांत कायदे करण्याचा अधिकार वेस्टमिन्स्टरच्या कायद्यानें दिला. पण त्याचा अर्थ ब्रिटिशांचे सवत्या सुभ्यांतील पूर्वीचे कायदे रद्द करण्याचा अधिकार वसाहतींना आहे असा नाहीं. त्यामुळें जे वसाहतींचे नवे कायदे ब्रिटिशांच्या जुन्या कायद्यांना विरोधी असतील ते कायदे ब्रिटिश कोर्टें मानणार नाहींत. वसाहतींना जर अशा मागासलेल्या देशांत आपले कायदे चालवयास हवे असतील, तर त्यांनीं त्या त्या देशाबरोबर स्वतंत्र कोर्टें स्थापन

करण्याचें ठरवून घ्यावें लागेल व आपण ब्रिटिश प्रजाजन नाहीं, असें जाहीर करावें लागेल. हे मागासलेलें देश वसाहतींना हे हक्क देतील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. तसेंच सर्व वसाहती हीं स्वतंत्र कोर्टें स्थापण्याला कितपत उत्सुक आहेत, याबद्दलहि निश्चित कांहीं सांगवत नाहीं. पण वसाहतींना त्या देशांनीं स्वतंत्र हक्क दिले तरी ब्रिटिश पार्लमेंटनें वसाहतींतील प्रजाजनावरील आपले हक्क काढून घेतले नाहींत, तोंवर त्यांच्यावर वसाहत कायद्यांचा अंमल चालणार नाहीं. दोघांच्या सहविचारानेंच हे प्रश्न सुटूं शकतील. अशा प्रकारें तत्त्वानें जरी वसाहतींना सवत्या सुभ्यांसंबंधीं कायदे करतां येतात, तरी व्यवहारानें ही सत्ता निरुपयोगी ठरली आहे.

वसाहतींना १९३१ च्या स्टॅटयूटप्रमाणें अंतर्गत स्वातंत्र्य किती मिळालें हें आपण पाहिलें. अंतर्गत स्वातंत्र्य अजमावण्याचें जें साधन आहे त्यांत

(१) गव्हर्नर जनरलचे अधिकार व नेमणूक
(२) कायदे करण्याची सत्ता.
(३) जहाजांसंबंधीं कायदे.
(४) राजेसाहेबांचे हक्क.
(५) वसाहतींची घटक स्वायत्त सत्तावर हुकमत.
(६) देशाबाहेरील प्रजेवर चालणारी सत्ता. (extra-territorial rights.)

हे ६ प्रश्न येतात. यांपैकीं सहाव्या प्रश्नाची चर्चा आपण आतांच केली. ५ व्या प्रश्नाबद्दल इतकेंच सांगावयाचें आहे कीं, वसाहत सरकार व वसाहत पार्लमेंट या दोघांना मिळून आपल्या ताब्यांतील प्रांतिक सरकारासंबंधीं कायदे करण्याची पूर्ण मुभा नाहीं. प्रांतिक स्वायत्त राज्यें व वसाहतीचें मध्यवर्ती राज्य यांच्यांत लढे असणें स्वाभाविक आहे. १९३१ च्या कायद्यानें कानडा व ऑस्ट्रेलिया यांच्या घटक स्वायत्त संस्थांच्या बाबतींत बराच पंक्तिप्रपंच केला आहे. कानडाच्या पार्लमेंटला

वाचनालय सातारा

आपल्या संयुक्त घटनेंतील प्रांतांसंबंधीं कायदे करण्याचा पूर्ण अधिकार नाहीं. कारण ते प्रांत फेडरेशनमधील आहेत व फेडरेशनमधील प्रांतावर मध्यवर्ती सत्तेला वाटेल ते कायदे करून अंमल चालवितां येत नाहीं. १९३१ च्या कायद्यानें प्रांतासंबंधीं कायदे करण्याचा नवा अधिकार कानडाला दिला नाहीं. पण जे कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटला पूर्वी होता, तो तसाच कायम रहाणार आहे. ऑस्ट्रेलियांतील स्टेट्ससंबंधीं कायदे करण्याचा अधिकार तेथील कॉमनवेल्थला नाहीं. आहे तो अधिकार मर्यादित आहे. ऑस्ट्रेलियांतील स्टेट्सच्या बाबतींत कायदे करण्याचा अधिकार इंग्लिश पार्लमेंटला रूढीनें होता. तो तसाच कायम राहील असें १९३१ च्या कायद्यानें सांगितलें आहे. त्या कायद्यांना ऑस्ट्रेलियाच्या पार्लमेंटची किंवा सरकारची संमती घेणें जरूर नाहीं असेंहि त्यांत म्हटलें आहे.

हीं कलमें अत्यंत अन्यायाचीं आहेत व तीं दोन्ही वसाहतींची सत्ता कमी करणारीं आहेत. ब्रिटिशांनीं आपली कायदे करण्याची सत्ता कायम ठेवली. वसाहत पार्लमेंटला त्यांनीं आपली सत्ता द्यावयास पाहिजे होती. पण त्याकरतां तेथील स्टेट्सनीं चळवळ करावयास पाहिजे.

हीं प्रांतिक राज्यें असेंहि म्हणतात कीं, आमचीं स्वराज्यें हीं फार पूर्वी स्थापन झालीं आहेत व त्यांचें स्वातंत्र्य १९३१ च्या कायद्यानें मर्यादित होता कामां नये. त्या कायद्यानें ज्या वसाहतींबद्दल विचार केला आहे त्यांतील प्रांतिक राज्यें साम्राज्यपरिषदेंत प्रतिनिधि म्हणून आली नव्हती. पण त्या राज्यांच्या कारभारांत हस्तक्षेप करावयाचा नाहीं असें त्या परिषदेंत ठरलें. किरकोळ बाबतींत एखाद्यादुसऱ्या वसाहतींत त्यांचें व साम्राज्यसरकारचें पूर्वींचे संबंध कायम असावेत असेंहि ठरलें. वसाहतसरकारची सत्ता त्यामुळें थोडीशी मर्यादित झाली. पण ह्या मर्यादेला वसाहतींनींहि संमति दिल्यामुळें तक्रारीला जागा नाहीं. वसाहतींनीं मनांत आणलें तर ह्याहि बाबतींतला उणेपणा त्या काढून टाकूं शकतील. पण त्याकरतां, पुढील साम्राज्य परिषदेंत प्रश्न उपस्थित केला पाहिजे.

तेव्हां आतां स्वातंत्र्याचा विचार करतांना पहिल्या चार प्रश्नांचाच विचार रहातो. गव्हर्नरजनरल हा आतां राजाकडून परस्पर नेमला जात नाहीं व काढलाहि जात नाहीं. वास्तविक त्याची जरूरीहि नाहीं. वसाहतींनीं त्याचा उपयोग फक्त रबरी शिक्याप्रमाणें केला आहे. जुनी परंपरा ठेवली पाहिजे, म्हणूनच गव्हर्नर जनरल राहिला आहे. आयर्लंडनें ही परंपराहि नष्ट केली आहे.

कायदे करण्याबद्दल. पूर्वी राजेसाहेब वसाहतींनीं केलेले कायदे रद्द करूं शकत असत. आतां त्यांना तसें करतां येत नाहीं. ग. जनरल पूर्वी राजाच्या संमतीकरतां कांहीं विशिष्ट बिलें राखून ठेवीत असे. आतां बिलांचा राखीवपणा कायदा करून दूर करतां येतो. इंग्लंडच्या कायद्याला विरोधी कायदे करण्याची पूर्वी परवानगी नसे. पण १९३१ च्या कायद्यानें हा निर्बंध दूर केला. अशा प्रकारें साम्राज्य-सरकारच्या कायद्यांना विरोधी कायदे करण्याची सुद्धां बहुतेक सत्ता वसाहतींना मिळाल्यामुळें वसाहतींचें स्वातंत्र्य हें याबाबतींत पूर्णत्वाला गेलें आहे. राजेसाहेबांकडे अपिलें ऐकण्याची, पदव्या देण्याची व दया दाखविण्याची जी सत्ता होती तीहि रद्द करतां येते. नौकानयनाच्या व्यापारासंबंधीं व कायदे आणि अंमलबजावणीसंबंधीं वसाहतींना पूर्णपणें स्वातंत्र्य आहे.

लष्कर, आरमार, विमानें वगैरेबद्दलचे वसाहतींना काय अधिकार आहेत असा प्रश्न विचारला जाईल. हिंदुस्थानांत हा प्रश्न उद्भवतो; पण वसाहतींत ( आयर्लंडशिवाय ) हा प्रश्न उद्भवतच नसे. कारण त्यांना स्वतःच्या देशाचें रक्षण स्वतःच केलें पाहिजे असें सांगितलें जात होतें. त्यामुळें वसाहती आपलें लष्कर ठेवीत. समुद्रावर वसाहतींचें रक्षण ब्रिटिश आरमार करी पण याहि खर्चांतून आमची मुक्तता करा असें ब्रिटिश सरकार सांगत असे. तेव्हां वसाहती लष्कर वैमानिक बाबतींत पूर्ण

स्वतंत्र आहेत आणि आरमारी रक्षणाची तयारी करीत आहेत.* तेव्हां वसाहतींकडे लष्करी किंवा आरमारी सत्ता आली नसली तर ती वसाहतींच्या अडचणीमुळें; कायद्याच्या निर्बंधामुळें नव्हे.

स्वातंत्र्याच्या प्रश्नांच्या बाबतींत जे प्रश्न आम्हाला शंकास्पद वाटतात तें (१) निशाण (२) भाषा, (३) नोकऱ्या, यासंबंधीचे आहेत. वसाहतींचें अमुकच राष्ट्रीय निशाण असलें पाहिजे असा नियम इंग्लंडनें केलेला नाहीं. पण बहुतेक वसाहतींनीं आपला इंग्लंडशीं संबंध आहे याचें निदर्शक म्हणून आपल्या निशाणांत बारिकसें युनियन जॅक ठेवलें आहे. आयर्लंडनें हें गुलामगिरीचें द्योतक आहे म्हणून त्यांला फाटा दिला व आपलें स्वतःचें युनियन जॅकविरहित तिरंगी निशाण सुरू केलें. कानडानें युनियन जॅकला आपलें राष्ट्रीय निशाण मानले. तसेंच न्यू फौंडलँडनेंहि.

भाषेच्या बाबतींतहि वसाहतींना स्वातंत्र्य असल्यामुळें ठिकठिकाणीं गंमती दृष्टीस पडतात. कानडांत इंग्लीश व फ्रेंच; आफ्रिकेंत इंग्लिश व डच आयर्लंडमध्यें आयरिश व इंग्लिश अशा भाषा सरकारी भाषा म्हणून ठेवलेल्या आहेत. ब्रिटिश सरकारनें त्या बाबतींत सक्ती केलेली नाहीं. वसाहतींना वाटेल ती सरकारी भाषा ठेवतां येतें.

नोकऱ्यांच्या बाबतींत वसाहतींना स्वातंत्र्य आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. हे नोकर नेमण्याकरतां एक बोर्ड असतें व त्यांच्यामार्फत नेमणुका केल्या जातात. पण ह्या नोकरांनीं प्रथम राजकारणांत पडून फार घोटाळे केले. ऑस्ट्रेलियांत तर सिव्हिल सर्वंटांना राजकीय पक्षोप-

*This feeling has resulted in the development on one hand, of the military and naval defences of the Dominions in practically complete autonomy and on the other hand of the gradual evolution of Naval defence based on the closest cooperation with British fleet ( Constitutional Law.: A. B, Keith page 414

पक्ष हातीशीं धरतात. प्रतिनिधीमंडळांतील सभासद या नोकरांना आपल्या निवडणुकीकरतां काम करावयास लावतात. तेथें सभाजसत्तावादी मंत्रिमंडळ आहे व तेथें मजुरांचीं मतें मिळविण्याकरतां रेल्वे नोकरांना उत्तेजन देतात. कानडांतहि हा प्रकार असे. पण आतां तेथें त्या बाबतींत सक्त नियम केले आहेत. कोणत्याहि सरकारी नोकराला स्वतःचें मत नोंदविण्यापलीकडे राजकारणांत भाग घेतां येत नाहीं.

अशाप्रकारें वसाहतींचा अंतर्गत कारभार आहे. ह्या कारभाराचे बाबतींत त्यांना इतर स्वतंत्र राष्ट्राइतकेंच स्वातंत्र्य जवळजवळ आहे. जर्मनी, जपान इतकें स्वातंत्र्य त्यांना आहे किंवा नाहीं हें त्यांना कोणत्या तरी देशावर चढाई करून सिद्ध करून घ्यावें लागेल. पण स्वतःच्या देशांत त्यांच्या सत्तेला इंग्रज सत्ता कोणत्याहि प्रकारें परिणामकारक प्रतिबंध करूं शकत नाहीं. कांहीं कांहीं बाबींत सूक्ष्म प्रमाणांत इंग्रजांचा हात काम करीत असेल. ही आज दिसणारी व्यवस्था एकदम अस्तित्वांत आली नाहीं. त्यांचा क्रमशः विकास होत आला आहे. हा विकास अद्याप थांबलेला नाहीं. ती विकसित होण्याची क्रिया सुरूं असल्यामुळें वसाहती आपल्याला त्रासदायक वाटणाऱ्या गोष्टी खास दूर करूं शकतील. आयर्लंडला समानतेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर त्यांनीं पुष्कळ बंड केलें आणि ब्रिटिशांच्या अरेरावीचें व इभ्रतीचें पटल भिरकावून दिलें. त्यावरून वसाहतींच्या समानतेचा दर्जा हा पोकळ नाहीं. तो अर्थपूर्ण व कार्यक्षम आहे. कायद्यांनीं तेंच सिद्ध केलें आहे. आफ्रिका व आयर्लंड इतकी स्वतंत्रता बाकीच्या वसाहतींना नाहीं हेंहि लक्षांत ठेवले पाहिजे.

---

# भाग ४ था.

## वेस्टमिन्स्टरचा कायदा

१९०७ सालीं वसाहतपरिषद भरली होती. ह्या परिषदेनें ' डोमिनिअन' शब्द उपयोगांत आणला. त्याचा अर्थ ब्रिटिशांचे समुद्रापलिकडे स्वयंशासीत देश असा केला गेला. १९२६ सालीं डोमिनिअन म्हणजे कायदेशीर भाषेंत काय आहे याची व्याख्या न करतां ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें सहा डोमिनिअन्स आहेत असें नमूद करण्यांत आलें. डोमिनिअन या शब्दांत स्वयंशासीत असलेल्या व स्वयंशासीत नसलेल्या अशा दोन्ही वसाहतींचा समावेश पुष्कळ वर्षे करीत असत. १९१७ चे महायुद्धाचे वेळीं वसाहती व ब्रिटिश सरकार यांचे संबंध काय आहेत हे ठरविण्या-करतां युद्ध संपतांच एक परिषद बोलवावी असें सुचविण्यांत आलें. १९२१ च्या परिषदेचा असा निष्कर्ष काढण्यांत आला कीं, दोघामधील संबंधांचें स्पष्टीकरण करण्याची जरूरी नाहीं. पण आफ्रिकेचे जनरल स्मट्स यांना हें कबूल नव्हतें. ते म्हणत 'आम्हाला जरी पुष्कळ स्वातंत्र्य असलें तरी आम्ही ब्रिटिशांचे अंकितच आहों.' १९१७ सालीं डोमि-निअन्स ह्या [ autonomous nations of an Imperial Commonwealth entitled to a voice in the Conduct

of foreign relations.] साम्राज्यशाही कॉमनवेल्थमधील स्वयंशासीत राष्ट्रें आहेत व परराष्ट्रीय संबंधांच्या कारभारांत त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें जातें असें त्यांचें स्वरूपवर्णन केलें जात होतें. आयर्लंडला जेव्हां स्वराज्य देण्याचा प्रश्न आला, तेव्हां त्या स्वराज्याची व्याख्या न करतां ऑस्ट्रेलिया, कानडा वगैरे वसाहतींना जें स्वातंत्र्य आहे तेंच आयर्लंडला द्या असें लॉईड जार्ज म्हणाले.

१९२६ मध्यें साम्राज्यपरिषद भरली व त्या परिषदेला जनरल हर्टझॉग हे जनरल स्मट्सचा पराभव करून आले. लॉर्ड बिंगनें पार्लमेंट विसर्जन करण्याचें नाकारल्यामुळें संतापलेले मॅकेंझी किंग कानडाहून आले होते. या सर्वांना वसाहतीच्या स्वराज्याची व्याख्या पाहिजे होती. २५ ऑक्टोबर १९२६ रोजीं लॉर्ड बाल्फर यांच्या अध्यक्षतेखालीं साम्राज्य व वसाहती यांचे संबंध निश्चित करण्याकरतां उपसमिती नेमली गेली. अध्यक्ष बाल्फर यांनीं शेवटीं वसाहतींचा दर्जा जाहीर केला तो प्रसिद्धच आहे. वसाहती (१) ब्रिटिश साम्राज्यांतील स्वयंशासित संघ आहेत. (२) त्या दर्जानें सर्व सारख्या आहेत. (३) अंतर्बाह्य कारभारांत एक दुसरीची अंकित नाहींत. (४) राजनिष्ठेनें त्या एकत्र संलग्न झालेल्या आहेत. (५) ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्समध्यें त्या स्वेच्छेनें समाविष्ट झालेल्या आहेत असें त्यांचे पंचविध स्वरूपलक्षण करण्यांत आलें. बाल्फरची ही घोषणा वसाहतींना व इंग्लंडलाहि समाधानकारक वाटली. पण या घोषणेचा जसा प्रत्यक्ष आचार होऊं लागला, तसें इंग्लंडला वाटलें कीं, आपण भलतेंच कबूल केलें. १९३१ च्या कायद्यांत तर आपण सर्वच गमावलें असें वाटून, तेव्हांपासून तेथील कायदेपंडित क्षुद्र वृत्तीनें वागत आहेत व वेलदोड्याची साल काढावी, त्याप्रमाणें शब्दनूशब्दाचा कीस काढून वसाहती आपल्या अंकित आहेत, आपल्या सार्वभौमत्वाखालीं आहेत, आणि राजनिष्ठेच्या शृंखलांनीं कायमच्या बांधल्या गेल्या आहेत, असा अर्थ काढण्याचा हिमालयतुल्य प्रयत्न करीत आहेत. आणि कायद्यानें काय सिद्ध होत नाहीं ? ज्याची बुद्धि जितकी सूक्ष्म व तीव्र तितका कायद्याचा

अर्थ बदलतो. दुर्दैव असें कीं, बाल्फरच्या घोषणेंत जो गर्भीत आशय होता, तो पार बदलून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणून एक पक्ष जरी या डोमिनिअन्स म्हणजे जपान, जर्मनीइतकीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत असें म्हणत असला, तरी दुसरा पक्ष ते आमचें अंकीत देश आहेत असें प्रतिपादन करीत आहे. म्हणूनच वसाहतींत दिवसेंदिवस जास्त असंतोष वाढत आहे आणि त्या आपला दर्जा कायद्यानें ठरवून घेण्याच्या भान-डींत न पडतां शेवटीं त्रागा करूनच ठरविणार आहेत. अशा पुढार-लेल्या वसाहती आयर्लंड व आफ्रिका आहेत. बाकीच्या तितक्याशा धीट झाल्या नाहींत.

बाल्फरच्या या घोषणेंत किंवा इतरत्र कोठेंहि 'डोमिनियन स्टेटस' या शब्दांचा उल्लेखहि नव्हता. त्या घोषणेंत ब्रिटिश कॉमनवेल्थमधील सभासदांचा दर्जा काय आहे हें सांगितलें होतें. ह्या दर्जाची व्याख्या घोषणेचा अर्थ लावूनच करावयाची आहे.

त्यांत तीन गोष्टी कायदेपंडितांच्या मतानें महत्त्वाच्या आहेत. एक सर्व वसाहतींनीं राजनिष्ठा मान्य केली पाहिजे. दुसरें त्या वसाहती 'साम्रा-ज्यांतील आहेत' असें सांगितलें आहे; पण या दोन व्याख्या हिंदुस्थान-सारख्या देशालाहि लागतील म्हणून तिसरी गोष्ट सांगितली कीं त्या वसाहती दर्जानें ग्रेटब्रिटन बरोबरीच्या आहेत. म्हणजेच अंतर्बाह्य संबं-धांत एक दुसरीपेक्षां कमी नाहीं.

समानता किंवा बरोबरीचा दर्जा म्हणजे काय हें सांगणें कायदेपंडि-तांना कठीण वाटतें. पण ब्रिटिशांच्याबरोबर त्यांची तुलना केली असल्यामुळें ग्रेटब्रिटन ज्याप्रमाणें घरच्या व बाहेरच्या बाबतींत कारभार चालवितें, तसा वसाहतींना चालवितां येईल असा त्याचा अर्थ होतो. ब्रिटिश पार्लमेंटवर जसा दुसऱ्या कोणाचा अंमल चालत नाहीं, तसा वसाहतींवर दुसऱ्या कोणाचा ग्रेट ब्रिटनचाहि चालणार नाहीं असें त्यावरून अनुमान निघतें. याचा अर्थ ग्रेट ब्रिटनची जशी राज्यघटना आहे, तशी वसाहतींची असली पाहिजे असें नाहीं. पण या समान हक्कांचा उपयोग वसाहतींनीं केलाच

पाहिजे असें नसल्याचें त्या वेळीं सांगण्यांत आलें. संरक्षणाच्या प्रश्नाचे बाबतींत कायदेपंडित म्हणतात, वसाहतींचा दर्जा सारखा असला तरी त्यांच्या रक्षणाचा भार ब्रिटनवरच पडेल.

कॉमनवेल्थमध्यें अलेल्या या लोकांच्या जमावाला काय म्हणावयाचें ? फेडरेशन, कां युनियन ? नाहीं. तो एक स्वेच्छेनें एकत्रित आलेल्या लोकांचा संघ आहे. यावरून मि. के. सी. व्हीअर म्हणतात,* दोनी पर्याय निंघू शकतात. एक पर्याय असा कीं, आम्ही स्वेच्छेनें न मोडणाऱ्या अशा ब्रिटिश कॉमन्वेल्थमध्यें कायमचे आलों आहोंत किंवा आम्हीं येथें जें एकत्र आलों, ते आमची इच्छा होती म्हणून आलों आणि जेव्हां आमची इच्छा बदलेल, तेव्हां आम्हीं त्यांतून जाऊं. फ्री शब्दावरून विभक्त होण्याचा हक्क निश्चित आहे असें डी. व्हॅलेरा, जनरल हर्टझॉग प्रभृति म्हणतात. विरुद्ध मत असणारेहि पुष्कळ आहेत.

तेव्हां डोमिनिअन स्टेटस यांचें स्वरूपांत तीन गोष्टी अंतर्भूत झाल्या आहेत. १ राजनिष्ठा, २ समानता, ३ स्वेच्छासंघप्रवेश. या तीनमध्यें समानता हीच खरी वसाहतींचीं नवी कमाई होती. कारण त्यापूर्वीं आठ बाबतींत वसाहतींना विषमता वाटणाऱ्या बाबी होत्या. मागील प्रकरणांत त्याचा उल्लेख केला आहेच. तथापि १९३१ च्या पूर्वीची स्थिस्ती, १९३१ नंतरची स्थिती व १९३१ चा कायदा एके ठिकाणीं वाचावयास मिळावा म्हणून येथें पुनरुक्ती केली आहे.

( १ ) राजाचा हुद्दा—आयर्लंडला स्वतंत्र दर्जा प्राप्त होऊनहि त्याचा उल्लेख ग्रेट ब्रिटन व आयर्लंड बरोबर करीत. पुढें आयर्लंडऐवजीं उत्तर आयर्लंड असें म्हणण्यांत आलें व दक्षिण आयर्लंड इतर वसाहतीबरोबर गुंफली गेली.

( २ ) ग. जनरलमुळें येणारी विषमता. ग. जनरल हा ब्रिटिश मंत्रि-मंडळाच्या सल्ल्यानें चाले. त्यामुळें वसाहतीवर ब्रिटिश मंत्र्याचें राज्य असे.

* *The statute of westminister and Dominion status by k. c. wheare Page 33.*

तो राजाचा प्रतिनिधी आहे हें खरें. पण राजाहि आपल्या मंत्र्यांना विचारून ग. जनरलला सल्ला देई. अशा रीतीनें प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें ग. जनरलचा अंमल म्हणजे ब्रिटिश अंमल असे.

( ३ ) राजेसाहेब आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें वसहतींनीं पास केलेले व ग. जनरलनें संमती दिलेले असें कायदे अमान्य करूं शकत.

( ४ ) ग. जनरल वसाहतींनीं पास केलेलें बिल राजेसाहेबांच्या मान्यतेकरतां राखून ठेऊं शके. राजेसाहेब आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें त्याचा निकाल देत.

( ५ ) आपल्या देशाबाहेर असलेल्या प्रजाजनावर वसाहतींच्या कायद्यांचा अंमल नसे. पण असा अंमल युनायटेड किंगडमच्या कायद्याचा चाले.

( ६ ) पूर्वी वसाहतींना युनायटेड किंगडमच्या कायद्याशीं विरोधी असणारे कायदे करतां येत नसत. त्यांनीं केलेले असे कायदे निरुपयोगी ठरत व ते अमलांत येऊ शकत नसत.

( ७ ) वसाहतींच्या न्यायमंदिरांत झालेल्या निर्णयावर इंग्लंडच्या प्रीव्हि कौन्सिलांत अपील करता येई. वसाहतींना हें अन्यायाचें व अपमानकारक वाटे.

( ८ ) बाहेर देशाशीं करारमदार करतांना ब्रिटिश सरकार साऱ्या वसाहतींना त्यांत गोवीत असे. त्यामुळें वसाहतींना आपलें स्वातंत्र्य नांवाचें आहे असें वाटे.

या विषमतेपैकीं कांहीं अगदीं साध्या होत्या व त्या १९२६ मध्येंच दूर झाल्या. राजाच्या हुद्याचा प्रश्न हा उघडउघड चूक होता, तो ताबडतोब दुरुस्त झाला. ग. जनरल व अपिलें याबद्दल १९२६ च्या परिषदेनें एकमतानें शिफारसी केल्या. परराष्ट्रीय व्यवहाराबद्दल त्यांनीं तपशीलवार नियम केले. आणि बाकीच्या प्रश्नांसंबंधीं तात्त्विक विवेचन केलें. या प्रश्नांचा ऊहापोह, चर्चा व छाननी करण्याकरतां एक उपसमिती नेमण्यांत आली. त्या कमिटीनें १९३० च्या जानेवारींत आपला अहवाल

सादर केला. ह्या अहवालावरच पुढें १९३१ चा वेस्टमिन्स्टरचा कायदा झाला.

या विषमतेच्या मागें फार मोठा इतिहास व वसाहतींच्या वादींचा इतिहास आहे. वसाहतींत गेलेले गव्हर्नर्स हे तेथील लोकांना न जुमानतां इंग्लंडच्या धोरणानें राज्य चालवीत. हिंदुस्थानला याचा अनुभव काय थोडा आहे. पुढें तेथें प्रातिनिधीक राज्यपद्धती आली. पण गव्हर्नर्सची सत्ता कमी झाली नाहीं. नंतर जबाबदार राज्यपद्धत आली. पण गव्हर्नर जनरल हा राजाचा प्रतिनिधी व राजा इंग्लिश मंत्र्यांच्या सल्ल्यानें चालणारा असल्यामुळे त्याचा सासुरवास जाणवतच राहिला. ज्याप्रमाणें वसाहतीच्या स्वराज्याची व्याख्या ठरलेली नाहीं, त्याप्रमाणें जबाबदार स्वराज्याची व्याख्याहि ठरलेली नाहीं. निदान वसाहतींत तरी त्या व्याख्येचा प्रभाव पडलेला नाहीं. व्याख्या म्हटली कीं, सत्ता कायदा आला आणि इंग्लिश लोक कायदा टाळून परंपरेनें जें देतां येईल तें देत, त्यामुळें अलिखीत अशी बरीच सत्ता त्यांच्या हातीं राहत असे. इंग्लंडमधील कॅबिनेट पद्धतीचा अंमल पदरांत पाडून घ्यावयास वसाहतींना जबाबदार राज्य-पद्धतींत सुद्धां पुष्कळ झगडावें लागलें. पण १९२६ सालीं वसाहतींत चाललेला हा रूढीचा व परंपरेचा गोंधळ बराच कमी झाला. तो अद्याप गेला आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण कायदा व रूढी यांचें युद्ध सुरू झालें कीं, कायदेपंडित कायद्यांना प्रामाण्य देतात आणि रूढी गौण मानतात. म्हणून १९३१ चा कायदा झाला असला तरी त्यामुळें रूढी गेल्या नाहींत. त्यामुळें या कायद्यानंतरहि वसाहतींना निश्चितपणें आपण कोठें उभ्या आहोंत हें सांगणें कठीण आहे. वसाहती व साम्राज्यसत्ता या दोघांचें त्याच कारणानें सारखे झगडे होतात. एक दुसऱ्याला दडपण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांत जो बलवान ठरतो, त्याचें साधतें. वर ज्या आठ विषमता सांगितल्या आहेत, त्यांतील कांहीं अशाच झगड्यानें दूर करण्यांत आल्या. आयर्लंडच्या बाबतींत तर हे झगडे फारच विकोपाला गेले आहेत.

१९३१ चा वेस्ट मिन्स्टरचा कायदा हा १९२६ व १९३० सालीं भरलेल्या साम्राज्यपरिषदेंतील ठरावांना कायदेशीर स्वरूप देण्यांकरतां केला गेला असें सांगण्यांत येतें १९२६ मध्यें वसाहती व ब्रिटिश सरकार यांच्यांत समानता आहे असें म्हटलें खरें; पण त्या बरोबरच प्रचलीत कारभार, कायदे, व न्याय पद्धति यांच्याशीं तो दर्जा पूर्णपणें सुसंगत नाहीं असेंहि सांगण्यांत आलें.* त्यांचें कारण असें देण्यांत आलें कीं, वसाहतींत आजची घटना येण्यापूर्वी जे कांहीं प्रकार होते ते त्याला जबाबदार आहेत. पण ही सबब लंगडी आहे. ते तुम्ही नष्ट करूं शकत नाहीं असें थोडेंच आहे. पण परिषद म्हणतें कीं, वहिवाटीनें कायद्यावर आक्रमण करून कायद्यांची गळचेपी केलेलीच आहे. कायदे अमान्य करणें ते राजाच्या संमतीकरतां ठेवणें, वगैरे प्रकार वसाहतींच्या संमतीनें व्हावेत असें म्हटल्यानंतर कायद्याचा बोज काय राहिला ? तेव्हां कायदा व वहिवाट यांच्यांतील बेशिस्तपणा काढून टाकण्याकरतां १९३१ चा कायदा झाला असें सांगण्यांत येतें.

वर ज्या आठ विषमतेच्या बाबी सांगितल्या त्या १९३१ च्या वेस्ट मिन्स्टर कायद्यानें कशा काढून टाकण्याचा प्रयत्न केला हें आपण पाहूं.

( १ ) राजाचा हुद्दा. तो बदललेल्या परिस्थितींत दूर होणें अवश्य होतें व त्याप्रमाणें केलाहि.

( २ ) ग. जनरलच्या दर्जाचा प्रश्न. हा प्रश्न रूढींनीं मान्य झाला. राजाचा इंग्लंडांत दर्जा, तो ग. जनरलचा वसाहतींत, राजा ज्याप्रमाणें मंत्र्यांच्या सल्ल्यानें चालतो, त्याप्रमाणें ग. जनरलनें वसाहत मंत्र्यांच्या सल्ल्यानें चालावें. त्याला कांहीं नियम आहेत. पण ते सांगितले गेले नाहींत. या ग. जनरलचा व ब्रिटिश मंत्रिमंडळाचा संबंध काय हा

---

* *Existing administrative legistative and judicial forms are admitedly not wholly in accord with this position. page. 163 The British Dominions 1918-1931 by Keith.*

दुसरा प्रश्न. त्या बाबतींत असें सांगितलें कीं, ब्रिटिश मंत्रिमंडळाचा ग. जनरलशीं कांहीं संबंध नाहीं. त्यांचा संबंध फक्त राजाशीं आहे. ह्या ग. जनरलची नेमणूक राजानें वसाहतमंत्र्यांचा सल्ला घेऊन करावी.

( ३ ) बिलांना अमान्यता. पूर्वीची वहिवाट अशी होती कीं, राजेसाहेब आपल्या या अधिकाराचा उपयोग करूं शकत नसत. ज्या वसाहतींत ही वहिवाट चालू आहे त्यांनीं ती चालू ठेवावी; पण जेथें ही वहिवाट नाहीं, तेथें वसाहतीनीं ब्रिटिश पार्लमेंटला तसा कायदा करावयास लावावा.

( ४ ) राजाच्या मान्यतेकरता बिलें राखून ठेवणें. या बाबतींत वहिवाट व कायद्याची सांगड घातली. राखीव बिलें दोन प्रकारचीं असतात. एकांत ग. जनरलला आपल्या विवेचक बुद्धीचा उपयोग करतां येतो आणि दुसऱ्यांत त्यांच्यावर बिलें राखून ठेवण्याचें बंधन असते. पहिल्या बाबतींत त्यानें वसाहत मंत्र्यांच्या सल्ल्यानें आपली विवेचक बुध्दी वापरावयाची आहे. दुसऱ्या बिलांच्या बाबतींत असें सांगण्यांत आलें कीं, जीं बिलें राजाकडे मान्यतेकरतां म्हणून पाठविलीं जातील, तीं राखून ठेवा असा सल्ला इंग्लंडचे मंत्री राजाला देणार नाहींत. अशा प्रकारें वहिवाटीनें बिलें राखून ठेवण्याची बाब नष्ट केली. पण जीं बिलें राजमान्यतेकरतां राखून ठेवलींच पाहिजेत असा वसाहतींचा कायदा आहे, तो वहिवाटीनें कसा बदलणार ? ती विषमता नष्ट करावयाची असेल, तर वसाहतींनीं आपली घटना बदलली पाहिजे. त्या गोष्टीला युनायटेड किंगडमचें पार्लमेंट जरूर तर कायदेशीर मान्यता देईल असेंहि कबूल करण्यांत आलें. अशा प्रकारें बिलें राखून ठेवण्याची भानगडच मिटविण्यांत आली.

( ५ ) **प्रिव्ही कौंसिल.** या बाबतींत असलेली विषमता काढून टाकण्यांत आली आणि ठरविण्यांत आलें कीं, साम्राज्यांतील ज्या भागाला आपल्या न्यायदानाच्या हक्कावर यानें आक्रमण होतें असें वाटत असेल त्यांच्या इच्छेविरुद्ध ग्रेट ब्रिटनचें सरकार जाणार नाहीं.

एखाद्या वसाहतींला प्रीव्हि कौंसिल नकोसें वाटलें आणि बाकींच्या वसाहतींना तें पाहिजे असलें तर त्याचा निर्णय आपसांत चर्चा करून करावा असें ठरलें.

(६) **परराष्ट्रीय संबंध.** या प्रश्नाबाबत वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें कांहींहि कलमें घातलीं नाहींत. व्यवहारांत ज्या ज्या बदला कराव्या असें वाटेल त्या नव्या वाहिवाटींनीं कराव्या, त्याला कायदा नको असें म्हटलें गेलें.

(७) **देशाबाहेरील प्रजाजनांवर कायद्याचा अंमल.** त्याबद्दल वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यांत स्पष्टीकरण नाहीं. पण १९२९ च्या परिषदेनें असें ठरविलें कीं, वसाहतींचा कायदा बाहेर लागूं पडतो कीं नाहीं, हा घोटाळ्याचा व गैरसोईचा प्रश्न युनाटेड किंगडमच्या पार्लमेंटनें आपलें म्हणणें वसाहतींच्या संमतीनें कायदा करून जाहीर करावें. वसाहतींना बाहेर देशाला लागूं पडणारा कायदा करण्याची सत्ता आहे हें कायद्यांत नमूद करावें.

(८) १८६५ चा कलोनिअल व्हॅलिडीटी ॲक्ट हा रद्द झाल्यामुळें वसाहतींना इंग्लंडच्या विरोधी कायदे करण्यासहि परवानगी मिळाली.

अशाप्रकारें आठ बाबतींत असणारी विषमता काढून टाकून वसाहतीं व युनायटेड किंगडम यांचा दर्जा सारखा करण्यांत आला.

डोमिनिअन म्हणजे एक प्रादेशिक जनतासंघ. (Territorial Community) तो ग्रेट ब्रिटनपेक्षां निराळा आहे. त्यांची लक्षणें तीन. एक ग्रेट ब्रिटन प्रमाणेंच राजाशी समान निष्ठा, दुसरें ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीचें असणें. म्हणजे अंतर्गत किंवा बाह्यसंबंधांत ग्रेट ब्रिटनच्या अंकित नसणें आणि तीन ग्रेट ब्रिटनच्या कॉमनवेल्थमध्यें स्वेच्छेनें समाविष्ट होणें. हीं तीन लक्षणें जेथें आहेत तेथें डोमिनिअनस्टेटस आहे असें के. सी. व्हीअर यांनीं म्हटलें आहे.* ही एक व्याख्या आहे. त्यांतील

---

*Statute of westminster and Dominion status by wheare page 294.*

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



दुसरें लक्षण महत्वाचें आहे. पण तिसरेंहि कमी महत्वाचें नाहीं. स्वेच्छेनें संघांत जो येतो तो स्वेच्छेनें बाहेरहि जाऊं शकतो. आणि तो बाहेर गेल्यावर त्याची राजनिष्ठा संपते. तेव्हां कांहींच्या दृष्टीनें तिसरें लक्षण हेंच खरें महत्त्वाचें ठरेल. ज्या वसाहतीं अशा प्रकारें कॉमनवेल्थच्या बाहेर जातील त्या दर्जानें इंग्लंड बरोबरीच्या आहेत असें म्हणण्यात तरी काय अर्थ ? तेव्हां ज्यांना वसाहतींचा दर्जा मिळाला आहे, त्यांना ( Free association ) स्वेच्छेनें कॉमनवेल्थमध्यें येण्याचा हक्क मिळाला आहे. आणि जोवर प्रवेश केल्यानंतर आंत रहाण्याची सक्ती नाहीं तोवर प्रवेश केल्यानंतर बाहेर जाण्यासहि बंदी नाहीं. म्हणून डोमिनिअन स्टेटस हें संपूर्ण स्वातंत्र्याच्या मार्गांतील द्वार आहे असें म्हणणें चूक नाहीं. ह्या दारांतून गेल्याखेरींज कॉमनवेल्थचें बंधन तोडता येत नाहीं असा कायद्याचा अर्थ करतां येतो.

वेस्ट मिन्स्टर कायद्याचा परिणाम काय झाला, हें येथें थोडक्यांत सांगितलें. हा कायदा वाटतो तेवढा मोठा नाहीं. त्याचीं कलमें फक्त १२ आहेत व त्या कायद्याचा उद्देश ६ परिच्छेदांत सांगितला आहे. हेतू-वाक्याबद्दल येथें व अन्यत्र बरींच चर्चा केली आहे. त्यांत १ समान राजनिष्ठा. २ राजा हें कॉमनवेल्थच्या सभासदांचें एक प्रतीक. ३ या कॉमनवेल्थमध्यें स्वेच्छाप्रवेश. ४ राजासंबंधीं कायदा बदलण्यास सर्व वसाहतींच्या पार्लमेंटची व इंग्लंडच्या पार्लमेंटची संमती. ५ पार्लमेंटचा कायदा हा वसाहतींनीं विनंती केल्याशिवाय त्यांना लागू करूं नये. ६ निरनिराळ्या सर्व वसाहतींनीं विनंती केल्यावरून हा कायदा केला जात आहे. ७ हा कायदा साम्राज्यपरिषदेंत झालेले निरनिराळे ठराव व घोषणा कायम करण्याकरतां, मंजूर करण्याकरतां व स्थापन करण्या-करतां केला जात आहे; एवढेंच प्राकथन प्रस्तावनेंत केलें आहे.

**कलम १ लें.** यांत डोमिनिअन्स म्हणजे काय, याची व्याख्या न करतां डोमिनिअन्स म्हणजे सहा वसाहती एवढें नमूद केलें आहे.

**कलम २ रें.** १८६५ चा कलोनिअन व्हॅलिडीटी ॲक्ट हा १९३१

च्या वेस्ट मिन्स्टर कायदा झाल्यानंतर, वसाहतीच्या कोणत्याहि कायद्याला लागू होणार नाहीं. ह्या ( १९३१ ) कायद्याचा अंमल सुरू झाल्यानंतर वसाहतीच्या पार्लमेंट्सनीं केलेला कोणताहि कायदा–तो इंग्लंडच्या किंवा विद्यमान अगर भावी ॲक्टना विरोधी आहे एवढ्याकरतां निष्फळ अगर गैरलागू ठरणार नाहीं. वसाहतींच्या पार्लमेंट्सना अशा ॲक्ट्खालीं काढलेले हुकूम वगैरे ते जर वसाहतींना लागू असतील तर दुरुस्त अगर रद्द करण्याचा अधिकार आहे. ह्या कलमानें वसाहतींना संपूर्ण स्वातंत्र्य दिलें. वसाहती वाटेल तो कायदा करूं शकतात. साम्राज्यांतून फुटून जाण्याचा कायदा जरी त्यांनीं केला तरी त्यांचा हात कायदा धरूं शकत नाहीं. प्रास्ताविक हेतूकथनामध्यें राजनिष्ठा असली तरी तिला कायद्याचें सामर्थ्य नाहीं. वेस्ट मिन्स्टर स्टॅट्यूटप्रमाणें वसाहती साम्राज्यांतून फुटून जाऊं शकतात असें जें म्हटले जातें तें याच कलमाच्या आधारावर.

ह्या कलमामुळें दोन प्रश्न उत्पन्न होतात. ( १ ) ज़र वसाहतींनीं आपल्या घटना कायद्यांत असें लिहिलें असले कीं, त्यांची सार्वभौम सत्ता ही ब्रिटिश राजा व पार्लमेंट आहे, तर त्यांना त्याविरुद्ध कायदा करून साम्राज्यांतून निघतां येणार नाहीं. कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड व न्यू फौंडलंड या चार वसाहतींनीं ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता आपल्या घटनाकायद्यांत मान्य केली आहे. पण दाक्षिण आफ्रिका व आयर्लंडनें ह्या बाबतींत सावधगिरी बाळगली आहे. त्यांनीं आपलें सार्वभौमत्व इंग्लंडच्या पार्लमेंट्सकडे आहे असें म्हटलें नाहीं. आफ्रिकेनें व आयर्लंडनें हें सार्वभौमत्व देवाकडे दिले आहे. त्यामुळें दाक्षिण आफ्रिका व आयर्लंड ह्या दोन वसाहतींना या साम्राज्यांतून फुटून जाण्याचा कायदा करतां येईल. पण बाकीच्या वसाहतींना हा अधिकार

| | |
|---|---|
| * १ कानडा–घटना कायदा कलम | ९. ( १८६७ ) |
| २ ऑस्ट्रेलिया | ६१. ( १९०० ) |
| ३ आफ्रिका | २. ( १९३४ ) |
| ४ आयर्लंड | २. ( १९२२ ) |

नाहीं असें याच कायद्यांत म्हटले आहे. या कायद्याच्या ७ व्या कलमांत कानडाला १८६७ ने १९३० पर्यंत झालेले कायदे रद्द करण्याला, बदलण्याला, किंवा दुरुस्त करण्याला मनाई केली आहे. ८ व्या व ९ व्या कलमांत ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड यांच्यावर हेंच बंधन घातलें आहे.

हिंदुस्थानच्या समान दर्जाचा जेव्हां प्रश्न येईल, तेव्हां १९३५ च्या कायद्यांतील सार्वभौमत्वासारखीं कांहीं कलमें आम्हाला बदलण्याला बंदी करण्यांत येईल. आज कॅांग्रेसनें जी घटनापरिषद मागितली आहे, ती अत्यंत योग्य व बरोबर आहे. या घटना परिषदेंत तयार होणाऱ्या घटनेंत आम्ही सार्वभौमत्वाचे अधिकार हे हिंदुस्थानच्या लोकांकडे आहेत असे म्हणूं. ब्रिटिश सरकार १९३५ च्या कायद्यांतील विशिष्ट भाग कायम ठेवल पाहिजे असा आग्रह धरील. याच भीतीनें आज घटनापरिषद द्यावयाला सरकार तयार नसावें.

**कलम ३.** वसाहतींतील अन्य देशांत रहाणाऱ्या प्रजाजनांकरतां कायदे करण्याचा अधिकार वसाहतींना आहे असें म्हटलें आहे. हे कायदे शांतता, सुव्यवस्था व सुराज्याकरतां करतां येतील. या कलमाची चर्चा मागील भागांत केली आहे.

**कलम ४.** युनायटेड किंगडमच्या पार्लमेंटचा कोणताहि कायदा वसाहतींना आपोआप लागू होणार नाहीं. वसाहतींनीं विनंती केली व मान्यता दिली, तरच तो कायदा त्यांना लागू होईल. या कलमामुळें कायदे-पंडित अस्वस्थ झाले. ब्रिटिश पार्लमेंटची सार्वभौम सत्ता या कलमानें नष्ट झाली असें ते म्हणूं लागले. पण ब्रिटिश पार्लमेंटचें सार्वभौमत्व हें ज्या वेळीं होतें त्या वेळीं म्हणजे हा कायदा करण्याच्या वेळीं असलेलें त्यांचें सार्वभौमत्व त्यांनीं स्वतः कायदा करून मर्यादित केले. आतां पार्लमेंटला वसाहती-शिवाय इतर कोठेंहि कायदे करतां येतील. फक्त वसाहतींनीं विनंति केली तरच त्यांच्याकरतां पार्लमेंट कायदे करूं शकेल. पण या कलमानें पार्लमेंटला वसाहतींकरतां कायदे करतां येणार नाहींत असें म्हटले नाहीं, वसा-तींच्या विनंतीनें व मान्यतेनें करतां येतील एवढेंच म्हटलें आहे

तेवढ्यांत साम्राज्यसत्तेनें समाधान मानून घ्यावें. या कलमाच्या अर्थाबद्दल कायदेपंडित भांडू शकतील व पार्लमेंटला आपली सार्वभौमसत्ता मर्यादित करतां येणार नाहीं असें म्हणूं शकतील. पण तें सिद्ध होणार नाहीं.

**कलम ५ व ६.** व्यापारी जहाजें व दर्यांवरील खटल्यासंबंधीं आहेत. त्यांची चर्चा इतरत्र केली आहे.

**कलम ७ वें** ( १ ) १८६७ पासून १९३० पर्यंत पास झालेल्या नॉर्थ अमेरिकेचे कायदे किंवा त्या कायद्यान्वयें निघालेले हुकूम, फर्मान, कानू रद्द करण्याला, बदलण्याला किंवा दुरुस्त करण्याला हा (१९३१ चा) कायदा लागू नाहीं. (२) या कायद्यांतील कलम २ मध्यें दिलेले अधिकार कानडांतील प्रांतांच्याहि कायद्यांना लागू आहेत. (३) या कायद्यानें कानडाच्या पार्लमेंटला किंवा प्रांतिक कायदेमंडळांना प्राप्त झालेले अधिकार हे त्या पार्लमेंटला किंवा प्रांतिक कायदेमंडळाला जे कायदे करण्याचे अधिकार आहेत, त्यापुरतेच मर्यादित आहेत.

**कलम ८ वें.** ऑस्ट्रेलियाच्या कॉमनवेल्थचा घटनाकायदा किंवा न्यूझीलंडच्या वसाहतीचा घटनाकायदा, किंवा घटना बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा नवा अधिकार या कायद्यानें दिलेला नाहीं. ते बदलावयाचे किंवा रद्द करावयाचे असतील, तर हा कायदा सुरू होण्यापूर्वी जी सत्ता त्या वसाहतींना होती, तीप्रमाणें करतां येईल.

**कलम ९ वें.** (१) ऑस्ट्रेलियांतील स्टेट्सच्या अधिकारांत ज्या बाबी आहेत, त्या बाबतींत कायदा करण्याचा अधिकार या कायद्यानें ऑस्ट्रेलियाच्या पार्लमेंटला दिलेला नाहीं. कारण त्या बाबी ऑस्ट्रेलियाच्या कॉमनवेल्थ सरकारच्या किंवा पार्लमेंटच्या अधिकारांतल्या नाहींत.

(२) ऑस्ट्रेलियाच्या स्टेट्सच्या अधिकारांत ज्या बाबी आहेत, त्यासंबंधीं ब्रिटिश पार्लमेंटला कायदा करण्यास ऑस्ट्रेलियाच्या सरकारचीं किंवा पार्लमेंटची संमति पाहिजे असें हा कायदा ( १९३१ ) म्हणत नाहीं. कारण त्या बाबी ऑस्ट्रेलियाच्या सरकारच्या किंवा पार्लमेंटच्या अधिकारांतील नाहींत. हा कायदा पास होण्यापूर्वी ब्रिटिश पार्लमेंटला त्यांच्या

संमतीशिवाय कायदे करण्याची सनदशीर रूढी जी होती, त्याच रूढीनें हे स्टेट्सकायदे ब्रिटिश पार्लमेंटला कायदे करतां येतील.

(३)चवथ्या कलमांत ज्या विनंतीचा व संमतीचा उल्लेख केला आहे, तो ऑस्ट्रेलियाच्या सरकारला व पार्लमेंटला उद्देशून आहे असें हा कायदा ऑस्ट्रेलियाच्या कॉमनवेल्थला लावतांना समजावे.

**कलम १० वें.** ज्या वसाहतींना २,३,४,५ हीं कलमें लागू होण्यासारखीं असतील, त्यांच्या पार्लमेंटनीं कायदा करून तीं कलमें लावावीं व त्यांतील एका किंवा अन्य कलमांची अंमलबजावणी ह्या कायद्याच्या सुरवातीच्या तारखेपासून किंवा जी तारीख ठरवली जाईल त्या तारखेपासून करावी. (२) त्यांतील एखादें कलम वसाहतींच्या पार्लमेंटला मागें खेचतांहि येईल. (३) हें कलम ऑस्ट्रेलिया कानडा, न्यू झीलंड व न्यू फौंडलंड यांनाच फक्त लागू आहे.

**कलम ११ वें.** १८८९ च्या इंटरप्रिटेशन कायद्यांत कांहींहि म्हटलें असेल तरी कॉलनी ह्या शब्दप्रयोगांत हा ( १९३१ ) कायदा सुरू झाल्यानंतर डोमिनिअनला, किंवा डोमिअनचा भाग असणाऱ्या प्रांताला किंवा स्टेटला ब्रिटिश पार्लमेंटच्या कायद्यानें अंतर्भूत करूं नये.

**कलम १२ वें.** ह्या कायद्याला १९३१ चा वेस्टमिन्स्टरचा कायदा असें म्हणावे.

वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें फक्त दोन वसाहती, आयर्लंड व आफ्रिका ह्या जवळजवळ स्वतंत्र झाल्या व या कायद्यानें खरा फायदा त्यांचाच केला वसाहतींत असलेल्या रूढींना या कायद्यानें कायदेशीर स्वरूप दिलें. पण कांहीं रूढी नव्यानें स्थापन होतील, कांहीं प्रस्थापित रूढी अद्याप कायद्यांत बसल्या नाहींत,तथापि इंग्लिश पद्धतीवर वसाहतींची रूढीनें वाढ व्हावी अशी एकंदर योजना दिसते.

---

# भाग ५ वा.

## वसाहतींचें आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य.

स्वतःच्या देशांतील राज्यकारभारांत वसाहतींना स्वातंत्र्य कितपत आहे हें आपण पाहिलें. पण स्वातंत्र्याचें तत्व असें असते कीं तें घरांत आहे आणि बाहेर नाहीं असें म्हणून भागत नाहीं, कारण बाहेर देशाच्या व्यवहारांत जर वसाहतीं परतंत्र असतील तर त्यांचें घरचें स्वातंत्र्यहि बाधित होईल. जसें प्रांतांत स्वराज्य असलें, आणि मध्यवर्ती सत्तेंत नसलें म्हणजे प्रांताच्या स्वराज्यांत काम करणें अशक्य होतें, त्याच प्रकारची स्थिति स्वदेशांत स्वातंत्र्य आणि परदेशांत परावलंबन असल्यानें झाल्याशिवाय रहात नाहीं. बाहेर देशांत होणाऱ्या बऱ्या-वाईट घडामोडींचे परिणाम आपल्या देशावर होतात आणि त्यामुळें अशा परदेशीय घडामोडीवर जर वसाहती हुकमत चालवूं शकत नसल्या, तर त्यांचें स्वातंत्र्य बेगडी आहे असेंच म्हणणें भाग पडतें.

रशिया, फ्रान्स, जर्मनी, जपान वगैरे जीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत, त्यांना युद्ध पुकारतां येतें, तह करतां येतात, तटस्थ रहातां येतें, व्यापारी करार करतां येतात, राष्ट्रसंघांत सभासद म्हणून जाता येतें, परदेशांत वकील नेमतां येतात, परदेशच्या वकिलांना आपल्या देशांत ठेऊन

घेतां येतें, बाहेरील देशाच्या मालाला, माणसांना आपल्या देशांत यावयास बंदी करता येते. हे सर्व अधिकार तीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत म्हणून त्यांना मिळाले आहेत.वसाहतींना यापैकीं किती अधिकार आहेत? त्यांना युद्ध तह करतां येत असले, परदेशी वकील पाठवितां येत असले, राष्ट्रसंघांत स्वतंत्रपणें बसतां येत असले, इंग्लंडच्या इच्छेविरुद्ध तेथें मत देतां येत असले, तर आपण त्यांना स्वातंत्र्य आहे असें म्हणूं. तें स्वातंत्र्य त्यांना नसेल तर वसाहतींना साम्राज्यांतून फुटून जाण्याचा अधिकार आहे या म्हणण्यांतहि अर्थ राहणार नाहीं. पुढील चर्चेत शिरण्यापूर्वी येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, वसाहतींना ब्रिटिशांच्या बरोबरीचा दर्जा आहे, असें १९२६ सालच्या परिषदेंत ठरल्यानंतर त्यांनीं जर हे अधिकार आपल्या हातीं घेतले नसले तर तो दोष वसाहतींचा आहे, घटनेचा नाहीं किंवा ब्रिटिश साम्राज्याचा नाहीं. जितक्या जितक्या निर्भयतेनें, सडेतोडपणानें वसाहती आपल्याला मिळालेले हक्क आक्रमून बसतील तितक्या तितक्या प्रमाणांत त्या स्वतंत्र होतील. आयर्लंड सारखा नुक्ताच स्वातंत्र्याचा दर्जा प्राप्त करून बसलेला देश आणि कानडा सारखा जुना देश यांच्या मनोवृत्तींत फरक रहाणारच. कानडा ब्रिटिशांना चिकटून रहाण्याचा प्रयत्न करील, तर आयर्लंड साम्राज्यांतून फुटून जाण्याचा प्रयत्न करील. चालू युद्धांतच पहाना आयर्लंडनें तटस्थता स्वीकारली असतां इंग्लंड त्याचें कांहीं करूं शकले नाहीं. याच्याहि पुढें जाऊन आपण अशी कल्पना करूं कीं, आयर्लंडनें किंवा दुसऱ्या एखाद्या वसाहतीनें जर्मनीला मिळण्याचें ठरविलें, तर इंग्लंड त्यांचें काय करणार ? इंग्लंडला आयर्लंडवर स्वारी करून पुनः आयर्लंड आपल्या ताब्यांत घेण्यावांचून गत्यंतर उरणार नाहीं. पण जेव्हां युद्धसमाप्तीनंतर तह परिषद होईल तेव्हां आयर्लंडला ब्रिटिश सरकार यशस्वी झालें तर साम्राज्यांतून घालवून तेथें मँडेट किंवा प्रोटेक्टरेट स्थापन करील. वसाहतींचा व ब्रिटिशांचा हा खटका अजून उडालेला नाहीं; पण ही वेळ येणें अशक्यच आहे, असें वाटत नाहीं. पण आजच्या कायद्याप्रमाणें वसाहतीं ह्या पर-

देशाच्या संबंधाच्या बाबतींत आपलें स्वातंत्र्य स्थापित करूं शकतील. तसें स्वातंत्र्य त्यांनीं गाजवण्यास सुरवातहि केली आहे. ब्रिटिशांनीं त्याबद्दल त्यांना अडथळा केला नाहीं, एवढेंच नव्हें तर तें स्वातंत्र्य मान्यहि केलें आहे. वसाहतींचा इतिहासच असा आहे कीं, ब्रिटिशांनीं ही सत्ता अमान्य केली असती तर त्यांनाच त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले असते.

वसाहतींना स्वतंत्रपणें तह करण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं हा प्रश्न फार पूर्वीं, म्हणजे १८७० सालींच निर्माण झाला. त्या वेळीं व्हिक्टोरिया येथें एक रॉयल कमिशन नेमलें होतें. या कमिशननें अशी शिफारस केली कीं, ब्रिटिश अंमलांतील वसाहतींना स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता द्यावी, त्यांना तह करण्याचे अधिकार द्यावेत आणि युरोपियन राष्ट्रांनाहि त्यांचा हा दर्जा विशद करून सांगावा. कानडामध्यें हा प्रश्न वारंवार निघाला; पण त्यांनीं तो नेटाला लावला नाहीं. पण कानडाला ब्रिटिशांच्या मदतीनें किंवा ब्रिटिशांच्याशिवाय स्वतंत्रपणें तह करण्याचा अधिकार होता. १८९३ व १९०७ सालीं त्यांनीं असे तह केले. या तहांना पुढें राजेसाहेबांनीं मान्यता दिली. हे तह करण्याची जरी कानडाला सत्ता होती, तरी त्या तहावर वसाहतमंत्र्याच्या बरोबरच ब्रिटिश पार्लमेंटच्या परराष्ट्र मंत्र्याची व राजाची सही व शिक्का लागे. त्यामुळें हें स्वातंत्र्य मर्यादितच असे.

पण पुढें १९१२ व १९१३ सालीं दोन व्यापारविषयक प्रश्न उपस्थित झाले आणि त्या वेळीं ह्या प्रश्नानें पुनः उचल खाल्ली. हे तह करण्याकरतां वसाहतींना स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता द्यावी, अशी इच्छा प्रदर्शित केली गेली. त्यावेळीं वसाहतींना पहिल्यादांच हे तह करण्याचे स्वतंत्र अधिकार मिळाले. पण साम्राज्यांत एकी असावी याकरतां आणि तो तह पाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे म्हणून ब्रिटिश मंत्रिमंडळाची सत्ता त्याहि वेळीं वसाहतीवर राहिलीच. म्हणजे वसाहती जरी स्वतंत्रपणें तहाचीं बोलणीं करूं शकत असल्या तरी ते तह शेवटीं ब्रिटिश सरकारमार्फतच मान्य होत.

महायुद्ध संपल्यानंतर जी तहपरिषद झाली, त्या परिषदेंत वसाहतींना इतर देशांप्रमाणें स्वतंत्र प्रतिनिधित्व दिलें. या प्रतिनिधीत्वाचा अर्थ ब्रिटिशांच्या कल्पनेप्रमाणें वसाहती ह्या साम्राज्यसरकारपेक्षां निराळें धोरण घेऊं शकतील असा नव्हता. आपल्या बाजूला वसाहतींच्या निमित्तानें अधिक मतें मिळावीं एवढाच त्यांत ब्रिटिशांचा हेतु होता. पुढें राष्ट्रसंघ स्थापन झाला. त्या संघांतहि वसाहतींना स्वतंत्र जागा मिळाल्या. हिंदुस्थानलाहि एक जागा मिळाली. ही जागा सभासदत्वाची होती. वसाहतींना राष्ट्रसंघाच्या कौंसिलवरहि घेतलें जावें असेंहि म्हणण्यांत आलें. ब्रिटिशांनीं ही कारवाई स्वतःच्या हातांत अधिक हुकमी मतें असावीं, याकरतां केली असली तरी वसाहतींना आपलें पाऊल पुढें टाकतां आलें यांत शंका नाहीं. आंतरराष्ट्रीय संबंधांत वसाहतींना स्वतंत्र स्थान व दर्जा त्यामुळें प्राप्त झाला. वसाहतींचे प्रतिनिधी जे राष्ट्रसंघांत गेले, ते आपापल्या मंत्रिमंडळाच्यातर्फें गेलें; ते ब्रिटिशसरकारच्या तर्फे नेमले गेलें नाहींत हें लक्षांत ठेवले पाहिजे.आमच्या हिंदुस्थानचा प्रतिनिधी ह्राहि व्हाईसरॉयतर्फे गेला होता. पण तेवढ्यामुळें हिंदुस्थान कांहीं स्वतंत्र ठरला नाहीं. तथापि हिंदुस्थानच्या प्रतिनिधीला जी गोष्ट करणें शक्य नव्हतें, ती वसाहतींच्या प्रतिनिधींनीं केली. त्यांनीं ब्रिटिश प्रतिनिधीच्या तंत्रानें चालण्याचें कधींच कबूल केलें नाहीं. उलट कांहीं कांहीं बाबतींत ब्रिटिश प्रतिनिधींच्या सूचनांविरुद्ध त्यांनीं मतें दिलीं. साम्राज्यसरकार व साम्राज्यांतील वसाहती यांचीं मतें अशा प्रकारें परस्परविरोधी पडलीं. कानडानें तर अनेक विषयांच्या बाबतींत ब्रिटिश प्रतिनिधींशीं अगदीं विरोधी असें मत प्रदर्शित केलें. पण राष्ट्रसंघांत वसाहती कितीहि विरोधी वागल्या तरी तो प्रामाणिक मतभेदाचा प्रश्न समजला जाई. त्यामुळें वसाहतींचा दर्जा कसा वाढणार ?

१९२३ सालीं कानडानें थोडेसें बंड केलें. त्यांनीं अमेरिकेच्याबरोबर ' हॉलिबट फिशरी ' नांवाचा एक तह स्वतंत्रपणेंच करून टाकला.

अमेरिकाहि अशा समजूतीखालीं होती कीं, कानडाबरोबर केलेला हा तह साऱ्या ब्रिटिश साम्राज्याला लागूं होईल. पण तें खोटें ठरलें आणि हा तह कानडापुरता मर्यादित झाला. अमेरिकेच्या सेनेटनेंहि त्याला मान्यता दिली. या तहावर ब्रिटिश वकिलांच्या किंवा मंत्र्यांच्या सह्या नव्हत्या. याचा अर्थ अमेरिकेनें कानडाचें स्वतंत्र अस्तित्व मान्य केलें. मासळीसारखा क्षुल्लक प्रश्न होता, म्हणून त्याबाबतींत इंग्लंडनें तक्रार केली नाहीं; पण दुसरा राजकिय प्रश्न असतां तर उभय राष्ट्रें स्वस्थ बसलीं असतीं किंवा नाहीं हें सांगवत नाहीं.

वसाहतींना स्वतंत्रपणें तह करतां येतात, हा उपक्रम जरी मर्यादित प्रमाणांत मान्य झाला, तरी दुसरा असा एक प्रश्न उद्भवला कीं, ब्रिटिशांनीं केलेले तह वसाहतींवर बंधनकारक होतात किंवा नाहीं. वसाहती ह्या ब्रिटिश पार्लमेंटच्या पोटांत येत असल्यामुळें वसाहतींबरोबर निराळा तह करण्याची जरूरी नाहीं असें ब्रिटिश सरकारहि धरून चाले.

१९२३ सालीं तुर्कस्थानबरोबर केमालपाशाच्या विजयानंतर लॉसेन येथें तह झाला. त्या तहपरिषदेला कानडाला बोलावलें नव्हतें. त्यामुळें लॉसेनचा तह आपल्यावर बंधनकारक नाहीं असें कानडा म्हणूं लागली. याचा अर्थ कानडा तुर्कस्थानबरोबर तहानें बंद झालेलें युद्ध तह फेटाळून सुरू करणार होती असें नाहीं. पण तुर्कस्थाननें जर तह फेटाळला आणि पुनः युद्ध सुरू केलें, तर त्या युद्धांत ब्रिटिशांना किती मदत करावयाची हें ठरवण्यास कानडा पूर्ण स्वतंत्र आहे, असें मॅकेंझीकिंग यानें सांगितलें. १९२६ च्या साम्राज्य-परिषदेपुढें हा प्रश्न चर्चेला आला असतां असें ठरलें कीं, राजेसाहेबांनीं अशा परिषदेंत वसाहतींचे प्रतिनिधि नेमावेत व ज्यावर त्यांच्या सह्या नसतील तो भाग त्यांना लागूं करू नये. या पद्धतीचा स्वीकार अत्यंत सक्तीनें केला गेला आहे आणि त्यामुळेंच वसाहतींना आंतरराष्ट्रीय

कायद्यांच्या दृष्टीनें विशिष्ट स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे.* तथापि ह्या तहावर ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याची व राजाचीहि सही लागते. त्यावरून वसाहतींना स्वतंत्र सार्वभौमत्वाचा दर्जा आहे असें म्हणतां येत नाहीं. ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याची सही व जिम्मेदारी वसाहतींना कमीपणाचीच वाटली. आयर्लंडनें या बाबतींत कोंडी फोडली. १९३१ सालीं ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याची मध्यस्थी काढून टाकण्याकरतां आयर्लंडचा मंत्री प्रत्यक्ष राजाला जाऊन भेटला व ती अडचण दूर करून घेतली. ब्रिटिश मंत्र्याच्या सहीची अडचण दूर झाली; पण राजाचा सहीशिक्का हा तहाकरतां लागेच. तथापि इंग्लंडच्या तहावर राजाची सही व शिक्का असल्यानें इंग्लंड जसा परतंत्र समजला जात नाहीं; त्याचप्रमाणें वसाहतींच्या तहावर त्याच राजाचा सहीशिक्का असल्यानें वसाहती परतंत्र ठरत नाहींत. पूर्वी वसाहतींच्या तहाच्या बाबतींत ब्रिटिश मंत्री राजाला सल्ला देत असल्यामुळें आणि त्या तहावर ब्रिटिशांचा एकमेव शिक्का असल्यामुळें वसाहती ह्या ब्रिटिश मंत्र्याच्या मार्फत ताब्यांत ठेवल्या आहेत असें म्हणत. पण आतां वसाहती व राजा यांचें संबंध प्रत्यक्ष रीतीनें आल्यामुळें वसाहतींचा दर्जा वाढला. आयर्लंडनें ब्रिटिश सीलहि काढून टाकलें.

आयर्लंडचें हें उदाहरण दुसऱ्या वसाहतींनाहि अनुसरतां येईल. ब्रिटिश सरकारचा संबंध अशा प्रकारें काढून टाकल्यानें वसाहती ह्या निखालस-पणें विशिष्ट दर्जाच्या झाल्या असें म्हणतां येईल. अजूनपर्यंत त्यांना स्वतंत्रपणें एखादें युद्ध करतां येतें किंवा नाहीं हें प्रसंगानें ठरावयाचें

---

**IT will be seen that this procedure, which has been rigidly adhered to since the Conference emphasises in the hightest degree the seperate Character of the Dominions and gives them in effect the status of distinct states in International Law page 50-51 Constitu lional Law of British Dominions by A.B.Keith*

आहे आणि त्याच वेळीं त्यांना स्वतंत्रपणें तह करता येतो किंवा नाहीं हेंहि दिसून यावयाचें आहे. एखादें असें उदाहरण घडलें म्हणजे वसाहतीं पूर्णपणें स्वतंत्र झाल्या असें आपण म्हणू शकूं. आज राजा वसाहतींचा मुख्य आहे. पण तो इंग्लंडचा राजा आहे व तो वसाहतीपेक्षां ब्रिटिश पार्लमेंटचें अधिक ऐकेल. कानडचा रहिवासी हा इंग्लंडचा राजा होऊंच शकत नाहीं. म्हणून वसाहतींवर राजाची सत्ता नामतः असली तरी तीं ब्रिटिश राजाची आहे, हें विसरून चालणार नाहीं. पण वसाहतींच्या दर्जाचा अर्थ ठरलेला नसल्यामुळें आयर्लंडसारखी एखादी वसाहत निश्चितपणें त्याचें स्वरूप बदलूं शकेल आणि कोणाला शंकाहि येऊं नये इतकी स्वतंत्र होऊन दाखवील. त्यावेळीं इंग्लंडच्या राजावरच अशी पाळी येईल कीं, ते आपण आयर्लंडचे राजे नाहीं असें स्वतःच जाहीर करतील. यांचें अत्यंतिक उदाहरण म्हणजे युध्दाचें. मागें म्हटल्याप्रमाणें आयर्लंडनें जर्मनीबरोबर सख्य केलें तर त्याला म्हणजे आयर्लंडच्या राजाला, इंग्लंडच्या राजाबरोबर म्हणजे स्वतःच विरुध्द युध्द जाहीर करावें लागेल. हें युध्द राजानें जाहीर केलें नाहीं तर आयर्लंड राजाला मानणार नाहीं किंवा राजेसाहेब आयर्लंडला आपणहून आपल्या साम्राज्यांतून काढून टाकतील. त्या परिस्थितींत वसाहतींना साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क किती आहे, याऐवजी ब्रिटिशसरकार वसाहतींना आपल्या साम्राज्याबाहेर घालवू शकतें किंवा नाहीं हा प्रश्न उद्भवेल. पण ह्या गोष्टी घडवून आणणें न आणणें वसाहतींच्या शक्तीवर व सामर्थ्यावर अवलंबून आहे.

## परराष्ट्रांत वकील नेमण्याचा प्रश्न.

परराष्ट्रीय संबंधांत राजेसाहेब हे सर्वस्वी अधिकारी आहेत आणि त्यांना परराष्ट्रीय मंत्र्यानें सल्ला द्यावा असेंहि कायद्यांत म्हटलें आहे. पण या लिखित नियमाचा भंग आयर्लंडनें कसा केला व परराष्ट्रमंत्री कसा उडवून टाकला हें आपण पाहिलेंच. परक्या राष्ट्रांत इंग्लंडची वकीलात असते व अनेक लहानमोठे अधिकारी असतात. ह्या वकिलांना मामुली

नगर वाचनालय सातारा
पाने १९४+२
दा नं. ८८५५
ता. १९०३ ३५



पध्दतीनें परक्या देशांनीं अगाऊ मान्यता द्यावी लागते. त्यांना परराष्ट्रांत पाठवितांना राजेसाहेब अधिकारपत्र देतात. परराष्ट्रांत वसाहतींचे मंत्र्यांना स्वतंत्रपणें जाण्याचा हक्कच आहे. पण हा हक्क बजावला जाण्यापूर्वी त्या त्या देशांची ब्रिटिश सरकार अनुमती घेते. त्यानंतर मात्र एकाच्या जागी दुसरा प्रतिनिधी मामुली पद्धतीनें जातो. वकिलांच्या नेमणुकीचीं हीं अधिकारपत्रें पूर्वी ब्रिटिश सरकाच्या शिक्क्यानें जात; पण आयर्लंडनें मध्यंतरीं तो उपक्रम तोडून टाकल्यापासून वसाहतींचा शिक्का आतां चालत आहे.

ज्या देशांत एखादें राष्ट्र आपला वकील नेमतें, त्या देशांत दुसऱ्या राष्ट्राचा वकील नेमला जातो; अशी परस्परांमध्यें वकील नेमण्याची पद्धत आहे. कानडानें आपले वकील अमेरिका, फ्रान्स व जपानमध्यें नेमले आहेत. आयर्लंडनें अमेरिका, रोम, फ्रान्स व जर्मनींत आपले वकील नेमले आहेत. त्याहि राष्ट्रांचें वकील कानडा व आयर्लंडमध्यें आहेत. आफ्रिकेच्या युनियनचे वकील नेदर्लंड, इटली, अमेरिका, जर्मनी व फ्रान्समध्यें आहेत. वसाहतींचे हे वकील आपल्या वसाहतसरकारच्या हुकमाप्रमाणें वागतात. ब्रिटिश वकिलायतींत त्यांचें जाणेंयेणें असतें, विचारविनिमयहि चालतो. पण त्यांचें न पटलें तर वसाहतमंत्री स्वतंत्रपणेंच वागतो. सर्वच वसाहतींनीं आपल्या कचेऱ्या त्या त्या देशांत थाटल्या आहेत असें नाहीं. ब्रिटिश वकिलायतींचा त्या जास्तीत जास्त उपयोग करून घेतात.

परक्या राष्ट्रांतील जे वकील वसाहतींत येऊन रहावयाचे असतात त्यांना परवानगी दाखल एक दाखला ( Exequaturs ) द्यावयाचा असतो. तो दाखला १९२६ पूर्वी ब्रिटिश सरकार देत असे. पण वसाहतींनीं त्या बद्दल चर्चा करून असें ठरविलें कीं, ब्रिटिश सरकारला आमच्या संमतीशिवाय हा दाखला देता येणार नाहीं. त्यामुळें आतां परक्या वकिलांचे अर्ज हे ब्रिटिश सरकारकडून वसाहतीकडे येतात व वसाहत सरकार आपली मान्यता देऊन ब्रिटिशसरकारकडे ते पुढील

व्यवस्थेकरता पाठवितात. ब्रिटिश सरकार यावर आपला मान्यतेचा शिक्का ठोकते. आयर्लंड मात्र त्याला अपवाद आहे. आयर्लंडनें आपला नवा शिक्का केल्यानंतर ब्रिटिश शिक्क्याला अर्थच उरला नाहीं.

ज्या अर्थी वसाहती स्वतंत्रपणें आपले वकील निरनिराळ्या देशांत नेमू शकतात; आणि आपल्या देशांतहि बाहेरचे वकील आपल्या परवानगीनें राहू देतात त्याअर्थी त्याचा दर्जा हा गौण प्रतीचा आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. परतंत्र राष्ट्रांना आपले वकील दुसऱ्या देशांत नेमता येत नाहींत तेव्हां याहि पद्धतीवरून वसाहतींचें स्वातंत्र्य मान्य झालें आहे असें म्हणता येतें.

आपल्या संमतीशिवाय केलेल्या करारांना किंवा एकाद्या गोष्टीला वसाहती कसा टोला लगावतात हें कांहीं उदाहरणावरून पाहवयास सांपडते. १९२४ सालीं ब्रिटिश सरकारनें वसाहतींना व विचारतां रशियाच्या सोव्हिएटला मान्यता दिली व त्यांचा प्रतिनिधी आपल्या राज्यांत ठेऊन घेतला. वसाहतींनीं ही मान्यता फेटाळून लावली असती; पण ब्रिटिश मुख्य प्रधानानें चूक कबूल केली व यापुढें वसाहतींना विचारल्याशिवाय त्यांच्या नांवानें असें करार करणार नाहीं असें कबूल केलें. १९२७ सालीं रशिया बरोबरचे संबंध इंग्लंडनें समाप्त केले आणि कानडानेंहि स्वतंत्रपणें हें संबंध संपविले. पण १९२९ सालीं इंग्लंडनें पुनः रशियाबरोबर संबंध जोडल्यावर कानडानें तसें करण्याचे नाकारलें. कानडाचें हें म्हणणें रशियानें बरोबर आहे असें सांगितले आणि त्यांच्या बरोबर स्वतंत्र तह केला पाहिजे असें मत दिलें.

वसाहतींनां परराष्ट्रीय संबंधांत किती स्वातंत्र्य आहे ह्याची थोडक्यांत चर्चा केली. ती वरून वसाहतीं ह्या बऱ्याच स्वतंत्र आहेत असें दिसून येतें. त्या ब्रिटिश साम्राज्यांत असल्यामुळें त्यांच्या स्वातंत्र्याला थोडासा कमीपणा आहे हें खरें आहे. पण उद्यां या वसाहतीं बंडखोर झाल्या आणि ब्रिटिश सरकारच्याच डोक्यावर जाऊन बसल्या तर ब्रिटिश सरकारलाच त्यांच्या बरोबर समानतेच्या नात्यानें मित्रत्वाचें तह करावें लागतील.

वसाहतींचा दर्जा हा वाढता आहे. त्याची प्रगती थांबलेली नाहीं. म्हणून वसाहतींचा दर्जा म्हटला म्हणजे पूर्वी मान्य झालेल्या एखाद्या राज्यपद्धती सारखी तेथील पद्धत आहे असें म्हणतां येत नाहीं. त्यांना लागू केलेले सर्व नियम स्वातंत्र्य निदर्शक आहेत. ब्रिटिश सरकार कायद्याकडे बोट दाखवून ह्या वसाहती आमच्याच आहेत असें म्हणेल, पण कायद्यापेक्षां रूढी व व्यवहार हा जर निर्णायक मानावयाचा असला तर वसाहती स्वतंत्र आहेत असेंच म्हणावे लागेल. या दृष्टीनें विचार करतां ब्रिटिश साम्राज्य याला वसाहतींच्या पुरता कांहींच अर्थ नाहीं. त्यां वसाहतीं आपल्या साम्राज्यांत आहेत असें समाधान ब्रिटिशांनीं मानावें; पण त्या घराच्या उंबऱ्यावर बसल्या आहेत व वाटेल तेव्हां बाहेर पडतील.

नगर वाचनालय

---

# भाग ६ वा.

## साम्राज्यांतून विभक्त होण्याचा हक्क.

वसाहती व साम्राज्य सरकार यांचे मधील संबंधांचा विचार करतांना वसाहती ह्या साम्राज्यांतून फुटून जाऊ शकतात कीं काय याचा विचार करणें जरूरीचें आहे. फुटून जाण्याचा प्रश्न हा अखेरचा प्रश्न आहे. जोपर्यंत वसाहती साम्राज्यांत आहेत, तोपर्यंत त्यांचें आपसांतील संबंध हे सलोख्याचे, निदान परस्पर सहकार्याचे असले पाहिजेत. ब्रिटिश सरकारचा सिद्धांत असा आहे कीं, साम्राज्यांत वसाहतींना समानतेचा दर्जा असला तरी ब्रिटिश साम्राज्य हें एक आहे. वसाहतींना परराष्ट्रांत सुद्धां हक्क दिले असले तरी तेवढ्यानें साम्राज्याचें ऐक्य नष्ट होत नाहीं. ह्या समजुतीमुळें वसाहतींना साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क नाहीं असें एक पक्ष म्हणतो; तर दुसरा पक्ष असें प्रतिपादन करतो कीं, साम्राज्यांत वसाहतींची झालेली संघटना ही ऐच्छिक आहे. त्यामुळें साम्राज्यांत आम्ही राहिलेच पाहिजे अशी आमच्यावर सक्ती करतां कामा नये. १९३१ च्या वेस्ट मिन्स्टर स्टॅट्यूटनें फुटून जाण्याचा हक्क वसाहतींना दिला असें कांहींचें म्हणणें आहे. तें कितपत बरोबर आहे हें आपण बघूं. या हक्कासंबंधीं दोन परस्पर विरोधी मतें आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

१९३१ च्या स्टॅट्यूटला जें प्रस्तावनेदाखल हेतु वाक्य जोडलें आहे त्यांत असें म्हटले आहे कीं, ज्या अर्थी राजा समान राजनिष्ठेनें बद्ध

झालेल्या ब्रिटिश कॉमनवेल्थ मधील राष्ट्रांच्या सभासदाचें स्वेच्छेनें एकत्र येण्याचें एक प्रतिक आहे, त्याअर्थीं कॉमनवेल्थमधील सभासदांचें जे परस्पराशीं संबंध आहेत व जे स्थापित राज्यपद्धतीनें मान्य झाले आहेत त्याला अनुसरून जर राजाच्या गादीवर येण्याचा, किंवा राजाच्या इतमामाचा अथवा किताबासंबंधींचा एखादा कायदा बदलावयाचा असेल तर त्याला वसाहतींतील सर्व पार्लमेंट्सची व युनायटेड किंगडमच्या पार्लमेंटची संमती लागेल.

या हेतूवाक्यावरून हें स्पष्ट करण्यांत आले आहे कीं, राजेसाहेबांच्या बाबतींत जर कायदा बदलायचा असेल तर त्याला सर्व वसाहतींची व ब्रिटिश पार्लमेंटचीहि संमती लागेल. तसेंच कॉमनवेल्थमधील सर्व वसाहतींची एकजूट जी आहे ती एकट्या दुकट्या वसाहतीच्या विरोधी मतानें अगर कृतीनें भंग पावणार नाहीं हेंहि त्यांत सूचीत केलें आहे असें सुप्रसिद्ध कायदेपंडीत मि. कीथ यांचें मत आहे. हें मत बरोबर आहे असें म्हणण्याचे कारण नाहीं. १९२९ च्या परिषदेमध्यें ह्या वाक्याचा जन्म झाला. आफ्रिकेचे जनरल स्मट्स यांचें म्हणणें असें कीं, कॉमनवेल्थमधून एखाद्या वसाहतीला निघून जाता येणार नाहीं कारण राजनिष्ठा सर्वांना समान आहे. जायचेच असेल तर इतरांची त्याला संमती लागेल. या इतरामध्यें ब्रिटिश सरकारहि अंतर्भूत झालें आहे.

या सर्व घटकांनीं असें ठरविलें कीं, आपली कॉमनवेल्थ आतां विसर्जन करावी व सर्वांनीं स्वतंत्र व्हावे तर त्यांना तसें करता येईल. जनरल स्मट्स यांच्या विरुद्ध आफ्रिकेचे दुसरें गृहस्थ जनरल हर्टझोग यांचें मत होतें. त्यांना १९२९ च्या या हेतूवाक्यांतील अडचण पटली नव्हती असें नाहीं. पण कोणत्याहि वसाहतीला साम्राज्यांतून निघून जाण्याचा अधिकार आहे ह्या सिद्धांताचे ते आग्रही होते. तेव्हां त्यांनीं १९२९ च्या या हेतूवाक्याला मान्यता देतांना त्यांत असें एक वाक्य जोडून दिले कीं, कोणत्याहि वसाहतीचा कॉमनवेल्थमधून फुटून जाण्याचा हक्क १९३१ च्या कायद्यांतील ह्या हेतुवाक्यानें बाधित

होत नाहीं. हें त्यांचें म्हणणें त्यानीं आपल्या पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहाकडून मान्य करून घेतलें, यानंतर १९३० च्या साम्राज्यपरिषदेकडून आपल्या प्रतिपादनाला मान्यता मिळवून घेऊं असेंहि ते म्हणाले. पण १९३० च्या परिषदेनें त्यावर काय मत दिलें तें नमूद झालेलें नाहीं. विभक्तीकरणाचा हा हक्क सर्व वसाहतींच्या व ब्रिटनच्या पार्लमेंटानीं पास करावयास पाहिजे होता, अशी त्यावर एक शंका प्रदर्शित केली जाते. ही संमति ज्या अर्थी आफ्रिकेशिवाय इतर घटकांनीं घेतली नव्हती, त्या अर्थी जनरल हर्टझॉग यांचें करणें कायदेशीर नव्हतें असा त्यावर आक्षेप आहे.

इकडे कायद्याचा कीस काढून ही चर्चा चालली असतां ब्रिटिशांच्या वसाहतमंत्र्यानें असें बोलून दाखविलें कीं, ज्याप्रमाणें एखाद्या मनुष्याचा स्वतःचा गळा कापण्याचा हक्क कोणी हिरावून घेऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें कोणत्याहि वसाहतींचा विभक्त होण्याचा हक्क हिरावून घेतां येणार नाहीं. आणि तें खरेंच आहे. एखादी वसाहत जर साम्राज्यपरिषदेशीं असहकार करूं लागली आणि तिच्याविरुद्ध वागूं लागली तर कायद्यांत तिला विभक्त होण्याचा हक्क नाहीं, एवढ्याखातर तिला जबरीनें आणून कॉमन्वेल्थमध्यें कसें बसवणार? सक्तीनें सहकार्य मिळणें शक्य नाहीं आणि त्यामुळें साम्राज्याचें एकजिनसी स्वरूप टिकणेंहि शक्य नाहीं. ज्या वेळीं अशी एखादी वसाहत विभक्त होईल, तेव्हां त्याच्या परिणामाला ती तयार असेलच. साम्राज्यसत्ता अशा वसाहतींच्या सवलती काढून घेईल व शत्रुपक्षाप्रमाणें तिला वागवील. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, हें विभक्त होणें सलोख्यानें होणार नसून लाग्यानें होणारें आहे आणि ब्रिटिश वसाहतमंत्र्यानें जें मत प्रदर्शित केलें तें त्राग्याची भूमिका त्यामागें असेल ही गोष्ट गृहीत धरूनच केलें. अशी एखादी वसाहत विभक्त झाली, तर तिच्याविरुद्ध लष्करी शक्ती उपयोगांत आणूं नये असें मात्र म्हटलें गेलें. आयर्लंडनें ज्या वेळीं आपल्या सभागृहांतील सदस्यानीं राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारलें

आणि जमिनीवरील कर्जफेडीचे हते अमान्य केले, तेव्हां इंग्लंडनें त्यांच्यावर कुठें सैन्य धाडलें? आयर्लंडला आपल्या देशांत रिपब्लिकहि स्थापन करावयाचें आहे, त्या वेळीं इंग्लंड काय करील हें पहातां येईल.

पण प्रो. किथ म्हणतात, दांडगाईच्या गोष्टी सोडल्या आणि निव्वळ कायद्याच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला तर कायदा अगदीं स्पष्ट आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें एकट्यादुकट्या वसाहतीला असें विभक्त होतांच येत नाहीं. वसाहती ज्या निर्माण केल्या, त्या ब्रिटिश राजमुकुटाखालीं नांदणारी संघटित राज्यें म्हणून निर्माण केल्या. या वसाहतींच्या कायद्यांत असें कलम नाहीं कीं, त्यांनीं राजाची सत्ता काढून टाकावी. उलट बहुतेक वसाहतींच्या घटनेंत पहिलें कलम राजनिष्ठेचें आहे. आयर्लंडनें सुद्धां राजनिष्ठेची शपथ मान्य केली. या सर्व वसाहती आपणहून राजसत्तेखालीं आल्या. पण या वसाहतींनीं आपल्या घटनेंत बदल केला तर? तर काय होईल कोणी सांगावें? पण जोंवर ब्रिटिश घटना व वसाहतीच्या घटना अस्तित्वांत आहेत, तोंवर त्यांना विभक्त होण्यास कायद्याचा आधार नाहीं असें एक पक्ष म्हणतो. जनरल स्मट्स म्हणतात, खुद्द राजेसाहेब सुद्धां अशा विभक्त होण्याच्या वसाहतींच्या कायद्याला मान्यता देऊं शकणार नाहींत. १९३१ च्या स्टॅट्यूटप्रमाणें एखादी वसाहत कॉमनवेल्थमधून जाऊं इच्छित असेल, तर त्या गोष्टीला (१) त्या वसाहतीच्या कायदेमंडळाची मान्यता, (२) ब्रिटिश सरकारची मान्यता आणि (३) इतर वसाहतींची मान्यता लागेल. तिघांची मान्यता मिळेल तरच वसाहत कॉमनवेल्थमधून फुटून जाऊं शकेल असें कांहीं कायदेपंडितांचें मत आहे व तें मत १९३१ च्या कायद्यांतील हेतुवाक्यांला धरून आहे.

यावर दुसरे कायदेपंडित विशेषतः आफ्रिकेचे असें म्हणतात कीं, वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें जर वसाहतींना वाटेल तो कायदा पास करण्याचा हक्क दिलेला आहे, तर एका किंवा अनेक वसाहतींनीं साम्राज्यांतून फुटून निघण्याचा कायदा केला तर त्याला तुम्ही कसें रोखूं शकणार?

तुम्ही असें म्हणाल कीं, राजा त्या कायद्याला संमती देणार नाहीं. पण राजाला संमती नाकारण्याचा हक्कच नाहीं. १९३४ सालीं आफ्रिकेनें राजाला युनियननें पास केलेले कायदे नाकारतां येत नाहींत, असा कायदा केला. अशा परिस्थितींत जर आफ्रिकेनें विभक्त होण्याचा कायदा पास केला. तर तो कोण अमान्य करूं शकणार ? राजाला कोणताहि कायदा अमान्य करण्याचा अधिकार नाहीं. मग राहिला ग. जनरल. त्यानें मंत्री-मंडळाचें ऐकलेंच पाहिजे. कारण तो मंत्र्याचा नोकर आहे. त्याला काढणें अगर ठेवणें मंत्र्यांच्या हातीं आहे. तेव्हां वसाहतींचें कॉमनवेल्थमधून अगदीं कायदेशीरपणें बाहेर जातां येईल. वसाहतींना हें म्हणणें अगदीं निरपवाद आहे. त्यांच्या या हक्काविरुध्द एकच कलम व तेंहि हेतु वाक्यांतील तोंडावर टाकलें जातें. ह्या हेतु वाक्याला कायद्याच्या दृष्टीनें किती किंमत असते, हें आपण पाहूंच. आफ्रिकेच्या युनियनचें यावर म्हणणें असें आहे कीं, आम्हीं जेव्हां वेस्टमिन्स्टरचा कायदा दोन्ही सभागृहांत पास करून घेतला तेव्हां आमचा विभक्त होण्याचा हक्क कायम आहे या स्पष्ट समजुतीनें तो कायदा पास केला. त्यांत आमची चूक झाली नाहीं व साम्राज्यसरकारनें उगीच कांहीं तरी कायद्याच्या अडचणी सांगून आमचा हा हक्क काढून घेऊं नये.

दक्षिण आफ्रिकेप्रमाणेंच आयर्लंड हाहि ह्या बाबतींत आग्रही आहे. आयर्लंडबरोबर १९२१ सालीं ब्रिटिशांनीं तह केला. या तहान्वयें आयर्लंडला कॉमनवेल्थमधून फुटून जातां येत नाहीं. पण आयर्लंड म्हणतें हा तह ब्रिटिशांनीं आमच्यावर लादला आणि लढ्याच्या धाकानें लादलेला तह बंधनकारक नसतो असा दाखला आहे. त्या तहान्वयें आम्हाला जो दर्जा प्राप्त झाला तो वाढविता येतो. १९०९ सालीं झालेला आफ्रिके-बरोबरचा तह जर बाजूला सारून आफ्रिका साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क सांगू शकते, तर आम्हाला हा हक्क कां सांगता येणार नाहीं ?

आतांपर्यंत हा विभक्त होण्याचा प्रश्न फक्त आयर्लंड व आफ्रिकेमध्येंच चर्चीला गेला आहे. कारण १९३१ च्या वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटचा पूर्ण अंमल

याच दोन वसाहतींत झाला आहे. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व न्यूफौंडलंड-मध्यें ह्या कायद्याचा अंमल सुरू झाला नाहीं. कानडामध्यें फेडरल घटनेचा पाया अद्याप मजबूत आहे व त्यांत बदल करावयाचा असेल तर तेच करू शकतील. पण त्यांच्यावर अद्याप ही पाळी आली नाहीं. आफ्रिका व आयर्लंड या दोन देशांत कायदे करण्याची पूर्ण सत्ता त्यांच्या पार्लमेंटला आहे. याचाच अर्थ राजेसाहेब ब्रिटिश मंत्र्यांच्या सल्ल्यानें तेथील कायदे फेटाळूं शकत नाहींत. तसेंच ब्रिटिश पार्लमेंट या वसाहतींच्या संमतीशिवाय त्याना लागू होणारे कायदे करूं शकत नाहींत. त्यामुळेंच या दोन्ही वसाहती आग्रहपूर्वक म्हणत आहेत कीं, ब्रिटिश कॉमनवेल्थशीं असणारा आमचा संबंध आम्ही वाटेल तेव्हां संपवूं शकूं. *ब्रिटिश पार्लमेंटचे कांहींहि कायदे असले, त्यांच्या कांहींहि भावना असल्या तरी त्या आमच्या कायद्याशीं विरोधी असल्या तर आम्ही कां मानूं?

कांहीं कायदेपंडितांचा भर १९३१ च्या हेतूवाक्यावर होता. पण त्याला चर्चील साहेबांनीं चांगलें उत्तर दिलें आहे. आयर्लंडच्या प्रश्नावर इंग्लिश पार्लमेंटांत चर्चा सुरू होती. आणि आयर्लंडला साम्राज्यांतून निघून जातां येईल किंवा नाहीं हा प्रश्न पुढें आला होता. 'एखाद्या वसाहतींला विभक्त व्हायचें असेल तर त्याकरतां साऱ्या भागीदारांची संमती लागेल असें जें तुम्ही म्हणतां तें खरोखर उपयुक्त आहे; पण त्याला बिलकूल किंमत नाहीं. हेतुवाक्याला काय अर्थ असतो? त्याला कायद्याचें सामर्थ्य नाहीं. न्यायाधीश हेतुवाक्यें वाचीत नाहींत असें मला सांगण्यांत आलें आहे. ते कलमाकडे पहातात. आपल्या पार्लमेंटच्या कायद्यांत 'दुसरें सभागृह तावडतोब स्थापन करावें' असें हेतुवाक्यांत म्हटलें होतें. या गोष्टीला २० वर्षें झालीं. कुठें आहे तें सभागृह?" Sचर्चीलच्या या आक्षेपाला सॉलिसीटर जनरलनें उत्तर दिलें. ते म्हणाले राजनिष्ठा ही जनतेच्या हृदयांत असते, कायद्यात नसते. तेव्हां ब्रिटिश कॉमन्वेल्थची एकी राखण्याचा जो आशय व्यक्त केला आहे, तो हेतु-

*Letters & Esseys by keith 1935-36 Pages 11-12.
S British Dominions 1918-31. Page 282,

वाक्यांतच बरा आहे, कायद्यांत नको असें त्यांनीं उत्तर दिलें. पण तें उत्तर बरोबर नव्हतें.

तेव्हां या सर्व चर्चेनंतर मुख्य प्रश्न उरतो, तो वसाहतींना साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क आहे किंवा नाहीं ? या प्रश्नाचा निकाल आयर्लंड व दाक्षिण आफ्रिकेच्या बाजूनें लागला आहे व तो कोर्टांत लागला आहे. त्या खटल्याच्या निकालांत असें म्हटलें नाहीं कीं, वसाहतींना विभक्त होण्याचा हक्क आहे; पण जो निर्णय त्यांत दिला गेला त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. तो खटला असा.

मूर विरुद्ध आयर्लंडचा ॲटर्नी जनरल असे या अर्जांत वादी विवादी आहेत. आयरिश सुप्रीम कोर्टांतून हें अपिल १९३५ मध्यें आलें व त्याचा निकाल लॉर्ड सँकी यांनीं दिला. खटल्याचें स्वरूप खालीलप्रमाणें आहे. मूर व इतर कांहीं जणांनीं आयर्लंडमधील एर्न नदीमध्यें मासे धरण्याचा आपला हक्क आहे, असा सरकारविरुद्ध दावा आणला. खालच्या कोर्टांत त्यांच्या बाजूनें निकाल झाला. पण वरिष्ठ कोर्टांत तो निकाल फिरला. त्यामुळें मूरनें इंग्लंडच्या प्रिव्हि कौन्सिलकडे अपील करण्याची परवानगी मागितली. प्रीव्हि कौंसिलनें त्याचा विचार ९ ऑक्टोबर १९३३ रोजीं केला आणि राजानें आपल्या मंत्र्याच्या सल्ल्यानें १० नोव्हेंबर रोजीं अपील करण्यास परवानगी दिली. त्यानंतर १६ नोव्हेंबर १९३३ रोजीं आयर्लंडच्या पार्लमेंटनें असा कायदा पास केला कीं, आयरिश फ्री स्टेटमधील कोणतेंहि अपिल ऐकण्याचा राजांना म्हणजे त्यांच्या प्रीव्हि कौंसिलला अधिकार नाहीं. हा कायदा चुकीचा आहे व तो आम्हांला लागू नाहीं, हें ठरवून घेण्याकरतां मूरनें प्रीव्हि कौन्सिलकडे अर्ज केला. त्या अर्जाचा विचार करून लॉर्ड सँकीनें निकाल दिला आहे. त्यानें आयर्लंडचा कायदा बरोबर आहे व राजांना अपिलें ऐकतां येणार नाहींत असें म्हटले आहे.

आयर्लंडचा सरकारी वकील आपलें म्हणणें मांडण्याकरतां अर्थातच हजर नव्हता. पण ब्रिटिशांचा ॲटर्नी जनरल हजर राहिला व त्यानें आयर्लंडचा

कायदा चूक आहे असें प्रतिपादन केलें. लॉर्ड सँकी यांचें थोडक्यांत म्हणणें असें आहे.

६ डिसेंबर १९२१ रोजीं ग्रेटब्रिटन व आयर्लंडमध्यें तह झाला. ३१ मार्च १९२२ रोजीं ह्या तहावर आधारलेला कायदा ब्रिटिश पार्लमेंटनें पास केला. ह्या कायद्याप्रमाणें आयरिश फ्री स्टेटकरतां पार्लमेंटला घटना करण्याचा अधिकार नाहीं असें ठरलें. ९ सप्टेंबर १९२२ रोजीं आयर्लंडच्या पार्लमेंटच्या नव्या निवडणुका झाल्या; आणि ते सभासद घटना परिषदेचे सभासद म्हणून बसले. त्यांनीं तयार केलेली घटना राजेसाहेबांनीं ५ डिसेंबरला मान्य केली व ती कायद्याला परिशिष्ट म्हणून जोडली. या घटनापरिषदेच्या घटनेला ब्रिटिश पार्लमेंटनें मान्यता दिल्यामुळें घटना करण्याचा अधिकार हा पार्लमेंटच्या कायद्यापासून प्राप्त झाला आहे. १२ कलमांत असें म्हटलें आहे कीं, आयर्लंडच्या पार्लमेंटला आपल्या लोकांच्या शांततेकरतां, व्यवस्थेकरतां आणि चांगल्या राज्यकारभाराकरतां कायदे करण्याचा एकमेव व संपूर्ण ( sole & exclusive ) अधिकार आहे. त्यांत पुढें असेंहि म्हटलें आहे कीं, उभय राष्ट्रांत झालेल्या तहांत दुरुस्ती करतां येईल. पण कायद्याचा अंमल सुरू झाल्यापासून ८ वर्षांच्या आंत ह्या दुरुस्तीला कायद्याचें स्वरूप यावयाचें असेल तर तो आयर्लंडच्या दोन्ही सभागृहांनीं पास केला पाहिजे एवढेंच नव्हे तर जनतेच्या मतांनीं ( एकंदर प्रांतांतील बहुसंख्येनें किंवा नोंदलेल्या मतांतील दोन तृतीयांशनें ) त्याला मान्यता मिळाली पाहिजे. त्याच्याच पुढें ६६ वें कलमांत राजांच्याकडे अपिलांचा अधिकार आहे, असें मान्य केलें आहे. यानंतर १९२९ सालीं आयरिश पार्लमेंटनें ८ वर्षांची मुदत १६ वर्षें केली. या सगळ्या गोष्टी होत असतां १९३१ साल आलें व व त्या सालीं वेस्ट मिन्स्टरचा कायदा झाला आणि राज्यघटनेचें सारें स्वरूप बदललें. त्यामुळें इंग्लंडच्या कायद्याला विरोधी असणारे कायदेहि करतां येऊं लागले. आयर्लंडनें १९३३ सालीं त्याप्रमाणें राजनिष्ठेची शपथ काढून टाकली आणि आपल्या घटनेंत '१९२१ च्या तहाला



६*

विरोधी असा बदल करतां येणार नाहीं ' हें कलम गाळून टाकलें. नंतर त्यांनीं वर उल्लेखिलेला १५ नोव्हेंबर १९३३ चा कायदा केला व प्रीव्हि कौन्सिलकडे अपिलें जाण्याला बंदी केली. हे बदल वेस्ट मिन्स्टरच्या दुसऱ्या कलमान्वयें केले.

'१९२१ च्या तहाला विरोधी असे कायदे करण्याला आयर्लंडचा हा हक्क बरोबर आहे. कारण तो १९३१ च्या वेस्ट मिन्स्टरच्या कायद्याला धरून अहे. म्हणजे त्या कायद्याला ब्रिटिश पार्लमेंटची अनुमती आहे. त्याच कायद्याला अनुसरून प्रीव्हि कौन्सिलकडे अपिल बंदी करणें हेंहि कायदेशीर ठरतें.'

अॅटर्नी जनरल मि. ग्रीन यांनीं १९३३ च्या नोव्हेंबरचा प्रीव्हि कौन्सिलसंबंधी कायदा चूक आहे असें म्हटले. ते म्हणाले कीं, हा कायदा करण्याची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटपासून उपलब्ध झाली नसून घटना-परिषदेपासून उपलब्ध झाली आहे. पण ही घटनापरिषद आतां मोडली आहे व तिनें आपली एखादी उपसमिती किंवा वारसदार अन्य समिती आपण केलेल्या घटनेंत दुरुस्ती करण्याकरतां शिल्लक ठेवली नाहीं. तेव्हां १९२२ च्या घटनेंत जर दुरुस्ती करावयाची असेल तर नवी घटनासमिती बोलावली पाहिजे. अशा घटनासमितीनें आपली पूर्वीची घटना दुरुस्त केली नसल्यामुळें प्रीव्हि कौन्सिलची सत्ता नष्ट होत नाहीं असें त्याचें म्हणणें.

पण मि. ग्रीन यांचें म्हणणें प्रीव्हि कौन्सिलनें मान्य केलें नाहीं. प्रीव्हि कौन्सिल म्हणाले कीं, आयर्लंडचा घटनाकायदा व घटना ही ब्रिटिश पार्लमेंटच्या कायद्यानेंच जन्म पावली आहे म्हणून ती ग्राह्य आहे. १९३१ च्या कायद्यानें आयरिश पार्लमेंटला आपल्या घटनाकायद्यांत दुरुस्ती अगर बदल करण्याचा अधिकार दिला आहे व त्या अधिकारा-प्रमाणें आयर्लंड वागलें आहे. शेवटीं प्रीव्हि कौन्सिलनें एकंदर परिस्थिति थोडक्यांत मांडली ती अशी. (१) आयर्लंडबरोबरचा तह आणि घटनाकायदा हे युनायटेड किंगडमच्या कायद्याचा भाग आहेत. (२) १९३१ चा वेस्ट मिन्स्टरचा कायदा पास होण्यापूर्वी आयर्लंडला १९२२

चा तह रद्द ठरवितां आला नसता. कारण १८६७ च्या कलोनिअल व्हॅलिडीटी ॲक्टाप्रमाणें साम्राज्याच्या कायद्याशीं विरोधी असे कायदे वसाहतींना करतां आले नसते. ( ३ ) कलेनिअल व्हॅलिडीटी ॲक्टाप्रमाणें आयर्लंडवर जीं बंधनें होतीं ती वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें रद्द केलीं आहेत. त्यामुळेंच आयर्लंडला वाटेल तसा साम्राज्य कायद्याला विरोधी असा कायदा करतां येईल. ही सत्ता त्यांना वेस्ट मिन्स्टर स्टॅटयूटनें म्हणजे साम्राज्याच्या कायद्यानें दिली. म्हणूनच त्यांना पूर्वी झालेला तह रद्द करण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

ग्रीन साहेबांनीं शेवटीं एक ठेवणींतला मुद्दा मांडला. तुम्ही राजेसाहेबांचा जन्मसिद्ध हक्क ( Prerogative )नष्ट करीत आहां. यावर प्रिव्हि कौन्सिलनें असें सांगितलें कीं, एवढ्यापुरता तरी हा हक्क (वेस्टमिन्स्टर ) स्टॅटयूटमध्यें लुप्त होतो आणि त्या स्टॅटयूटनें हा कायदेशीर हक्क दुरुस्त करण्याची किंवा त्यांत बदल करण्याची सत्ता दिलेली आहे.

या निर्णयामुळें पुष्कळ कायदे पंडीतांनीं डोकीं फिरून गेलीं. त्यांना वाटलें आतां वसाहतींच्या हातांत कोलीतच मिळालें. वसाहती आतां आपल्या पार्लमेंटांत साम्राज्यांतून फुटून जाण्याचा कायदा करतील आणि तो कायदा बरोबर ठरेल. त्या कायदेपंडितांची भीति बरोबर आहे. १९३१ च्या कायद्यांच्या हेतुवाक्यांत जरी असें म्हटलें आहे कीं, राजेसाहेबांचें गादीवर येणें, त्यांचे किताब वगैरेबद्दल फरक करावयाचा असेल तर त्याला ( १ ) त्या वसाहतीचा कायदा लागेल. ( २ ) ब्रिटिश पार्लमेंटची आणि ( ३ ) सर्व वसाहतींची अनुमती लागेल,तरी ती सदिच्छा आहे. आणि हेतुवाक्याला कायद्याचें महत्त्व नसल्यामुळें दोहोंमध्यें विरोध निर्माण झाला असतां कायद्याचीं कलमें प्रभावी ठरतात. हिंदुथानलाहि या प्रिॲंबलच्या-हेतूवाक्याच्या जोरावर झुलवत ठेवलें होतें. पण त्याचा विचार हिंदुस्थानचा प्रश्न येईल तेव्हां आपण करूं.

या प्रिव्हि कौन्सिलच्या निर्णयानें असें ठरलें कीं, राजाची जन्मसिद्ध

सत्ता ही स्टॅट्यूटमध्यें लुप्त होते.* वसाहतींना वाटेल ते कायदे करण्याचा अधिकार १९३१ च्या कायद्यानें दिलेला आहे. राजाला हे वसाहतीचे कायदे अमान्य करतां येत नाहींत. त्यामुळें राजाची सत्ता नष्ट होऊन वसाहतींची सत्ता हीच अखेरची ठरते. राजसत्तेचा हा अंत वसाहतींनीं केलेला नसून १९३१ च्या कायद्यानेंच केलेला आहे.

दक्षीण आफ्रिकेचे जनरल हर्टझॉग आणि आयर्लंडचे डी. व्हॅलेरा यांना या बंडखोरीबद्दल श्रेय दिलें पाहिजे. हर्टझॉग हे तर फार पूर्वीपासून विभक्त होण्याचा आपला हक्क आहे असें धरून चालले होते. त्यांनीं १९३४ सालीं 'Union status and Royal Executive functions and seals Act ' हा पास करून घेतला. या कायद्याप्रमाणें आफ्रिकेच्या युनियननें राजाची सत्ता गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलकडे खेचून आणली. राजाची सत्ता गव्हर्नर जनरलकडे आल्यानें आणि तो ग. जनरल वसाहतमन्त्र्यानींच नेमलेला असल्यानें त्याला वसाहतींचा कोणताहि ठराव अमान्य करतां येणार नाहीं. १९३१ च्या वेस्टमिन्स्टर कायद्यानें वसाहतींना वाटेल ते कायदे पास करण्याची परवानगी दिली, हे कायदे अमान्य करण्याची राजसत्ता काढून घेतली आणि त्यामुळें वसाहतींना साम्राज्यांतून फुटून जाण्यास परवानगी मिळाली.

याबद्दल प्रो. किथ यांचे दोनतीन उतारे उद्धृत करूं म्हणजे झालें. कानडाचा एक खटला कोल कार्पोरेशन विरुद्ध राजा; आणि दुसरा मूर विरुद्ध अटर्नी जनरल यांच्या निर्णयामुळें प्रो. किथ यांचीं मतें बदललीं असलीं पाहिजेत. ' असें दिसतें कीं, युनिअन ( आफ्रिका ) व युनायटेड

* *That whatever might be the position of the King's prerogative if it were left as a common law it is here in this particular enactment made matter of parliamentary legislative so that the preeogative is protanto merged in the statute and statutegives power of amending and altering the statutory prerogative.*

*Cases privy council ( 1935 A. C. 484 )*

किंगडम ( इंग्लंड ) यांच्या मधील संबंध हा आतां युनियनच्या इच्छेवर अवलंबून आहे. '1

" जनरल हर्टझॉगनें स्टेटस ऑफ युनियन वगैरेसंबंधींचा कायदा पास करून राजसत्तेच्या विभागणीचा, साम्राज्यांतून निघून जाण्याचा, तटस्थ रहाण्याचा आपला हेतु तडीस नेला. "2

युनियन पार्लमेंट हें आतां निःशंकपणें सर्वस्वीं सार्वभौम असें कायदे मंडळ झालें आहे, बाहेरच्या कोणत्याहि सत्तेचें दडपण तिच्यावर चालणार नाहीं आणि स्वतःला शृंखलाबद्ध करून घेतां येणार नाहीं.3

अशा प्रकारें ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें असणाऱ्या सहा वसाहतींपैकीं, दोन वसाहतींनीं विभक्त होण्याचा प्रश्न नेटाला लावला आहे. या प्रश्नावर खूप चर्चा झाली व होत आहे. ब्रिटिश पार्लमेंटचे अधिकारी याबद्दल आपलें मत प्रदर्शित करीत नाहींत. विशिष्ट प्रसंगीं ते जुन्या साम्राज्यशाही धोरणाला अनुसरून वसाहती आपल्याच आहेत असें बोलतात. पण तें कायद्याचें बोलणें नाहीं; परंपरेचें बोलणें आहे. ह्या प्रश्नाचा निर्णय एखादी वसाहत साम्राज्यांतून फुटून दाखवूनच लावून घेईल. न्यायमंदिरांतहि या प्रश्नाचा निकाल लागू शकेल; आणि कांहीं कायदेपंडित म्हणतात हा निकाल लागलेला आहेहि. त्यांची विचारसरणी काय आहे

*1 ' It appears tbat the connection between the union and the united Kingdom now rests on the union Parliament-Letters andEssays by Keith.page45*

*2' General Hertzog has carried out by the status of the union and Roval Exceutive Functions and Seals Act his purpose of establishing the divisibility of the crown and the rights of secession and of neutrality -ibid page 68*

*3The union Parliament is now beyond doubt an absolutely sovereign legislature incable of restraint by any external power and incapable of fettering itself-page 69.*

हें वर सांगितलेंच आहे. ते असें म्हणतात.

(१)१९३१च्या पूर्वी वसाहतींना साम्राज्याला विरोधी असे कायदे करतां येत नसत. साम्राज्यांतून फुटून विभक्त होण्याचा कायदा हा साम्राज्याच्या कायद्यांना विरोधी झाला असता.

(२) १९३१ च्या वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें साम्राज्याच्या कायद्यांना विरोधी असणारे सुद्धां कायदे करण्याचा अधिकार वसाहतींना दिला आहे.

(३) १९३१ च्या कायद्याच्या प्रिॲंबलमध्यें म्हणजे हेतुवाक्यामध्यें राजेसाहेबांच्या वारसाबद्दल, पदव्याबद्दल जर कांहीं फेरफार करावयाचे असतील तर ते वसाहतीं व युनायटेड किंगडम यांच्या मान्यतेनें करावे असें म्हटलें आहे. त्याच्यावर कॉमनवेल्थ एक असावे असेंहि म्हटलें आहे. पण हेतुवाक्याला कायद्याच्या भाषेंत शून्य किंमत असल्यामुळें त्यांत प्रदर्शित केलेली सदिच्छा निरुपयोगी आहे.

(४) या अधिकारान्वयें जर वसाहतींनीं असा कायदा केला कीं, आम्हाला साम्राज्यांत रहावयाचे नाहीं; आम्ही पूर्णपणें अंतर्बाह्य स्वतंत्र आहों तर त्यांना तसा कायदा करतां येईल.

(५) असा कायदा करण्याची सत्ता त्यांना वेस्ट मिन्स्टरच्या म्हणजे साम्राज्याच्या कायद्यानें दिलेली आहे.

(६) त्याला एकच अडचण उरते. ती म्हणजे राजाची. ब्रिटिश पार्लमेंटची किंवा वसाहतमंत्र्यांची अडचण त्यांत येत नाहीं. कारण वसाहती ह्या राजाशीं प्रत्यक्ष संबंध आणूं शकतात. ब्रिटिश मंत्र्यांनीं राजाला सांगावें व राजांनीं वसाहतींना सल्ला द्यावा हें चूक आहे. वसाहत-मंत्री हें राजाला परस्पर सल्ला देऊं शकतात. त्यामुळें ग. जनरलची नेमणूक ही राजेसाहेब वसाहत मंत्र्याच्या सल्ल्यानें करतात. तेव्हां राजाचा प्रतिनिधी ग. जनरल हा वसाहतींचा नोकर ठरतो.

(७) राजेसाहेब पूर्वी एखादा वसाहतींनीं केलेला कायदा फेटाळूं शकत. पण राजेसाहेबांची ही सत्ता वसाहती काढून घेऊं शकतात

आणि असें म्हणूं शकतात कीं, राजानें आमचा कोणताहि कायदा अमान्य करतां कामा नये. आयर्लंड, आफ्रिकेनें राजेसाहेबांना आपण केलेले कायदे अमान्य करण्यास प्रतिबंध केला आहे.

(८) म्हणून वसाहतींनीं प्रथम राजेसाहेबांची आपण केलेले कायदे अमान्य करण्याची सत्ता काढून घेतली पाहिजे आणि नंतर साम्राज्यांतून आम्हाला फुटून विभक्त व्हावयाचे आहे असा कायदा पास करावयाचा आहे

असा कायदा जर वसाहतींनीं केला तर तो पूर्णपणें योग्य ठरतो; आणि त्यांना साम्राज्याबाहेर जातां येते. अजूनपर्यंत कोणत्याहि वसाहतीनें विभक्त होण्याची आपली तयारी दाखवली नाहीं. पण आयर्लंड व आफ्रिका या तयारींत आहेत. चालू युद्धांतच आपण असें पाहिलें कीं, आयर्लंडनें तटस्थ रहाण्याचें ठरविलें आणि आफ्रिकेच्या अधिकाररूढ पक्षानें तोच निर्णय घेतला होता. पण त्यांचा पराभव झाल्यानें त्यांची तटस्थता राहिली नाहीं. साम्राज्यांतून फुटून गेल्यानंतर युनायटेड किंगडमप्रमाणें, किंगडम ऑफ आयर्लंड, किंगडम ऑफ साऊथ आफ्रिका अशी नांवें किंवा रिपब्लिक ऑफ आयर्लंड असें नांव त्याना धारण करतां येईल. यानंतर त्यांचे व इंग्लंडचें संबंध कसे रहातील हें कोणीं सांगावें ? पण कायद्याच्या दृष्टीनें विचार केला किंवा क्रमशः विकास पावत जाणाऱ्या प्रगतीचा विचार केला तरी ही विभक्त होण्याची वेळ येणें अस्वाभाविक नाहीं. विकास पावत जाणाऱ्या सृष्टीचा हाच क्रम आहे. सृष्टींतील विकास पावणारी प्रत्येक वस्तु आपला कोश फोडून परिणतावस्थेला येत असते. याच विकासवादाला अनुसरून साम्राज्याचे संरक्षक आवरण जर वसाहतींना आपल्या वाढीला अडथळा करतें असें वाटलें तर त्यांनीं त्या आवरणाच्या बाहेर कां येऊ नये ? क्रांतीवादांत बाहेरून दडपण येऊन वस्तूचें परिणत स्वरूप दृग्गोचर होतें आणि विकासवादांत आंतील दडपणामुळें बाह्य कवच फुटत असतें.

डी. व्हॅलेरानें आयरिश पार्लमेंटमध्यें १९२१ च्या तहविरोधी बिलें

आणून आपला साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क शाबीद करण्याचा जेव्हां प्रयत्न केला, त्या वेळचा पत्रव्यवहार सारांशरुपानें देणें उद्‌बोधक होईल.

डी. व्हॅलेराच्या या तहविरोधी बिलांवर पार्लमेंटमध्यें भाषण करतांना वसाहत-मंत्री, जे. एन्. टॉमस १९३३ च्या नोव्हेंबरांत म्हणाले 'हो' ही१९२१च्या; तहांतील जबाबदारी फेटाळणें आहे. कायदेशीर प्रश्न आपण बाजूला ठेवूं. पण सन्माननीय करार या बिलांनीं उध्वस्थ केला जात आहे. तहांत जर सुधारणा करावयाच्या असतील तर दोन्ही देशांच्या संमतीनें त्या झाल्या पाहिजेत. पण हाच कांहीं मुख्य मुद्दा नाहीं. त्या बिलांचा खरा हेतु राजसत्ता आयर्लंडच्या घटनेंतून काढून टाकावी हा आहे. डी. व्हॅलेरा मला म्हणाले कीं, आपला अंतीम हेतू संयुक्त आयर्लंडला रिपब्लिक म्हणून मान्यता मिळावी आणि ब्रिटिश कॉमनवेल्थच्या सभासदाशीं कसल्या तरी स्वरूपाची, कोणत्या तरी परिस्थितींत व कांहीं तरी कारणानें संगती जोडावी आणि राजाला त्या संघाचा मुख्य मानावा. ब्रिटिशांना हें पूर्णपणें अमान्य आहे. १९२६ च्या घोषणेनें युनायटेड किंगडम व वसाहती या राजनिष्ठेनें बद्ध झाल्या आहेत. डी. व्हॅलेराला या घोषणेंतील कल्पनेप्रमाणें अंतर्गत कारभारांत पूर्ण स्वातंत्र्य आहे हें आतां कळून आले असेल. या कॉमनवेल्थमध्यें आल्यानें जे फायदे आहेत ते आयर्लंड आपल्या कृत्यानें गमविण्याच्या बेतांत आहे. समान नागरिकत्वाच्या सवलती, इतर साम्राज्याबरोबर व्यापाराचे आर्थिक फायदे, आंतरराष्ट्रीय संबंधांत प्रभावी वजन इत्यादि सवलती कॉमनवेल्थमध्यें असण्यानेंच मिळतात.

"या सवलतीबरोबर जबाबदाऱ्या आहेत. राजनिष्ठा व इतर सभासदां-बरोबर मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध ह्या त्या जबाबदाऱ्या आहेत. आमची अशी इच्छा आहे कीं, डी. व्हॅलेरानें या सवलती घ्याव्यात व जबाबदाऱ्या पत्कराव्यात. त्यानें जर एकीचा त्याग केला तर दुसरीचा फायदा त्याला घेतां येणार नाहीं."

या भाषणाला डी. व्हॅलेरानें उत्तर दिलें त्याचा सारांश असा.

"तुमचें सर्व म्हणणें मला समजलें. पण आयर्लंड जो कॉमनवेल्थमध्यें आला तो खुषीनें आला नाहीं. आम्ही प्रत्येक वेळीं स्वतंत्र व निराळें राष्ट्र आहों असा हक्क प्रतिपादन करीत आलों. आम्ही १९२१ च्या तहाला जी संमती दिली तिला कारण तशी संमती दिली नसती तर आम्हाला ताबडतोब युद्ध करावें लागलें असतें. हा तह म्हणजे ब्रिटिशांच्या बरोबर अखेरची तडजोड नव्हे. ह्या तहानें ब्रिटिश सरकारला आमच्या घटनात्मक वाढींत हात घालण्याचा कायमचा हक्क आहे असें आम्ही मानीत नाहीं. तुमच्या १४ तारखेच्या भाषणावरून आयरिशांनीं कॉमनवेल्थशी संबंध तोडण्याचे जें ठरविलें आहे तेवढें कारण तुमच्या चढाईला अगर ताबडतोब युद्ध जाहीर करण्याला पुरेसें आहे असें दिसत नाहीं. ही ब्रिटिशांनीं धारण केलेली वृत्ती इतकी मूलभूत महत्वाची आहे कीं, त्यासंबंधीं एक सरळ व स्पष्ट असें पत्रक प्रसिद्ध व्हावे.अशा पत्रकाचें आयरिश सरकार स्वागत करील."

यावर टॉमस यानीं प्रत्युत्तर दिलें त्याचा सारांश असा:—

आयर्लंडवर हा तह लादला या म्हणण्याचा त्यानीं इन्कार केला. "तो तह दोघांतील कटुपणा काढून टाकण्याकरतां केला व आयर्लंड बारा वर्षें तो मानीत आला. दोघांच्यामध्यें १२ वर्षें मित्रत्वाचे संबंध वाढत गेले. आपण म्हणतां त्या पद्धतीनें ब्रिटिशसरकार या तहाची जबाबदारी नाकारण्यास तयार नाहीं आणि म्हणून तुम्ही तसें केलें तर त्या परिस्थितींत काय करावें लागेल हा नुसता एखादी गोष्ट गृहीत धरून चालण्याचा प्रश्न नसल्यामुळें आम्हाला काय करावें लागेल, हें आतां आम्ही सांगू शकत नाहीं." शेवटीं त्यांनीं पुनः समान दर्जामध्यें प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याची थोरवी गायली आणि मित्रत्वाचें नातें तोडूं नका अशी विनंती केली.

या पत्रव्यवहारावरून आयर्लंड साम्राज्यांतून फुटून जाण्याचा कसा प्रयत्न करीत आहे, १९२१ चा तह त्यानीं कसा मोडला हें दिसून येतें. त्याबरोबरच हा तह मोडला असतां इंग्लंडनें त्याच्यावर सैन्य पाठविलें

नाहीं हें दिसलेंच. टॉमस यांनीं वेस्टमिन्स्टर स्टॅटयूटप्रमाणें साम्राज्यांतून आयर्लंडला फुटून जातां येणार नाहीं असें म्हणण्याऐवजीं तो कायदा मानण्यांत फायदे काय होतात याचें वर्णन केलें.

अशा प्रकारें १९३१ च्या वेस्टमिन्स्टरच्या कायद्याची फलश्रुती आहे. ह्या कायद्यानें वसाहतींना संपूर्ण स्वातंत्र्याच्या दारांत आणून उभें केलें आहे. दाराबाहेर पडण्यास त्यानीं स्वतःच निश्चय केला पाहिजे. हा निश्चय कृतींत उतरवावयाचे वेळीं साम्राज्यसत्ता आड येणार नाहीं असें नाहीं; पण तें त्यांचें करणें चूक ठरेल.

---

# भाग ७ वा.

## वसाहती व साम्राज्याचें संबंध.

जोंपर्यंत वसाहतींनीं साम्राज्याचा संबंध सोडलेला नाहीं, तोंपर्यंत त्यांचें व साम्राज्याचे संबंध काय असावेत अगर आहेत हें पहाणें जरूर आहे. दिवसें दिवस साम्राज्य व वसाहतीं यांच्यामध्यें ऐक्यभावना वृद्धिंगत होण्याऐवजीं दोघांचें संबंध दुरावतच चालले आहेत. वसाहतींची प्रवृत्ती आपला संसार निराळा मांडावा आणि आपले शेजारी जे असतील त्यांच्याशीं निकट संबंध आणावा इकडेंच झुकत आहे. ब्रिटिश साम्राज्याची शक्ति अगर वैभव जर कमी झालें, तर वसाहती साम्राज्याला मदत न करतां त्यांच्यापासून निराळ्याच होतील असें वाटतें. आज सुद्धां त्यांच्यांत बंडखोर वृत्ती दिसत आहे आणि साम्राज्यसरकारच्या अधिकारावर आक्रमण करण्याची तयारी दिसत आहे. त्यांत त्यांना बरेंच यश येत चाललें आहे हें निर्विवाद आहे.

ब्रिटिश कॉमनवेल्थ एक आहे हें अजमावण्याचें साधन, वसाहतींतील नागरिकांचा आणि युनायटेड किंगडममधील नागरिकांचा असणारा समान दर्जा. हा समान दर्जा वसाहती व ब्रिटन यांचा राजा एकच असल्यामुळें प्राप्त होतो. अर्थात हिंदुस्थान किंवा इतर जे परतंत्र देश आहेत, त्यांना

हा समान दर्जा आहे असें नाहीं. पण वसाहतीं ह्या युनायटेड किंगडमच्या बरोबरीच्या झाल्यामुळें युनायटेड किंगडममधील रहिवाशांना जे हक्क कायद्यानें प्राप्त झाले आहेत, ते हक्क वसाहतींतील नागरिकांनाहि आहेत असें समजण्यांत येतें.

साम्राज्यसरकारचा कायदा जर वसाहतींना लावण्यांत आला नसता तर हे हक्क त्यांना प्राप्त झाले नसते. पण वसाहती जसजशा सार्वभौम होऊं लागल्या, तसतशा त्या आपल्या नागरिकांचा हक्क दर्जा वगैरेला जास्त जपूं लागल्या आणि त्याची व्याख्या करू लागल्या.कांहीं वसाहती पुढारलेल्या होत्या कांहीं मागासलेल्या होत्या. तेव्हां सर्व वसाहतींतील नागरिकांना सारखे हक्क होते असें नाहीं.कांहींना ब्रिटिश नागरिकापेक्षांहि अधिक हक्क होते तर काहींना कमी होते१९३० च्या साम्राज्यपरिषदेंत हा प्रश्न चर्चेला निघाला आणि त्या परिषदेंत असें ठरलें कीं,जन्मजात ब्रिटिश नागरिक कोणाला म्हणावे हें ज्या १९१४ च्या ब्रिटिश कायद्यानें ठरलें आहे, तो कायदा पाहिजे तर वसाहतींनीं रद्द करावा. पण ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घेण्यांत खरोखरच कांहीं वसाहतींना कमीपणा वाटत होता. तथापि तेथें जमलेले प्रतिनिधी म्हणाले कीं, समान प्रजा म्हणवून घेण्यानें दळणवळणांत सोई होतात, परस्परांना सवलतीहि मिळतात. पण याहि उपर या समान दर्जात बदल हवा असेल तर परस्परांत विचारविनिमय करूनंच बदल करावे. प्रत्येक वसाहतीनें आपल्या राष्ट्रीय प्रजाजनाची व्याख्या करावी आणि नंतर सर्व वसाहतींतील नागरिकांना समान दर्जा आहे, हेंहि कबूल करावें. या समान दर्जाला इतर वसाहतींनीं मान्यता द्यावी.पण अशी व्याख्या करणें अशक्य आहे असें आयर्लंड म्हणूं लागला. ते म्हणाले आम्हीं म्हणूं ते आमचें राष्ट्रीयत्व व हें राष्ट्रीयत्व आमच्यावर अंमल चालवील. आमचे प्रतिनिधि बाहेर देशांत आमचें रक्षण करतील. बाहेर देशाबरोबर केलेल्या तहांनीं आम्हांला स्वतंत्र हक्क प्राप्त होतील.

ह्या तत्वाच्या आधारावर आयर्लंड आपल्या लोकांना पासपोर्ट देतांना त्यांना ब्रिटिश प्रजाजन म्हणत नसे; आयरिश प्रजाजन म्हणत असे. पण

१९३० नंतर ' आयर्लंड व ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्सचा रहिवाशी' असा प्रयोग त्यांनीं मान्य केला.

हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाहीं. वसाहती या बाबतींत अद्याप संकोचित मनोवृत्तीच्या आहेत म्हणा किंवा सावध आहेत म्हणा. हिंदुस्थानला तर हा प्रश्न फारच नडत आहे. आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांना ब्रिटिश प्रजाजन असूनहि येऊं देत नाहींत. आस्ट्रेलियानें सुद्धां इतरांना आपल्या देशांत यावयास व रहावयास मज्जाव केला. कानडानें सुद्धां या बाबतींत नियम करून टाकले. आयर्लंडला इंग्लिशांची भीति होती म्हणून त्यांनीं ६ डिसेंबर १९२२ रोजीं जे तेथें जन्मले किंवा ज्यांचे आईबाप तेथें जन्मले किंवा जे ७ वर्षे तेथें रहात होते त्यांनाच नागरिकत्वाचे हक्क दिले. त्यांनीं आपल्या राज्यांत ब्रिटिश कॉमनवेल्थच्या राष्ट्रीयत्वाच्या कायद्याला मान्यता नाहीं असें म्हटलें आणि आयरिश नागरिकांना बाहेर देशांत जर हक्क मिळणार असले तर आयरिश नागरिक म्हणून मिळालें पाहिजे असें प्रतिपादन केलें. अफ्रिकेनें सुद्धां याच धर्तीवर तटबंदीचें कायदे करून टाकले.

१९३७ च्या साम्राज्यपरिषदेंत हा प्रश्न चर्चेला निघाला होता. पण त्यांत कांहींच निष्पन्न झालें नाहीं. प्रत्येक वसाहतीनें आपले नागरिक कोण याबद्दल कायदा करावा अशी एक सूचना आली. हे कायदे कानडा, आफ्रिका व आयर्लंडनें केले. पण बाकीच्या तीन वसाहती अशा कायद्यांना तयार नव्हत्या. ज्यांनीं कायदे केले, त्यांनीं हें नागरिकत्व निश्चित करून टाकलें. पण सर्व वसाहतींतील नागरिक राजाच्या अंमलाखालीं असल्यामुळें त्यांना एक समान दर्जा आहे एवढें खरें. नागरिकत्वाची व्याख्या इतर वसाहतींनीं केली नसली तरी त्या वसाहतींत वाटेल त्या ब्रिटिश प्रजाजनाला जातां, रहातां येतें व राजकीय हक्क मिळतात असें मात्र नाहीं. ब्रिटिश सरकारनें आपण पूर्वीप्रमाणेंच आपल्या प्रजाजनांना वागवूं व हक्क देऊं असें मान्य केलें. डी. व्हॅलेरासारखा साम्राज्याचा कट्टा वैरी सुद्धां या समान दर्जामुळें आपल्याला विशेष सवलती मिळतात

म्हणून तो दर्जा सोडून द्यावयास तयार नाहीं. इंग्लंडहि आपलें साम्राज्यावरील प्रभुत्व शाबीद करण्याकरतां हें प्रजाजनत्व मान्य करतें.

## एक्स्ट्रा-टेरिटोरिआलिटी
किंवा
## बाहेर देशांतील आपल्या प्रजाजनांचे हक्क

ब्रिटिश गृहस्थ जर चीनमध्यें असला किंवा आयरिश माणूस इजितमध्यें असला तर दोघेहि ब्रिटिश प्रजाजन असल्यामुळें व त्यांची व्याख्या ठरली असल्यामुळें त्या त्या देशांत ब्रिटिश कायद्याच्या खालीं तें येतात. या कायद्याचा अंमल तेथील ब्रिटिश अधिकारी करीत असतात. अर्थातें ही सत्ता त्या त्या सरकारनीं ब्रिटिश राजाला दिली असली तरच या गोष्टी शक्य होतात. हे परके देश जर वसाहतींना स्वतंत्र मान्यता देतील, तरचा प्रश्न वेगळा होईल. पण आयर्लंड आपण ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घ्यावयास तयार नाहीं. म्हणून साम्राज्यांत आयरिशांना शत्रुवत मानावयास पाहिजे. राजाच्या राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारून आयर्लंडनें एकत्वाच्या भावनेचा नाश केला आहे. तथापि तेवढ्यामुळें आयर्लंडच्या बाहेर असणाऱ्या आयरिशांचे ब्रिटिश प्रजाजनत्वाचे हक्क जात नाहींत. तसा कायदा ब्रिटिश पार्लमेंटांत व्हावयाला पाहिजे.म्हणजे आयर्लंडला साम्राज्याबाहेर घालवयाला पाहिजे. तें करावयास ब्रिटिश सरकार अद्याप तयार नाहीं.

## युद्धांत तटस्थता.

एखाद्या युद्धांत वसाहती तटस्थ राहूं शकतील किंवा नाहीं या प्रश्नाचें उत्तर आयर्लंडनें चालू युद्धांत दिलेंच आहे. आफ्रिकेनेंहि आपण तसें करूं शकतों हें दाखविलें आहे. जनरल हर्टझॉग हे पूर्वीपासून तटस्थतेच्या हक्काचें प्रतिपादन करीत असत. पण तटस्थतेचा अर्थ आधुनिक युद्धांत वाटतो तितका सोपा नाहीं. तटस्थ राष्ट्रांनीं शत्रूचीं जहाजें आपल्या बंदरांत येऊं देणें हेंहि तटस्थतेच्या विरुद्ध समजले जातें. कांहीं दिवसांपूर्वीं चालू युद्धांत शांततेचा प्रयत्न करणाऱ्या

हॉलंडच्या राणीला व बेल्जमच्या राजाला हिटलरनें असें सांगितलें कीं, तुमच्या बंदरांत शत्रूपक्षाच्या जहाजाला आश्रय मिळाला तरी तुमची तटस्थता भंग झाली असें मी समजेन. तटस्थ राष्ट्रांच्या बाबतींत एवढी खबरदारी घेणें जरूर असते. कारण तटस्थ राष्ट्रांच्या बंदराचा उपयोग जर शत्रूपक्ष करूं लागला तर त्यांचा तटस्थपणा कसा शिल्लक उरणार ?

म्हणून आयर्लंड किंवा आफ्रिका यांच्या तटस्थतेचा अर्थ वाटतो तितका साधा नाहीं. त्यांनीं आपलीं बंदरें इंग्लंडला बंद केलीं पाहिजेत. पण वसाहतींचे ब्रिटिशाबरोबर पूर्वी करारमदार झाले आहेत. या कराराप्रमाणें युद्धाचे वेळीं आयर्लंडनें ब्रिटिश सरकारला ते मागतील तीं बंदरें द्यावयाचीं आहेत* हीं बंदरें आयर्लंडच्या संरक्षणाची जी जबाबदारी इंग्लंडवर आहे, त्याकरतां द्यावयाचीं आहेत. आयर्लंडनें चालू युद्धांत जरी पुष्कळ सांगितले कीं, आम्ही तटस्थ आहों तरी जर्मनी ही गोष्ट कशी मान्य करणार ? फार तर आयर्लंड ब्रिटिशांना रिक्रुट पुरवणार नाहीं किंवा पैसा देणार नाहीं. म्हणजे त्याची तटस्थता ब्रिटिशापुरती राहील. पण जर्मनीनें ही तटस्थता अमान्य करून आयर्लंडला शत्रूपक्षीय लेखलें व त्याच्यावर स्वारी केली तर आयर्लंड काय करणार ? ब्रिटिशांच्याबरोबर त्याला दोस्त राष्ट्रांत सामील झाले पाहिजे किंवा एकट्यानें युद्ध जाहीर केलें पाहिजे. आयर्लंड हा युरोपच्या रणकुंडाजवळ असलेला देश असल्यामुळें ही चर्चा करावी लागते. इतर वसाहतींच्या बाबतींत हा प्रश्न तितका निकरावर येणार नाहीं. पण त्यांच्यावरहि आरमारी तळ ब्रिटिशांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी आहेच. याला कायदेशीर अडचण अशी आहे कीं, जोंवर वसाहती साम्राज्यांत आहेत, तोवर युध्द अगर शांतता राजाच्याच नांवानें होऊ शकते. १९२८ च्या केलॉग पॅक्टप्रमाणें किंवा राष्ट्रसंघाच्या

---

**In time of war or strained relations with foreign power such harbour and other facilities as the British government may require.(Article 7 of irish treaty.*

पाने १९४+२ दा. नं. LWV रा-१९०३३

 / देवगिरीकर

नियमाप्रमाणें ही सत्ता राजाकडेच आहे. एखादी वसाहत जर विरुद्ध जाऊं लागली तर राजाला स्वतः विरुद्ध युद्ध पुकारणें शक्य नसल्यामुळें ती वसाहत त्याला साम्राज्याबाहेर घालवावी लागेल. आज आयर्लंडच्या तटस्थतेच्या बाबतींत इंग्लंड कांहीं करीत नाहीं याचें कारण वसाहतीवर जोवर हल्ला झाला नाहीं तोवर त्यानीं युद्धांत प्रत्यक्ष भाग घ्यावयाचा नाहीं असें सामान्य धोरण आहे; पण शत्रूपक्षाला त्यानीं व्यापारविषयक सवलतीहि द्यावयाच्या नाहींत.

आयर्लंडमध्यें अजूनपर्यंत ब्रिटिश सैन्य असल्यामुळें परकी राष्ट्रें आयर्लंडची तटस्थता कशी कबूल करणार? जोपर्यंत आयर्लंडनें आपली बंदरें ब्रिटिश जहाजाकरतां आणि आपला देश ब्रिटिश सैन्याकरतां मोकळा ठेवला आहे, तोंपर्यंत त्याची तटस्थता ही दिखाऊ आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं तो १९२१ चा तहनामा बदलूं शकणार नाहीं. ह्या तहांच्या कलमांत त्यांनीं बदल केलाच आहे. त्यानें १९२१ च्या तहनाम्यांतील संरक्षणविषयक कलमें रद्द केली तर त्याच्या बंदरांत ब्रिटिश जहाजें व देशांत ब्रिटिश सैन्य राहूं शकणार नाहीं. हा नवा कायदा त्यानें केल्यावर त्याला खऱ्या अर्थानें तटस्थ रहातां येईल, एवढेंच नव्हें तर ब्रिटिशांबरोबर युद्धहि पुकारतां येईल. असें युद्ध आपण पुकारलें तर आपण पुनः ब्रिटिशांच्या गुलामगिरींत खेचले जाऊं, या भीतिनें डी. व्हॅलेरा आज स्वस्थ बसला आहे.

तेव्हां ब्रिटिश साम्राज्याची अविभाज्यता, त्याचें स्थैर्य, त्याचा एकजिनसीपणा असा हा पोकळ व मानीव आहे. ज्या साम्राज्यांत वसाहती एकराष्ट्रीयत्व मानावयास तयार नाहींत किंवा ब्रिटिश प्रजाजन म्हणून घ्यावयास ज्यांना कमीपणा वाटतो आणि युद्धाचे वेळीं आपण आपले भाग्याचे धनी आहों असें म्हटलें जातें, त्या साम्राज्यांत एकत्व व अविभाज्यत्व कसें असेल?

साम्राज्यसरकारनें युद्ध जाहीर केलें तर वसाहती कशा वागतील हें वर सांगितलें. पण वसाहतींचें व एखाद्या परक्या राष्ट्राचें जर भांडण

झालें आणि युद्धप्रसंग उद्भवला तर साम्राज्यसरकार काय करणार, हाहि एक प्रश्न आहे. अशीं भांडणें अगर युद्धें वसाहतींनीं परस्पर करावयाची आहेत. साम्राज्यसरकार या युद्धामुळें परक्या विजयी राष्ट्राला द्याव्या लागणाऱ्या खंडणीला जबाबदार रहाणार नाहीं. आयरिश फ्री स्टेटनें तर असें सांगूनच टाकलें आहे कीं, परक्या राष्ट्रांचा प्रश्न आमचा आम्ही पाहून घेऊं. पण साम्राज्यावर संकट आलें म्हणजे वसाहती जशा धावून जातात ( अर्थात नैतिक जबाबदारी समजून ) त्याप्रमाणें साम्राज्यसरकारनें सुद्धां अशा संकटाचें वेळीं वसाहतींना मदत करावयास हवी. आयर्लंडवर जर्मनीनें स्वारी केली तर इंग्लंड स्वस्थ बसणार नाहीं; किंवा कानडावर अमेरिका चालून गेली, तर इंग्लंडला डोळे मिटतां यावयाचे नाहींत. कारण ह्या लढायांत आत्मरक्षणाकरतां इंग्लंडला पडावें लागेल. अर्थात कायद्यानें तसें करण्यास इंग्लंड बांधलें गेलें नाहीं म्हणूनच ब्रिटिश साम्राज्य एक व अविभाज्य आहे असें म्हणता येत नाहीं.

## व्यापारी सवलती.

परक्या राष्ट्रांना आपल्या देशाबरोबर व्यापार करण्यास जड जावें म्हणून व स्वतःच्या व्यापाराची वाढ व्हावी म्हणून कांहीं देशांत जकातीच्या प्रचंड भिंती उभ्या केल्या जातात. वसाहती व ब्रिटिश सरकार एकच आहेत अशा भावनेनें कधींकधीं दोघेहि परस्परांना सवलती देतात. वास्तविक अशा प्रकारच्या सवलती दिल्या पाहिजेत असा कायदा नाहीं. हिंदुस्थानसारख्या देशाला परावलंबनामुळें ओटावा करार मान्य करावा लागला. हिंदुस्थानच्या मध्यवर्ती सरकारांत ब्रिटिशाचें हितरक्षण करणारे बहुसंख्य सभासद होते, त्यामुळें हा करार झाला हें आपणास ठाऊक आहे. हिंदुस्थानला हा करार नाकारण्यास किती स्वातंत्र्य होतें हें आपण जाणतोच; पण वसाहती ब्रिटिशांच्या अंकित नाहींत. त्यांना स्वतःचा फायदा दिसल्याशिवाय त्या अशा कराराला मान्यता देणार नाहींत. आयर्लंडसारख्या तेजस्वी, पाहिजे तर ब्रिटिशांच्या भाषेंत आपण त्याला नाठाळ म्हणूं, राष्ट्रानें हा करार मान्य केला नाहीं. यावरून वसाहती

साम्राज्यांतील मालाला विशेष सवलती देण्यास बांधलेल्या नाहींत असें सिद्ध होतें. त्या पूर्णपणें स्वतंत्र आहेत व पाहिजे तर त्या परस्परांना सवलती देतील अगर देणार नाहींत.

पण याहिपेक्षां दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. परक्या देशाबरोबर ब्रिटिश सरकार ज्या ज्या वेळीं व्यापारी करार करतें, त्या त्या वेळीं परक्या राष्ट्रानीं वसाहतींच्या मालाला सुद्धां विशिष्ट सवलतीचे हक्क दिले पाहिजेत असा करार करते. त्याचा मोबदला वसाहतींनीं सुद्धां त्या राष्ट्राला आपल्या विशेष मर्जीतला ( most favoured nation ) देश मानला पाहिजे व सवलती दिल्या पाहिजेत. अशा तहावर युनायटेड किंगडम फक्त सह्या करते. त्यांत। वसाहतीकरतां सह्या नसतात. वसाहतीवर कोणतीहि बंधनें न घालतां त्यांचा जर फायदा करतां आला, तर करावा अशी पूर्वापार पद्धत आहे. पण आयर्लंडनें ह्या पद्धतीला विरोध केला व आमच्या करतां तुम्ही सह्या करतां कामा नये असें बजावले. आफ्रिकेला सुद्धां ही ब्रिटिश पद्धत मान्य नाहीं. पण अद्याप साम्राज्यपरिषदेनें त्या बाबतींत स्पष्ट नियम केलेले नाहींत.

वरील विवेचनावरून पूर्वीचाच सिद्धांत दृढ होतो.वसाहती ह्या व्यापारविषयक बाबतींतहि पूर्णपणें स्वतंत्र आहेत. त्यांच्यावर साम्राज्य सरकार कोणतीहि सक्ती करूं शकत नाहीं. त्यामुळें ब्रिटिश कॉमनवेल्थच्या एकजिनसीपणाला शब्दापलीकडे कांहींच अर्थ उरत नाहीं. परकी राष्ट्रें वसाहतींतील ही बजबजपुरी पाहून वसाहतीशीं स्वतंत्र तह करूं लागल्या तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं.

युनायटेड किंगडमचा प्रश्न आपण बाजूला ठेऊं. आयर्लंडनें रशियाशीं जर व्यापारविषयक सवलती मिळविल्या आणि त्यानें साम्राज्याला त्याचा फायदा दिला, तर तो घेण्यास साम्राज्य तयार होणार नाहीं असें माल समजण्याचें कारण नाहीं. याच्या उलट प्रकार दिसला तर वसाहती आपल्या हक्काचे पुराण सांगू लागतील, हेंहि तितकेंच खरें आहे.

## संरक्षण

संरक्षणाच्या बाबतींत वसाहती व युनायटेड किंगडम यांचे संबंध काय आहेत, हें आपण आतां पाहूं. वसाहतींना अन्तर्गत स्वातंत्र्य असल्यामुळें आपल्या देशांतील संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. पण वसाहतींच्याजवळ आरमार नसल्यामुळें समुद्रावरील त्यांचें रक्षण ब्रिटिशांनीं करावें हें उचित आहे. वसाहतींपासून आपल्याला फायदा नाहीं आणि त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी व त्याच्या मागोमाग येणारा खर्च आपल्यावर पडतो, ह्याबद्दल ब्रिटिश लोक कुरकुरू लागले आहेत. तेव्हां वसाहतींनीं हळूं हळूं आपलें आरमार वाढवावें व आम्हाला खर्चाच्या बोजांतून मुक्त करावें, अशी ब्रिटिशांची इच्छा असल्याचें सांगितलें जातें. हें कितपत सत्य आहे याचा अंदाज करतां येत नाहीं. पण वसाहती स्वयंशासीत आणि जवळजवळ स्वतंत्र म्हणावयाच्या व त्यांच्या रक्षणाकरतां ब्रिटिशांनीं खर्च करावयाचा, हें वरवर तरी अन्यायाचें वाटतें. मनांतून ही जबाबदारी ब्रिटिशांना आवडत असेलहि. कारण आस्ट्रेलिया किंवा कानडाच्या रक्षणाकरतां त्यांना जर पासिफिक व आटलांटिक समुद्रावर स्वामित्व गाजवितां आलें आणि आपली लढाऊ जहाजें वाटेल तिकडे फिरवतां आलीं तर त्यांना त्याचें वाईट कां वाटावें? त्यांचा चीन आणि आसपासच्या बेटांत व्यापार आहे. ह्या व्यापाराकरतां त्यांचें जपानबरोबर खटके उडतात. जपानबरोबरचे त्यांचें संबंध आज तरी सलोख्याचें नाहींत. तेव्हां अशा स्थितींत वसाहतींच्या निमित्तानें त्यांना स्वतःचें हितरक्षण करतां आलें तर त्यांनीं तें कां करूं नये?

उलटपक्षीं वसाहतींनीं तरी ब्रिटिशांच्या ओंजळीनें किती दिवस पाणी प्यावें? त्यांच्यांतहि आत्मरक्षणाच्या या साधनांची जाणीव निर्माण झाली आहे; व त्या वसाहती वैमानिक व आरमारी दल उभारूं लागल्या आहेत.

या प्रश्नाचा सनदशीररीत्या विचार केला तर काय उपलब्ध होतें तें आपण पाहूं. राजाबद्दल समाननिष्ठा हें वसाहतींच्या दर्जाचें आद्य वाक्य

असल्यामुळें राजा हा साम्राज्यांतील सर्व सैन्याचा प्रमुख ठरतो. पण वहिवाट किंवा नियम असा आहे कीं, राजानें ग. जनरलला कमांडर इन् चीफ् ही पदवी द्यावयाची. आयर्लंडनें राजाचें अस्तित्वच मुळीं गुंडाळून ठेवल्यामुळें ते हा सिद्धांतच मान्य करीत नाहींत. पण इतर वसाहतींतील कमांडर हा ग. जनरल असतो व त्याच्यावर मंत्रिमंडळाचें नियंत्रण असल्यामुळें सैन्याचा ताबा जनतेकडेच पूर्णपणें असतो.

वसाहतींना आत्मरक्षणाचे कायदे करण्याची पूर्ण परवानगी आहे. आपलें सैन्य बाहेर देशीं पाठवावयाचें किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार वसाहतींना आहे. या बाबतींत त्या साम्राज्यसरकारच्या सैन्याशीं सहकारितां करू शकतात,युद्धाचे वेळीं सारें सैन्य त्यांच्या ताब्यांत देऊं शकतात. या शेवटच्या शक्यतेमुळेंच आपल्या सैन्याचें शिक्षण ब्रिटिश अधिकाऱ्यामार्फत करण्याचें वसाहतींनीं ठरविलें तर त्यांत कमीपणा नाहीं. उलट उत्तम प्रकारचें सैन्य तयार करण्याकरतां ब्रिटिशांच्या पावलावर पाऊल टाकणें कांहीं वसाहतींना अवश्यक वाटते. ब्रिटिशांच्या ताब्यांत सैन्य देण्यामुळें दुसरीहि गोष्ट करणें अवश्य होते. शिस्त व शासनाबाबत ते सांगतील तसले कायदे करावे लागतात; पण त्यानें स्वामित्व जात नसल्यामुळें वसाहतींना कुरकुरण्याचें कारण नाहीं.

वसाहती व युनायटेड किंगडम यांच्यांत एकसूत्रीपणा रहावा म्हणून लॉर्ड बाल्फर यानें साम्राज्यसंरक्षणकमिटी नेमली. या कमिटींत वसाहत प्रतिनिधी यावेत व त्यांनीं संरक्षणाचे प्रश्नावर तज्ज्ञांच्या मदतीनें चर्चा करावी अशी मूळ योजना होती. अशा कमिटीमुळें वसाहतींच्या सैन्यांत एकसूत्रीपणा येतो व त्यांचें सैन्य पहिल्या प्रतीचें, निदान ब्रिटिशाइतपत राहूं शकते. या कमिटीला कायदेशीर स्वरूप नाहीं. त्या कमिटींतील चर्चा व निर्णय फक्त शिफारसवजा असतात. अशा प्रकारें संरक्षणाच्या बाबतींत वसाहती ह्या पूर्ण स्वतंत्र आहेत असें दिसून येतें. साम्राज्य संरक्षक कमिटींत जाणें न जाणें, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हवालीं सैन्य करणें न करणें, त्यांच्या धर्तीवर अगर हुकमतीखालीं सैन्याला शिक्षण देणें न देणें,

हें सर्वस्वी वसाहतींच्या मर्जीवर अवलंबून आहे. अशा प्रकारें व्यापार, रक्षण, प्रजाजनाचे हक्क वगैरे बाबतींत युनायटेड किंगडम व वसाहती यांचें नातें काय आहे हें आपण पाहिले. त्यावरून वसाहती ह्या युनायटेड किंगडमवर अवलंबून आहेत असें म्हणतां येत नाहीं. दोघांच्या फायद्याकरतां त्यांनीं आपल्या हक्कांना मुरड घातली, तर त्यानें स्वातंत्र्य बिघडत नाहीं.

वाचनालय

---

# भाग ८ वा.

## आंतरराष्ट्रीय व आंतरवसाहतिक संबंध

जोंपर्यंत वसाहती ह्या ब्रिटिश कॉमनवेल्थमधील एक भाग म्हणून समजल्या जात आहेत, तोंपर्यंत त्यांना बाह्य जगांत स्वतंत्र स्थान आहे असें कायदेशीररीत्या म्हणतां येत नाहीं. घरीं स्वतंत्र आणि बाहेर परतंत्र ही स्थिति जरा चमत्कारिक वाटते. वसाहती आपण स्वतंत्र आहों असें कितीहि म्हणत असल्या तरी जपान, जर्मनी, अमेरिका, रशिया, इटली अशा राष्ट्रांनीं त्यांचें स्वातंत्र्य जोपर्यंत मान्य केलें नाहीं आणि ब्रिटिश सरकारला धुडकावून त्यांच्याबरोबर स्वतंत्रपणें करारमदार केलें नाहींत, तोंपर्यंत वसाहतीचें स्वातंत्र्य हें संपूर्ण झालें आहे असें म्हणतां येत नाहीं.

आयर्लंडनें साम्राज्यसत्तेशीं युद्ध पुकारून आपण विभक्त झालों असें जाहीर केलें आणि इतर स्वतंत्र देशांनीं त्यांचें स्वातंत्र्य मानलें नाहीं तर आयर्लंडला खालीं पहाण्याची वेळ येईल. इतर राष्ट्रांना हें स्वातंत्र्य मानण्यास अडचण असते. राष्ट्रसंघासारखी एखादी संस्था असते, त्या संघांत निरनिराळ्या देशचे प्रतिनिधी येतात, ते एकमेकांच्या करारमदारांना मान्यता देतात आणि तेथें जर ब्रिटिशानीं अमेरिकाला सांगितलें कीं, तुम्ही आयर्लंडला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देतां कामा नये, तो

आमच्या साम्राज्यांतील एक देश आहे, तर आयर्लंडला राष्ट्रसंघ सोडला पाहिजे, किंवा इंग्रजांची मनधरणी करून आणि कायद्यांचा कीस काढून आपलें स्वातंत्र्य शिक्कामोर्तब करून घेतले पाहिजे. राष्ट्रसंघांत वसाहतींना स्वतंत्र जागा आहेत हें खरें आहे. पण ही जागा ब्रिटिशांनीं आपलें स्थान बलिष्ठ करण्याकरतां दिली आहे.

राष्ट्रसंघामध्यें वसाहतींना स्वतंत्र जागा देऊन आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीनें एवढ्यापुरतें तरी त्यांचें स्वतंत्र स्थान मान्य केलें आहे.* वसाहतींनीं व्यापार विषयक किंवा इतर तहहि स्वतंत्रपणें केलेले आहेत. पण त्या तहाची अंतीम जबाबदारी ब्रिटिश मंत्रिमंडळावर असे. मागें म्हटल्याप्रमाणें १९२३ सालीं कानडानें अमेरिकेबरोबर हॅलिबट फिशरीचा तह केला आणि अमेरिकेच्या सेनेटनें त्याला मान्यताहि दिली. पण अशा उदाहरणांवरून वसाहती स्वतंत्र झाल्या असें ठरत नाहीं. वसाहती प्रमाणेंच ब्रिटिश सरकारहि वसाहतींच्या मान्यतेशिवाय वसाहतीकरतां स्वतंत्र तह करू शकत नाहीं. ह्या पद्धतीमुळें वसाहतीना अंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीनें निश्चित दर्जा प्राप्त झाला आहे असें प्रो. कीथ म्हणतात.1 अशा तहावर राजाची सही लागतेच. पण हा विधी औपचारिक आहे असें त्यांचें मत आहे. त्या-

*It is clear that Dominions thus obtained for all league purposes a definite position, as for these matters at least, status of International Law (Constitutional law by Keith 47,)*

*1 This procedure emphasises in the highest degree the separate character of the Dominions and gives them in effect the status of distinct states of International law. It is however true that.., The full powers and instruments of ratification are still issued with the king's singnature affixed on the strength of the warrant countersigned by British foreign secretary (ibid page 51)*

मुळेंच वसाहतींचें जागतिक स्वातंत्र्य हें अनिर्बंध नाहीं. आयर्लंडनें याच्यापुढें पाऊल टाकून सहीशिक्क्याची भानगड काढून टाकली हेंहि मागें सांगितलेंच आहे, पण आयर्लंडला काय किंवा इतर वसाहतींना काय साम्राज्यांतून जरी बाहेर जातां आलें आणि आपण स्वतंत्र झालों असें पुकारतां आलें तरी त्यांना अंतरराष्ट्रीय जगांत मान्यता मिळविण्याकरतां प्रयत्न केला पाहिजे. कांहीं वसाहतींचे वकील दुसऱ्या राष्ट्रांत जातात व तीं राष्ट्रें त्यांना ठेवून घेऊन त्यांच्या स्वातंत्र्याला मान्यता देतात हा खरोखर महत्त्वाचा मुद्दा आहे. हा हक्क तर वसाहतींनीं बराच संपादन केला आहे. ब्रिटिशांनीं त्याविरुद्ध कांहीं केलें नाहीं. या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी एकेरीवर प्रकरण आल्यानंतर काय होईल, हें सांगवत नाहीं. ब्रिटिशांच्या हातांत फक्त इतर स्वतंत्र देशांना आमच्या वसाहतींना मान्यता देतां कामा नये, एवढेंच सांगण्याची सत्ता आहे. तें मानणें न मानणें त्या त्या देशावर अवलंबून राहील. हा प्रश्न असाच पुढें रेटीत न्यायचा आयर्लंड व आफ्रिकेचा निर्धार आहे. तेव्हां स्वतंत्रपणें तह करणें,स्वतंत्र वकील नेमणें या स्वातंत्र्य-निदर्शक गोष्टींवरून वसाहती आंतरराष्ट्रीय दृष्ट्यासुद्धां बऱ्याच स्वतंत्र आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

## वसाहती–वसाहतीमधील संबंध.

वसाहती व युनायटेड किंगडम हे एक अविभक्त कुटुंबाप्रमाणें आहेत असा मूळ सिद्धांत ब्रिटिश सरकार प्रतिपादन करीत असत. वसाहती, वसाहतींमध्यें मित्रत्वाचे संबंध असावेत, अशी त्यामुळेंच ब्रिटिशांची इच्छा आहे. हे संबंध एकाद्या कायद्यानें प्रतिपादन केले नाहींत. प्रत्येक वसाहत दुसऱ्या वसाहतीबद्दल आपल्या घटनेंत योग्य ती तरतूद करू शकते. एक वसाहत दुसरीबरोबर करारमदार करूं शकेल, पण युध्द करू शकेल कीं नाहीं हें सांगवत नाहीं. कारण सर्व वसाहतींचा मुख्य जो राजा तो एकच आहे. तेव्हां एका वसाहतीनें दुसरीबरोबर युध्द करणें म्हणजे एकाच

राजानें स्वतःविरुध्द युध्द करण्यासारखें आहे. त्यामुळें युध्द करणारी वसाहत आधीं साम्राज्यबाहेर पडेल आणि नंतर युध्द पुकारील.

हा अंतीम टोकाचा प्रश्न आपण सोडून देऊं. पण दोन वसाहतींत जर एखाद्या प्रश्नाबद्दल भांडणें झाली तर त्यांचा निकाल कसा करावयाचा ? त्याकरतां आपसांत एकमतानें ठरेल तसें करावें असें सांगितलें आहे. कांहीं वसाहती असें म्हणतात कीं, आम्ही स्वतंत्र असल्यामुळें दुसऱ्या वसाहतींबरोबरचे आमचे संबंध हे एखाद्या तिऱ्हाईत देशाप्रमाणें अंतर-राष्ट्रीय कायद्यानें ठरविले जावेत; पण वसाहतींना हा कायदा लावण्यास ब्रिटिश सरकार तयार नाहीं. १९३६ च्या परिषदेंत सर्व वसाहतींनीं ब्रिटिश सरकारचें हें म्हणणें मान्य केलें.* आयर्लंडला या कबुलीबद्दल मागाहून पश्चात्ताप झाला. त्यानें पुढें तक्रारीला सुरवात केली. आम्ही आमची वसाहतींबरोबरीचीं भांडणें आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें नेऊं असें आयर्लंड म्हणूं लागला पण ब्रिटिशांचें यांविरुद्ध असलेलें म्हणणें या कोर्टाला अमान्य करणें शक्य नाहीं. म्हणून जोंपर्यंत वसाहतींना बाहेर मान्यता मिळत नाहीं आणि त्या मान्यतेच्या आड ब्रिटिश सरकार येतें, तोंपर्यंत वसाहतींना अंतरराष्ट्रीय कायदा लागू होत नाहीं. आयर्लंडशिवाय हा मुद्दा कोणतीहि वसाहत आग्रहानें मांडत नाहीं, म्हणून तो प्रश्नहि तसाच राहिला आहे. ब्रिटिशांनीं आपलें हें म्हणणें १९२४ सालीं व १९२९ सालीं मांडलें. १९२४ सालीं त्यांनीं असें सांगितले कीं, राष्ट्रसं-घाची नियमावली प्रसिद्ध झाल्यापासून आपण असें सारखे सांगत आलें आहोंत कीं,या नियमावलीनें किंवा राष्ट्रसंघाकडून पाडल्याजाणाऱ्या वहिवाटीनें ब्रिटिश कॉमनवेल्थमधील राष्ट्रांचे परस्परांमधील संबंध हे नियंत्रित केले जाणार नाहींत. १९२९ सालींहि त्यांनीं तेंच सांगितलें. ब्रिटिश कॉमनवेल्थमधील

*The conference of 1928 accepted unanimously and no Dominion parlament dissented from the viewthat the relation of the parts of the commonwealth inter Se are not relations of International law ( C.L. page 80.)

जे सभासद राष्ट्रसंघांत आहेत, त्याना वगळून बाकीच्या सभासदांमधील भांडणें फक्त आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें जावीत; बाकीची कॉमनवेल्थमधील सभासदांचीं भांडणें हीं आपसांत मिटवावींत. ब्रिटिश सरकारच्या या दोन जाहीर धोरणावरून वसाहतींना आपसांतील भांडणें आपसांतच मिटवावीं लागतात असें दिसते. एवढ्यावरून वसाहतींच्या स्वातंत्र्याला थोडाफार कमीपणा येत असला तरी त्यांचा दर्जा कमी आहे असें मानण्याचें कारण नाहीं.

वसाहतीवसाहतींमधील भांडणें मिटविण्याकरतांहि एका ट्रिब्यूनलची योजना केली जाते. हें न्यायमंडळ कारणपरत्वें नेमलें जातें. त्याच्या पुढें दोन सरकारमधील मतभेदाचे मुद्दे तेवढे येतात. वाटेल तो प्रश्न येऊं शकत नाहीं. हिंदुस्थानसारख्या देशाला हिंदी लोकांना आफ्रिकेंत केलेला बंदीचा प्रश्न काढतां येणार नाहीं. या न्याय मंडळानें कसें काम करावें याचीं तत्त्वेंहि ठरलीं नाहींत.

१९३२ सालीं आयर्लंडनें राजनिष्ठेची शपथ नाकारली.जमिनीचे वार्षिक हप्ते देण्याचें नाकबूल केलें व पेन्शन देत नाहीं म्हटलें त्यावेळीं लवादा-पुढें हें प्रकरण गेलें पाहिजे असें ब्रिटिश सरकार म्हणू लागलें. त्या वेळीं डी. व्हॅलरानें कॉमनवेल्थमधील लोकांचें लवाद मी मान्य करीत नाहीं असें उत्तर दिलें. त्यांत परक्या राष्ट्राचा मनुष्य असला पाहिजे असें तो म्हणूं लागला. कारण तो स्वतःला कॉमनवेल्थमधील नियमांनीं बांधून घेण्यास तयार नव्हता. ब्रिटिश सरकार बाहेरच्या माणसाला घेण्यास कबूल होईनात. ब्रिटिशांनीं आपलें येणें पुढें आयर्लंडच्या मालावर जादा जकाती बसवून वसूल केलें ती गोष्ट अलाहिदा पण तो प्रश्न सुटलेला नाहीं एवढें खरें.

ब्रिटिश कॉमनवेल्थ ही एक आहे असें सिद्ध करण्याचा हा ब्रिटिशांचा प्रयत्न सुरू आहे. कायद्याच्या कोर्टांत त्याचा निश्चित निकाल लागणार असेल तो लागो, पण कॉमनवेल्थची ही कोंडी फोडावयाची असेल तर वसाहतींनीं उघडपणें त्यांतून बाहेर पडलें पाहिजे. याशिवाय दुसरा मार्ग त्यांना उपलब्ध नाहीं. कांहींच्या कल्पनेप्रमाणें हा निकाल आयर्लंड, आफ्रिकेच्या बाजूनें लागला आहे; पण त्याला विरोधहि आहे.

अशा प्रकारें वसाहतींच्या, अंतर्गत, अंतरदेशीय वगैरे चार दर्जाची आपण पहाणी केली. आतां हिंदुस्थानच्या प्रश्नाकडे वळूं.

# भाग ९ वा.

## हिंदुस्थान व वसाहतींचा दर्जा.

ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें हिंदुस्थानला समाविष्ट करून घेण्यांत आलें नाहीं. सध्यांचें महायुद्ध सुरूं झाल्यापासून हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा देण्यांत येईल, असें फक्त सांगण्यांत येत आहे. लॉर्ड लिनलीथगो, सर सॅम्युएल होअर व लॉर्ड झेटलंड या तिघांनीं हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीचा अंत वसाहतींच्या स्वराज्याच्या दर्जांत होणार आहे असें म्हटलें आहे. ही घोषणा झाल्यामुळेंच वसाहतींच्या दर्जा प्राप्त झाल्यानें कोण-कोणते राजकीय हक्क मिळतात, राष्ट्रांत व परराष्ट्रांत किती स्वातंत्र्य मिळतें वगैरे प्रश्नांची चर्चा करणें अवश्य झाले आहे. कारण हिंदुस्थानला हें स्वराज्य नको असेल तर तें कां नको आहे, हें सांगतां आलें पाहिजे. तसेंच या स्वराज्यांत गौणत्वनिदर्शक कांहीं बाबी असल्या तर त्या आपल्याला काढून टाकणें शक्य आहे किंवा नाहीं हेंहि बघितलें पाहिजे. वसाहतींच्या स्वराज्यामुळें संपूर्ण स्वातंत्र्याचा मार्ग नजिक येतो, कां दुरावतो याचीहि आपल्याला कल्पना पाहिजे. आणि या सर्वांपेक्षां आपण आपल्या शक्तीचाहि विचार केला पाहिजे आणि असें ठरविलें पाहिजे कीं, अमुक अमुक हक्कांच्यापेक्षां कमी हक्क आम्ही मान्य करणार नाहीं,

वरील दृष्टीनें आपण विचार करू लागलों म्हणजे आपल्याला हिंदी राजकीय प्रश्नाची थोडीशी पूर्वपरंपराहि पहावी लागेल.

१९१७ साल हें या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. या सालांत त्या वेळचे भारतमंत्री मि. मॉंटेग्यू यांनीं ब्रिटिश मंत्रिमंडळामार्फत ता. २० ऑगस्टला जाहीर घोषणा केली. या घोषणेंत असें सांगितलें कीं, १ ब्रिटिश साम्राज्याचा एक अंशभूत भाग म्हणून हिंदुस्थानांत प्रगतीपर मार्गानें जबाबदारीच्या स्वराज्याची घटना घडवून आणणें ( २ ) स्वयंशासित संस्थेच्या स्वरूपाची क्रमशः वाढ करणें ( ३ ) त्याकरितां हिंदी लोकांच राज्यकारभारांतील प्रत्येक खात्यांत जास्त जास्त संबंध येऊ देणें हें आमचें ध्येय आहे. * ह्या घोषणेचा अंतर्भाव पुढें १९१९ च्या कायद्यांच्या प्रास्ताविक विभागांत करण्यांत आला. पण या घोषणेचा किंवा प्रस्तावनेचा अर्थ हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा देण्यांत येणार आहे असा करणेंच शक्य नव्हतें. हिंदुस्थानचें ध्येय जबाबदारीचें स्वराज्य आहे एवढेंच त्यांत म्हटलें होतें. १९१९ च्या कायद्यानें प्रांताभध्यें अल्पांशानें ही जबाबदारी सुरू केली, पण त्या जबाबदारीला काहींच अर्थ नव्हता सायमनकमिशननें हिंदुस्थानच्या राजकीय हक्कांची बरोबर कल्पना येईल असें त्याचें वर्णन केलें होतें. तें कमिशन म्हणतें हिंदुस्थानच्या सिव्हिल व मिलिटरी सरकारवरील देखरेख, मार्गदर्शक व सत्ता ही गव्हर्नर जनरल इन्. कौंसील यांच्या हातीं आहे. त्यानें भारतमंत्र्यांच्या हुकमाला योग्य

*ही घोषणा लॉर्डन कर्झन यांनीं तयार केली होती हें पुष्कळांना ठाऊक नसेल. अर्ल ऑफ रोनाल्डशे यानीं लॉर्ड कर्झन यांचें चरित्र लिहिलें आहे. त्याच्या तिसऱ्या भागांत १६७ पानावर हें गौप्यकथन आहे. मॉंटेग्यू यानीं खालील घोषणा तयार केली होती.

*His Majesty's Government and the Government of India have in view the gradual development of free institutions in India with a view to ultimate self--Government within the Empire.*

मान दिला पाहिजे. घटनात्मक सिद्धांत सांगावयाचा म्हणजे हिंदुस्थान सरकार हें ब्रिटिश सरकारच्या हाताखालचें एक सरकार आहे.* " हिंदुस्थानचा दर्जा हा अशा प्रकारें सायमन कमिशननें ब्रिटिश सरकारच्या एका खात्याइतका क्षुद्र आहे असें म्हटलें आहे व तें खरें आहे. या दर्जात कायदेशीर भाषेनें बोलावयाचें म्हणजे अद्याप फरक पडलेला नाहीं. अर्थात प्रत्यक्ष व्यवहारांत हिंदुस्थानला थोडीफार किंमत आहे. पण वसाहतींच्या जवळजवळ आपण आहों असेंहि म्हणण्याचें धाष्ट्र्य आम्हाला करवत नाहीं. त्यामुळें हिंदुस्थानांत असंतोष नांदत आहे. हा असंतोष १९१९ च्या कायद्यानें व १९३५ च्या कायद्यानें जास्त जास्त भडकत गेला आहे, हें सर्वांना ठाऊकच आहे.

गेल्या महायुद्धांत हिंदुस्थानला जरा खूष करण्याचा प्रयत्न केला गेला. त्या वेळीं साम्राज्य सरकारतर्फें युद्धमंत्र्याचें एक मंडळ निर्माण केलें होतें. या मंडळांत वसाहतींतील मुख्य मंत्र्यांना स्थान असे. १९१७ सालीं या मंडळाची पहिली बैठक झाली. त्या बैठकीला हिंदुस्थानतर्फे कोण मुख्य मंत्रि जाणार! हिंदुस्थानला जबाबदार राज्यच नव्हतें, मग मुख्य मंत्री कोठला असणार! तेव्हां त्या बैठकीला हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. मॉटेग्यू हेच अधिकृत प्रतिनिधी म्हणून गेले.1 त्यांच्या बरोबर ॲसेसर्स म्हणून तीन हिंदी लोक होते. एक बिकानेरचे महाराज, दुसरे सर जेम्स मेस्टन व तिसरे सर एस. पी. सिंह.

त्या वेळीं साम्राज्य युद्धमंत्रिमंडळ व साम्राज्यपरिषद अशा दोन

---

**In constitutional theory therefore the Government of India is a subordinate official Government under His Majestys Government.*

*Statutory commttee report. vol. 1 p. 174-175.*

---

*1British Dominions by A. B.Keith page 5.*

संस्था होत्या. पहिलीचे अध्यक्ष इंग्लंडचे मुख्य प्रधान होते व दुसरीचे वसाहत मंत्री अध्यक्ष होते. हिंदुस्थानचे प्रतिनिधी हे दोन्ही संस्थांत होते. हिंदुस्थानचे प्रतिनिधी हे लोकनियुक्त असावेत, अशी काँग्रेस व इतर पक्षांच्यातर्फे विनंती करण्यांत आली. त्यामुळें दुसऱ्या बैठकीला मि. मॉंटेग्यु यांच्याबरोबर सर सिंह हे हिंदुस्थानचें प्रतिनिधी म्हणून व्हाईसरॉयनीं पाठविले. संस्थानिकांच्या तर्फे पतियाळाचे महाराज गेले होते.*

हें युद्धमंडळ एवढ्याच करतां बोलावले होते कीं, वसाहतींतील सैन्यें पैसा वगैरेंचे ब्रिटिशांना सहाय्य मिळाल्यामुळें त्यांचाहि हात युद्ध धोरण ठरविण्याकरतां असावा. १९१७ सालीं दोस्तांची स्थितिहि भयंकर होऊं लागली होती. त्यामुळें वसाहतींचें सहकार्य त्यांना जास्त जास्त लागू लागले. हिंदुस्थानला बोलावण्यांत दुसरा कोणताच हेतू नव्हता.

हिंदुस्थानला या परिषदेंत व मंत्रिमंडळांत स्थान मिळाल्यामुळें कांहीं कायदेपंडित असें म्हणू लागले कीं, हिंदुस्थानचा समानत्वाचा दर्जा मान्य केला आहे असें समजण्यास हरकत नाहीं. ते म्हणत १९११ सालीं साम्राज्य परिषद भरली असतां तींत हिंदुस्थानला स्थान नव्हतें. पण युद्धाचे वेळीं ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानला जबाबदार स्वराज्य देण्याचें अभिवचन देऊन पूर्वीच्या विषमतेमुळें झालेली त्यांची अनुपस्थिती सुधारून घेतली.

हिंदुस्थानचे प्रतिनिधी फक्त साम्राज्यपरिषद, साम्राज्ययुद्धमंडळ यांतच घेतलें असें नाहीं. तर १९१९ च्या तहपरिषदेंत हिंदुस्थानचे दोन प्रतिनिधी घ्यावेत असें तह परिषदेच्या नियमांत दुसऱ्या कलमांत सांगितले होतें. पॅरिसच्या तहावर ज्यांनीं सह्या केल्या, तेच पुढें राष्ट्रसंघाचे आपोआप सभासद झाले. हिंदुस्थान पॅरिसच्या तहांत होता, तेव्हां तो

*History of the congress page 529.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



राष्ट्रसंघाचाहि सभासद झाला. वसाहतींच्या बरोबरच हिंदुस्थानला या चारहि संस्थामध्यें स्वतंत्र स्थान देण्यांत आल्यामुळें हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा निश्चितपणें देण्याचें कबूल झालें आहे असें मानण्यांत आलें. विशेषतः हिंदुस्थानला राष्ट्रसंघांत जागा देण्यांत आल्यामुळें तर उरलासुरलेला संशयहि नाहींसा झाला.* हिंदुस्थानचें ध्येय वसाहतीचा दर्जा आहे हें वर म्हटल्याप्रमाणें चार गोष्टींनीं सिद्ध झालें. १ साम्राज्ययुद्धमंत्रिमंडळ, २ साम्राज्यपरिषद, ३ तहपरिषद व ४ राष्ट्रसंघ.

पण या चारहि संस्थांत हिंदुस्थान जो घेतला गेला, तो हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा मान्य करावा या बुद्धीनें घेतला गेला नाहीं. त्याचा अर्थ कायदेपंडितांनीं कांहींहि केला असला तरी १९१७ ची घोषणा व १९१९ च्या कायद्यांतील हेतुवाक्य (Preamble) यावरून हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा देण्यांत येणार आहे असें बिलकुल सिद्ध होत नाहीं. मग प्रश्न असा उरतो कीं, या चार संस्थांत हिंदुस्थानांत स्वतंत्र जागा कां दिल्या? साम्राज्यपरिषद व मंत्रिमंडळांत घेण्याचें कारण हिंदुस्तानला असें वाटूं नये कीं, आपले १२ लाख हिंदी शिपाई व अब्जावधी रुपये ब्रिटिश सरकारनें घेतले आणि आपल्याला साध्या चर्चेला सुद्धां बोलावलें नाहीं.

या परिषदेला व मंत्र्यांच्या मंडळाना नुसत्या वादविवाद

---

**Footnotes:**

***_And any doubt which might have existed as to the sense of declaration of 1917, disappeared when India was accorded a place in the league of Nations together with the Dominions–Letters & Esseys bys Keith_**

**_( 12 Feb. 1935 Page 7. )_**

***_By this action it was made clear beyond dispute that India's ultimate goal was that status which has been attained by the Great Dominions._**

**_( ibid. Page 124. )_**

सभेपेक्षां अधिक महत्त्व नव्हतें. हिंदुस्थानचा प्रश्न सोडून ह्या पण वसाहतीना तरी तेथें कांहीं मान होता असें मानण्याचें कारण नाहीं. तह परिषदेंत हिंदुस्थानला घेतला याचें कारण एकतर ब्रिटिशांना आपल्या बाजूचे हक्काचे दोन प्रतिनिधी ( शिवाय वसाहतींचे १० ) मिळावे आणि दुसरे तुर्कस्थानच्यामुळें हिंदी मुसलमान बिथरतील ही वाटणारी भीति दूर व्हावी. तुर्कस्थाननें द्रोह केला हें ब्रिटिश म्हणत होते; पण हिंदी मुसलमान धर्मवेडे असल्यामुळें ते या द्रोहाकडे लक्ष देणार नाहींत आणि तुर्कांवर कमीअधिक अटी लादल्या तर ते खवळतील म्हणून तहपरिषदेंत हिंदुस्थान आला.*

राष्ट्रसंघांतहि हिंदुस्थान जो घेतला गेला तो ब्रिटिशांचीं मतें वाढावीं म्हणून. शिवाय जे तहपरिषदेंत होते, तेच राष्ट्रसंघाचे सभासद मानले गेल्यामुळें हिंदुस्थानला त्यांत जागा मिळाली. तेव्हां नुसत्या सभासद होण्यावरून आपला समानतेचा दर्जा मान्य केला गेला ही वाटणारी समज बरोबर नव्हती. १९२९ सालीं व्हाईसरॉयनीं हिंदुस्थानचा दर्जा मान्य केला, त्याला १९२०–२१ ची असहकारितेची चळवळ त्यानंतरची ७।८ वर्षांची जागृती आणि सायमनकमिशन नेमण्यांत झालेली चूक कारणीभूत झाली.

हिंदुस्थानच्या समानत्वाच्या दर्जाचे तेव्हांपासून आतांपर्यंत कसकसे धिंडवडे निघाले हें आपण पाहूं. हिंदुस्थान हा काळ्या लोकांचा देश आहे हें कबूल करण्यांत आम्हाला कमीपणा वाटत नाहीं. पण हाच काळेपणा आमच्या प्रगतीच्या आड येतो कीं काय अशी शंका येते. बाकी आयर्लंड-सारख्या गोऱ्या लोकांना ब्रिटिशानीं काय मोठें चांगल्या रीतीनें वागविलें म्हणून आम्हाला आमच्या रंगाबद्दल वैषम्य वाटावे ? आज जो इतर वसाहतींचा प्रश्न समाधानकारकरीतीनें सुटल्या सारखा वाटतो, त्याला कारण तेथील मूळ रहिवाशी अज्ञानांत आहेत हेंच होय. आफ्रिकेंतील निग्रो लोक जागे झाले म्हणजे जनरल हर्टझॉग व स्मट्स यांची काय अवस्था

* *The Governments of the British Empire by Keith.* ( *Page* 55. )

होईल ती दिसेलच. पण हिंदुस्थानला समानतेचा दर्जा दिला असें म्हणणारांनीं आमच्या लोकांना आफ्रिकेंत कसें वागतात हें विसरतां कामा नये. हिंदी लोकांना आफ्रिका प्रथमच आजिबात बंद केली असती तरचा प्रश्न वेगळा होता. पण ज्या हिंदी लोकांनीं रक्ताचें पाणी करून जंगलांचें रम्य उद्यान केलें, पिढ्यान्‌पिढ्या तेथें काढल्या त्यांना साध्या माणुसकीनेंहि वागविलें जात नाहीं. हाच समानतेचा अर्थ आहे काय हें आपण साम्राज्यसरकारला विचारलें पाहिजे. १९१७ व १९१८ सालीं साम्राज्यपरिषदेंत आमच्या नव्या दर्जानंतर हा प्रश्न निघाला. तेथें असें ठरलें कीं, साम्राज्यांतील प्रजाजनांना चैन, व्यापार, शिक्षण याकरतां आफ्रिकेंत राहण्यासवरण्यास बंदी नसावी; पण कायम वास्तव्य किंवा हंगामी मोलमजुरीला परवानगी देऊं नये. हिंदुस्थाननेंहि इतर वसाहतींना हाच नियम लावावयाचा होता. हिंदुस्थानांत या नियंत्रणामुळें असंतोष माजला. किनियामध्यें युरोपिअन वस्तींत हिंदी लोकांना येऊंहि देत नसत. तेथें हिंदी लोकांना मताचाहि अधिकार नसे. १९२१ च्या परिषदेंत ना. श्रीनिवासशास्त्री यांनीं हा प्रश्न काढला. त्या वेळीं तेथें ठराव झाला कीं, परदेशांतील रहिवाशांना आपल्या देशांत यावयास वाटेल तितकीं बंधनें घालावी; पण हिंदुस्थान हा आतां समदर्जाचा झाल्यामुळें जे हिंदी लोक वसाहतींत कायमचे रहिवाशी झाले असतील त्यांना कमी लेखूं नये. हा ठराव आपल्याला अमान्य आहे असें आफ्रिकेनें सांगितलें. त्याचें कारण वर्णद्वेष नसून आर्थिक आहे असें स्मट्स म्हणाले. * ऑस्ट्रेलिया, कानडा, कोलंबिया वगैरे ठिकाणीं हिंदी लोकांना मताचे अधिकार नव्हते; पण तेथें ना. शास्त्र्यांनीं जाऊन व सरकारचीं मनें वळवून कांहीं भागांत मताधिकार मिळवून दिले. आफ्रि-

*He (General Smuts) insisted that disabilities were imposed on Indians not on racial but on economic grounds and he held no hope of any political or other concessions to Indians in the union — Govts. of the British Empre by Keith* **Page 205.**

केंत तर बदल होणें अशक्यच झालें. आफ्रिकेंत हिंदी लोकांना समानतेचा दर्जा नाहीं, एवढेंच नव्हे तर कांहीं भागांत त्यांना पाऊलहि टाकूं देत नाहींत. ऑरेंज फ्री स्टेटमध्यें ही स्थिति आहे आणि नाताळमध्यें म्युनिसिपालिटीचे मतदानाहि काढून घेतलें आहे. सर तेजबहादूर सप्रूंनीं युनियनच्या या वृत्तीचा निषेध केला व आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें हा प्रश्न नेण्याची धमकी दिली. पण हिंदुस्थानच्या त्या धमकीला कोण विचारतो? हिंदी लोकांना अजूनपर्यंत आफ्रिकेंत अपमानानें वागवतात आणि आम्ही त्यांचें कांहीं करूं शकत नाहीं व ब्रिटिश सरकारहि करूं शकत नाहीं. कारण वसाहती स्वतंत्र आहेत, त्या वाटेल ते कायदे करू शकतात व आम्ही साम्राज्यांत रहाणार नाहीं असा धाकहि घालतात. तेव्हां आमच्या समानतेचा असा हा खेदजनक इतिहास आहे.

राष्ट्रसंघानें आपल्या सभासदांमध्यें जर एखाद्या प्रश्नासंबंधीं भांडण झालें तर त्याचा निकाल कायम स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय कोर्टांत करून घ्यावा असें म्हटलें. १९२९ सालीं त्याचे नियमहि प्रसिद्ध झाले, पण या आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें ब्रिटिश साम्राज्यांतील भांडणें जावयाचीं नाहींत. कारण या साम्राज्यांतील घटक ( वसाहती ) ' हे जरी व्यक्तिशः संपूर्ण अर्थानें आंतरराष्ट्रीय असले तरी ते एकाच राजाला बद्ध झालेले आहेत. ' या घटकांत हिंदुस्थानचा समावेश केला आहे. हिंदुस्थानच्या लोकांना आपल्या वसाहतींत येण्याला बंदी करणें किंवा त्यांना वाटेल तसें वागविणें यावर आंतरराष्ट्रीय कोर्टाचा अभिप्राय नको, एवढ्याकरतां वसाहतींनीं हिंदुस्थानला आपल्यांत घेतलें व आमचीं भांडणें आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें जाऊं नयेत असें म्हटलें.* आपल्या घरांत आणून एखाद्याला

---

* *The term ( Commonwealth ) of course includes India, and one of the reasons for the exclusion of the disputes referred to is the objection of the Dominions to have their issues of the migration and treatment of resident Indians submitted to International Court.*

*--British Dominions by Keith Page 416.*

कोंडून ठेवावा त्यापैकीं हा प्रकार आहे. हिंदुस्थानला समान दर्जा त्यांत आहे पण त्याचें तोंड बंद करण्याकरतां आहे. इतर वसाहती हिंदुस्थानकडे कोणत्या दृष्टीनें पहातात, हें यावरून कळून येतें.

मर्चंट शिपिंगचा प्रश्न निघाला असतां हिंदुस्थानचा प्रतिनिधी त्या उपसमितींत घ्यावा असें ठरलें. या समितीचे जे ठराव झाले त्याची अंमलबजावणी करण्याचें काम इतर वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानवर न सोपवितां हिंदुस्थान व ब्रिटिश सरकारवर सोपविलें. हिंदुस्थान सरकार हें बेजबाबदार सरकार असल्यामुळें त्याच्याबद्दल आम्हाला जिव्हाळा नाहीं. पण ब्रिटिश सरकार त्याच्या जोडीला कशाला? त्याचा उद्देश एवढाच होता कीं, आमच्या दृष्टीनें बेजबाबदार असणाऱ्या या दोन सरकारनीं हिंदुस्थानचा निकाल लावावा.* हिंदुस्थानचा दर्जा वसाहतींच्यासारखाच आहे, असें याच कलमांत सांगण्यांत आले आहे. तेव्हां याहि बाबतींत ही समता चांगलीच दिसून येते.

पण या प्रकारचीं उदाहरणें दाखवून शेवटीं काय सिद्ध होणार? हिंदुस्थानला वसाहतींच्या तोडीचा दर्जा नाहीं हेंच ना? तें जर स्वयंसिद्धच आहे. तेव्हां अशी उदाहरणें देण्यांत तरी अर्थ काय? पण कांहीं लोक असे आहेत कीं, ते म्हणतात या उदाहरणावरून हिंदुस्थानला वसाहतींचा दर्जा पूर्णपणें मिळाला आहे, असें जरी सिद्ध होत नसलें तरी तो तात्त्विक दृष्ट्या मिळाला आहे हें शाबीद होतें. लॉर्ड आर्यावन, सर सॅम्युएल होअर वगैरे तोच अर्थ लावतात. पण हा अर्थ १९२९ नंतरचा आहे. तोंपर्यंत हिंदुस्थानचें नांव पुढें करून जगाला फसविण्याचाच प्रयत्न ब्रिटिशांनीं केला.

१९३५ चा कायदा पार्लमेंटांत चर्चेकरतां आला तेव्हां त्यावर बराच

*'*Applying the principles.........should be considered by His Majesty's Government in the United Kingdom and the Government of India—124 Clause, Repor t the M. S. Committee,*

वादविवाद झाला आणि वसाहतीच्या दर्जावर बराच प्रकाश पडला. १९३५ सालपूर्वी सहा वर्षें म्हणजे १९२९ सालीं व्हाईसरॉयनीं घोषणा केली, त्यावेळीं ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा द्यावयाचा ठरविलें होतें. त्याला कारण '१९१९ च्या कायद्याचा नैसर्गिक शेवट वसाहतीच्या स्वराज्यांत होणें' असें नाहीं. त्याला अनेक कारणें झालीं. ॲसेंब्लींत गेलेल्या काँग्रेस पक्षानें हिंदुस्थानला स्वराज्य द्यावें असे ठराव पास केले; मुडीमन कमिटीच्या बहुमतानें झालेल्या शिफारसी फेटाळल्या; पं. मोतीलाल नेहरूनीं वसाहतीचें स्वराज्य ताबडतोब द्यावें ही आणलेली उपसूचना ७२ विरुद्ध ४५ मतांनीं पास केली* असेंब्लींत सरकारचा पराभव होत होता तसें बाहेरही वातावरण भडकत चाललें होतें. म.गांधींनीं खादीप्रचाराकरतां दौरा काढून हिंदुस्थानांत विलक्षण जागृती केली होती. सायमन कमिशनवरील बहिष्कारामुळेंहि देश खडबडून जागा झाला होता. काँग्रेसमध्यें संपूर्ण स्वराज्याचे ठराव येत होते आणि जे म. गांधी स्वराज्याचा अर्थ सोईप्रमाणें साम्राज्यांत किंवा साम्राज्याबाहेर म्हणत होते, ते व्हाइसरॉयबरोबर तडजोड न झाल्यास आपण संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा पुकारण्याच्या बाजूचे होऊं असे म्हणाले. दहशतवादी चळवळीहि जोरावल्या होत्या. या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन एकीकडे कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली आणि दुसरीकडे लॉर्ड आयर्विन यांनीं वसाहतीच्या स्वराज्याच्या ध्येयाकडे अंगुलीनिर्देश केला; पण काँग्रेसची घोषणा म्हणजे जशी स्वातंत्र्यसंस्थापना नव्हती, त्याप्रमाणें व्हाइसरॉयचें दिग्दर्शन म्हणजे वसाहतीच्या स्वराज्याची प्राप्ती नव्हती. कारण व्हाइसरॉयसाहेब म्हणाले एखाद्या प्रवाशाला तुला अमुक गांवी जावयाचें आहे, हें

*टीप—१९१९ च्या कायद्यांतील घोषणा अर्थ वसाहतीचें स्वराज्य आहे अशा समजुतीनें पंडितजींनीं हा ठराव आणला पण त्याला सर माल्कम हेली यांनीं असें उत्तर दिलें कीं, वसाहतीच्या स्वराज्याच्या व १९१९ च्या कायद्यांतील घोषणेचा कांहींच संबंध नाहीं. जबाबदारीचें स्वराज्य म्हणजे वसाहतीचें स्वराज्य नव्हे, असा हेली यांचा अभिप्राय !

सांगणें म्हणजे तुझा प्रवास संपला आहे असें सांगणें नव्हे.* गांधींना ही भूमिका मान्य नव्हती. कारण ते म्हणाले ' प्रत्येक दशलक्षाधीश दरिद्री बनून ७ पैसे रोज मिळवीपर्यंत हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य मिळालें नाहीं, तरी व्हाइसरॉयना चालेल; याकरतां आपण देशाला योग्य मार्ग दाखवूं. '

लॉर्ड आयर्विनसाहेबांनीं हिंदी प्रवाशाला तुझें तिकीट कोठलें आहे, हे सांगण्याचा मोठेपणा केला, याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानूं नयेत कां ? कारण काळाच्याबरोबर युद्ध करून आणि ब्रिटिश साम्राज्याची शक्ती एकवटून प्रवासाला निघालेल्या या हिंदी माणसाला त्यांनीं एखाद्या बोगद्यामध्येंच अडकावून टाकले असतें तर आपण काय करूं शकलों असतो ? तेव्हां आम्हाला, न वाचतां येणाऱ्या हिंदी लोकांना कोठलें तिकीट काढून दिलें आहे, हें सांगण्याचें मनोधैर्य त्यांनीं दाखविलें, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. आजहि लॉर्ड लिनलिथगोप्रभृती तिकिट इन्स्पेक्टरांनीं पुनः आमचें तिकिट पाहून आम्हाला बजावलें आहे कीं, तुमचा प्रवास, तुमची दिल्ली, फार दूर आहे;उगीच गडबड करूं नका. याबद्दल आपण त्यांचे ऋणी असावयास नको काय ?

१९१७ सालापासून १९३९ सालापर्यंत ब्रिटिश सरकार कसकसें घसरत गेलें हें पहाणें गंमतीचें आहे. १९१७ सालची घोषणा किंवा १९१९ च्या कायद्यांतील हेतुवाक्य आणि व्हाईसरॉयची १९२९ ची घोषणा याचा वास्तविक कायद्याच्या अर्थानें कांहीं संबंध नाहीं. क्रमशः हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य देणें, याचा अभिप्रेत अर्थ जर वसाहतीचें स्वराज्य असा होता, तर तो नमूद करावयाला ब्रिटिश सरकार दहा वर्षें का भ्यालें? ॲसेंब्लींत इतके वेळां चर्चा केली गेली, कॉंग्रेसनें ठराव केले, एवढेच नव्हे

---

******No sensible traveller would feel that a clear defination of his destination was the same thing as the compe- tion of his journey but an assurance of direction—*

*History of the Congress. Page 618.*

तर सायमनकमिशनकडे कामगिरी सोपविली, त्यावेळीं वसाहतीच्या स्वराज्याचा दुरूनसुद्धां उच्चार ब्रिटिश सरकारनें केला नाहीं.सायमन कमिशनला सांगितलें कीं जबाबदारीच्या स्वराज्याचें तत्त्व ( स्वराज्य नव्हे ) हिंदुस्थानांत कितपत वाढवितां येईल अगर असणारें जबाबदारीचें स्वराज्य कितपत नियंत्रित करतां येईल, याचा अहवाल सादर करण्याकरतां तुमची नेमणूक आम्ही करीत आहों. त्या वेळीं वसाहतीच्या स्वराज्याकडे प्रगती कितपत करतां येईल, याचा अहवाल सादर करण्या करतां तुमची नेमणुक करीत आहों हें कां सांगितलें नाहीं ? त्याचें कारण एकच आहे. वसाहतींचें स्वराज्य हिंदुस्थानला अंतीं द्यावें, अशीं १९२९ सालपर्यंत त्यांना इच्छा नव्हती. कांहीं साम्राज्यवादी कायदे पंडीत अशी फसवणूक करतील कीं, जबाबदारीचें स्वराज्य म्हणजेच वसाहतीचें स्वराज्य असल्यामुळें तो उल्लेख करणें जरूर नव्हतें. पण जबाबदारीचें स्वराज्य म्हणजे समानतेचें स्वराज्य नव्हे, हे हि तितकेंच खरें आहे. पण कांहीं शब्दांच्या उल्लेखानें मानसिक समाधान होतें, तसा मानसिक संतापहि होतो.हिंदुस्थानला वसाहतींचें स्वराज्य दिल्यानें इंग्लंडमधील बायकामुलें आणि सनातनी वृद्ध व पेन्शनर घाबरले असते. पण त्या बरोबरच हिंदुस्थानांतील बऱ्याच लोकांचें व कांहीं पक्षांचें समाधान झालें असतें. ब्रिटिश सरकारला दुहेरी डाव खेळावयाचा होता,म्हणून त्यांनीं तो शब्द टाळला.१९२९ सालींच त्यांनीं ती घोषणा करावयाला हिंदी चळवळ हें जसें एक कारण आहे, तसें ब्रिटिश पार्लमेंटच्या दृष्टीनेंहि कारण आहे. सायमनकमिशनची नेमणूक केली ती कॉंझर्वेटिव्ह पक्षाच्या सरकारनें. त्यांत बदल करावा हें सांगण्याकरतां रॅम्से मॅकडोनल्ड, लॅन्सबरी व स्नोडन हे तिघे मजूर पुढारी बर्कनेहेडसाहेबाकडे गेले. ज्या मजूरपक्षाला हें कमिशन मान्य नव्हतें तेंच पुढें अधिकारावर आले. त्या वेळीं हिंदुस्थानांत चळवळीचा डोंब विलक्षण पेटला होता. सायमन कमिशनची हिंदुस्थानांत झालेली शोभा आणि त्या निमित्तानें झालेले अत्याचार मजूर मंत्रिमंडळ कसें विसरणार ? तेव्हां त्यांनीं आपल्या अम-

दानींत व्हाइसरॉयकडून डोमिनिअन स्टेटस हें हिंदुस्थानचें ध्येय असल्याची घोषणा करवली. ही घोषणा करवितांना आपण कांहीं नवें सांगतो असें नाहीं; १९१७ च्या घोषणेंतच हा अर्थ अभिप्रेत आहे;* हेंहि त्यानीं सांगितलें. तें कोणाकरतां ? ब्रिटिश लोकाकरतां. हिंदी लोकांना त्यांनीं सांगितलें कीं, तुम्ही १९१७ च्या घोषणेबद्दल निष्कारण गैरसमज करून घेतां. अशा प्रकारें मजूर मंत्रिमंडळानें दोघांनाहि चकविलें म्हणा किंवा दोघांनाहि खूष करण्याची यातायात केली म्हणा.

पण यावर चर्चिल साहबांनीं जो आक्षेप घेतला तो योग्य आहे असें कबूल करणें भाग आहे. चर्चिलसाहेब हे हिंदुस्थानच्या स्वराज्याचे कट्टे वैरी आहेत हें आपण जाणतोंच. पण इतकें असूनहि त्यानीं या घिसाडघाईच्या घोषणेचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध केला. त्यांचेआमचें विळ्याभोपळ्याएवढें सूत असतांनाहि त्यांनीं मजूर मंत्रिमंडळाबद्दल आणि त्यानंतर आलेल्या कॉन्झर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळाबद्दल केलेला हा निषेध यथार्थ आहे.

१९३५ सालीं हिंदुस्थानच्या कायद्याबद्दल पार्लमेंटांत चर्चा चालली होती. त्यावेळीं चर्चील साहेब घोषणेवर बोलत होते. ते म्हणाले १९२९ च्या घोषणेला ब्रिटिश सरकारनीं व भारतमंत्र्यानें मान्यता दिली. पण तुम्ही ही घोषणा करतांना सायमनकमिशन रिपोर्ट लिहिण्यांत गुंतलें होतें याचाहि विचार केला नाहींत. सभ्यपणा व शिष्टपणाला अनुसरून हा रिपोर्ट बाहेर येईपर्यंत तुम्ही थांबावयाला पाहिजे होते. त्या रिपोर्टाला विसंगत होण्याचा संभव असणारी किंवा विरोधी होणारी घोषणा व्हाईसरॉयनीं करावयास नको होती. चर्चील साहेबांचें म्हणणें

---

**I am authorised on behalf of His Majesty's Government to state clearly that in their judgment.it is implicit in the declaration of 1917, that the natural issue of India's Constitutional Progress as there Contemplated is the attainment of Dominion Status.*

*Lord Irwin.*

यांत काय चूक होतें ? ही घाई करण्यांत मजूर मंत्रिमंडळाचा उद्देश हिंदुस्थानच्या असंतोषाचें तारूं भडकूं देऊं नये हा होता यांत वाद नाहीं. पण त्याबरोबरच आपल्या सहकाऱ्यांना आपण अन्याय करतो हा विचार त्यांनीं करावयास नको होता काय ?

सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, सायमन रिपोर्टाला अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरतां ही घोषणा आम्ही केली. पण त्या घोषणेनें सायमन रिपोर्ट ठार मारला गेला, हें चर्चील साहेबांचें म्हणणें बरोबर आहे. या घोषणेला सायमन कमिशननें विरोध केला. लॉर्ड रिडींग, लॉईड जॉर्ज, सर ऑस्टीन चेंबरलेन, लॉर्ड बर्कनहेड वगैरे कॉंझर्वेटिव्ह पक्षीय सभासदांनीं या घोषणेबद्दल नापसंती व्यक्त केली. बाल्डविन म्हणाले ही घोषणा जर सायमन रिपोर्टांत अंतर्भूत होत असेल, तर माझी त्या घोषणेला हरकत नाहीं. पण तसें घडलें नाहीं. ह्या घोषणेचा अंतर्भाव रिपोर्टांत झाला नाहीं.

त्यानंतर मजूर पक्ष अधिकारांतून गेला आणि ज्या कॉंझर्वेटिव्ह पक्षानें या घोषणेचा इतका तिरस्कार केला त्याच पक्षाला या घोषणेचें बारसें करावें लागलें. या घोषणेच्या समर्थनपर अशीं भाषणें तेव्हांहि झालीं आणि अजूनपर्यंतहि होत आहेत.

आपण ही घोषणा करावयास लावणाऱ्या कॉंग्रेसला विशेषतः म. गांधींना त्याबद्दलचें श्रेय दिलें पाहिजे. १९२९ च्या लाहोर कॉंग्रेसला जाण्यापूर्वीं गांधीप्रभृतींनीं व्हाइसरॉयची भेट घेतली व त्याच भेटींतून या घोषणेचा जन्म झाला, ही गोष्ट आपण तर्कानें जाणूं शकतो. तेव्हां १९२९ सालीं व्हाईसरॉय वसाहत स्वराज्य बोलण्यापर्यंत आले, ते हिंदी लोकांच्या चळवळीमुळें आले यांत वाद नाहीं. तें स्वराज्य आपल्याला मान्य असो किंवा नसो; पण बोलण्याच्या बाबतींत तरी निश्चितपणा आला व त्याला कॉंग्रेस कारण झाली.

यानंतर सायमनरिपोर्ट प्रसिद्ध झाला व लगेच मरणहि पावला; पुढें राउंडटेबल परिषदा वगैरे अनेक भानगडी होऊन १९३५ चें बिल पास.

मेंटपुढें आलें. त्या पार्लमेंटच्या बैठकींत निरनिराळ्या सभासदांनीं डोमिनिअन स्टेटसला कसकसें वागविलें हें पहाण्यासारखें आहे. व्हाइसरॉयनीं घोषणा केली, तेव्हां १९२६ ची साम्राज्यपरिषद झालीच होती. या परिषदेनेंच वसाहती व युनायटेड किंगडम यांच्यांत समानता असल्याचें पुकारले होतें. १९३१ चा वेस्ट मिन्स्टरचा कायदा हा १९२६ च्या चर्चेवरच उभारला असल्यामुळें व्हाईसरॉयची घोषणा होतांना त्यांना डोमिनिअन स्टेटसची मजल कुठपर्यंत जाणार हें ठाऊक नव्हते असें नाहीं. चर्चिल प्रभृति सभासद कासाविसच झाले होते व हिंदुस्थानला वेस्ट मिन्स्टरच्या कायद्याचें वसाहत स्वराज्य देणार काय, असें विचारू लागले. होते आम्हीं जें वसाहत स्वराज्य देण्याचें अंतिम ध्येय पुढें ठेवलें आहे ते १९१९ च्या कायद्याच्या आधारावर ठेवलें आहे व त्यांत 'साम्राज्याचा एक भाग' असें शब्द आहेत.हें पार्लमेंटांत पण बजबजावून सांगितलें जात होतें. याचा अर्थ वेस्टमिन्स्टरचा कायदा आम्हाला लागू करावयाचा नाहीं असा होतो. पण त्यासंबंधीं आपण पुढें पाहूं.

हिंदुस्थानला 'वसाहतीचें स्वराज्य' हें ध्येय म्हणूनहि सांगूं नये असें म्हणावयास आर्च बिशप ऑफ कँटरबरी पुढें आले.ते म्हणाले वसाहतींच्या स्वराज्यासारखा चुकीचा मार्ग दाखविणारा शब्दप्रयोग टाकून देण्याची वेळ आली आहे. या देशांत व हिंदुस्थानांत या शब्दाचा अत्यंत गैरसमज होणारा आहे हें सिद्ध झालें आहे. वसाहतीचें स्वराज्य म्हणजे घटना आहे कां दर्जा आहे, हेंहि कोणाला ठाऊक नाहीं. याचा अर्थ घटना असेल तर हिंदुस्थानच्या परिस्थितीचा विचार करतां व त्यांच्या साम्राज्यपार्लमेंटशीं आवश्यक संबंधाचा विचार करतां, तुम्ही आम्ही कल्पना करू शकूं अशा एखाद्या काळांत, हिंदुस्थानला दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया किंवा कानडासारख्या अगदीं भिन्न देशांनीं जी घटना प्राप्त करून घेतली आहे, तशी घटना मिळेल असें तुमच्या विचारांत तरी कसें येते ? म्हणून हिंदुस्थानला वसाहतीसारखी घटना मिळेल हा विचार करण्याचेंहि कारण नाहीं.

सर सॅम्युएल होअर हें या बिलाचें जनक. त्यानीं आपल्या भाषणांत वसाहतीच्या स्वराज्यावर जोर दिला नाहीं. हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य द्यावें असें त्यांचें म्हणणें. ' हिंदुस्थानला जर खरें संकट कोणतें असलें तर तें कॉंग्रेसचें नाहीं, किंवा कम्युनिझमचें नाहीं किंवा बेबंदशाहीचें नाहीं, तें बेजबाबदार राज्यपद्धतीचें आहे. ' याच बेजबाबदार राज्यपद्धतीमुळें आपल्या ताब्यांतील देश गेले असें होअर म्हणाले. 'जन्मानें ब्रिटिश असणाऱ्या स्त्रीपुरुषांना बेजबाबदार पद्धत वाईट असते आणि एशिआटिक स्त्रीपुरुषांना ती चांगली असतें असें मी समजत नाहीं.' * पण ही बेजबाबदारी संपूर्ण नाहींशी करावयाची असेल, तर हिंदुस्थानला समानतेचा दर्जा दिला पाहिजे, ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. अशा दर्जा-ऐवजीं त्यांच्या पदरांत राजकीय सुधारणांचें माप टाका असें ते म्हणाले. ' तें त्यांच्या दर्जाचें बाह्य लक्षण आहे. आमचें धोरणच असें आहे कीं, सहानुभूतिपूर्ण मदतीनें व सहकार्यानें हिंदुस्थानला त्यांच्या मार्गांतील अडचण दूर करण्याकरतां शिकस्तीची मदत करावयाची आणि शेवटीं

---

**The real danger in India is not Congress, or Communism or misgovernment; it is irresponsibility. As long as Indian Assemblies have no responsibility to govern so we must expect negative criticism and even mischievous obstruction. Has it not been the history of the British Empire that irresponsibility is the real danger to good relations between the mother country & its overseas ... dependancies? It almost lost us the Dominion of Canada.*

*I do not take the view that while irresponsibility is bad for men & women of British Stock, it is good for men or women of Asiatic Stock.*

*(S.Hoare, Parliamentary debates Pages 462-463 Vol. 231)*

ब्रिटिश कॉमन वेल्थमधील स्वयंशासीत सभासदांत तिला जागा मिळवून देण्यास समर्थ करावयाचें ! *

पार्लमेंटमध्यें झालेल्या सर्व भाषणांत अॅटर्नी जनरल [ टॉमस इन्स्कीप ] यांचें भाषण महत्वाचें आहे. कारण तें कायद्याच्या आधारानें विषय प्रतिपादन करीत होते. ' हिंदुस्थानला १९३१ च्या वेस्टमिन्स्टर कायद्याप्रमाणें तुम्ही वसाहतींचें स्वराज्य देणार कां ? असा यापुढील प्रश्न आहे. वेस्टमिन्स्टर कायद्यानें वसाहतीच्या स्वराज्याचा उल्लेखहि केला नाहीं; मग त्यांत त्याची व्याख्या कोठून असणार ? त्याची व्याख्या करणें फार कठीण आहे. त्याचें कारण असें आहे कीं, वसाहतींचें स्वराज्य ही एका जीवनाची एका चैतन्याची वाच आहे. ती वाढत आहे आणि कायद्याच्या स्वरूपाप्रमाणें ती मृतवस्तु नाहीं.

' या कायद्यानें ग्रेट ब्रिटन व वसाहती यांच्यात पूर्ण समानता व दर्जा आणला पण हें सर्व ब्रिटिश साम्राज्याच्या आंत.

' यानंतर एकच प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें राहिलें. साम्राज्यांतून फुटून जाण्याच्या हक्काबद्दल. आम्ही आतांपर्यंत जीं हिंदुस्थानला वचनें दिलीं आहेत, तीं हिंदुस्थानची वाढ साम्राज्यांत राहून होणार या अशा अर्थाचीं आहेत. १९१९ च्या प्रिअँबल-हेतुवाक्य-मध्यें तस स्पष्ट उल्लेख आहे आर्यर्विनच्या घोषणेंत तेंच सांगितलें आहे. डोमिनियन स्टेटस हे शब्द साम्राज्याला सोडून अर्थशून्य आहेत. १९२६ च्या घोषणेंतहि डोमिनिअन्स याचा अर्थ ' ब्रिटिश साम्राज्यांतील स्वयंशासीत वसाहती ' असाच आहेत

---

**Our policy is to do all that we can by sympathetic help and cooperation to enable India to overcome these difficulties and ultimately to take her place among the fully self governing members of the British Commonwealth.*

*( Col. 1165—66 Vol. 297 )*

आमचा असा विश्वास आहे कीं, पुढें जी सर्व आवश्यक जुळवाजुळव करावयाची ती मागच्याप्रमाणें करतां येईल.*' यावरून ब्रिटिश सरकारला हिंदुस्थान हातचा सोडावयाचा नाहीं असें सिद्ध होतें. पण ॲटर्नी जनरलचें हें म्हणणें चूक ठरणार आहे.

वसाहतीच्या स्वराज्यावर भाषण करतांना बोनर लॉ पूर्वीं म्हणाले होते 'उद्यां स्वयंशासीत ऑस्ट्रेलिया किंवा कानडानें असें म्हटलें कीं, "आम्हाला

---

**The next question & that is the most important question that has been put to me is this.Do the Govt. intend that Dominion Status shall be given to India of the naure of Dominian Status after the statute of west minser? I am sure that those who have asked the question appreciate the fact that the* **Statute of west minster** *did not mention still less define Dominion Status....*

*There is good deal of difficulty in defining it. It lies in the fact that Dominion Status is a thing of life,of Spirit and growing and not a dead thing of legal form...*

*It established full equality and status of great Britain and the Dominions,each of whom has its own point of view and its own position but let me add within the British Empire. ( ibid 810 )*

*It only remains for me to reply to the question raised by some of my Hon.& right Hon. friends as to the so called right to secede.........All our pledges to India are pledges relating to the future development of India* **Within the Empire** *& the preamble itself says " As an Integral part of the Empire."It was so stated in the Irwin declaration.Obviously none of these pledges included a promise of status outside the British Empire*

[ पुढें पहा ]

ब्रिटिश साम्राज्याचा भाग व्हावयाचें नाहीं ' तर आम्ही त्यांच्यावर सक्ती करणार नाहीं. डोमिनिअन होमरूल याचा अर्थ स्वतःच निर्णय देण्याचा हक्क. '*

यावरून अॅटर्नी जनरल यांचें म्हणणें कसें असमर्थनीय आहे हें दृष्टोत्पत्तीस येतें. पण वसाहतींच्या बाबतींत जो न्याय लावावयाचा तो हिंदुस्थानच्या बाबतींत लावला नाहीं तर त्यांचें कोण काय करणार? वसाहतींचें स्वराज्य हें मृत नाहीं, सजीव चैतन्य युक्त वाढती वस्तू आहे असें म्हणणाऱ्या अॅटर्नी जनरलनें हिंदुस्थानला विचित्र प्रकारची घटना देणें असंभवनीय नाहीं.

ते म्हणतात ' राजेसाहेबांच्या वसाहतींत हिंदुस्थानची योग्य जागा, त्या देशाच्या परिस्थितीप्रमाणें, न्यूझीलंड, किंवा दक्षिण आफ्रिका किंवा दुसऱ्या वसाहती प्रमाणेंच असणार नाहीं. हिंदुस्थानचा प्रश्न हा अगदीं निराळा आहे. '*

---

*or of a constitution intended to be used to take India outside the Empire. The words D. S. are meaningless apart from the Empire & indeed the words in the 1926 declaration, of which I have reminded the house described the D. S. as autonomous Communities within the British Empire. we believe all necessary adjustments can be made in the future as they have been made in the past.*

( *Attorney General 811 & 812* )

**If the self governing Dominion of Australia or Canada chooses tomorrow to say ' We will no longer make a part of the British Empire' we would not try to force them. Dominion Home Rule means the right to decide for themselvs.* **Bonar Law** ( *Parl. Debates Page 408* )
*The due place of India among His Majesty's Dominions must be, in the very nature of the Country, something*

[ पुढें पहा ]

हिंदुस्थानच्या रक्षणाबद्दल किंवा परराष्ट्रीय राजकारणाबद्दल कांहीं तरी निराळी व्यवस्था करून हिंदुस्थानला वसाहतींचें स्वराज्य दिलें असें दाखवावें हा त्यांचा बेत आहे.

बोलतांना मात्र ते आम्हाला वसाहतीचा दर्जा आहे, असें बोलणार आणि घटना देतांना अशी कांहीं विचित्र घटना देणार कीं, त्यांत स्वराज्य असणार नाहीं. पण त्यांचा तो प्रयत्न यशस्वी होऊ देणें न देणें त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील.

बॉल्डवीन हे आपल्या भाषणांत म्हणतात 'स्वयंशासित हिंदुस्थानला कमी प्रतीचा दर्जा असेल असें कोणाच्या स्वप्नांतहि नाहीं. कोणताहि हिंदी माणूस हिंदुस्थानचा कमी प्रतीचा दर्जा स्वप्नांतहि आणणार नाहीं; आम्हीहि हिंदुस्थाननें हीन दर्जावर संतुष्ट रहावें असें म्हणणार नाहीं; कारण त्यामुळें आम्ही आमच्या कार्यांत अयशस्वी झालों असें ठरणार आहे.'*

---

*not quite the same as the place, shall I say, of New Zealand or South Africa or of other Dominions. India is a far different proposition altogether. India will attain her due place amongst His Majesty's Domions but that is not to say that the problems with which she will have to deal, in the nature of external affairs or problems of defence, will be problems that will be settled in precisely the same way as those......are settled in connection with His Maiesty's other Dominions.*

**Attorny General**

*( Parl. debates. 4922 )*

**Surely no one dreams of a self Governing India with an inferior status. No Indian would dream of an India with an inferior status, nor can we wish that India should be content with an inferior status, because that would mean that we have failed in our work in India.*

*( official Report Col. 1112 Vol. 231 )*

बाल्डविनच्या या वाक्याची ॲटर्नी जनरलच्या वाक्याशीं कशी सांगड घालावी, हें तेच शेवटीं ठरविणार आहेत.

अशा प्रकारें निरनिराळे अधिकारी कसें बोलत आले आहेत तें लक्षांत येतें. बोनर लॉ म्हणतात, समानतेचा दर्जा म्हणजे साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क. होअरसाहेब जबाबदारीच्या स्वराज्यावर भर देतात. ॲटर्नी जनरल हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा दिला पाहिजे पण संरक्षण व परराष्ट्रीय संबंध यांची निराळी योजना केली पाहिजे, असें सांगतात. बॉल्डविन म्हणतात, हिंदुस्थानला हीन दर्जा देतां कामा नये. पण सर्व जण ब्रिटिश साम्राज्यांत राहून या सर्व गोष्टी होणार असें म्हणत आहेत. त्यांच्या म्हणण्यांत एकवाक्यता नाहीं; पण कांहींहि असले तरी हिंदुस्थान आपल्या हातून सुटून जाऊं नये, याबद्दल सर्वांचें एकमत दिसतें.

१९१७ सालीं जबाबदारीच्या स्वराज्याचा पहिला हप्ता देण्यांत आला; पण त्याला एक अट घातली. हें स्वराज्य साम्राज्यांत राहून उपभोगतां येईल असें त्यांत म्हटलें आहे. पुढें या घोषणेंत डोमिनिअन स्टेटस अभिप्रेत आहे असा व्हाईसरॉयनीं १९२९ सालीं खुलासा केला. १९३५ सालीं ज्या वेळीं हिंदुस्थानच्या सुधारणासंबंधींचा कायदा पार्लमेंटमध्यें मांडला, त्या वेळीं वसाहतीच्या स्वराज्याचा उल्लेख कायद्याच्या हेतुवाक्यामध्यें नव्हता. उलट आपल्या सोंगाची बतावणी बेमालूम करण्याकरतां नव्या कायद्याला हेतूवाक्यहि न घालण्याची सावधगिरी सर सॅम्युएल होअर यांनीं घेतली. सरकारतर्फें असें सांगण्यांत आले कीं, अलिकडच्या बिलांत (Preamble) हेतूवाक्य घालीत नाहींत. * यावर मजूर पक्षातर्फें अशी शंका घेण्यांत आली कीं, नवा कायदा झाल्यामुळें जुना म्हणजे १९१९ चा कायदा रद्द होतों; तेव्हां हा कायदा रद्द झाला म्हणजे त्याच्या बरोबरीचें हेतुवाक्यहि रद्द होणार. पण सॅम्युएल होअर म्हणाले हें हेतूवाक्य आम्ही कायम ठेऊं.

* *The bill like most modern bills contains no Preamble ( Volume 29 Col. 1165—66 Parliament debates.)*

तशी योजना त्यानीं इंडिया ॲक्टच्या ३२१ कलमांत केली व हेतूवाक्य रद्द होणार नाहीं असें नमूद केलें.

पण तेवढयानें हिंदी लोकांचें समाधान झालें नाहीं. तुम्ही जर वसाहतीच्या स्वराज्याबद्दल घोषणा करतां, तर त्याचा अंतर्भाव कायद्यांत का करीत नाहीं,असा प्रश्न विचारून मजूर पक्षानें सरकारला सतावून सोडलें. तेव्हां त्यानीं ग.जनरलला आज्ञापत्रक द्यावयाचें त्यांत त्याचा उल्लेख करूं असें म्हटलें आणि त्याप्रमाणें ३१ वें कलमांत निर्देश केला. ' हिंदुस्थान आमच्या साम्राज्यांत आपलें योग्य स्थान प्राप्त करून घेईल. ' एवढाच त्यांत उल्लेख आहे. या आज्ञापत्रकाला पार्लमेंटची संमति घेतल्यामुळें त्याला कायदेशीरपणा आला आहे हें खरें. पण तो उल्लेख किती ढोबळ व अस्पष्ट आहे हें दिसतेंच.यावर ॲटर्नी जनरल असें म्हणतात कीं,मंत्र्याच्या घोषणेला सरकारचा पाठिंबा असला म्हणजे ती हेतुवाक्याइतकीच जोरदार असते.*

ही सारी लपवाछपव आपल्या म्हणण्यांत सुसंगती आहे हें दाखविण्याकरतां आणि ब्रिटनमधील भांडवलवाल्यांना आपण नवें कांहीं करीत नाहीं हें सांगण्याकरतां केली गेली. अशा प्रकारें हिंदुस्थानचा १९३५ चा कायदा पास झाला.

या कायद्यांतील फेडरेशनचा जो दुसरा भाग त्याची अंमलबजावणी सुरू झाली नाहीं. फेडरेशनला संस्थानिक, मुसलमान व काँग्रेस या तिघांचाहि विरोध होता. त्यामुळें १९३९ च्या सप्टेंबर महिन्यांत युद्ध सुरू होतांच व्हाइसरॉयसाहेबांनीं काँग्रेसच्या हातांत फेडरेशनविरोधाचें शस्त्र राहूं नये म्हणून फेडरेशन तहकूबीची घोषणा केली. वरवर त्यांनीं युद्धाच्या धामधुमींत आम्हाला फेडरेशनकडे पहायला वेळ नाहीं असें म्हटलें,

---

**Declaration of a minister with the assent of the Government behind it is just as valid, just as strong just as effective as you can put into a preamble.*

*( Attorny General Page 406 )*

पण अंतस्थ हेतु विरोध टाळण्याचा होता. युद्धसमाप्तीनंतर १९३५ च्या कायद्याची फेरतपासणी करूं, त्याकरतां एखादी प्रातिनिधिक परिषदहि भरवूं, असें व्हाईसरॉय म्हणाले. पण राऊंडटेबलच्या बैठकींचा इतिहास सर्वांना ठाऊक असल्यामुळें कॉंग्रेसनें अशा प्रयत्नाबद्दल प्रतिकूलताच दाखवली.

त्यानंतर कॉंग्रेसनें युद्धहेतूच्या स्पष्टीकरणाबद्दल मागणी केली. त्याबद्दल व्हाईसरॉय, सर सॅम्युअल होअर व भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांनीं खुलासे केले. या खुलाशांत सरळपणा नव्हता, असें स्पष्टपणें दिसतें. १७ ऑक्टोबर १९३९ रोजीं केलेल्या व्हाइसरॉयच्या खुलाशांत १९२९ च्या आर्यार्विनच्या घोषणेचा हवाला दिला होता.* वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटसह वसाहतींचे स्वराज्य हिंदुस्थानला दिलें जाईल असें त्यांत म्हटलें नव्हतें. १८ ऑक्टोबर १९३९ ला लॉर्ड झेटलंडनीं १९१९ च्या कायद्यांतील हेतुवाक्याचा अर्थ डोमिनिअन स्टेटस आहे असा केला. या दोघांच्या भाषणामुळें हिंदुस्थानला समाधान झालें नाहीं. त्यामुळें कॉंग्रेस शासीत प्रांतिक कायदेमंडळांतून ' राजकीय स्वातंत्र्याच्या दर्जाला मान्यता द्यावी, स्वयंनिर्णयानुसार घटना तयार करण्याचा हिंदुस्थानचा हक्क कबूल करावा ' अशा अर्थाचे ठराव पास झाले. यानंतर कॉंग्रेसमंत्रीमंडळांनीं राजिनामे देऊन १९३५ ची घटना मोडून टाकली. म. गांधीप्रभृती कॉंग्रेस पुढारी

---

*'*Responsible self-Government for India is the goal set forth by Parliament in the preamble of the act of 1919, and it was with the full authority of the Government of the day that my noble friend the Foreign secretary stated ten years later that the natural issue of India's progress as there contemplated–that is to say in the preamble of the act of 1919–was the attainment of Dominion status. From that objective we never have had and have not now the smallest intention of departing.*

या दोघांच्या घोषणाबद्दल अत्यंत तीव्र नापसंती व्यक्त करणारे उद्गार काढूं लागले. कॉंग्रेसमंत्र्यांनीं राजिनामे देऊन आपला युद्धविषयक असहकार पुकारला. कारण हिंदुस्थानला ज्या युद्धामुळें लोकशाहीचें हक्क मिळणार नाहींत, तें युद्ध लोकशाहीकरतां चाललें आहे असें म्हणावयास कॉंग्रेस तयार नव्हती. या सर्व खळबळीचा परिणाम होऊन २६ ऑक्टोबर रोजीं पार्लमेंटांत 'हिंदुस्थान व युद्ध' या विषयावर चर्चा झाली आणि सर सॅम्युअल होअर यांनीं आणखी थोडासा अधिक खुलासा केला. त्यांत ते म्हणतात "आम्ही जेव्हां वसाहतीच्या स्वराज्याबद्दल बोलतो, तेव्हां आमच्या मनांत ब्रिटिश कॉमनवेल्थमधील इतर सभासदांना असणारा समानतेचा दर्जा हिंदुस्थानपासून हिरावून घ्यावा अशा प्रकारची राज्यघटना देण्याचा विचार असतो असें नाहीं. लोक समजतात त्याप्रमाणें वसाहतीच्या स्वराज्याचे प्रकार दोन नाहींत. आम्ही ज्याप्रकारच्या वसाहत स्वराज्याचा विचार केला, तें वेजवुडबेन यांनीं म्हटल्याप्रमाणें १९२६ चेंच वसाहत स्वराज्य आहे. वसाहत स्वराज्य हें लायक जमातींना द्यावयाचें बक्षीस नाहीं; पण विद्यमान परिस्थितीला मान्यता असा त्याचा अर्थ आहे. ज्यावेळीं ही परिस्थिति हिंदुस्थानांत असेल, त्या वेळीं आमच्या धोरणाचें ध्येय प्राप्त होईल. त्यांत जर कांहीं अडचणी असतील तर त्या आम्ही निर्माण केलेल्या नाहींत.......ह्या अडचणी दूर करणें हें हिंदी लोकांचें ध्येय ( aim ) असलें पाहिजे; आमचेंहि ध्येय त्या अडचणी दूर करण्यास मदत करणें हें आहे. ( हिंदुस्थानांत ) दुही माजवून राज्य करण्याच्या कल्पनेपासून आम्ही फार दूर आहोंत; आम्ही हे भेदाभेद एक आपत्ती समजतों आणि ते काढून टाकण्याकरतां प्रयत्नाची शिकस्त करण्याची आमची तयारी आहे."*

---

***_That when we spoke of Dominion status we meant what we said and did not mean some system of Government that deprived India of full status of equality with other members of the British Commonwealth._**

**_There are no two kinds of Dominion status as some_**

[ पुढें पहा ]

सर सॅम्युएल होअर यांनीं १९२६ च्या साम्राज्य परिषदेंतील वसाहत स्वराज्य देणें हें आमचें ध्येय आहे असें म्हटलें. ही कबूली अगदीं पहिल्या प्रथमच दिली गेली. १९३१ चा कायदा हा १९२६ च्या ठरावावरच केला गेला हें अभ्यासकांना माहीत आहे. पण १९३१ च्या कायद्यानें त्या चर्चेला कायदेशीर स्वरूप प्राप्त झालें असल्यामुळें चर्चेपेक्षां कायद्याची मातब्बरी अधिक आहे. वसाहतीचा दर्जा प्राप्त करून घेणाऱ्या देशाला १९२६ चे ठराव व १९३१ चा कायदा हे दोन्ही हवे आहेत. त्याशिवाय सरकारचें धोरण पुरें होत नाहीं. सर सॅम्युएल होअर यांनीं आपल्या भाषणांत १९२६ चा दर्जा मान्य केला जाईल एवढेंच म्हटलें. १९३१ सालचा कायदा आम्हाला लागू होईल असें म्हटलें नाहीं. हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या संशयित वातावरणाचें

---

*people seem to think. The Dominion status that we contemplated was the Dominion status which has been described by Mr. Wedgwood Benn-the Dominion status of 1926.*

*Dominion status is not a prize that is given to a deserving community but is the recognition of facts that actually exist. As soon as these facts exist in India, and in my view the sooner they exist the better, the aim of our policy will be achieved. If there are difficult ies in the way, they are nit of our making. They are inherent in the many divisions between the classes and communities in the great sub-continent. It must be the aim of Indians themselves to remove these divisions just as it should be our aim to help Indians in their task*

*So far are we from wishing to divide and govern, that we regard these divisions as a calamity and are ready to do our utmost to remove them.*

निराकरण करण्याकरतां शेवटीं लॉर्ड झेटलंड यांनीं लॉर्डांच्या सभागृहांत खालील आशयाचें भाषण केलें.

" लॉर्ड प्रिव्ही सील ( सर सॅम्युएल होअर ) यांनीं कांहीं दिवसांपूर्वी पार्लमेंटांत हिंदुस्थानला द्यावयाच्या संकल्पित डोमिनिअन स्टेटससंबंधीं जो उल्लेख केला, त्याबद्दल कांहीं शंका व अविश्वास हिंदुस्थानांत निर्माण झाला आहे व तो मी आतां प्रसंगानें दूर करणार आहे.* ज्या वसाहतींना १९३१ चा वेस्टमिन्स्टरचा कायदा लागू होतो त्यांना(१९२६) बाल्फर घोषणेमुळें निर्माण झालेल्या समानतेच्या संबंधापेक्षां निराळा, वरिष्ठ दर्जा प्राप्त होतो असें सूचित करण्यांत आलें आहे. पण ह्या गृहाला निदान माझ्यावर विश्वास ठेवावयास अडचण वाटणार नाहीं कीं, या सूचनेला कांहींहि आधार नाहीं. सर सॅम्युअल होअर यांनीं १९२६ च्या डोमिनिअन स्टेटसचा उल्लेख एवढ्याकरतांच केला कीं, त्या सालांत साम्राज्यपरिषदेनें वसाहतीच्या दर्जाचें विवरण केलें आणि त्या वेळीं विवरण केलेल्या या दर्जांत अजूनपर्यंत कोणत्याहि गोष्टीनें बदल झालेला नाहीं. वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूटनें त्या वेळीं मान्य केलेल्या घटनात्मक परिस्थितीचे होणारे जे परिणाम त्यांना कायदेशीर स्वरूप दिलें. "1

---

*वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूट म्हणजे पार्लमेंटचा कायदा. पार्लमेंट वेस्टमिन्स्टरमध्यें भरते.

1 *Let me take this opportunity of removing some doubts and suspicions which appear to have been felt in India about the reference in the recent India debate in the House of Commons by the Lord Privy Seal to Dominion status of 1926 as being the status we contemplate for India. The suggestion, I understand, has been made that the passage of the statute of Westminster in 1931 has produced for the Dominions to which*

[पुढें पहा]

युद्ध परिस्थितीमुळें बदललेल्या वातावरणांत हिंदुस्थानच्या भवितव्या-संबंधीं हें तूर्त अखेरचें उत्तर आहे असें समजण्यास हरकत नाहीं. ह्या घोषणेचा अर्थ काय लावावयाचा हें निश्चित करून घ्यावयाचें आहे. १९२६ च्या साम्राज्यपरिषदेनें जो वसाहतींचा दर्जा ठरविला तो आम्ही हिंदुस्थानचें अंतिम ध्येय म्हणून मान्य करीत आहों, असें सर सॅम्युएल होअर आणि भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांनीं सांगितलें. हें सांगतांना आपण पूर्वींच्या १९१७ च्या जाहीर घोषणेला सुसंगत असेंच बोलत आहों हेंहि पण ते सांगत गेले. या निरनिराळ्या घोषणांत सुसंगती असो वा नसो, आज मात्र निश्चितपणें एवढें सिद्ध झालें आहे कीं, हिंदुस्थानचा दर्जा हा इतर वसाहतींच्या प्रमाणेंच होणार आहे.

हिंदुस्थानला वेन्स्टमिन्स्टरचा कायदा लावणार कां नाहीं याचें स्पष्ट उत्तर अद्याप मिळालेलें नाहीं हें राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करणारांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. वेस्टमिन्स्टरच्या कायद्याचा व समानत्वाच्या दर्जाचा एका अर्थानें अगदीं निकटचा संबंध आहे. पण ज्यांना ज्यांना समानतेचा दर्जा दिला जाईल त्यांना त्यांना १९३१ चा कायदा लावलाच जाईल असें मात्र नाहीं.

---

*the statute applies a status which is somewhat different from, and is superior to, the relationship described in the Balfour Declaration contained in the report of the Imperial conference of 1938.*

*This House at all events will have no difficulty in believing me when I say that there is no foundation for any such suggestion and that my right honourable friend (Sir Samuel Hoare) referred to Dominion status of 1926 because it was in that year that the Imperial Conference described the status of the Dominions and the status so described has not been altered by any thing which has since occurred, the statute of westminster having merely given legal effect to certain consequences of the constitutional position as was then recognized.*

कारण समान दर्जाच्या दोन वसाहतींना एकच कायदा लावला पाहिजे असा अर्थ होऊं शकत नाहीं असें खास म्हटलें जाईल. दोन स्वतंत्र राष्ट्रांचे कायदे कोठें सारखे असतात ? इंग्लंड, फ्रान्स अमेरिका, इटली, जर्मनी, रशिया हीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत; पण त्यांचे कायदे कोठे सारखे आहेत ? भिन्न भिन्न देशांना भिन्न भिन्न कायदे देशकालपरत्वें लावावे लागतात, असा युक्तिवाद पुढें येणें संभवनीय आहे.

ह्या मुत्सद्यांचें एकमत जें आहे तें दर्जाच्या बाबतींत. १९३१ च्या कायद्यानें वसाहतींच्या दर्जांत फेरफार केला नसल्यामुळें आणि १९३१ च्या कायद्यानें दर्जाचें स्वरूपवर्णनहि केलें नसल्यामुळें त्या कायद्याचा संबंध दर्जा ठरविण्याच्या प्रश्नाशीं येत नाहीं, असें इंग्रज मुत्सद्दी आज ना उद्यां बोलूं लागतील. त्यांचीं भाषणें सूक्ष्मपणें वाचलीं असतां १९३१ चा कायदा हा समान दर्जा मान्य होण्याबरोबर आम्हाला लागू होतो असें समजण्याचें कारण नाहीं. म्हणूनच १९२६ च्या साम्राज्यपरिषदेंतील चर्चेच्या पुढें इंग्रज मुत्सद्दी गेलेले नाहींत, हें आपण विसरतां कामा नये. तेव्हां हिंदुस्थानला इतर वसाहतींप्रमाणें समानतेचा दर्जा मिळणार असला तरी १९३१ चा वेस्ट मिन्स्टरचा कायदा हिंदुस्थानला लागू होणार आहे असें कोणाच्याहि भाषणांत सांगितलेलें नाहीं. दर्जा याचा अर्थ त्या दर्जावर केलेला कायदा नाहीं. १९३५ सालीं पार्लमेंटांत हा प्रश्न निघाला होता, हें मागें आपण पाहिलेंच. तुम्ही हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य देणार म्हणजे वेस्ट मिन्स्टरचा कायदाहि लावणार का,असा चर्चिलप्रभृतींनीं प्रश्न विचारला. यावर ॲटर्नी जनरलनीं सरळ उत्तर दिलें नाहीं. ते म्हणाले वेस्टमिन्स्टर कायद्याप्रमाणें वसाहतीचा दर्जा म्हणजे काय ? अहो त्या कायद्यांत वसाहतीच्या दर्जाचा उल्लेखहि नाहीं. मग त्या दर्जाची व्याख्या कोठून असणार ? वसाहतीच्या दर्जाची व्याख्या करावयास ती काय ठराविक वस्तु आहे ? वसाहतीचा एकच दर्जा आहे. तो १९३१च्या कायद्यानें कमीजास्त होत नाहीं. या कायद्यानें वसाहतींना काय दिलें तें ॲटर्नी जनरलनें सांगितलें. त

म्हणाले वसाहतीना कायदे करण्याची अमर्याद सत्ता या कायद्यानें दिली.पण तीन वसाहतींना आपला घटनाकायदा बदलण्याची बिनशर्त सत्ता त्या कायद्यानें दिली नाहीं. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, हिंदुस्थानची एकंदर परिस्थिती पाहतां हिंदुस्थानला हा कायदा लावला जाईल असें नाहीं.

या भाषणानंतर चर्चील साहेब बोलले. त्यानीं ॲटर्नी जनरल टाळा-टाळी करीत आहेत असा आरोप केला. ते म्हणाले "( १९२६ ) घोषणेला वेस्टमिन्स्टरचा कायदा लागतोच लागतो आणि तो या घोषणेवर प्रभुत्व गाजवतो. त्या घोषणेवर अंमल चालविण्याकरतांच तो कायदा आहें. त्यांत साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हक्क अभिप्रेत नसेल...पण हिंदुस्थानला जो वसाहत दर्जा मिळणार, तो वेस्टमिन्स्टरच्या कायद्याप्रमाणेंच मिळणार. तुम्ही म्हणतां कीं, त्याची व्याख्या केलेली नाहीं. पण मी आपली क्षमा मागून सांगतों कीं, निर्दिष्ट केलेल्या, दाखविलेल्या, व वेस्टमिन्स्टर कायद्यांत अंतर्भूत केलेल्या दर्जाप्रमाणें हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा द्यावा लागेल.*

चर्चिल यांचें म्हणणें खोटें आहे असें समजण्याचें कारण नाहीं. पण तें खोटें आहे असें धरलें तर असा प्रश्न निर्माण होतो कीं, आम्हाला कायदा तरी कोणता लावणार ? हिंदुस्थानचा समान दर्जा मान्य करून आमच्याकरतां निराळा कायदा केला जाणार, असें यावरून स्पष्ट दिसतें. १९३१ चा सर्वच्या सर्व कायदा, आहे तसाच हिंदुस्थानला लावावा असा आग्रह कोणी धरीत नाहीं. कारण त्या कायद्यांत अशीं कांहीं कलमें आहेत कीं, तीं सर्वच वसाहतींना लागू होण्यासारखीं नाहींत. त्या कायद्यांत कानडा, ऑट्रेलिया व न्यूझीलंड यांना लावलेलीं कलमें आफ्रिका व

---

* *The ultimate Dominion status which India is to achieve will be Dominion Status as defined by the statute of westminster.*

आयर्लंडला लावलेलीं नाहींत कारण दोवां गटांच्या घटना सारख्या नाहींत. आम्हाला गैरलागू होणाऱ्या कांहीं कलमांबद्दल आम्हीहि आग्रह धरणार नाहीं. पण वसाहतींचा समानतेचा दर्जा मान्य केल्या-नंतर १९३१ च्या कायद्यांत प्राणभूत म्हणून जीं कलमें आहेत, तीं लाव-ण्याच्या बाबतींत युनायटेड किंगडमनें जर नकार दर्शविला तर समान-तेचा दर्जा हा पोकळ आहे असें म्हणावें लागेल.

समानतेच्या दर्जाला प्राणभूत अशीं तत्त्वें कोणतीं हें आपण आतां पाहूं. वेस्टमिन्स्टरच्या कायद्यांतील कलमांच्या अनुरोधानें हीं तत्त्वें सांगितलीं आहेत.

( १ ) ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें समानतेच्या दर्जानें जो आमचा प्रवेश होणार तो इतर वसाहतींप्रमाणें 'Free association' स्वेच्छेनें प्रवेश होत आहे हें मान्य केलें पाहिजे.

( २ ) ब्रिटिश पार्लमेंटचा कोणताहि कायदा, हुकूम, फर्मान वगैरे हिंदुस्थानच्या पार्लमेंटनें कायद्यानें मान्यता दिल्याशिवाय हिंदुस्थानला लागू होतां कामा नये.

( ३ ) हिंदुस्थानविषयक जो पार्लमेंटांत कायदा होणार, तो पार्लमेंट आमच्या विनंतीला अनुसरून करीत आहे, असें म्हटले पाहिजे.

वरील तीनहि कलमें १९३१ च्या कायद्यांत हेतुवाक्यांत (Preamble) घातलेलीं आहेत. तीं तशींच हिंदुस्थानच्या कायद्यांत घातलीं जावींत. याशिवाय प्रीॲंबलमध्यें (कलमामध्यें नव्हे) राजमान्यते-बद्दल कलम घातलें गेलें जाणारच आहे. त्या-मुळें आमचें स्वातंत्र्य मर्यादित होतें; पण हिंदुस्थान संरक्षणक्षम झाला नाहीं, तोंवर आयर्लंडप्रमाणें हा दर्जा मान्य करणारांना तो अपमान सहन करावा लागेल.

( ४ ) समानतेच्या अर्थानें आयर्लंड ज्या प्रमाणें 'फ्री-स्टेट' म्हणून मान्य केलें गेलें, तसेंच हिंदुस्थान हें 'इंडीपेंडंट स्टेट' (स्वतंत्र राज्य) म्हणून मान्य केलं जावें.

( ५ ) स्वतंत्र हिंदुस्थानला कोणताहि कायदा-ब्रिटिश किंवा वसाहतींच्या कायद्याशीं विरोधी असणारा सुद्धां-करण्यास प्रत्यवाय असता कामा नये. साम्राज्याच्या कायद्याशीं विरोधी असणारे जे कायदे पूर्वी केले असतील ते रद्द करण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा अधिकार हिंदुस्थानला असावा. राजमान्यतेकरतां बिलें राखून ठेवणें किंवा राजांनीं पास झालेलीं बिलें अमान्य करणें, हे त्याच्या अधिकारांत येत नाहीं हें सांगण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारला असावा.

( ६ ) ब्रिटिश मंत्रीमंडळाचा संबंध हिंदी मंत्रिमंडळाशीं बिलकूल असतां कामा नये. राजा हा कॉमनवेल्थचा प्रमुख असल्यामुळें जें नातें ब्रिटिश मंत्रिमंडळाचें व राजाचें तेंच नातें हिंदी मंत्रिमंडळाचें व राजाचें असलें पाहिजे.

( ७ ) परदेशांत असणाऱ्या हिंदी लोकांसंबंधीं कायदे करण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारला असला पाहिजे. ( वसाहती व ब्रिटन हे परदेश समजण्यांत यावेत. )

( ८ ) हिंदी व्यापारी जहाजें कोणत्याहि समुद्रांत असली तरी त्यांच्यावर हिंदी कायद्याची सत्ता चालावी. त्यांच्यावरील अधिकाराची चौकशी ही हिंदी कोर्टांत झाली पाहिजे.

( ९ ) हिंदुस्थानची संघटना तयार करणें,बदलणें,रद्द करणें, वगैरे संबधींचे सर्व अधिकार स्वतंत्र हिंदुस्थानच्या पार्लमेंटचे आहेत. त्यांत ब्रिटिश पार्लमेंटला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसावा.

( १० ) स्वतंत्र हिंदुस्थानचे वकील हे सर्व देशांत जातील व त्या त्या देशांचे वकील हिंदुस्थानांत रहातील.

हीं कलमें मान्य केलीं गेलीं म्हणजे वेस्टमिन्स्टरचा सर्व कायदा मान्य करण्यांत आला, असें होईल. या दहा कलमांपैकीं ४, ६ व १० हीं कलमें वेस्टमिन्स्टरच्या कायद्यांत नाहींत; पण रुढीनें तीं मान्य केलीं आहेत.

त्यामुळें वसाहतींनीं रूढीनें जें प्राप्त करून घेतलें आहे, तें हिंदुस्थानलाहि मिळालें पाहिजे.

असा कायदा पास झाला तर काय होईल, हें आपण थोडक्यांत बघूं.

( १ ) हिंदुस्थानच्या पार्लमेंटकडे सार्वभौमत्वाचे अधिकार येतील. ( आफ्रिका व आयर्लंडच्या पार्लमेंटला हे अधिकार आहेत. )

(२) कॉमनवेल्थमध्यें जाणें हें स्वेच्छेचें असल्यामुळें इतर वसाहतींप्रमाणेंच हिंदुस्थानला साम्राज्यांतून फुटून जातां येईल. ' स्वेच्छा ' ही हेतुवाक्यांत असल्यामुळें तो कायदा नाहीं असें म्हणतात. आपणहि ती गोष्ट कबूल करूं. पण हिंदुस्थानला वाटेल तो कायदा करण्याची आणि राजेसाहेबांना तो अमान्य करण्याची सत्ता नसल्यामुळें ( वसातींनीं हें ठरवून घेतले आहे. ) आम्हाला साम्राज्यसरकारशीं संबंध तोडतां येईल.

( ३ ) ग. जनरल, गव्हर्नर्स वगैरे हिंदी मंत्रिमंडळ नेमूं शकेल व काढूं शकेल.

( ४ ) प्रीव्हि कौंसिलकडे अपिलें जाणार नाहींत.

( ५ ) इतर राष्ट्रांबरोबर व्यापारविषयक तह करतां येतील.

( ६ ) युद्धांत भाग घेणें न घेणें हें आमच्या इच्छेवर अवलंबून राहील. आमच्या संमतीशिवाय आम्हाला लागू होणारे तहनामे साम्राज्यसरकार करूं शकणार नाहीं. स्वतंत्रपणें परक्या देशाशीं हिंदुस्थानला युद्ध जाहीर करतां येईल किंवा नाहीं अगर तह करतां येतील किंवा नाहीं किंवा साम्राज्यसरकारच्या शत्रूच्या बाजूनें युद्धांत पडतां येईल किंवा नाहीं, हें इतर वसाहतीपुढेंहि प्रश्नच आहेत. तेव्हां त्यांचा निकाल लावावयाचा आहे.

( ७ ) हिंदुस्थानला सैन्य, आरमार व वैमानिकदल कायदा करून उभारतां येईल.

( ८ ) कोणत्या राष्ट्रांतील लोकांना हिंदुस्थानांत येऊं द्यावयाचें व राहूं द्यावयाचें हें हिंदुस्थानचा कायदा ठरवील.

ज्या वसाहतींना १९२६ च्या परिषदेनें समानतेचा दर्जा दिला व जो वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यानें मान्य केला आणि कायद्याच्या भाषेंत बसविला त्या वसाहतींत वर वर्णन केलेली परिस्थिति आहे. हिंदुस्थानला वसाहतींच्या बरोबरीचा दर्जा आहे याचा अर्थ हिंदुस्थानला हे हक्क मिळाले पाहिजेत. ते हक्क ब्रिटिश सरकारनीं वेस्टमिन्स्टरचा कायदा मोठा करून मान्य करावेत अगर निराळा कायदा करून मान्य करावेत. पण ज्या कायद्यांत वरील हक्क येणार नाहींत तो वसाहतींच्या दर्जाचा कायदा होणार नसून हीन दर्जाचा कायदा होणार आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदुस्थानला वेस्टमिन्स्टरचा १९३१ चा कायदा हा किरकोळ दुरुत्या करून आपोआप लागूं केला जाईल असें पार्लमेंटांत म्हटलें असतें तर दर्जा ठरण्याबरोबर त्या दर्जाचा अर्थहि स्पष्ट झाला असता. तथापि वसाहतींना अंतर्गत, अंतरराष्ट्रीय, अंतरसाम्राज्यविषयक आणि अंतर वासाहतिक स्वातंत्र्य ज्या दर्जामुळें प्राप्त झालें नाहीं, तें हिदुस्थानला मिळालें तरच हिंदुस्थान दर्जानें इतर वसाहतींच्या बरोबरीचा झाला असें ठरणार आहे. मग तें स्वातंत्र्य १९३१ चा कायद्याप्रमाणें मिळो किंवा अन्य कायद्याप्रमाणें मिळो. हें स्वातंत्र्य नाकारणें ब्रिटिश सरकारला अशक्य आहे. कारण हिंदुस्थान व वसाहती यांचा दर्जा एक आहे असें म्हटल्यानंतर वसाहतींना जें स्वातंत्र्य मिळालें तें हिंदुस्थानला कोणत्या तोंडानें नाकारणार ?

हिंदुस्थानला समान दर्जा मिळाल्यामुळें काय काय परिस्थिति निर्माण होईल हें येथवर सांगितलें. यावरून कॉंग्रेसनें अगर कॉंग्रेसच्या पुढें जाणाऱ्या जहाल पक्षानें हा दर्जा मान्य करावा असें नाहीं. त्याच्यामध्यें जर धमक असेल तर त्यानीं आम्हाला हा दर्जा नको असें म्हणावें आणि यशस्वी क्रांती करावी. पण अशी क्रांती केल्याशिवाय व इंग्रजांना येथून घालवून दिल्याशिवाय स्वतःच्या कल्पनेप्रमाणें स्वराज्य स्थापतां येणार नाहीं. वसाहतीचा दर्जा मान्य करणें म्हणजे तडजोड मान्य करणें आहे आणि जहाल भाषेंत बोलावयाचें म्हणजे साम्राज्यशाहीला मान तुकविणें आहे. ही तडजोड करावयाची कां नाहीं हा आपल्या शक्तीचा प्रश्न आहे.

वाचनालय

# भाग १० वा.

## दर्जा ठरला पण पुढें काय ?

हिंदुस्थानचा दर्जा 'वसाहतीचें स्वराज्य' असा ठरला. तो दर्जा ठरल्याबरोबर वसाहतींचें स्वराज्य हिंदुस्थानला मिळेल असें नाहीं, हें सर सॅम्युएल होअर म्हणतात. वसाहतींच्या स्वराज्याचा दर्जा म्हणजे इतरत्र सर सॅम्युएल होअर यांनीं म्हटल्याप्रमाणें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला द्यावयाची देणगी नाहीं. आयर्लंडच्या स्वातंत्र्यावर १९२२ सालीं भाषण करतांना त्या वेळचे मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज असेंच म्हणाले. ते म्हणतात " वसाहतीच्या स्वराज्याची व्याख्या करणें कठीण आहे व भयंकरहि आहे.' ही व्याख्या करणें जरी कठीण व भयंकर असलें तरी 'कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका, यांना जितकें स्वातंत्र्य आहे तितकें आयर्लंडला दिलें जाईल.' आयर्लंडचा दर्जा इतर वसाहतीप्रमाणेंच आहे हें फक्त नमूद करण्यांतच आयर्लंडला हमी दिलेली ( Guarautee ) आहे; कारण जर आम्ही आयर्लंडच्या स्वातंत्र्यावर

आक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर इतर वसाहतींनाहि आपलें स्थान संकटानें ग्रस्त झालें अशी भीती वाटावयास लागेल. " *

या भाषणावरून दर्जाची व्याख्या जरी करतां येत नसली,तरी त्या दर्जा-मुळें इतर वसाहतीइतकेंच हक्क अधिकार हिंदुस्थानला मिळाले पाहिजेत हें सिद्ध होतें. या हक्कावर जर ब्रिटिशांनीं आक्रमण केलें, तर वसाहतींना आपल्याहि हक्कावर आक्रमण करण्याची सत्ता ब्रिटिश सरकारला आहे असें वाटू लागेल व वसाहती कदाचित् त्याला विरोध करतील. तेव्हां वेस्टमिन्स्टरचा किंवा त्यासारखा कायदा हिंदुस्थानला लागू केलाच पाहिजे, असें यावरून उघड होतें. मग ब्रिटिश मुत्सद्दी कांहींहि म्हणोत.

हा दर्जा हिंदुस्थानला आज देणार नाहीं, युद्ध संपल्यावर देऊं असेंहि नाहीं, किंवा तो केव्हां देणार हेंहि सांगतां येत नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्दी म्हणतात. तो दर्जा प्राप्त होण्याला अल्पसंख्याक, संस्थानिक यांचे प्रश्न आड येतात असें होअरसाहेबांचे म्हणणें आहे.आणि जोंपर्यंत ते प्रश्न सुटलें नाहींत, तोंपर्यंत अमुक तारखेला वसाहतीचें स्वराज्य देऊं असें आम्ही सांगू शकत नाहीं, हें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. हे प्रश्न सोडविण्याची

---

*What does Dominion status mean? It is difficult and dangerous to give a definition.........It is something that has never been defined by an act of Parliament, even in this country, yet it works perfectly. All we can say is that whatever measure of freedom Dominion status gives to Canada, Australia, Newzealand, or South Africa, that will be extended to Ireland, and there will be the guarantee, contained in the mere fact that the status is the same, that wherever there is an attempt at encroaching upon the rights of Ireland, every Dominion will begin to feel that its own position is put in jeopardy.*

*British Dominions Pages 83-84* **A. B. Keith.**

जबाबदारी ते सर्वस्वीं आमच्यावर टाकीत नाहींत. आपणहि त्या बाबतींत मदत करूं, असें मोठ्या औदार्यानें ते आश्वासन देत आहेत. तेव्हां आम्हाला वसाहतीचें स्वराज्य पाहिजे असेल, तर हे प्रश्न सोडविले पाहिजेत आणि ते प्रश्न सोडवावयाचे नसतील तर कायम गुलामगिरींत राहिलें पाहिजे असा त्याचा अर्थ होतो.

इतर वसाहतींत हे भानगडीचे प्रश्न नव्हते. आयर्लंडमध्यें धार्मिक प्रश्न नव्हते असें नाहीं, पण ते हिंदुस्थानइतकें विकोपाला गेले नव्हते. अल्स्टर व दक्षिण आयर्लंड यांच्यामध्यें असलेले धर्मभेद आयर्लंडला जाचक झालेच पण ते धार्मिक असण्याऐवजीं आर्थिकच अधिक होते. म्हणून ब्रिटिशांनीं अल्स्टरला स्वतंत्र पार्लमेंट देऊन आयर्लंडची चिरफाड केली. दक्षिण आयर्लंडमधील प्रोटेस्टंटांना तेथील डेलनें संरक्षणाची हमी दिली व त्या बाबतींत तरी ब्रिटिशांना लुडबूड करू दिलीं नाहीं. इतर वसाहतींत आपसांत भांडणें होतीं; पण तीं राजकीय होती. तीं भांडणें त्यानीं आपसांत हक्कांची कमीअधिक विभागणी करून मिटवलीं.

आयर्लंडच्या शिवाय बाकीच्या वसाहतींनीं जे ब्रिटिशांबरोबर संबंध जोडले ते स्वखुषीनें जोडले. त्या वसाहतींनीं आपसांत चर्चा केल्या; घटना तयार केल्या आणि आपले प्रतिनिधी लंडनला पाठवून पार्लमेंटकडून त्या मान्य करून घेतल्या. या घटना तयार करण्याच्या बाबतींत ब्रिटिशांना किंवा ब्रिटिश पार्लमेंटला त्यांनीं बिलकूल हस्तक्षेप करूं दिला नाहीं. त्यांचें ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें जाणें हें खऱ्या अर्थानें स्वेच्छेचें होतें. साम्राज्याशीं संबंध जोडण्यानें त्यांच्या व्यापाराला, संरक्षणाला बळकटी आली, तसेच इंग्लंडलाहि वसाहतीमुळें आपलें सामर्थ्य वाढवितां आलें.

तसा प्रकार आयर्लंडमध्यें नव्हता व हिंदुस्थानांतहि नाहीं. इंग्लंडचें राज्य हें जसें आयर्लंडवर स्थापन झालें होतें तसें हिंदुस्थानवरहि स्थापन झालें आहे. आयर्लंडनें निकराचा प्रतिकार करून आपलें स्वातंत्र्य मिळविलें. हिंदुस्थाननें तितका प्रतिकार केला नाहीं; पण किती प्रतिकार करावा लागेल याची अद्याप कल्पना नाहीं. इंग्लंड व आयर्लंडचा लढा ज्या

पद्धतीनें मिटला, त्याच पद्धतीनें हिंदुस्थानचाहि मिटला पाहिजे. हिंदुस्थानांत जातीय प्रश्न आहे, संस्थानिकांचे प्रश्न आहेत, हें कबूल केले तरी ते प्रश्न युद्धसमाप्तीनंतर द्यावयाच्या स्वातंत्र्या-आड का यावेत हें कळत नाहीं. ब्रिटिश सरकारनें ह्या प्रश्नांचा अडसर जो स्वातंत्र्याच्या प्रश्नाला लावला आहे, तो सद्बुद्धीनें लावला आहे असें आम्हास वाटत नाहीं. तेव्हां हिंदुस्थानच्या ताब्यांत जें स्वातंत्र्य करावयाचें तेवढ्यापुरतीच त्यांनीं चर्चा करावी. बाकीचे प्रश्न सोडविण्यास हिंदुस्थान समर्थ आहे व त्याकरतां इंग्रजांनीं सहाय्य दिलें तर तो घेईलहि.

तेव्हां मुख्य प्रश्न जो राजकीय स्वातंत्र्याचा त्यावरच आम्ही भर दिला पाहिजे. तो सोडविण्यास आयर्लंडचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवणें जरूर आहे. आयर्लंडनें प्रथम इंग्रजांच्याबरोबर तह केला. तह केल्यामुळें इंग्लंड व आयर्लंड हीं दोन राष्ट्रें समान दर्जाचीं मान्य करण्यांत आलीं. तह होतो तो समान राष्ट्रांतच होतो. शासीत व शास्ते यांच्यांत होत नाहीं. आयर्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि तह झाला पाहिजे. पण हिंदुस्थानांत एक अडचण आहे. हिंदुस्थानांत तह करावयाचा म्हणजे कोणाबरोबर करावयाचा? कॉंग्रेस ही राष्ट्राची एकमेव प्रतिनिधी आहे, असें म. गांधी राऊंड टेबलला जाईपर्यंत म्हणत होते. पण ५० वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतरहि कॉंग्रेसला एकमेव प्रतिनिधित्व स्थापन करतां आलें नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे. मुस्लीम लीग, अस्पृश्य, पारशी, शीख, अँग्लो इंडीयन्स, ख्रिश्चन्स वगैरे अनेक जाती व संस्था पुढें येऊन असें सांगत आहेत कीं, कॉंग्रेस ही आमची प्रतिनिधि नाहीं. हिंदुसभाहि कॉंग्रेसचे प्रतिनिधित्व मान्य करीत-नाहीं. तेव्हां हिंदुस्थानबरोबर तह करावयाचा म्हणजे कोणाबरोबर करा-वयाचा? आयर्लंडमध्यें हा प्रश्न आला नाहीं, कारण त्यांनीं १९२१ साला-पूर्वीच आपलें स्वातंत्र्य पुकारून डेल एरीनची स्थापना केली होती. ह्या डेलबरोबर ब्रिटिश प्रतिनिधींनीं तह केला. तेव्हां हिंदुस्थानांत एक तर कॉंग्रेसचें एकमेव प्रतिनिधित्व स्थापन झालें पाहिजे किंवा दुसरें कॉंग्रेसनें अल्पसंख्याकांच्याबरोबर तडजोड करून

व एक होऊन सरकारवर दडपण आणलें पाहिजे. तरच तह करणें शक्य होईल. हिंदुस्थानांत १९३५ चा कायदा करतांना जी परिस्थिति होती ती आजहि कायम आहे. त्या वेळीं गोलमेज परिषदेंत अल्पसंख्याकांचा प्रश्न न सुटल्यामुळें म. गांधींना आपल्या पराभवाची कबूली देऊन परत यावें लागलें. नंतर सरकारनीं अल्पसंख्याकांचा प्रश्न स्वतःच्या कल्पनेप्रमाणें सोडविला आणि राजकीय प्रश्नहि सोडविला. आजहि कॉंग्रेसला जर अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविता आला नाहीं तर सरकार तशीच कारवाई करून जातीय व राजकिय असें दोन्ही निर्णय स्वतःच्या कल्पनेप्रमाणें व स्वतःचें राज्य भक्कम करण्याकरतां आमच्यावर लादील. आमच्यावर अल्पसंख्याकांच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्या पार पाडण्याकरतां आम्हाला हिंदुस्थानांत रहाणें भाग आहे असेंहि ते म्हणतील. पण सरकार जोवर असें सांगत नाहीं कीं, कॉंग्रेस व अल्पसंख्याक यांचा प्रश्न सुटतां क्षणींच हिंदुस्थानांत पूर्ण स्वातंत्र्य प्रस्थापित होईल, तोंवर त्यांची अल्पसंख्याकांच्या विषयींची सबब खोटी आहे असें म्हणणें भाग आहे. अल्पसंख्याकांना जास्त हक्क देणें का ब्रिटिश राज्य राहू देणें, असा पर्याय आला असतां निदान कॉंग्रेस तरी ब्रिटिश राज्यापेक्षां अल्पसंख्याकांना जास्त हक्क देणें मान्य करील. १९१६ सालीं हीच परिस्थिति निर्माण झाली होती. त्या वेळीं संपूर्ण स्वातंत्र्यहि हिंदुस्थानला मिळणार नव्हतें. क्रमशः जबाबदारीचे तुटपुंजे हक्कच मिळणार होते. पण त्याहि वेळीं कॉंग्रेसनें लोकमान्यांच्या पुढाकाराखालीं लखनौचा करार केला आणि मुसलमानांचा प्रश्न सोडविला. आज आपसांत ऐक्य झालें तर त्याहिपेक्षां अधिक प्रगति व्हावयाची आहे आणि ती प्रगति हिंदुस्थानला संपूर्ण स्वराज्याचे हक्क मिळण्यांत होणार असेल, तर कॉंग्रेस अल्पसंख्याकांना जादा हक्क देऊनहि स्वराज्य पदरांत पाडून घेईल. तशी घोषणा सरकार करीत नसल्यामुळें कॉंग्रेस तरी मुसलमानांच्या बरोबर कोणत्या हक्काकरतां तडजोड करणार ? मुस्लीम लीग व कॉंग्रेसचे

पुढारी एकत्र बसले तर त्यानीं तडजोड कशाकरतां करायची ? तडजोड जी होत असते ती राजकीय हक्क आपल्याला कोणते मिळणार यावर होत असते. त्या हक्कांची कल्पना सरकार आज देत नाहीं, उद्यांहि देणार नाहीं. अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवा असें टुमणें मात्र त्यांनीं आमच्या मागें लावलें आहे.प्रांतिक स्वराज्याच्या बाबतींतील भांडणें मिटवा, असाहि खोडसाळपणा ते करतात. जर सरकार आमची स्वयंनिर्णयाची, लोकशाहीची व घटनापरिषदेची मागणी मान्य करावयास तयार असेल तर तडजोड करावयास वेळ लागणार नाहीं. नुसता हिंदुस्थानचा वसाहतीचा दर्जा आम्हीं मान्य केला आहे, एवढें सांगून तडजोडीचा मार्ग खुला होत नाहीं. त्या वसाहतीच्या स्वराज्याचा अर्थ संपूर्ण स्वातंत्र्य आहे आणि तें तुम्हाला आपसांत तडजोड होतांच देऊं असें त्यांनीं म्हटलें पाहिजे. तें जोंवर सरकार स्पष्टपणें सांगत नाहीं, तोंवर सरकारची घोषणा निरर्थक आहे. पण हें दोन्हीहि जमातींनीं म्हटलें पाहिजे.

मुसलमान व इतर अल्पसंख्याक काँग्रेसच्याबरोबर सरकारला हें सांगावयास तयार नाहींत. त्याचें कारण त्यांना काँग्रेसबद्दल विश्वास नाहीं. अलीकडे तर मुस्लीम लीगचे पुढारी लोकशाही विरुद्ध बोलूं लागले आहेत आणि काँग्रेस राजवट संपली म्हणून सुटलों असाहि उसासा टाकीत आहेत. याचा अर्थ त्यांना प्रांतिक स्वायत्तता नको असा नाहीं. मि. रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं दिलेल्या जातीय निर्णयावरच आजची राज्यघटना आधारलेली आहे. तो जातिय निर्णय मुसलमानांना संपूर्णतः मान्य आहे. त्यांना लोकशाही नको, याचें कारण आठ प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळें आहेत हें होय. त्यांना या मंत्रिमंडळांत स्वतंत्र प्रतिनिधित्व पाहिजे आहे.सर शिकंदर हयातखान यानीं तर ही गोष्ट स्पष्टपणें सांगितली आहे. आज जो काँग्रेस राजवट संपल्याबद्दल समाधानाचा सुस्कारा टाकला जात आहे त्याला कारण मुस्लीम लीगचे प्रतिनिधी मंत्रिमंडळावर नाहींत हेंच होय. तेव्हां मुसलमानांच्या बरोबर तडजोड करावयाची असेल, तर त्यांचे प्रतिनिधी मंत्रिमंडळांत घेतले पाहिजेत,ही त्यांची

एक अट दिसते. ही अट कायदा करून मान्य करावयाची कां रूढीनें प्रस्थापित करावयाची, हा खरोखर प्रश्न आहे. पण कोणत्याहि रीतीनें ती मान्य केली, तरी लोकशाहीच्या तत्त्वाला त्यामुळें बाध येतो. संयुक्त जबाबदारीचें तत्त्व त्यानें मारलें जातें. मंत्रिमंडळांत पुनः राखीव जागांचें घातुक तत्त्व त्यानें स्वीकारावें लागतें. मुस्लीम लीगचे हे प्रतिनिधी लीगला जबाबदार रहाणार, काँग्रेस वर्किंग कमिटीला जबाबदार रहाणार नाहींत. लीगचा कार्यक्रमहि ते मंत्रिमंडळाला स्वीकारावयास लावणार. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन ही त्यांची अट मान्य करावयाची किंवा नाहीं हें ठरविलें पाहिजे.

मुसल्मानांना संमीश्र मंत्रिमंडळ हें आत्महित रक्षणाकरतां पाहिजे आहे. तें हीत गव्हर्नर्स पाहू शकत नाहीं असा त्यांचा ग्रह झाला आहे. पण संमिश्र मंत्रिमंडळामुळें आपसांत खटके उडतील व वारंवार राजिनाम्याचे प्रसंग उद्भवतील. त्याकरतां मुस्लीम लीग व इतर अल्पसंख्याक यांचे एक सल्लागार मंडळ नेमावें व त्यांच्या सल्ल्यानें व सहकार्यानें अल्पसंख्याकांचे प्रश्न जेव्हां जेव्हां उद्भवतील तेव्हां तेव्हां त्यांना विश्वासांत घ्यावे. हा सल्ला बंधनकारक मानावा व रूढीनें त्याला मान्यताहि द्यावी. ही उपसूचना करण्याचें कारण इतकेंच कीं, लोकशाहीच्या सर्वमान्य तत्वाला व संयुक्त जबाबदारीला बाध येऊं नये.

याहिपेक्षां जास्त अडचणीचा प्रश्न मुस्लीम लीग हीच मुसल्मानांची अधिकृत व प्रतिनिधि संस्था आहे ह्या गोष्टीला कबूली देणें.याचा अर्थ काँग्रेस ही हिंदूंची आहे असें कबूल करणें. म्हणजे गेल्या पन्नास वर्षांत काँग्रेसनें जो राष्ट्रीयत्वाचा पुकारा केला तो खोटा होता हें लिहून देणें.तसेंच काँग्रेसमध्यें सरहद्द व इतर प्रांतांतील जे मुसल्मान आहेत, त्यांना तुम्ही हिंदु आहांत असें म्हणणें किंवा मुस्लीम लीगच्या गोटांत तरी ढकलणें. त्यामुळें हिंदुस्थानांत राजकीय पक्षच शिल्लक उरणार नाहीं व हिंदुस्थान जातीय राष्ट्र होईल. मग ह्या दोन्ही पक्षांना आर्थिक प्रश्न सोडविण्याऐवजी जातीय प्रश्नच सोडवीत अनेक वर्षें बसावें लागेल. तेव्हां मुस्लीम लीगची ही मागणी कोणत्याहि परिस्थितींत मान्य होतां कामा नये.

तिसरी त्यांची मागणी फेडरेशनमध्यें जे संस्थानी प्रतिनिधी येतील, त्यांपैकीं एक तृतीयांश जागा मुसल्मानांना द्या,ही असण्याचा संभव आहे. जिनासाहेब असें बोलू लागले आहेत कीं, आम्हाला फेडरेशनच नको आहे. फेडरल राज्यघटनाच त्यांना मान्य नाहीं. याशिवाय त्यांच्या आणखी किती मागण्या येऊं शकतील याची कल्पना करतां येत असली तरी ती प्रस्तुत प्रश्नाला गैरलागू आहे. कराचीच्या मुस्लीम लीग परिषदेंत एकानें हिंदु हिंदुस्थान व मुस्लीम हिंदुस्थान अशी फाळणी करण्याचा ठराव आणलाच होता. पण असल्या वेडगळ तपशीलाचा विचार करण्याचेंहि कारण नाहीं. मुख्य प्रश्न आहे तो परस्परांच्या परस्परावरील विश्वासाचा. दोघांनीं हिंदुस्थान आपलें राष्ट्र आहे असें मानलें पाहिजे, त्याच्या स्वातंत्र्याकरतां त्याग केला पाहिजे आणि तेथील दरिद्री प्रजा या स्वातंत्र्याशिवाय सुखी होणार नाहीं असें दोघांच्या अंतःकरणाला पटलें पाहिजे. ही भूमिका जोंवर मान्य होत नाहीं, तोंवर तपशीलांतील तडजोडी ह्या निरर्थक आहेत. एकमेकांनीं एकमेकांचे हेतु प्रामाणिकपणाचे आहेत, एक दुसऱ्याचा घात करूं इच्छित नाहीं, हें अंतःकरणपूर्वक कबूल केलें पाहिजे. हा विश्वास वाटूं लागल्यानंतर कोणाला जास्त जागा मिळाल्या व कोणाला कमी मिळाल्या तरी तक्रार केली जाणार नाहीं. पण जोंवर एक जात दुसऱ्या जातीची वैरी आहे ही भावना कायम आहे, तोवर केलेल्या तडजोडी केव्हांहि मोडून टाकतां येतील. भावना समजून घेण्यालाहि उभयपक्षीं उदारता लागते. त्याशिवाय पुढें पाऊलच पडत नाहीं. तडजोडीच्या मागें हीच मनोवृत्ती असावयास पाहिजे.

तेव्हां हिंदुस्थानांत जें ऐक्य प्रस्थापित व्हावयास पाहिजे, तें परस्परांच्या सद्धेतूवर आधारलेलें ऐक्य पाहिजे. यांत जर यश आलें तर मुस्लीमलीगला मुसल्मानांची प्रतिनिधी माना आणि हिंदुसभेला हिंदूंची प्रतिनिधी माना, अशी तेढीचीं बोलणींच केलीं जाणार नाहींत. जातीय प्रश्नांना राजकीय प्रश्नाचें स्वरूप देण्याचा जो सध्यांचा प्रयत्न सुरू आहे, त्यामुळें

दोन प्रकारचें राष्ट्रीयत्व या देशांत निर्माण होईल. हिंदुंचें राष्ट्रीयत्व निराळें व मुसल्मानांचें राष्ट्रीयत्व निराळें असे त्यांत भेद पडतील. ते भेद एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला घातुक आहेत. त्याचा फायदा घेणारा एखादा डिक्टेटर निघाला तर हिंदुस्थान धुळीला मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां धार्मिक प्रश्न कोणते, जातीय प्रश्न कोणते व राजकीय प्रश्न कोणते याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. इतकी छाननी होऊनहि अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांबद्दल पूर्ण विश्वास वाटत नसल, तर त्यांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण होईल अशी हमी द्यावयास कांहीं हरकत नाहीं. पण या सर्वांचा उद्देश भेद नष्ट करणें हा असला पाहिजे. कॉंग्रेसचें धोरण ठरविण्याचा अधिकार हिंदूनाच आहे आणि मुसल्मानांना नाहीं असें थोडेंच आहे ? कॉंग्रेसमध्यें प्रमुख मुसल्मान होते. त्यांनींहि कॉंग्रेसचें धोरण ठरविण्यास मदत केली आहे. आजहि मुसल्मान पुढारी कॉंग्रेसचें धोरण ठरवीत असतात. कॉंग्रेससारख्या संस्थेंत येणें हेंच अल्पसंख्याकांना आपल्या हक्काच्या मान्यतेचें एक विश्वासस्थान आहे. त्यामुळेंच त्यांना आपलें हित साधून घेतां येईल. एका संस्थेंत आल्यानें भेद नष्ट होतात व प्रगती करतां येते.

वर जी चर्चा केली आहे, ती हिंदुस्थानांत सशस्त्र क्रांती होणार आहे, आपण सार्वभौमत्वाचे अधिकार काबीज करणार आहों, इंग्रजांना या देशातून बाडबिस्तऱ्यासह हाकून देणार आहों या सिद्धांतावर केलेली नाहीं. हिंदुस्थानला निःशस्त्रप्रतिकार करावा लागेल, आणि त्या प्रतिकारांत आपण पूर्णपणें यशस्वी झालों तरी सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानांत परक्या सत्तेचे हितसंबंध, त्यांचें भांडवल व त्यांचे कर्ज वगैरे नष्ट करावेत ही मनोभूमिका नसल्यामुळें सत्याग्रहाच्या यशस्वी मोहिमेनंतरहि आपल्याला एका टेबलावर बसून जमाखर्च तपासावे लागतील व निर्णय घ्यावे लागतील. लढयावांचून जर आपल्याला हे जमाखर्च मुक्रर करतां येत असतील तर ते कां न करा ? पण सरकार जर असेंच म्हणत राहील कीं, आपसांतील भांडणें मिटल्यानंतरहि

तुमच्या स्वराज्याचा प्रश्न सुटेल व तुम्हांला स्वातंत्र्य मिळेल असें नाहीं, तर कॉंग्रेसला प्रतिकाराशिवाय दुसरा मार्गच उरत नाहीं. हा प्रतिकार जातीय भांडणें मिटल्यानें अधिच तीव्र होईल आणि जातीय भांडणें हटवादी वृत्तीमुळें मिटत नाहींत असें ठरलें तरी, सत्याग्रह प्रतिकार हा अनिर्वाह्यच ठरेल. या सत्याग्रहानंतरहि जसा कॉंग्रेस सरकारला अन्याय करणार नाहीं तसा अल्पसंख्यांकांनाहि करणार नाहीं.त्या वेळीं लढा मिटविण्याकरितां सरकारला १९३० च्या गांधी आयर्विन कराराप्रमाणें कॉंग्रेसबरोबरच तहनामा किंवा तहनाम्याच्या स्वरूपाचा करार करावा लागेल. आयर्लंडनें १९२१ सालीं ब्रिटिश सरकारबरोबर जो तहनामा केला, तो विजयी राष्ट्र म्हणूनच केला. ह्या तहनाम्याच्या वेळीं जातीय वाद मिटवा असें सरकार सांगणार नाहीं. कारण त्यांचें अस्तित्वच त्यांना धोक्यांत आहे असें वाटेल. आज सुद्धां सरकारनें जातीय प्रश्न काढला नसता; पण त्यांना आपलें अस्तित्व संकटांत आहे असें वाटत नाहीं. उद्यां जर सरकारला कॉंग्रेसचें सहाय्य चालू युद्धांत अनिर्वाह्य वाटलें तर तें जातिभेदाचें बुजगावणें दाखवणार नाहींत. निदान ते अल्पसंख्याकांना तुमचें बरोबर किती, चूक किती, न्याय्य काय अन्याय्य काय, हें सांगू शकतील आणि न्याय्य पक्षच घेतील.

सत्याग्रहाच्या यशस्वी मोहिमेनंतर सरकारबरोबर जो तहनामा होईल, त्यांत अल्पसंख्याकांना कॉंग्रेस अवश्य बोलवील. कारण परक्या सरकारबरोबर तह करणें म्हणजे अल्पसंख्याकांच्याबरोबर युद्ध सुरू करणें नाहीं. तेव्हां भावी लढे टाळण्याकरतां अल्पसंख्याकांना सहकार्याकरतां बोलावण्यांत कांहींच चूक नाहीं.

स्वातंत्र्य संपादण्याच्या क्रियेला तहापासून सुरुवात होते. हा तह झाल्यानंतर दुसरा टप्पा जो येतो तो तात्पुरतें सरकार स्थापण्याचा; आणि तिसरा टप्पा जो येतो तो घटनापरिषदेचा. तह, हंगामी सरकार, आणि घटनापरिषद हे स्वातंत्र्याच्या मार्गांतील तीन टप्पे आहेत. याच तीन टप्प्यानीं आयर्लंडला स्वातंत्र्य मिळालें. त्यांच्या तहामध्यें खालील कलमें होती. तीं अभ्यासकांना उपयोगी पडतील.

( १ ) आयर्लंडचा दर्जा हा इतर वसाहतींप्रमाणें समानतेचा दर्जा राहील.

( २ ) इंग्लंडचे व कानडाचे जे संबंध आहेत, तेच आयर्लंडचे व इंग्लंडचे राहतील.

( ३ ) कानडांत जसे राजप्रतिनिधी नेमले जातील, तसें आयर्लंड मध्येंहि नेमले जातील.

( ४ ) राजनिष्ठेचें स्वरूप निदर्शन.

( ५ ) सरकारी कर्जाबद्दल जबाबदारी. आपसांत निकाल न लागल्यास लवादनिवाडा.

( ६ ) आयर्लंडनें स्वतःच्या रक्षणाची सोय केली नाहीं, तोंपर्यंत किनाऱ्यावरील रक्षणाची इंग्लंडवर जबाबदारी. पांच वर्षांनीं त्याची तपासणी.

( ७ ) आयर्लंडनें साम्राज्याचें सैन्य, कांहीं काळ राहूं देणें, किनाऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी इंग्लंडवर सोंपविणें.

( ८ ) आयर्लंडचें आरमार किती व कसें असावें.

( ९ ) आयर्लंडच्या किनाऱ्यांचा परदेशांना योग्य देणें दिल्यावर उपयोग करण्यास परवानगी.

( १० ) ज्या इंग्लिश अधिकाऱ्यांना अधिकारक्रांतीमुळें सेवामुक्त करण्यांत येईल किंवा जे नोकऱ्या सोडून जातील, त्यांना भरपाई देणें. इंग्लंडमध्यें भरती झालेल्या पोलिसांना दोन वर्षे हा नियम लागू नाहीं. त्यानंतर त्यांना द्यावयाच्या पेन्शनची जबाबदारी इंग्लंडवर.

११, १२, १३ अल्स्टरबद्दल आहेत.

( १४ ) धार्मिक बाबतींत कोणावरहि अन्याय होईल अगर अपात्रता येईल अशा शिक्षणाबद्दल व इतर गोष्टींबद्दल उभय आयर्लंडला मनाई.

( १५ ) हौस ऑफ कॉमन्सचे जे दक्षिण आयर्लंडचे सभासद असतील, त्यांच्याकडे हंगामी सरकार म्हणून सर्व सत्ता संक्रांत करण्यांत येईल. ही सत्ता फक्त १२ महिने राहील.

(१६) हा तह इंग्लंडनें आपल्या पार्लमेंटांत व आयर्लंडनें हौस ऑफ पार्लमेंटचे जे दक्षीण आयर्लंडचे सभासद असतील त्यांची सभा बोलवून त्यांच्याकडून मान्य करून घेणें.

अशा प्रकारें हा तह केला गेला आणि हंगामी सरकारच्या हातीं आयर्लंडच्या राज्यकारभाराचीं सूत्रें सोपविण्यांत आलीं. या हंगामी सरकारनें आपल्या नव्या पार्लमेंटच्या निवडणूका केल्या आणि जे सभासद निवडून आले ते घटना तयार करण्याकरतां घटनापरिषदेंच सभासद म्हणून बसले. त्यांनीं तयार केलेली घटना ऱ्हस्वदीर्घाचाहि फरक न करतां इंग्लंडच्या पार्लमेंटनें कायदा करून मान्य केली. अशा प्रकारें प्रथम तह, नंतर हंगामी सरकार आणि शेवटीं घटनापरिषद या पायऱ्यापायऱ्यानें आयर्लंड स्वतंत्र झाला. आयर्लंडमध्यें ह्या स्वातंत्र्याला विरोध झाला हें आपल्याला ठाऊकच आहे. त्याकरतां कॉलीन्सचा खूनहि झाला.

आयर्लंडमधील विकासाचा हा इतिहास देण्याचें कारण इतकेंच कीं त्यांच्या हातांत देशाचें स्वातंत्र्य कसें गेलें एवढेंच त्यावरून कळावें. त्यानंतर आयर्लंडनें तहाच्या कांहीं अटी मोडल्या, राजनिष्ठेची शपथहि गाळून टाकली, ग. जनरलची जागा कमी केली आणि चालू युद्धांत तटस्थता स्वीकारली. आयर्लंड जर कॉमनवेल्थमधून आज फुटत नसेल, तर त्याला कारण कायद्याची अडचण हें नसून त्यांना इंग्लंडपासून कांहीं फायदे होतात हें आहे.

तेव्हां हिंदुस्थानांत वसाहतीच्या स्वराज्यघोषणेपर्यंत ब्रिटिश सरकारनें प्रगति केल्यानंतर आपल्याला आयर्लंडच्या क्रमाप्रमाणें जावयाचें असेल तर ब्रिटिश सरकारनें भाग पाडलेंच तर निःशस्त्र प्रतिकाराची लढत देणें क्रमप्राप्त होईल. त्यानंतर तह करावा लागेल, तो हिंदुमुसलमानांची एकी झाली व दोघांनीं मिळून प्रतिकार केल्यास दोघांबरोबर करावा लागेल. कॉंग्रेसनें एकटीनेंच प्रतिकार केल्यास कॉंग्रेसबरोबर तह करावा लागेल. कॉंग्रेस अल्पसंख्याकांना ह्या तहामध्यें सहभागी होण्याकरतां बोलावील. ज्या वेळीं अधिकारक्रांतीची वेळ येईल, त्यावेळीं अल्पसंख्याकांचे प्रति-

निंधी हंगामी सरकारमध्यें हमखास येतील. हे हंगामी सरकार घटना-परिषद बोलावील आणि ती घटना ब्रिटिश सरकारला जशीच्या तशी मान्य करावी लागेल. ह्या मान्यतेच्या बाबतींत कायदा नसला तरी तहाच्या अटींत त्याचा समावेश करावा.

आज काँग्रेसमध्यें ज्या प्रकारचे विचार बोलले जात आहेत, त्यावरून घटनापरिषद हीच प्रधान होऊं लागली आहे. तें अनेक दृष्टीनें बरोबरहि आहे. घटनापरिषदेला इतर राष्ट्रांत व भिन्न भिन्न परिस्थितींत जो अर्थ चिकटला होता, तो आपण झाडून टाकला म्हणजे या परिषदेचें काम व्यापक होईल. इतर राष्ट्रांत घटनापरिषद ही फक्त घटना बनविण्याकरतां बोलावीत असत. आमच्याकडील घटनापरिषद ही अल्पसंख्यांकांच्या बरोबर तडजोड करील, ब्रिटिशांच्या बरोबर तह करील, परिषदसभा-सदांचें हंगामी सरकार बनलें जाईल आणि त्यांच्याच हातांत सत्ता येईल. आयर्लंडमध्यें घटनापरिषदेनें फक्त घटना बनविली. तेथें तहान्वयें निर्माण झालेल्या हंगामी सरकारच्या हातीं सत्ता दिली; आणि तह जो केला तो डेलच्या सभासदांबरोबर किंवा इंग्लिशांच्या दृष्टीनें सांगावयाचें म्हणजे आयर्लंडचे जे सभासद पार्लमेंटांत जाऊन बसूं शकत होते, त्यांच्या बरोबर.

कांहींना घटनापरिषदेची ही त्रिविध कामगिरी अशास्त्रीय वाटेल. तसें वाटणें बरोबरहि आहे. कारण घटनापरिषद ही फक्त घटना बनविते, तह करीत नाहीं. पण हिंदुस्थानांत एकराष्ट्रीय अशी कोणती तरी संस्था असली पाहिजे. मुस्लीम लीगसारख्या संस्था संबंध देशातर्फे बोलूं शकत नाहींत. काँग्रेस हा हक्क सांगते; पण तिला जातीय संस्था मानीत नाहींत. तेव्हा सर्व राष्ट्राची अशी एखादी अधिकारी संस्था जन्माला आलीच पाहिजे. त्याशिवाय सर्व राष्ट्राचें अमुक मत आहे हें कोण सांगणार ? अशी संस्था घटनापरिषदच होऊ शकेल. तिला घटनापरिषद तुम्ही म्हणू नका. तिला राष्ट्रीय परिषद ( National assembly ) म्हणा. घटनापरिषदेपेक्षां राष्ट्रीय परिषद हें नांव जास्त अन्वर्थक आहे.

फ्रान्समध्यें अशीच राष्ट्रीयपरिषद भरली व नंतर तिचें रूपांतर घटना परिषदेंत झालें. तेव्हां आमची घटनापरिषद ही राष्ट्रीय परिषदच आहे.

मध्यंतरीं व्हाइसरॉयसाहेबांनीं आपल्या मंत्रिमंडळांत असेंब्लींतील मुख्य मुख्य पक्षाचे प्रतिनिधि घेण्याची तयारी दर्शवली होती. त्यांच्या दृष्टीनें घटनापरिषद भरविणें अशक्य असल्यामुळें त्यांनीं हा मधला मार्ग काढला असावा. या मंत्रिमंडळांतून सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त सभासद काढून टाकले असते म्हणजे त्यांच्याबरोबर करार करण्याचा व त्यांना हंगामी सरकार म्हणून मान्यता देण्याचा मार्ग निर्माण झाला असता. पण या सर्व तर्कांच्या गोष्टी आहेत. त्याला आधार कांहीं नाहीं. हिंदुस्थानच्या हातांत सत्ता द्यावयाची असें ठरल्यानंतर ती घटनापरिषदेच्या हातीं द्यावी का मध्यवर्ती कायदेमंडळाच्या हातीं द्यावी, हे प्रश्न गौण आहेत.

वादाच्याच दृष्टीनें याची चर्चा केली तर मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद हे सर्व देशाचे प्रतिनिधी होऊं शकत नाहींत. त्या मंडळाच्या मतदारांची लायकी ही फारच थोड्यांना उपलब्ध होते. तशी स्थिती घटनापरिषदेच्या सभासदांची होणार नाहीं. कारण त्यांचा मतदारसंघ हा जास्तींत जास्त मोठा असा होणार आहे. तेव्हां तह करायचा असला, सत्ता द्यायची असली किंवा घटना बनवायची असली तर लोकांचे खरे प्रतिनिधी जे असतील त्यांच्यावरच ही जबाबदारी टाकणें श्रेयस्कर आहे.

अशा प्रकारें अधिकारक्रांतीच्या चार मार्गांची आपण पहाणी केली पहिला मार्ग कॉंग्रेस व अल्पसंख्याक यांच्यामध्यें तडजोड झाली तर दोघांच्या प्रतिनिधीबरोबर ब्रिटिश सरकारनें तह करणें, आणि ह्या प्रतिनिधीना हंगामी सरकार म्हणून पार्लमेंटच्या कायद्यानें मान्यता देणें व त्यांच्या स्वाधीन सर्व सत्ता करणें आणि ह्या सरकारनें घटना परिषद बोलवणें. आयर्लंडच्या पद्धतीचा हा मार्ग आहे.

दुसरा मार्ग कॉंग्रेस व अल्पसंख्याक यांच्याबरोबर तडजोड झाली नाहीं, आणि सरकारनेंहि तडजोड झाल्याबरोबर तुमच्या हातीं सत्ता देऊं

अशी घोषणा केली नाहीं तर सत्याग्रहाचा लढा सुरू करून काँग्रेसबरोबर सरकारला तह करावयास भाग पाडणें. तहामध्यें काँग्रेसनें अल्पसंख्या-कांच्या हक्कांचें रक्षण करण्याची हमी देणें व त्यांना तहावर सह्या करण्यास, हंगामी सरकारमध्यें येण्यास व घटनापरिषदेच्या द्वारां घटना बनविण्यास पाचारण करणें. अल्पसंख्याकांनीं या परिषदेवर बहिष्कार घातल्यास सत्तां घेण्याचें व घटना बनविण्याचें काम थांबवितां कामा नये असा निर्धार करणें.

तिसरा मार्ग अल्पसंख्याकांच्याबरोबर तडजोड करण्याकरतां घटना परिषदेला पार्लमेंटनें कायद्यानें संमती देऊन व्हाईसरॉयला ह्या परिषदेच्या निवडणूकी करावयास सांगणें. नंतर या परिषदेच्या निवडक प्रतिनिधीं-बरोबर तह करणें, त्या प्रतिनिधींना हंगामी सरकार म्हणून मान्यता देणें आणि सर्व प्रतिनिधींनीं घटना परिषदेंत रूपांतरित होऊन घटना तयार करणें.

चवथा मार्ग मध्यवर्ती कायदे मंडळाचे प्रमुख प्रमुख प्रतिनिधी मंत्रि-मंडळांत घेऊन त्यांच्याबरोबर तह करणें, त्यांच्या हातीं सत्ता करणें व त्यांनीं घटनापरिषद बोलावणें.

अशा प्रकारें हे चार मार्ग आज विचारांत येऊं शकतात. प्रांतिक मंडळाचे प्रतिनिधी एकत्र करण्याचा आणखी एक मार्ग आहे पण तो त्याज्य आहे.

घटना परिषदेसंबंधीं कोठें साशंकता, कोठें भय, कोठें अविश्वास दर्शविला जात आहे. ती कल्पना अव्यवहार्य असेंहि म्हणतात. पण त्या-बद्दल इतकी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. जगांतील प्रत्येक देशानें आपापल्या घटना आपणच तयार केल्या आहेत. इंग्लंड त्याला अपवाद आहे, कारण इंग्लंडची घटना ही क्रमाक्रमानें बनत गेली आहे, ती एकदम झालेली नाहीं. पण असें कांहीं अपवाद सोडल्यास कोणताहि देश दुसऱ्या कोणाला घटना करूं देणार नाहीं. आपल्या देशाची घटना

प्रत्येक देश आपणच करीत असतो. तें स्वातंत्र्याचें पहिलें गमक आहे. जोंवर हिंदुस्थान स्वतंत्र नव्हता, तोंवर हिंदुस्थानच्या घटना इंग्लंडनें तयार केल्या. अगदीं परवाचा म्हणजे १९३५ चा कायदा इंग्लंडनें केला. तत्पूर्वी सायमन कमिशन नेमले तेंहि पूर्णतः इंग्लिशांचें नेमलें. १९१९ कायदा हा अशाच प्रकारें मॉंटेग्यूसाहेबांनीं तयार केला. त्यापूर्वीच्या मोर्लेमिंटो सुधारणा याहि इंग्लिशांनीं तयार केल्या. यानंतर अजूनहि इंग्रज सरकार हिंदुस्थानची घटना तयार करणार असेल तर हिंदुस्थानला वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा आहे, हें त्यांचें म्हणणें खोटें ठरेल. स्वराज्या-प्रमाणेंच घटना बनविणें हा प्रत्येक देशाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो हक्क अमान्य करणें म्हणजे त्या देशाचें स्वातंत्र्य अमान्य करणें आहे.

# भाग ११ वा.

## घटनापरिषदा

घटनापरिषदेला स्वकीयांकडून व परकीयांकडून विरोध होत आहे, हें आपण पहातोच.या विरोधाची चार कारणें सांगितली जातात.(१)हिंदुस्थानांत सशस्त्र राज्यक्रांती झाली नाहीं व लोकांनीं सत्ता बळकावली नाहीं म्हणून घटनापरिषदेची मागणी ही अशास्त्रीय आहे (२) हिंदुस्थानचा विस्तार लक्षांत घेता घटनापरिषद भरविणें अशक्य आहे. (३) घटना परिषदेंत हिंदूंचें बहुमत होणार असल्यामुळें अल्पसंख्याकांचे हितसंबंध सुरक्षित रहाणार नाहींत. (४) वयांत आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला मताधिकार देण्यास हिंदुस्थान अद्याप लायक झाला नाहीं. याशिवाय आणखी विरोधाची कारणें असतील; पण हीं प्रमुख कारणें आहेत.

यापैकीं एकेक कारणाचा आपण विचार करूं. घटनापरिषदेला विरोध असण्याचीं हीं तीन प्रकारचीं कारणें आहेत; एक ऐतिहासिक, दुसरें कायदे-शीर व तिसरें व्यावहारिक. यापैकीं पहिलें कारण आपण घेऊं. मागें आपण पाहिलेंच आहे कीं, प्रत्येक देशाच्या घटना ह्या देशांतील प्रतिनिधीच तयार करीत असतात. सशस्त्र क्रांती करूनच घटना बनविल्या पाहिजेत

असें शास्त्र नाहीं. सशस्त्र क्रांतीपर्यंत परिस्थिती बिघडवूं देणें हें राज्यकर्त्यांच्या बेफिकीरीचें, अरेरावीचें किंवा सत्तेच्या लोभाचें लक्षण आहे. सूज्ञ राज्यकर्ते प्रजेच्या भावनांचा अंदाज लागतांच प्रजेला घटना बनवूं देतात. तेव्हां राज्यक्रांती हीच घटना बनविण्याला शास्त्रीय दृष्टया योग्य असते असें नाहीं. फ्रान्सच्या इतिहासांत घटनापरिषद हा शब्द क्रांतीमुळें विटाळला गेला असल्यामुळें तो इतर घटनांना लावूं नये, असे होत नाहीं. जर्मनी, ऑस्ट्रीया, झेकोस्लोव्हाकिया, वगैरे स्वतंत्र देशांनीं सशस्त्र क्रांत्या न करतां घटनापरिषदा भरविल्या आणि आपापल्या घटना तयार केल्या. ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतीनीं आपापल्या घटना बनविल्या तेव्हां त्यांच्या देशांत क्रांत्या कुठें झाल्या होत्या ? त्यांनीं त्या परिषदांना घटनापरिषद हा शब्द लावला नाहीं एवढें खरें; पण त्यामुळें त्यांची सत्ता अमान्य होते असें नाहीं. पण त्याहिपेक्षां ठळक उदाहरण आयर्लंडचें आहे. आयर्लंडमध्यें घटनापरिषद भरली, तिनें घटना तयार केली व तिला ब्रिटिश पार्लमेंटची संमतीहि घेतली. तेथें क्रांतीचा जो अर्थ आहे, त्या अर्थानें क्रांती झाली नव्हती. इंग्रजांच्या संमतीनेंच तेथें घटनापरिषद भरली. तेव्हां साम्राज्यांतर्गत वसाहतींत घटनापरिषदा भरल्या, स्वतंत्र देशांनीं घटनापरिषदा भरविल्या आणि क्रांतीच्या वातावरणांतहि घटनापरिषदा भरल्या. क्रांतींतच घटनापरिषद होऊं शकते, असा जर सिद्धांत असता तर इतर देशांत भरलेल्या घटनापरिषदा ह्या घटनापरिषदाच नव्हत्या असें म्हणावें लागेल. पण तें चूक आहे. स्वेच्छेनें, परेच्छेनें, क्रांतींत अगर क्रांतीशिवाय ज्या ज्या वेळीं घटना बदलण्याची लोकांना इच्छा होते तेव्हां ते घटना परिषद भरवूं शकतात.

टीकाकारांचा मुख्य आधार फ्रान्स आहे. या देशांतील घटनापरिषदेचा विचार केला म्हणजे तोहि आधार कसा लटपटीत आहे, हें कळून येईल. याकरतां आपण फ्रान्सच्या घटनापरिषदेचा थोडक्यांत परामर्ष घेऊं.

## पहिला प्रकार.

१६ वा लुई हा १७७४ पासून १७९२ पर्यंत राज्यावर होता. तो स्वभावानें फार चांगला होता; पण मनानें दुर्बल होता. त्याची राणी मेरी ॲंटनेट व इतर लोक त्याच्यावर सत्ता गाजवीत. तो बुद्धीनें बेताबाताचाच होता. त्याच्या अमदानीला सुरवात चांगली झाली. त्यानें सुधारणावादी मंत्रिमंडळ नेमलें. टर्गो हा मुख्य होता. त्याची इच्छा श्रीमंत लोकांवर कर बसवावे अशी होती. पण राणी व इतर लोकांना तें पसंत नव्हतें. तिनें त्याची हकालपट्टी केली. नंतर नेकर नांवाच्या जर्मन सावकाराला फडणीस केलें, तो हुशार होता; पण सुधारणावादी नव्हता. त्याला यश आलें असतें; पण त्याच वेळीं अमेरिकेंत स्वातंत्र्याचें युद्ध झालें. त्या युद्धांत फ्रान्स इंग्लंडच्याविरुद्ध सामील झाल्यामुळें फ्रान्सच्या तिजोरींत खडखडाट झाला. मोठमोठीं कर्जें काढावीं लागलीं. नेकरला पैसा उभारतां येईना, म्हणून त्याला १७८१ मध्यें काढून टाकला. पुढें कॅलोन फडणीस झाला. त्यानें भारी व्याजानें कर्जें काढलीं; तरी पैसा पुरेना. तेव्हां त्यानें नोटेबल्सची सभा बोलावली. त्यांत राजानें नेमलेले १४२ सभासद होते. या नोटेबल्सनीं राजाला मदत करण्याऐवजीं स्टेट्स जनरलची सभा बोलावण्याचा आग्रह धरला. कॅलोनला परिस्थिति सुधारतां येईना, म्हणून १७८७ सालीं त्याला रजा मिळाली. पुढें चवथा फडणीस लोमेन डी ब्रीन हा आला. त्यानें राजाच्या हुकमानें लोकांवर कराचा बोजा लादला. याला पार्लमेंटनें प्रतिकार केला. आतां कांहीं मार्ग उरला नाहीं असें पाहून राजानें १७८८ सालीं स्टेट्स जनरलची सभा बोलावली. त्या वेळीं लोकांना तीन सुधारणा हव्या होत्या. १ राजकारणांत सुधारणा. २ दारिद्र्य व गुन्हेगारीला आळा. ३ धर्मकारणांत क्रांती.

ही स्टेट्स जनरलची अगदीं पूर्वीची सभा १६१४ सालीं भरली होती. नव्या सभेंत तीन वर्गांचे प्रतिनिधी होते. ३०८ भिक्षुक प्रतिनिधी; २८५ सरदारांचे व ६२१ सामान्य लोकांचे. प्रत्येक वर्ग आपापल्या निवडणुका स्वतंत्रपणें करी. सर्वसाधारण वर्गाच्या प्रतिनिधींची निवड २५ वर्षें वयाचा व

खातेदार असलेला करी. हे मतदार आपल्या प्रतिनिधींना आपली गाऱ्हाणीं लेखी देत व त्यानें ती दूर केलीं पाहिजेत असें सांगत. १७८९ सालीं झालेल्या या निवडणुकांत लाचलुचपत वशीला वगैरे कांहीं नव्हता. ते प्रतिनिधी अगदीं कच्चे, राजकारणांत अनभ्यस्त असें होतें,सभेंत काय करावें कसें बोलावें हेंहि त्यांना ठाऊक नव्हतें.एकेका वेळीं १०० जण बोलायला उठत. सभा सुरू असतां हसणें ओरडणें चालू असे; पण हे सर्व खवळलेल्या भावनांचे उद्रेक असत. तीन वर्गांच्या प्रतिनिधींमध्यें सलोख्याऐवजीं भांडणें चालतच.

४ मे १७८९ सोमवार रोजीं हे सर्व १२०० सभासद देवळांत जमले, त्यांनीं प्रार्थना केली व ते मिरवणूकीनें सभास्थानीं गेले. ही सभा व्हर्सायला भरली, पॅरीसला भरली नाहीं. त्यांची मिरवणूक पहायला रस्त्यानें हजारों लोक जमले होते.लोकप्रतिनिधींनीं काळा पोशाख केला होता व लोक त्यांना पाहून टाळ्या पिटीत होते.राजा आला तेव्हांहि टाळ्या पिटल्या गेल्या. पण राणी, भिक्षुक व सरदारांचें स्वागत झाले नाहीं. आठला सभा जाहीर केली, पण दहापर्यंत सभेला सुरवात झाली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सभेला पुनः सुरवात झाली.राजेसाहेबांची इच्छा लोकांना संघटना व हक्क द्यावे अशी होती. पण त्यांच्या मंत्र्यांनीं कांहींच योजना केली नव्हती.दुसऱ्या दिवसापासून या तीन वर्गांत इतकीं भांडणें झाली कीं, तिघे निरनिराळ्या ठिकाणीं बसूं लागले. १७ जून रोजीं स्टेट्स जनरलचें जे सभासद होते, त्यांनीं स्वतःला नॅशनल ॲसेंब्ली हें नांव घेऊन आपला कारभार सुरू केला. त्यांनीं भिक्षुक व सरदारांना आपल्यांत यावयास प्रतिबंध केला नव्हता; पण त्याकरतां एका मसुद्यावर सह्या कराव्या लागत. राजाला ह्या पृथक् बैठका मान्य नव्हत्या. त्यांची एकत्र बैठक २२ जूनला भरेल असें मंत्र्यानें पुकारलें पण ही नोटीस बेलीला-अध्यक्षाला दिली नाहीं. राष्ट्रीय पक्ष २० जूनला सभागृहांत आला, तेव्हां सभागृह बंद केलें होतें. म्हणून ते टेनीस कोर्टांत गेले व तेथें त्यांनीं सभा भरवली. त्याना राजपक्षाबद्दल शंका आली व त्यांनीं घटना होईपर्यंत आपण सभा मोडावयाची नाहीं अशा शपथा घेतल्या.

पुढें २२ तारखेला व नंतर एकत्र बैठका होऊं लागल्या. गांवांत फार खळबळ उडाली. लोकाची गर्दी सभागृहांत जमूं लागली. लोकहि सभासदांत बसूं लागले. रस्त्यांत लष्करी फौजफाटा आणून उभा केला. २३ तारखेला राजानें आपल्या सुधारणा जाहीर केल्या. कोणताहि कर स्टेट्स जनरला विचारल्याशिवाय लादला जाणार नाहीं. कोणालाहि कर माफ होणार नाहीं. कायद्यांत, लष्करांत, वृत्तपत्रांत सुधारणा जाहीर केल्या. तीन वर्ग निराळे बसतील; पण सोईप्रमाणें एकत्र बैठकहि होईल असें पुकारून राजेसाहेब निघून गेले. पण लोक प्रतिनिधी तेथून उठेनात. हातघाईवर प्रकरण आले. पण राजानें त्याना हात लावू नका असें बजावलें. यावेळीं पॅरीस व व्हर्सायमध्यें बंडें झालीं. तेथील हॉटेलें लुटलीं जाऊं लागलीं. राजाला धोका आहे असें वाटूं लागले. लोक कायदे मानीनात. पोलीस व लष्कर कुचकामी ठरले. लष्करांत राजाविरुद्ध गुप्त कट उघडकीला आला. त्या लोकांना ॲबे नांवाच्या तुरुंगांत टाकलें. ३० जूनला लोकांनीं हा तुरुंग फोडला व शिपायांना बाहेर काढलें. राजानें ॲसेंब्लीच्या सल्ल्यानें बाकीचे कैदीही मुक्त केले व पुढें कांहीं करावयाचें नाहीं असें ठरविलें.

पॅरिसमध्यें १२ जुलैला दंगेधोपे झाले. १४ जुलैला बॅस्टीलचा तुरुंग फोडण्यांत आला. जाळपोळी झाल्या. पण राजानें ॲसेंब्लीच्या सल्ल्यानें पुनः १५ तारखेला सैन्य वगैरे काढून घेऊन शांतता प्रस्थापित केली. अशा प्रकारें या दोन शहरांत दंगे झाले; पण इतरत्रहि कायद्याविषयीं आदर नव्हता. नॅशनल जनरलची सभा मात्र चालू होती.

त्यांनीं जुलै महिन्यांतच घटनापरिषद भरवली व निर-निराळ्या कमिट्या नेमून कामाला सुरवात केली. ६ जुलै १७८९ रोजीं या परिषदेच्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्याकरतां कमिटी नेमली गेली. ह्या परिषदेचें काम दोन वर्षें चाललें होतें. घटनेबद्दल प्रतिनिधी इतके आतुर होते कीं, ते रात्रंदिवस काम करीत होते. जुलै महिन्यांत झालेल्या दंगलीला न जुमानतां ते आपलें कार्य पुढें रेटीत होते. ऑक्टोबर १७८९ मध्यें व्हर्सायहून ही परिषद

पॅरिसला गेली. ३ सप्टेंबर १७९१ रोजीं ह्या परिषदेचें काम संपून त्यांनीं घटनेला कायदेशीर स्वरूप दिलें. या घटनापरिषदेचें काम चालू असतां तिला राजपक्षाकडून विरोध होत होता. पण तो निष्फळ ठरला, आणि राजाला अशी भीति वाटली कीं, आपल्याला ही घटना मान्य करावी लागेल एवढेंच नव्हे तर आपण ती तयार होऊं द्यावयाला जबाबदार आहों असें समजण्यांत येईल. ही आपत्ती टाळावी म्हणून राजेसाहेब जून १७९१ मध्यें पॅरिसहून पळून गेले. पण त्यांना शेवटीं त्या घटनेला मान्यता द्यावी लागली. ही मान्यता घटनाकायदा कायदेशीर ठरावा, या-करतां नको होती; पण राजाला आपला अधिकार कायम ठेवण्याकरतां देणें भाग होतें. १४ सप्टेंबरला राजानें आपण घटनेशीं इमानानें वागूं अशी शपथ गंभीरपणें नॅशनल कौन्सिलच्या सभेमध्यें घेतली. लोकांना वाटलें आतां क्रांती वगैरे होणार नाहीं व राज्य सुखानें चालेल. अशा प्रकारें घटनेचें काम संपतांच ३० सप्टेंबर रोजीं नॅशनल असेंब्ली समाप्त झाली.

त्यानंतर एक वर्षानें तेथें पुनः बंड झालें आणि त्या बंडाच्या शेवटीं कन्व्हेंशन भरून राजाला दोषी ठरवून त्याचा जानेवारी १७९३ मध्यें वध करण्यांत आला.नंतर लोकांनीं रिपब्लिक जाहीर केलें व राजसत्ता संपवली.

वरील हकीगतीवरून फ्रान्समध्यें राज्यक्रांती झाली, लोकांनीं हातांत सत्ता घेतली आणि नंतर घटना परिषद भरवली, या पैकीं कांहींहि झालें नाहीं. राजानें बसविलेले कर असह्य झाल्यामुळें स्टेट्स जनरलची सभा राजानेंच बोलावली, त्या स्टेट्स जनरलमधून लोकप्रतिनिधींनी नॅशनल असेंब्ली या नांवाची आपली परिषद भरवली, या परिषदेनें घटना तयार करण्याकरतां एक समिती नेमली. पॅरिस व व्हर्सायचे दंगे हे क्रांती या नांवाला साजेसे नव्हते. फार तर त्यांना बंड म्हणतां येईल. या बंडामुळें घटनापरिषद भरली असें नाहीं. लोकांनीं राजाला हाकून दिलें नव्हते एवढेंच नव्हे तर त्यांचें राज्य चालू असतांच ही परिषद काम करीत होती. तेव्हां फ्रान्सची १७८९ ची घटनापरिषद ही इतर देशांच्या परिषदे-पेक्षां बिलकूल भिन्न नव्हती.



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## रशिया.

रशियामध्यें घटनापरिषद भरली अशी लोकांची समज नाहीं. वास्तविकपणें क्रांतीनंतर सत्ता काबीज केल्यावर घटनापरिषद भरते असा जर सिद्धांत असता, तर रशियांत घटनापरिषद भरावयास पाहिजे होती. पण तेथें ती भरली नाहीं. त्याचा इतिहास आपण थोडक्यांत पाहूं.

१९१७ च्या मार्चमध्यें केरेन्स्कीनें क्रांती करून आपल्या हातीं सत्ता घेतली. त्यानंतर जून महिन्यांत पेट्रोग्राड येथें सोव्हिएट्सची ऑल-रशियन कॉंग्रेस भरली. त्या कॉंग्रेसला ७८१ प्रतिनिधी जमले होते. ही सोशिआलिस्टांची वर्गसंघटना होती. तिला कायदेशीर स्वरूप नव्हतें. १९१७ च्या सप्टेंबर महिन्यांत या कॉंग्रेसनें इतर राजकीय पक्षांच्या बरोबर सहकार्य करून हंगामी सरकारच्या स्थापनेला मान्यता दिली. ही तात्पुरती व्यवस्था घटनापरिषद होईपर्यंत चालू रहावी असें ठरलें. दरम्यानच्या काळांत बोल्शेविक्स अत्यंत प्रबळ झाले व त्यांच्या पक्षानें असें ठरविलें कीं, सबंध राज्याचा ताबा सोव्हिएट संस्थेनें घ्यावा. या ठरावाप्रमाणें त्यांनीं व्यवस्था केली आणि नोव्हेंबर ६ च्या रात्रीं त्यांनीं पेट्रोग्राड घेतलें, हंगामी सरकारला गिरफदार केले आणि त्यांच्या जागीं लष्करी क्रांतिकारक मंडळ स्थापन केलें. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं सोव्हिएटांची दुसरी कॉंग्रेस भरली व त्यानीं सत्ता बळकावल्यानंतर संबंध राज्याची व्यवस्था आपल्या कल्पनेप्रमाणें करावयाचें ठरवलें. या कॉंग्रेसच्या ४४५ सभासदांपैकीं ३९० बोल्शेविक होते. या कॉंग्रेसनें रशियांत सोव्हिएट रिपब्लिक स्थापन झाल्याची घोषणा केली.

या घडामोडीमुळें घटनापरिषद बाजूला पडत गेली. सोव्हिएटांना वाटलें कीं, घटनापरिषद झाली तर भलताच निकाल होईल. म्हणून त्यानीं या परिषदेवर आपलें भवितव्य ठरविण्याचें नाकारलें. पण नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत म्हणजे बोल्शेविकांनीं सत्ता हातांत घेण्याच्या वेळीं घटनापरिषदेच्या निवडणूका झाल्या. त्या निवडणुकांत ३ कोटी ६० लक्ष मतदारांनीं मतें दिलीं. त्यांतील २ कोटी १० लाख मतें बोल्शे-

विकांच्या विरुद्ध पडलीं. ९० लाख बोल्शेविकांच्या बाजूनें पडलीं. २० लाख मेन्शेविकांना मिळालीं व ४० लाख इतरांना पडलीं. आपल्याविरुद्ध हें मतदान झाल्याचें पाहून बोल्शेविकांनीं १८ जानेवारी १९१८ रोजीं घटनापरिषद भरतांक्षणींच ती परिषद उधळून टाकली. त्याच दिवशीं त्यांनीं आपली तिसरी कॉंग्रेस भरवली व तीच घटनापरिषद आहे, असें म्हटलें. त्यांची ५ वी कॉंग्रेस जुलै १० ला भरून तिनें सध्याची घटना तयार केली.

अशा प्रकारें जगांतील दुसरा क्रांतिकारक देश जो रशिया त्यानें घटनापरिषदेची अशी विटंबना केली. त्या देशांत घटनापरिषद भरलीच नाहीं. सोव्हिएट कॉंग्रेसच्या बैठकीलाच त्यांनीं घटना परिषद संबोधिलें. तेव्हां क्रांतीनंतरच घटनापरिषद भरते, ह्या सिद्धांताला हा दुसरा धक्का मिळाला.

## दुसरा प्रकार.

आतां आपण ज्या देशांत क्रांत्या झाल्या नाहींत, पण जेथें घटना मोडकळीस आल्या होत्या त्यांचा थोडासा परामर्ष घेऊं.

### पोलंड.

गेल्या महायुद्धांत हा देश स्वतंत्र झाला. त्या वेळीं त्यांनीं आपली घटनापरिषद भरवली. त्यांच्या कायद्याच्या सुरवातीला 'आम्ही दीडशें वर्षांच्या गुलामगिरींतून सुटल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानून......मे १७९१ च्या घटनेप्रमाणें पोलीश रिपब्लिकची ही घटना, घटनापरिषदेंत मतें देऊन मंजूर करीत आहों.' असें म्हटलें आहे. तेथें सरक्त क्रांती झाली नव्हती; निरक्त क्रांतीच होती.

### ऑस्ट्रिया.

ऑस्ट्रियामध्यें १७ ऑक्टोबर १९१८ रोजीं बादशहानें जाहीरनामा काढला, २१ ऑक्टोबरला २१० जर्मन प्रतिनिधी जमले व त्यांनीं हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापलें. ११ नोव्हेंबरला कैसरनें ऑस्ट्रियावरील आपला संबंध सोडल्याचें जाहीर केलें. १२ नोव्हेंबर रोजीं जर्मन-

ऑस्ट्रिया हे डेमोक्रॅटिक रिपब्लिक आहे, असें कायद्यानें जाहीर झालें. याच वेळीं हंगामी सरकारनें घटनापरिषद १९१९ च्या जानेवारींत भरेल असें कायदा करून जाहीर केलें. ह्या कायद्याप्रमाणें घटनापरिषद दोन वर्षे बसावी, तींत २५० प्रतिनिधी असावेत, २० वर्षांच्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला मताचा अधिकार असावा असें ठरलें. त्याचप्रमाणें १५ फेब्रुवारीला निवडणुका झाल्या. ४० लाख लोकांनीं मतें दिलीं व ४ मार्चला घटनापरिषद भरली. त्यांनीं नंतर घटना बनविली व १ ऑक्टोबरला घटनाकायदा मंजूर झाला.

ऑस्ट्रियांतहि सशस्त्र क्रांति झाली नव्हती. लोकांनीं नव्या परिस्थितीनुरूप आपली घटना तयार केली.

## झेकोस्लोव्हाकिया.

प्रेसिडेंट मेसॅरिकच्या नेतृत्वाखालीं यांनीं स्वातंत्र्य जाहीर केलें. युद्धसमाप्तीनंतर दोस्तांनीं त्याला मान्यता दिली. २८ ऑक्टोबर १९१८ सालीं नॅशनल कौन्सिलनें आपल्या हातीं सत्ता घेतली व स्थायी सरकार स्थापण्याकरतां घटना परिषद भरविण्याचें ठरविलें. या परिषदेकरतां निवडणुका करणें कठीण झाल्यामुळें त्यांनीं निरनिराळ्या पक्षांना आपले प्रतिनिधी नियुक्त करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें १४ नोव्हेंबर १९१८ रोजीं घटनापरिषद भरली. या परिषदेनें आपलें डेमोक्रॅटिक रिपब्लिक जाहीर केलें. नंतर ही परिषद घटना तयार करण्याकरतां बसलीं. २० फेब्रुवारीला ह्या परिषदेचें काम समाप्त झालें. येथेंहि सशस्त्र क्रांतीशिवाय घटनापरिषद भरली व घटना तयार झाली.

## जर्मनी.

पूर्वी कैसर हा जर्मनीचा मालक होता. पण युद्धसमाप्तीनंतर ३० सप्टेंबर १९१८ रोजीं कैसरनें एक जाहीरनामा काढून आपली सत्ता लोकांच्या स्वाधीन केली. ( from the person of the kaisar to the people ) नंतर कैसर तेथून निघून गेला. लोकांच्या हातीं सत्ता आल्यावर पुढील काम व्यवस्थीतपणें झालें असतें. पण तेथें नोव्हेंबर महिन्यांत

छोटेसें बंड झालें. कामकरी व शिपाई यांनीं आपलीं मंडळें स्थापन करून आपल्या हातीं सत्ता आली पाहिजे असा आग्रह धरला. त्यांनीं आपलें एक हंगामी सरकार नेमलें. त्याच वेळीं दुसरें एक अखिल जनतेचें हंगामी सरकार अस्तित्वांत होतें.

दोन हंगामी सरकार एकाच वेळीं कामें करू लागले व त्यांच्यांत खटके उडूं लागले. ६ डिसेंबरला हीं भांडणें संपलीं व असें ठरलें कीं घटनापरिषद बोलावून तिचा निकाल कायम समजावा. १९ जानेवारी १९१९ रोजीं घटनापरिषदेच्या निवडणुका झाल्या. २० वर्षांवरील स्त्री-पुरुषांना मताधिकार मिळाला. ४२१ जागा निवडण्यांत आल्या. त्यांत ३६ बायका होत्या. ६ फेब्रुवारीला घटनापरिषद वायमारच्या नाट्यगृहांत भरली. तिनें कामचलावू घटना बनवली. पूर्वींच्या दोन्ही हंगामी सरकारनीं आपले अधिकार या घटनापरिषदेला दिले. इबर्टला राईशचा अध्यक्ष नेमले व घटनापरिषदेचें काम सुरू झालें. ह्या परिषदेनें आपल्या घटनेचा मसुदा २१ फेब्रुवारीला तयार केला. जुलै महिन्यांत त्यावर चर्चा झाली. ३१ जुलैला तो पास झाला. ही घटनापरिषद विसर्जन न पावतां ती पहिली राईशटाग ( कायदेमंडळ ) व्हावें असें कायद्यानें ठरलें. अशा प्रकारें जर्मनीची घटना तयार झाली.

स्वतंत्र राष्ट्रांनीं आपापल्या घटना अशा प्रकारें घटनापरिषदांच्याद्वारां तयार केल्या.

## तिसरा प्रकार.

आतां तिसरा प्रकार ब्रिटिश वसाहतींतील देशांचा दृष्टीस पडतो. या वसाहतींनीं आपापल्या देशांत कन्व्हेंशन्स बोलावून आपल्या घटना तयार केल्या व नंतर ब्रिटिश पार्लमेंटकडे त्या पाठवून त्यांना मंजूरी घेतली. या वसाहती पूर्वीं स्वतंत्र असल्यामुळें त्यांना दुसऱ्या कोणाची घटना बनविण्यास जरूरी भासली नाहीं. फक्त आयर्लंडनें घटनापरिषदेच्या द्वारां आपली घटना तयार केली. या वसाहतींच्या घटना त्यांच्या त्यांनीं तयार केल्या.आम्ही त्यांत हस्तक्षेप केला नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्दी अभिमानानें

सांगतात.त्या घटना बनविण्याचें स्वातंत्र्य त्यांना असल्यानें त्या दर डोई मत देऊन तयार केल्या किंवा नाहीं हा प्रश्न गौण आहे. मुद्याचा प्रश्न असा आहे कीं, त्या घटनांत ब्रिटिशांनीं हस्तक्षेप केला नाहीं. त्याबद्दल सर जॉन सायमन आयर्लंडच्या कायद्याला पाठिंबा देतांना पार्लमेंट मधील भाषणांत म्हणतात.

'ही घटना अशी आहे कीं, ती आयर्लंडमध्यें, आयरिश लोकांनीं, आयर्लंडकरतां बनविली आहे. ज्या पद्धतीनें ही घटना बनविली गेली तीं पद्धत नवी किंवा क्रांतिकारक नाहीं. मुख्य प्रधानांनीं सांगितल्याप्रमाणें, ज्या घटनाखालीं आमच्या साम्राज्यांतील निरनिराळे देश नांदत आहेत, त्या घटना पुष्कळशाच प्रमाणांत ज्या देशांत त्या चालवयाच्या होत्या त्याच देशांतील लोकांनीं बनविल्या आहेत. कानडाची घटना साम्राज्याच्या कायद्यांत आहे; पण या साम्राज्याच्या कायद्यानें केवेकला दीर्घकाळ चर्चा होऊन आणि शेवटीं परस्परांत एकमत होऊन जे अनेक ठराव झाले, त्या ठरावाला कायदेशीर स्वरूप दिलें इतकेंच. ऑस्ट्रेलियाचीं घटना १९०० च्या कायद्याला फक्त परिशिष्ट म्हणून जोडली आहे. आपण आयर्लंडची घटना या बिलाला अशीच परिशिष्ट म्हणून चिकटवणार आहों. याहिपेक्षां दक्षीण आफ्रिकेची घटना विशेष संस्मरणीय आहे.

द. आफ्रिकेंतील लोकांनीं आपल्या देशांत चर्चा करून ती घटना-बनविली आणि १९०९ सालीं आम्ही या गृहांत एका वाक्याचाहि फरक न करतां ती मान्य केली. कोणी म्हणतील हीं उदाहरणें बरोबर लागू होण्यासारखीं नाहींत; कारण त्यांतील संघ अशा प्रदेशाबद्दल आहेत कीं, जे पूर्वी संघटित झाले नव्हते......पण आमच्या साम्राज्यांज्यांतील उदाहरणें निरनिराळ्या संयुक्त घटनेंतील संघापुरतीच मर्यादित नाहींत. ज्या घटनांमुळें उत्कर्ष होतो व राजनिष्ठा वाढते, आणि ज्या घटना आमच्या साम्राज्यांतील अंकित देशांत सुद्धां कायमच्या टिकावू असतात, त्या एकहि अपवाद न दाखवितां, जवळजवळ पूर्णपणें जे लोक त्या घटनेमध्यें नांदतात त्यांनींच तयार केल्या आहेत......आय-

लँडची ही घटना आयरिशांनीं तयार केली आहे व त्यांनीं पार्लमेंटकडे तिला संमती मागितली आहे." सायमनकमिशनचे अध्यक्ष मोठ्या अभिमानानें सांगत आहेत कीं, बरोबरीचा दर्जा मान्य केलेल्या वसाहतींनीं आपल्या घटना बनविल्या यांत आश्चर्य काय? पण ज्यांना आम्ही आमचे अंकीत देश समजतो त्यांनींसुद्धां आपल्या घटना स्वतःच बनविल्या आहेत. प्रत्येक देशाचा तो हक्कच आहे असें त्यांच्या भाषणावरून सिद्ध होतें. आयर्लंडला त्याबद्दल शंका नव्हती असें दिसतें आणि कोणत्याहि देशानें आपली घटना दुसरा करील अशी शंकाहि घेऊ नये. आयर्लंडला ती शंका असती तर तहांत त्यांनीं तें कलम घालून घेतलें असते. पण कांहीं आयरिशांना कांहीं प्रश्नाबद्दल शंका आल्या. त्यांतील घटनेबद्दल एक शंका होती. तह ६ डिसेंबरला झाल्यानंतर ७ दिवसांनीं मुख्य प्रधान लॉईड जॉर्जनीं खुलासा केला व तुमची घटना तुम्हीच बनविली पाहिजे असें उत्तर दिलें.

वर ज्या अनेक राष्ट्रांच्या घटनांचा इतिहास आपण पाहिला, त्यावरून घटनापरिषदेकरतां सशस्त्र क्रांति व्हावी लागते सत्ता हिसकावी लागते, राज्ययंत्र मोडून पडावें लागतें तरच घटनापरिषद सशास्त्र होते असा अनुभव नाहीं. फ्रान्सचा जो विस्तारानें इतिहास दिला आहे, त्यावरून तेथील घटनापरिषद क्रांतीपूर्वी दोन वर्षे भरली होती असें दिसून येतें. रशियांत क्रांति झाली; पण सर्व लोकांची घटनापरिषद आपल्या अंगलट येईल असें पाहून सोव्हिएटांनीं ही परिषदच उधळून लावली. सशस्त्र क्रांतींच्या देशांचा व घटनापरिषदांचा असा हा इतिहास आहे. यानंतर क्रांति न झालेले व नव्यानें जन्माला आलेले जे दोन पोलंड व झेकोस्लोव्हाकिया देश तेथें घटनापरिषदा भरल्या व त्यांनीं आपल्या घटना बनविल्या. जर्मनी व ऑस्ट्रिया बादशहांच्या अंमलाखालून सुटल्यानंतर आपापल्या घटना, घटनापरिषदेच्या मार्गानें बनवित्या झाल्या. या दोन देशांत प्रौढ मतदान होतें. आतां उरलेल्या ब्रिटिशांच्याबरोबरीच्या वसाहती. त्यांच्या घटना आपण तयार केल्या नाहींत, असें सायमनच सांगतात.

कानडा, ऑस्ट्रेलिया व द. आफ्रिका यांचें संयुक्त राज्य व्हावयाचें असल्या-मुळें त्या संयुक्त राज्यांत येणाऱ्या घटकांचे प्रतिनिधि एकत्र आले, आपल्या घटना त्यांनीं तयार केल्या, त्या घटना घटकांकडून मान्य करून घेतल्या आणि शेवटचें शिक्कामोर्तब ब्रिटिश पार्लमेंटकडून करून घेतलें. आयर्लंडमध्यें असें संघराज्य नव्हतें.म्हणून आयर्लंडनें घटनापरिषद भरवून आपली घटना केली. तेव्हां आक्षेपकांचा पहिला आक्षेप हा फोल ठरतो.

दुसरा आक्षेप घटनापरिषद भरविणें अशक्य असा आहे. ब्रिटिश सर-कारकडून तो घेतला जातो. हिंदुस्थानांतील २८ कोटी लोकांपैकीं २१ वर्षां-वरील १५ कोटी लोकांचे मतदारसंघ करणें, निवडणुका करणें अशक्य आहे, असें त्यांना वाटतें. पण सरकारला खरी भीति या खटाटोपाची वाटत नसावी. सारी जनता घटनापरिषदेच्या निमित्तानें तळापासून हलवली गेली, तर आपलें राज्यच संपलें अशी त्यांना भीति वाटत असावी. त्यांना ज्या कारणाकरतां घटना परिषद नको, त्याच कारणाकरतां आम्हाला ती हवी आहे. नाहीं तर लोकांना आपल्या हक्कांची जाणीव कशी व्हावी व आपण कोणी तरी विचारांत घेतली जाणारी वस्तु आहों हें केव्हां वाटावें? घटनापरिषदेच्या द्वारें जातीय प्रश्न सोडविण्याचे जर काँग्रेसनें जाहीर केलें नसतें तर घटना परिषदेचा प्रश्नच उद्भवला नसता. तो समान दर्जा मिळालेल्या राष्ट्राचा हक्क आहे व तो हक्क इंग्रजांच्याकडे मागणी न करतां आम्ही बजावला असतां. तेव्हां निवडणुकीच्या अडचणी या खोट्या आहेत. जबाबदारी टाळण्याचें तें उत्तम साधन आहे.

तिसरी अडचण–घटनापरिषदेंत हिंदुंचें बहुमत होणार असल्यामुळें अल्पसंख्याकांचें हितरक्षण होणार नाहीं अशी आहे. घटनापरिषदे-सारख्या लोकशाहीचें खरें प्रतिबिंब पडलेल्या सभेंत जर हें हितरक्षण होणार नसेल, तर छोट्या परिषदेंत तें बिलकूल होणार नाहीं. कारण अल्पसंख्याकांना जादा सवलती द्यायच्या असल्या तर त्या सर्वांच्या मतानें दिल्या, तरच टिकावू होतील. चार डोकीं एकत्र बसून त्यांनीं कांहीं करार केले तर त्यांच्या डोक्यावर बहुसंख्येचें अनहित केल्याचें

खापर सारखें फुटत राहील. आज काँग्रेसवर हे आरोप होत आहेतच; व हिंदुतहि असा एक जातीय पक्ष अस्तित्वांत आला आहेच. तेव्हां अल्पसंख्याकांना आपलें हक्करक्षण थोड्या लोकांकडून होण्याऐवजीं सगळ्या लोकांकडून झालेलें अधिक चांगले असें का वाटूं नये ? घटना-परिषदेंत हिंदूंच्या बहुमताची जर भीति तर छोट्या परिषदेंत ती कां नाहीं ? कां छोटया परिषदेंत हिंदूंना कमी मतें मिळणार अशी आक्षेपकांची कल्पना आहे ? अर्थात राऊंड टेबलसारखी सरकारनियुक्त कमिटी बसली तर तेथें सरकार बहुमतवाल्यांना अल्पसंख्याक बनवूं शकतें हें आपल्या चांगल्या अनुभवाला आलें आहे. म्हणूनच म. गांधी व काँग्रेसनें अशा गोलमेज परिषदांचा धिक्कार केला आहे.

पण अल्पसंख्याकांना खरी भीति असली तर ती बहुसंख्याकांची नाहीं. त्यांना आपल्याच अनुयायांची भीति वाटते. कारण त्याचे स्वयंमन्य पुढारी वाटेल तसें वर्तन करून गरीबांच्या हितावर तिलांजली देत असतात. हें त्यांचें स्वतःची प्रतिष्ठा टिकविण्याचें वर्तन उघडें पडेल व त्यांचें पुढारीपण जाईल, ही खरी भीति त्यांना वाटत असावी. मुसलमान समाज हा अद्याप जुन्या सरंजामशाही व जमिनदारी पद्धतीवर आधारलेला आहे. त्यामुळें गरीब जनतेचें जन्मजात पुढारी मोठाले श्रीमंतच आहेत.

पण कांहींहि असलें तरी घटनापरिषदेशिवाय हे जातीय वाद मिटणार नाहींत. आजपर्यंत हे वाद मिटविण्याचे अनेक प्रयत्न झाले. सर्वपक्षीय परिषदा झाल्या, उभयपक्षीय परिषदा झाल्या, मोठमोठ्या व्यक्तींनीं विचार विनिमय केले; पण या वादाचें उच्चाटन झालें नाहीं. आतां घटना-परिषदेचा एकच मार्ग उरला आहे. तो तरी समर्थ आहे किंवा नाहीं याची आपण परीक्षा घेऊं. अर्थात काँग्रेसला अल्पसंख्याकांचें अहित करावयाचें नाहीं; त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना आपले अंकित करावयाचे नाहीं. सर्व हिंदुस्थान एक समजून प्रत्येक माणसाला सुखी, समाधानी, राष्ट्राचा उत्तम नागरिक बनवावयाचा आहे. या सद्धेतूबद्दल कोणी शंका घेऊं नये.

मुसल्मान हे अल्पसंख्याकहि नाहींत. राष्ट्रसंघाच्या व्याख्येप्रमाणें ते शेकडा २० टक्क्यापेक्षां अधिक असल्यामुळें अल्पसंख्याक नाहींत असें कॉंग्रेसचें म्हणणें आहे. ते अल्पसंख्याक नाहींत, त्यांचा प्रश्न जातीय नाहीं राजकीय आहे. पण जातीयतेच्या नांवाखालीं, त्यांना बहुसंख्याकांवर हुकमत चालवावयाची आहे असेहि कॉंग्रेसचे पुढारी म्हणत आहेत. पण या सर्व प्रश्नांचा निकाल घटनापरिषदेशिवाय होणार नाहीं. त्या परिषदेवर या अल्पसंख्याकांनीं बहिष्कार घातला तर त्याहि आपत्तीला तोंड देण्याची तयारी पाहिजे. त्यांना न्याय्य असेल तें द्यावें एवढेंच नव्हें तर औदार्यानें थोडेसें जास्तच द्यावें; पण ते लोकशाहीवर आघात करूं लागले तर राष्ट्राचें कायमचे अनहित होईल.

चवथा आक्षेप असा आहे कीं, अजून लोक अज्ञानांत आहत, त्यांना आपले हक्काची जाणीव नाहीं. अशा निद्रिस्त लोकांच्या नांवावर हुशार राजकारणी लोक आपले प्रातिनिधित्व मिरवतील व त्यांचा फायदा घेतील. पण निद्रिस्त लोकांच्या अज्ञानाचा फायदा राष्ट्रीय वृत्तीचे लोक घेत नसून जातीय वृत्तीचे लोकच घेतात. अशा झोपलेल्यांना जागे करण्याकरतां त्यांच्या हक्कांचें प्रचारद्वारां शिक्षण देणें हाच त्यांची झोंप घालवण्याचा खरा मार्ग आहे. त्यांचें मतदानाचे हक्क हिरावून त्यांचें कल्याण कसें होणार ? लायकी ही प्रसंगानें येते, ती प्रसंग टाळून येत नाहीं. स्वतंत्र देशांत प्रत्येकाला मतदानाचा हक्क मिळावा लागतो. लोकशाहीचा तो मूलभूत सिद्धांत आहे. २१ वर्षांच्या मनुष्याजवळ पैसा नसला तर तो त्याचा गुन्हा नाहीं, त्याला शिक्षण नसलें, तर त्याची जबाबदारी सरकारवर आहे. तेव्हां अज्ञानाच्या या सबबी स्वार्थीय दृष्टीच्या आहेत. अशा प्रकारें हे चारहि आक्षेप फोल आहेत.

घटनापरिषदेला प्रौढ मत द्या असा आग्रह कॉंग्रेस धरीलच असें नाहीं, त्या बाबतींत तडजोड होऊं शकेल. पण जी घटनापरिषद भरावयाची ती जास्तींत जास्त लोकांना मतदानाचे हक्क देऊन भरवली पाहिजे एवढेंच त्यांचे म्हणणें. ही परिषद भरवण्याला अनेक वर्षेंहि लागणार

नाहींत. सहा महिन्यांत अगर वर्षांत ही परिषद बोलवतां येईल. तसेंच घटनापरिषद ह्या शब्दानाहि विरोध करण्याचें कारण नाहीं. तो शब्द क्रांति किंवा रक्तपातानें दूषित झालेला नाहीं. त्याच्यापेक्षां घटनापरिषदेंत अंतर्धान होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेसारखा जास्त योग्य शब्द सर्वांनीं मान्य केला तरी चालण्यासारखें आहे. पण घटनापरिषद या शब्दांत जो स्वातंत्र्याचा ध्वनि प्रतीत होतो, तो दुसऱ्या शब्दांत होणार नसल्यामुळें दुसरा शब्द सुचविणें कठीण आहे. तथापि अर्थ निश्चित करून शाब्दिक भांडणें सोडून द्यावीं.

घटना परिषद जी पाहिजे ती खालील कारणाकरतां पाहिजे. ( १ ) ती स्वातंत्र्याची निदर्शक आहे. ( २ ) त्या परिषदेंत राष्ट्रांतील व्यक्तींच्या मूलभूत हक्कांची, धार्मिक स्वातंत्र्याची, संस्कृती, भाषा, वगैरेंची घोषणा करतां येईल. ( ३ ) लोकशाहीला खरी सुरवात तीपासून होईल. ( ४ ) लोकांना आपल्या हक्काचें शिक्षण देतां येईल. ( ५ ) जातीय व अन्यवाद हे तिच्यामुळेंच मिटतील. ( ६ ) स्वयंनिर्णयाला ती जन्म देणारी आहे.

म. गांधी म्हणतात, मला आतां घटना परिषदेबद्दल जास्त जास्त प्रेम वाटू लागलें आहे आणि तें खरेंहि आहे. लोकशाहीबद्दल आपण गप्पा मारावयाच्या व लोकांना आपले मताधिकार उपभोगूं द्यावयाचे नाहींत, हें प्रामाणिकपणाचें नाहीं. लोकक्षोभाचा परिणाम इतर देशांत कसा झाला, हें इतिहास सांगतो. त्याची पुनरावृत्ती कॉंग्रेसला व्हावयास नको आहे व सरकारनें तो प्रसंग आपल्यावर ओढवून घेऊं नये. कॉंग्रेसला नुसता जातीय किंवा साम्राज्यविषयक प्रश्नच सोडवावयाचा नाहीं. आर्थिक प्रश्नांच्या जाणीवेनें उद्भूत होणारे वर्गावर्गांमधील प्रश्नांनाहि तोंड द्यावयाचें आहे. त्या सर्वांना घटनापरिषदच उपयोगीं पडणार आहे.

---

# भाग १२ वा.

## हिंदुस्थान व घटनापरिषद.

हिंदुस्थानांत घटना बनविण्याचा प्रयत्न १९१९ च्या सुधारणा येण्यापूर्वी झाला होता. काँग्रेस होमरूल स्कीम व बिझांट-बाईची कॉमनवेल्थची योजना त्यावेळीं निघाली होती. त्यानंतर मोठा प्रयत्न नेहरूकमिटीच्या वेळचा. हे व इतर प्रयत्न कांहीं थोडया व्यक्तींनीं केले होते. आपल्या योजना बनवून हे पुढारी जनतेकडे गेले व त्यांच्यांत या योजनांचा त्यांनीं प्रचार केला. घटनापरिषदेंतहि तुम्ही दुसरें काय करणार असा प्रश्न विचारला जाईल. थोडे लोकच एकत्र बसून घटना बनवतील हें खरें आहे. पण त्यांच्या मागें सर्व प्रतिनिधींचें पाठबळ असेल, सर्व प्रतिनिधींच्या संमत्तीनें घटना बनविणारे प्रतिनिधि निवडले जातील व त्यांनीं तयार केलेली घटना मान्य होईल म्हणून तिला महत्त्व येईल. कायदेशीर दृष्टीनें विचार केला तर घटना बनविण्याला दुसरी पद्धतच संभवत नाहीं. देशाचें राज्य म्हणजे सार्वभौमत्व हें लोकाकडे आल्यानंतर लोकांनींच घटना बनविलीं पाहिजे. हेंच लोकशाहीचें मूळ तत्त्व आहे. पण अजूनहि हें सार्वभौमत्व ब्रिटिशांकडे आहे, म्हणून ते आम्हाला घटनापरिषद बोलवूं

देत नाहींत. पण जर हें सार्वभौमत्व लोकांकडे आलें म्हणजेच हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर आमची घटना बनविण्याचा अधिकार हा ब्रिटिशांच्याकडे जाणार नाहीं किंवा हिंदुस्थानांतील मूठभर लोकांच्याकडे जाणार नाहीं. तो सर्व जनतेचा हक्क आहे व तिनेंच तो बजावला पाहिजे.

सध्यांच्या कायद्याप्रमाणें आम्हाला ही घटना बनविण्याचा अधिकार नाहीं. तो पार्लमेंटला आहे. कारण हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता ही राजाकडे आहे. म्हणून आमची कायदेमंडळें दुय्यम दर्जाचीं ठरतात. तीं श्रेष्ठ ठरत नाहींत. "मामुली पद्धतीनें जर एखाद्या कायदेमंडळाला कांहीं कायदे करता येत नसले तर ते विशिष्ठ कायदेमंडळ वरिष्ठ नाहीं असें ठरते. अशा बाबतींत जे कायदे असतात ते घटनेचे कायदे असतात. ते कायदे बदलत्या घटनेप्रमाणें करतां येत नाहींत. तो कायदा वरिष्ठ असतो. या दोन कायद्यांतील फरक ओळखण्याची साधी रीत म्हणजे हे न बदलणारे कायदे कसें अस्तित्वांत आले ते पहाणें होय. पुष्कळ बाबतींत हे घटनाकायदे विचारविनिमय करून खास लोकांच्या मंडळाकडून केले जातात. त्या मंडळाला घटनापरिषद असें म्हणतात. या घटनापरिषदेचें काम सामान्य कायदे करण्याचें नसतें." वरील उतारा हा सी. एफ्. स्ट्रॉंग यांच्या मॉडर्न पोलिटिकल कॉंस्टीटयूशन्समधील आहे. त्यावरून घटनापरिषद बोलावणें व घटना करणें ह्याचा व क्रांतीचा संबंध नाहीं, तें काम प्रत्येक वरिष्ठ सत्ता प्राप्त झालेल्या सरकारचेंच असतें हें सिद्ध होते. हिंदुस्थानमध्यें पूर्वीं जे तीन प्रयत्न झाले त्याचा वर उल्लेख केला आहे. पण त्यांत घटनापरिषदेला आवाहन दिलें नव्हतें. घटनापरिषदेच्या आवाहनाची कल्पना हिंदुस्थानांत १९३१ मध्यें कराची कॉंग्रेसचे वेळीं निघाली. त्या वेळीं कॉ. रॉय हे तेथें आले होते. त्यांच्याच प्रोत्साहनानें कॉंग्रेसचे अधिवेशन चालू असतां एके दिवशीं तेथें सगळीकडे हिंदुस्थानला घटनापरिषद पाहिजे' अशी वाक्यें असलेलीं तांबडीं फडकीं फडकावण्यांत आली. ही घोषणा करणारांनीं तीन गोष्टी अभिप्रेत आहेत असें ध्वनित केलें. एक

हिंदुस्थानांत राज्यक्रांती झाली पाहिजे; ही क्रांती राष्ट्रीय लोकशाही स्वरूपाची झाली पाहिजे. घटनापरिषदेंत जनतेचें प्राबल्य होणार असल्यामुळें या घोषणेंत समेटानें सत्ता पालट ही गोष्ट गृहीत धरली नव्हती. सत्ता काबीज करणें गृहीत धरलें होतें.

कराची कॉंग्रेसनंतर म. गांधी राऊंडटेबलला जाऊन आले. तेथें कॉंग्रेस ही सर्व राष्ट्राची प्रतिनिधी आहे हा सिद्धांत जातिभेदाच्या खडकावर फुटून छिन्नभिन्न झाला. नंतर कायदेभंग सुरू झाला व तीन वर्षें कॉंग्रेसचीं अधिवेशनें मामुली पद्धतीनें झाली नाहींत. १९३४ च्या ऑक्टोबर महिन्यांत मुंबईला कॉंग्रेस अधिवेशन झालें.त्या अधिवेशनाच्या पूर्वी जूनच्या १७ तारखेला वर्किंग कमिटीची सभा मुंबईस भरली होती. त्या वेळीं मध्यवर्ती कायदेमंडळांतील निवडणुका कॉंग्रेसनें लढविण्याचें ठरलें होतें. निवडणुका म्हटल्या म्हणजे मतभेद आलेच. जातीय निवाड्याबाबत कॉंग्रेसमध्यें दोन पक्ष होऊं लागले होते. मालवीय, अणे हे जातीय निवाड फेटाळावा या मताचे तर कॉंग्रेस त्या बाबतींत तटस्थ रहावें या मताची. जून महिन्यांत भरलेल्या वर्किंग कमिटीनें जातीय निवाड्याबाबत व श्वेतपत्रिकेबाबत आपलें मत प्रदर्शित करणारा ठराव केला. त्यांत घटनापरिषदेचा उल्लेख आहे. घटनापरिषदेमुळें १९३५ चा कायदा रद्द होईल व तो रद्द झाला म्हणजे जातीय निवाडा आपोआप गळेल असें तेव्हां प्रतिपादन केलें गेलें. आजच्या कॉंग्रेसच्या अगर म. गांधींच्या भूमिकेशीं तो ठराव पूर्णपणें सुसंगत आहे. त्यांत बिलकूल बदल झाला नाहीं. जातीय प्रश्न हा अंतर्गत संबंधाचा प्रश्न आहे, त्या प्रश्नाशीं सरकारला कर्तव्य नाहीं व तो आम्ही आपसांत सोडवूं ही कॉंग्रेसची भूमिका तेव्हांहि होती व आजहि आहे. हिंदुस्थानच्या घटनेबद्दल हीच भूमिका होती. वर्किंग कमिटीचा घटनापरिषदेसंबंधींचा अगदीं पहिला ठराव म्हणतो 'श्वेतपत्रिकेला दुसरा समाधानकारक विकल्प म्हणजे प्रौढाना मत देऊन किंवा जास्तींत जास्त त्याच्या जवळचे मताधिकार देऊन घटनापरिषदेच्या मार्फत घटना

तयार करणें हा आहे. या घटनापरिषदेला मुख्य मुख्य अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी त्यांच्याच मतदारसंघानें जरूर असल्यास सर्वस्वीं निवडावें.* हा ठराव झाला त्यावेळीं पं. जवाहरलाल नेहरू हे तुरुंगांत होते. तसेच वल्लभभाई व खान अबदुल गफरखान हेहि मुक्त झाले नव्हते. घटनापरिषदेचा ठराव हा जवाहरलाल यांच्या गैरहजिरींत तयार झाला असल्यामुळें त्यांच्याच प्रोत्साहनानें तो ठराव झाला असें नाहीं. घटनापरिषदेची कल्पना अन्यथा मान्य असल्यामुळें तो ठराव पास झाला.

पं. जवाहरलाल नेहरूंना तुरुंगांत हा ठराव पास झाल्याचें वाचून आनंद झाला. राष्ट्रीय घटनेचा प्रश्न सोडविण्यास दुसरा मार्गच नाहीं असें ते आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात. "कधीं ना कधीं ही परिषद भरलीच पाहिजे अशी माझी खात्री आहे. ब्रिटिश सरकारच्या संमतीशिवाय ती भरणार नाहीं हें उघड नाहीं; किंवा यशस्वी राज्यक्रांती तरी स्वतंत्र परिषद भरण्याकरतां झाली पाहिजे. सरकारची संमती सध्यां तरी मिळणार नाहीं....निमसरकारी रीत्या या परिषदेला सरकारची हरकत नाहीं असें प्रसिद्ध झालें. त्यांना वाटलें सर्वपक्षीय परिषदेप्रमाणें ही परिषदहि अयशस्वी होईल. पण नंतर त्यांना त्यांतील धोके व त्या कल्पनेंतील शक्यता कळून आली व ते या परिषदेला विरोध करूं लागले." हिंदी पुढारीहि घटनापरिषदेला सर्वपक्षीय सभेचें स्वरूप देऊं लागलें असें

---

**The only satisfactory alternative to the white paper is a Constitution drawn up by constituent assembly elected on the basis of adult suffrage or as near it as possible with the power if necessary to the important minorities to have their separate representatives' elected exclusively by the electors belonging to such minorities.*

**The only satisfactory alternative to the white paper is a Constitution drawn up by constituent assembly elected on the basis of adult suffrage or as near it as possible with the power if necessary to the important minorities to have their separate representatives' elected exclusively by the electors belonging to such minorities.*

जवाहरलालनी म्हटलें आहे. जवाहरलाल जरी मुंबईकाँग्रेसला हजर नसले तरी घटनापरिषदेबद्दलची त्यांचीं मतें प्रकट झालीं होतीं. १९३३मध्येंच त्यांनीं विलायतच्या एका पत्रांत आपली ही योजना मांडली होती. पं. मालवीय ह्यांनीं जातीय निवाडयाच्या ठरावावर १९३४ च्या मुंबईकाँग्रेसमध्यें उपसूचना मांडतांना पं. जवाहरलाल यांच्या घटनापरिषदेच्या उपायाचा उल्लेख केला होता. म. गांधींनाहि तो मार्ग मान्य असल्याचें मालवीयजी म्हणाले होतें.

घटनापरिषदेचा अंतर्भाव होणारा ठराव मुंबईस डॉ. अन्सारी यांनीं मांडला. मुंबई कॉंग्रेसनंतर लगलीच महिन्यानें पाटणा येथें वर्किंग कमिटीची सभा झाली. या सभेनें जॉईंट पार्लमेंटरी कमिटीच्या रिपोर्टावर मत प्रदर्शन करतांना पुनः घटनापरिषदेनें तयार केलेल्या घटनेशिवाय कोणतीहि घटना समाधानकारक होणार नाहीं असें म्हटलें. अशा प्रकारें १९३४ सालीं घटनापरिषदेच्या मागणीला सुरवात झाली. त्याच सालीं मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकाकरतां जो जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला, त्यांत व्हाईट पेपर त्याज्य ठरवून घटनापरिषदेचा कॉंग्रेसचा ठराव अंतर्भूत केला होता.

१९३५ सालीं कॉंग्रेस अधिवेशन झालेंच नाहीं. पण १९३६ च्या लखनौ कॉंग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू असतांना त्यांनीं आपल्या भाषणांत घटनापरिषदेवर जोर दिला होता. 'आपल्या राजकीय व जातीय प्रश्नांचा निरास घटनापरिषदेनेंच होईल. वयांत आलेल्यांना मताधिकार देऊनच ही परिषद बोलावली जावी. ही परिषद अर्धवट क्रांतीची परिस्थिति (Semi Revolutionary situation) निर्माण झाल्याशिवाय भरणार नाहीं....ती केव्हां होईल हें मला सांगवत नाहीं....या घटनापरिषदेचे प्रतिनिधी ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीबरोबर तह करतील' वगैरे विचार त्यांनीं बोलून दाखविले. त्या कॉंग्रेसच्या बैठकींतहि घटनापरिषदेबद्दल उल्लेख करण्यांत आला. पूर्वीच्यापेक्षां नवे विचार त्या

ठरावांत नव्हते. फक्त प्रांतिक कायदेमंडळांतून घटनापरिषदेची मागणी करणारे ठरावहि पास करावेत असा आदेश दिला. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकींचा जो जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला, त्यांतहि घटनापरिषदेचा पुरस्कार केला आहे. त्यानंतर फैजपूर काँग्रेस झाली. त्याहि काँग्रेसमध्यें घटनापरिषदेचा पुरस्कार पंडीतजींनीं केला. फैजपूर काँग्रेसमध्यें घटनापरिषदेचा ठराव पास झाला. या घटनापरिषदेच्या बाबतींत दोन विचारप्रवाह वहात होते. एका प्रवाहाचे पुरस्कर्ते म्हणत असत कीं, घटनापरिषद ही सत्ता काबीज केल्यानंतरच येऊ शकते. दुसरा पक्ष सत्तेची बदल झाल्यानेंहि घटनापरिषद होऊ शकते असें म्हणे. फैजपूर काँग्रेसच्या ठरावांत सत्ता बदल झाल्यानें आणि लोकांच्या हातीं सरकारचा परिणामकारक ताबा आल्यानें जी खरी लोकशाही स्थापन होऊं शकते; तिच्याकरतां काँग्रेस झटत आहे असें म्हटलें आहे. *The congress stands for a genuine democratic state in India where political power has been transferred to the people as a whole and the Government is under their effective control.*

*Such a constitution, in its opinion must be based on the independence of India as it can only be frame by a constitutent assembly.*

यानंतर झालेल्या काँग्रेस अधिवेशनांतहि घटनापरिषदेवर जोर दिलेला आढळून येतो. हरिपुरा काँग्रेसमध्यें श्री. सुभाषबाबू यांनीं आपल्या भाषणांत वर्किंग कमिटीच्या घटनापरिषदेच्या ठरावाचा पुरस्कार केला. त्या काँग्रेसमध्येंहि घटनापरिषदेचा ठराव पास झाला. त्रिपुरी काँग्रेसनेंहि आपल्या राष्ट्रीय मागणीच्या ठरावांत हीच घटनापरिषद मान्य केली. अगदीं अलिकडे २३ नोव्हेंबर १९३९ रोजीं अलाहाबादला भरलेल्या वर्किंग कमिटीच्या सभेंत त्याच परिषदेवर जोर दिला आहे. त्या ठरावांत

असें म्हटलें आहे ' ब्रिटिश धोरणावरील साम्राज्यशाहीचा डाग नष्ट होण्याकरतां आणि काँग्रेसला ( युद्धांत ) सहकार्याचा विचार करण्यास संधी देण्याकरतां हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता देऊन घटनापरिषदेच्या मार्गानें आपली राज्यघटना तयार करण्याचा जनतेचा हक्क प्रथम कबूल केला पाहिजे. स्वातंत्र्य व लोकशाहीचीं तत्त्वें मान्य करणारा कोणताहि माणूस घटनापरिषदेला विरोध करू शकणार नाहीं. जातीय व इतर अडचणी सोडविण्याचा घटनापरिषद हाच एक मार्ग आहे. '

या सर्व ठरावांचा इतिहास पहातां आपल्याला असें दिसून येतें कीं, काँग्रेसचा घटनापरिषदेच्या मागणीवर पूर्ण विश्वास आहे. तिनें हे ठराव १९३४ पासून प्रत्येक काँग्रेसमध्यें केलेले आहेत. काँग्रेसनें हे ठराव पास करून आपल्या स्वातंत्र्याची मागणी मान्य करावी असें सरकारला सांगितलें आहे. त्यांत सत्ता काबीज करण्याचें धोरण दिसत नसून सत्तेच्या बदलाचीच भूमिका घेतलेली आहे. ही सत्ता विशिष्ट पक्षांकडे बदलून यावी असें काँग्रेस म्हणत नसून ती सत्ता जनतेकडे यावी असें म्हणत आहे.

घटनापरिषद कोणी बोलवावयाची, कशी बोलवावयाची याबद्दल काँग्रेसच्या ठरावांत मुग्धता दिसून येते. त्याचें कारण उघड आहे. जोंपर्यंत स्वातंत्र्य मान्य झालें नाहीं, तोंपर्यंत पुढच्या योजना करीत बसणें हें निरर्थक असतें. पण हें स्वातंत्र्य सरकार मान्य करीपर्यंत काँग्रेस स्वस्थ बसेल असा त्याचा अर्थ नाहीं. त्याकरतां सत्याग्रहहि करावा लागेल हें पुढाऱ्यांच्या भाषणावरून व मनोवृत्तीवरून उघड दिसतें. क्रांतीशिवाय ब्रिटिशांच्या संमतीनें आणि क्रांती झाली असतां स्वयंमेव क्रांती करणारे घटनापरिषद बोलवूं शकतील.

घटनापरिषद ही फार मोठी असतां कामा नये. ३५० ते ५०० पर्यंत प्रतिनिधी या परिषदेचे असावे. हिंदुस्थानांतील ११ प्रांताचे ॲसेंब्ली सभासद १५८५ आहेत. त्यांत ४८२ मुसलमान आहेत. ही संख्या एकपंचमांश करावी आणि आहे तेच मतदारसंघ कायम ठेवावे. वयांत आलेल्यांना मताधिकार द्यावयाचा असल्यामुळें मतदारांची संख्या वाढेल.

ही परिषद भरल्यानंतर तींतूनच निरनिराळ्या उपसमित्या निरनिराळ्या विषयाकरतां नेमल्या जाव्या. गोलमेजपरिषदेंत हाच उपक्रम केला होता. त्या कमिट्यांचे अहवाल जाहीर बैठकीपुढें यावेत व हे सर्व अहवाल एकत्र करून घटना तयार करावी. ही घटना सर्वमान्य झाल्यावर ती प्रत्येक कायदेमंडळाकडून मान्य करून घ्यावी. अर्थात सबंध देशाची घटना ही फेडरल पद्धतीची असेल व त्या घटनेप्रमाणें होणाऱ्या निवडणुकींत संस्थांनी प्रजेचे प्रतिनिधी येतील. ह्या घटना परिषदेंत संस्थांनीं प्रजेचे प्रतिनिधी येतील किंवा नाहीं याबद्दल काँग्रेसचे ठराव मुग्ध आहेत. त्याचें कारणहि उघड आहे. संस्थानें हीं ब्रिटिशांच्या अधिराज्याखालीं आहेत. हें अधिराज्य हिंदुस्थानांतील जनतेच्या सार्वभौम सत्तेकडे संक्रांत करतांना संस्थानचे जे अधिराजे ब्रिटिश सरकार त्यांच्याबरोबर तह करावा लागेल. ह्या तहाच्या अटी काय असाव्यात, ते घटनापरिषदेनें निवडलेलें मंडळ ठरवील. ज्याप्रमाणें ब्रिटिश सरकारचे हक्क, भांडवल, कर्ज, वगैरेबद्दल सत्ता संक्रांतीचे वेळीं तहनामे होतील, त्याप्रमाणेंच संस्थानिकांचें जुने तहनामे, त्यांचें हक्क, सवलती, वगैरेबद्दलहि तहनामे होतील. हे तहनामे घटनापरिषदेचे प्रतिनिधीच करूं शकतील. त्या तहनाम्यांत संस्थानी प्रजा व संस्थानिक यांचें परस्परसंबंधाविषयीं अटी ठरतील. अर्थातच संस्थानांत लोकशाही स्थापन झाली पाहिजे हें ओघानेंच येईल. पहिल्या घटनापरिषदेंतच सर्व प्रश्नांचा निकाल लागेल असें नाहीं. पहिल्या बैठकींत तहनामे, अल्पसंख्याकांचे प्रश्न, संस्थानी प्रजेचे व संस्थानिकांचे अधिकार वगैरे गोष्टी निश्चित होऊन हंगामी सरकारकडे सत्ता येईल. पुढें घटना तयार करण्याच्या कामाला सुरवात होईल व त्यावेळीं संस्थानांत निवडणुका होऊन संस्थानी प्रतिनिधी घटना बनविण्याकरतां येतील. संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी घटनापरिषदेंत आल्याशिवाय संबंध हिंदुस्थानला लागू होणारी फेडरल घटना तयार करणें शक्य नाहीं. जी घटना बनवितांना संरक्षणाचा खर्च, प्रांतीवरील कर वगैरे संस्थानांनीं विभागून घेतलाच पाहिजे. आज ते हिंदुस्थानच

फायदा घेतात, माल हिंदुस्थानला पैसा देत नाहीं. संस्थानी प्रजेला जर बोलावलें जाणार नाहीं, तर ती घटना ते मान्यहि करणार नाहींत व आम्हालाहि त्यांच्यावर अशी घटना लादतां येणार नाहीं.

ही घटनापरिषद फ्रान्सप्रमाणें दोन वर्षें बसतां कामा नये किंवा जर्मनीप्रमाणें एका आठवड्यांत समाप्त होतां कामा नये. साधारणपणें वर्षाच्या आंत तिचें काम संपावें. यापेक्षां जास्त काळ लागल्यास विध्वंसक साधनें जोरावतात व कार्य करणें अशक्य होते. सायमनकमिशनचें उदाहरण आपल्यापुढें आहेच. तीन वर्षेंपर्यंत हें कमिशन काम करीत राहिलें. देशांत अनेक प्रश्न निर्माण झाले व शेवटीं तो रिपोर्ट रद्द झाला. पण याचा अर्थ घाईघाईनें कांहीं तरी करून टाकावें असा नाहीं.

हिंदुस्थानच्या फेडरल कोर्टाचे न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांनीं घटनापरिषदेऐवजीं छोटीशी परिषद भरविणें कसें हितप्रद आहे याचें वर्णन केलें आहे. वसाहतींनीं छोट्या सभा भरविल्या व आपल्या घटना तयार केल्या तेव्हां घटनापरिषदेपेक्षां छोट्या परिषदा याच जास्त कार्यक्षम असतात असें ते म्हणतात. लहान परिषदेंत निरनिराळ्या गटाचीं माणसें एकत्र येतात, परस्परांना परस्परांच्या मनावर छाप पाडतां येते आणि सर्व जण कार्यतत्पर असल्यामुळें सलोखा करणें शक्य होतें. घटनापरिषद ही अवाढव्य, दीर्घ काल चालणारी व कंटाळवाणी पद्धत आहे असें त्यांचें म्हणणें. तेव्हां हिंदुस्थानला आधीं सलोखा, नंतर घटना व शेवटीं सुव्यवस्थित व सुखप्रद राज्यकारभार या तीनहि गोष्टी साधावयाच्या असल्यामुळें मॉरिस ग्वायर यांनीं हा उपदेश केला आहे. त्यांच्या हेतूबद्दल आपण त्यांना धन्यवाद देऊं. पण घटनापरिषद हिंदुस्थानला पाहिजे आहे ती तीन दृष्टीनें पाहिजे आहे. एक तर आजपर्यंतच्या साऱ्या छोट्या परिषदा अयशस्वी झाल्या. त्याला कारण त्या परिषदेंत आलेल्या पुढाऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूप नव्हतें. हें प्रातिनिधिक स्वरूप नसल्यामुळें जमलेले प्रतिनिधि कोणालाच जबाबदार नसत. जबाबदार प्रतिनिधि असल्याशिवाय केलेलीं बोलणीं यशस्वी होत नाहींत. पण प्रतिनिधित्वाला

मर्यादा घातली पाहिजे हेंहि खरें. हजार दीड हजार माणसांची घटनापरिषद ही एक मोठी मजलस होईल. ती कार्यपटु पुढाऱ्यांची सभा होणार नाहीं. म्हणून तीनशे चारशे लोकांची घटनापरिषद कार्यक्षम होण्याला प्रत्यवाय नाहीं. या बड्या सभेंतून एक छोटें मंडळ निर्माण करावें व त्या मंडळाच्या वारंवार बैठकी व्हाव्यात, परस्परानीं परस्परांची मनोवृत्ति पारखावी, एकमेकांच्या मनावर परिणाम करावेत, देशप्रेम, गोरगरिबांचा कळवळा, पारतंत्र्य वगैरेबद्दल भावनापूर्ण विनंत्या कराव्यात व मनें सांधून घ्यावींत. त्यामुळेंच घटना बनविणें व टिकविणें शक्य होईल हें कबूल करावयास प्रत्यवाय नाहीं. अनेक पक्षांच्या पुढाऱ्यांची मनें एका मुशींत ओतून एकरूप झाल्याशिवाय बनविलेली घटना चिरस्थाई होणार नाहीं हें ग्वायर यांचें म्हणणें बरोबर आहे. पण जबाबदार प्रतिनिधीच हा सलोखा घडवून आणतील. व्हाइसरॉयनीं नेमलेले अगर स्वत: एकत्र झालेले पुढारी सलोखा घडवून आणणार नाहींत. निदान पूर्वीचे हे प्रयत्न फसले आहेत म्हणून हा नवा प्रयत्न करणें प्राप्त आहे.

हा प्रयत्न शास्त्रशुद्धहि आहे. हिंदुस्थानला स्वयंनिर्णय पाहिजे आहे, लोकशाही पाहिजे आहे आणि आम्ही घटना बनविण्यास स्वतंत्र आहों याचीहि घोषणा पाहिजे आहे. या सर्वांचा समावेश घटनापरिषदेची मागणी मान्य झाल्याशिवाय अन्यथा होणें शक्य नाहीं. ह्या प्रयत्नांत खरोखरच आम्ही फसलों आणि जातीय सलोखा घडवून आणूं शकलों नाहीं तर तो दोष आमचा ठरेल; ब्रिटिश सरकारवर दोष रहाणार नाहीं. या सर्व परिस्थितीचा विचार करतां कॉंग्रेसच्या घटनापरिषदेच्या मागणींत ग्वायर यांनीं प्रदर्शित केलेली परिस्थिति अंतर्भूत होते, एवढेंच नव्हे तर त्यापेक्षां जास्त व शास्त्रशुद्ध असा मार्ग आचरला जातो. वरील कारणामुळेंच आपण ग्वायर यांचें म्हणणें मान्य न करतां घटनापरिषदेच्या मागणीची तड लावली पाहिजे व ती आज पुरी झाली नाहीं तर आपल्या चळवळींत तिला प्रमुख स्थान दिलें पाहिजे.

अशा प्रकारें आपण घटनापरिषदेचा विचार केला. त्यावरून या परिषदेचें महत्व लक्षांत येतें. आज देशांत क्रांती झाली नसल्यामुळें ब्रिटिश सरकारनेंच ही परिषद बोलावली पाहिजे. ही परिषद बोलावली जाणें याचाच अर्थ आमचें स्वातंत्र्य मान्य झालें असा होतो. पारतंत्र्यांत राहणारीं राष्ट्रें घटना तयार करूं शकत नाहींत. या घटनापरिषदेनें ब्रिटिशांच्या बरोबर तह केला पाहिजे, अल्पसंख्याकांचा, संस्थानिकांचा व ब्रिटिश व्यापारी, नोकर, अधिकारी वगैरेंचा प्रश्न सोडवला पाहिजे आणि नंतर हंगामी सरकार म्हणून त्यांच्या हातीं सत्ता गेली पाहिजे. त्यानंतर घटना तयार करण्याला सुरवात होईल,ती हिंदी कायदेमंडळांत व ब्रिटिश पार्लमेंटांत मंजूर होऊन ठराविक दिवशीं त्या घटनेचा अंमल सुरू झाला, अशी राजघोषणा केली जाईल. अर्थात पुष्कळांना हे महान भयंकर डोंगर कसे चढून जातां येतील याबद्दल शंका वाटते. पण ब्रिटिश सरकारनें आयर्लंड-प्रमाणें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य केल्यावर हे दुर्गम वाटणारे अडथळे आपोआप दूर होतील. आमची तर अशीच इच्छा आहे कीं, हे सर्व प्रश्न सलोख्यानें सुटावेत; पण जर ब्रिटिश सरकार घटनापरिषद न बोलावतां अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवा असें म्हणू लागले तर ब्रिटिशांचे हेतू निःस्वार्थी नाहींत असें ठरून सत्याग्रहाची चळवळ केल्यावाचून गत्यंतर उरणार नाहीं. पण त्यानंतरहि याच पद्धतीनें आपल्या हातीं सत्ता येणार आहे व हिंदुस्थान स्वतंत्र होणार आहे यांत शंका नाहीं.

---

# भाग १३ वा.

## समारोप.

वसाहतीचें स्वराज्य म्हणजे काय, वेस्ट मिन्स्टरच्या स्टॅट्यूटनें त्या स्वराज्यांत काय बदल केली, एका सत्तेकडून दुसऱ्या राष्ट्राकडे सत्ता येण्यास घटनापरिषदच कशी कार्यक्षम होऊं शकेल, याची आपण येथवर चर्चा केली. या चर्चेतील मुख्य मुख्य बाबींचा थोडक्यांत परामर्ष घेऊं व ग्रंथाचा समारोप करूं.

१९२६ सालीं वसाहती ह्या युनायटेड किंगडमच्या बरोबरीच्या आहेत असें ठरलें. दोघांचा दर्जा समान आहे, एक दुसरीपेक्षां कमी नाहीं असें मान्य करण्यांत आलें. ही मान्यता मिळाल्यानंतर १९२६ च्या साम्राज्य-परिषदेंत ज्या ज्या गोष्टी एकमतानें ठरल्या, त्यांना १९३१ च्या वेस्ट मिन्स्टरच्या कायद्यांत अंतर्भूत करण्यांत आलें. हा वेस्टमिन्स्टरचा कायदा समानतेच्या दर्जाचा अर्थ प्रतिपादन करणारा असल्यामुळें तो महत्त्वाचा आहे. त्याचीं कलमें फक्त चाराच आहेत आणि तो पूर्व संदर्भाशिवाय वाचल्यास त्यांत काय गूढ आहे हें लक्षांतहि यावयाचें नाहीं. या कायद्याच्या हेतुकथनामध्यें खालील गोष्टींचा उल्लेख आहे. निरनिराळ्या वसाहती या कोणाच्या आग्रहामुळें किंवा दडपणामुळें एकत्रित आल्या नसून त्या स्वतःच्या

इच्छेनें कॉमनवेल्थमध्यें आल्या आहे. या साऱ्या वसाहतींना आपण एक आहों हें समजण्याचें साधन म्हणजे राजा आहे. तेव्हां राजांच्या गादीवर येण्याबाबत, किताब पदव्या वगैरेबाबत बदल करावयाचा असेल तर तो सर्व वसाहती व युनायटेड किंगडमच्या पार्लमेंटच्या कायद्यांनीं करावा. युनायटेड किंगडमचा कोणताहि कायदा वसाहतींच्या संमती शिवाय त्यांना लागू होणार नाहीं. हा कायदा जो करण्यांत येत आहे तो वसाहतींच्या विनंती वरून करण्यांत येत आहे इतकें प्रास्ताविक हेतु-कथन त्या कायद्यांच्या आरंभीं आहे.

पुढील कलमामध्यें वसाहतींना वाटेल तो कायदा करण्याची परवानगी दिली आहे. तो कायदा इंग्लंडच्या कायद्याच्या विरोधी असला तरी वसाहती असा कायदा करूं शकतील. वसाहतींना परदेशांत असणाऱ्या आपल्या नागरिकांबद्दल कायदे करतां येतील. वेस्टमिन्स्टर स्टॅटयूट-मध्यें हीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. वसाहतींना वाटेल ते कायदे करतां येतात, याचा अर्थ ब्रिटिश साम्राज्यांतून त्यांना फुटून जाण्याचाहि कायदा करतां येईल. या एकाच कलमानें वसाहतींना सैन्य, आरमार, विमानें वगैरे उभारण्यास पूर्ण स्वातंत्र्य मिळते, इतर देशांत वकील पाठवितां येतात, दुसऱ्या राष्ट्राचे वकील आपल्या देशांत ठेवतां येतात, दुसऱ्या देशा बरोबर तह करतां येतात, औद्योगिक स्वातंत्र्य उपभोगतां येतें, कोणाबरोबरहि व्यापारी करारनामे करतां येतात, परदेशाच्या मालावर जकाती बसवितां येतात, रेल्वे, नोकऱ्या वगैरेंवर पूर्ण नियंत्रण ठेवतां येतें, निशाण भाषा वगैरेबाबत स्वातंत्र्य मिळतें, थोडक्यांत अंतर्गत, आंतरराष्ट्रीय, स्वातंत्र्याचे हक्क त्यांना पूर्णपणें उपभोगतां येतात. इतर वसाहतीबरोबरहि त्यांना वाटेल तसे करार करतां येतात आणि साम्राज्यसरकार हें एक बरोबरीचें राष्ट्र समजून त्यांच्या बरोबरहि वाटेल तसे वागता येते; इतके स्वातंत्र्य त्यांना आहे. त्या वसाहती साम्राज्यांत आहेत असें म्हणण्यांत खरोखरीच अर्थ नाहीं, त्या साम्राज्यांत स्वतःच्या फायद्याकरितां आहेत. त्यांची

आत्मरक्षणाची तयारी नाहीं, म्हणून त्यांना इंग्लंडसारख्या बलाढ्य राष्ट्राशीं संबंध ठेवणें आवश्यक वाटतें. आपल्या गरजेकरतां राजनिष्ठेचा तंतु त्यांनीं शिल्लक ठेवला आहे. तो तंतूहि कायद्याचा भाग नाहीं. त्याचा अंतर्भाव प्राक्कथनांत केला आहे, कायद्याच्या कलमांत नाहीं. घटनेच्या दृष्टीनें प्राक्कथनाला महत्त्व असले तरी कायद्यानें त्याला महत्व नाहीं. तेव्हां बरोबरीचा दर्जा याचा अर्थ इंग्लंड जितकें स्वतंत्र राष्ट्र आहे तितक्याच वसाहतीहि स्वतंत्र आहेत. अशा प्रकारचा स्वातंत्र्याचा दर्जा हिंदुस्थानचाहि मान्य करण्यांत आला आहे. इंग्लंड व हिंदुस्थान हीं जर बरोबरीच्या दर्जाचीं राष्ट्रें समजण्यांत येत आहेत तर त्यांत हिंदुस्थानला कमीपणा वाटण्यासारखें काय आहे? हिंदुस्थान हा समान दर्जाचा मानल्यानंतर वसाहतींना एक कायदे व हिंदुस्थानला निराळे कायदे करतांच येणार नाहीं. कारण लॉईड जॉर्जनीं म्हटल्याप्रमाणें जर एखाद्या वसाहतीचा समान दर्जा मान्य केल्यानंतर तिच्या स्वातंत्र्यावर आम्ही आक्रमण करूं लागलों, तर इतर वसाहती आपल्या हक्कावरहि असेंच आक्रमण करण्याची शक्ति इंग्लंडच्या कायद्यांत आहे असें म्हणून त्याला विरोध करूं लागतील. तेव्हां हिंदुस्थानला समानतेचा दर्जा प्राप्त झाल्यावर इतर वसाहतींना जसें संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें, तसें हिंदुस्थानलाहि मिळालें पाहिजे. त्यांत जर डावेउजवे झालें तर समानतेचा अर्थ बदलावा लागेल आणि इंग्रज मुत्सद्यांची घोषणा ही ढोंगीपणाची होती, असें दिसून येईल. ज्या संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा हिंदुस्थाननें केली, तितकें जरी नसलें तरी जवळजवळ संपूर्ण स्वातंत्र्य या दर्जामुळें मिळेल. जवळ जवळ म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, वसाहतीचा दर्जा मिळाल्याबरोबर हिंदुस्थान हा जर्मनी, फ्रान्स, रशियाप्रमाणें एकदम स्वतंत्र होणार नाहीं. तो ब्रिटिश कॉमनवेल्थमधील एक बरोबरीच्या दर्जाचा देश म्हणून राहील. कॉमनवेल्थमधील सभासदत्व कांहींना अपमानकारक वाटेल; पण हें सभासदत्व झुगारून देतां येत नसतें तरच तें अपमानकारक ठरलें असतें. उद्यां हिंदुस्थाननें राजनिष्ठेची शपथ घ्यायची नाहीं असें म्हटलें आणि

त्याहिपुढें जाऊन आपल्याला कॉमनवेल्थशीं कांहीं संबंध ठेवायचा नाहीं असें म्हटलें, तर कायदा करण्याची जी संपूर्ण सत्ता हिंदुस्थानला मिळणार आहे, ती हिंदुस्थानला कॉमनवेल्थमध्यें डांबू शकणार नाहीं. आयर्लंडमध्यें ह्या प्रश्नावर द्वंद्वयुद्ध झालें. डी. व्हॅलेरा व कॉलीन्स ग्रिफिथ यांच्या मतभेदाचें पर्यवसान रक्तपातांत झालें. पण शेवटीं डी. व्हॅलेरानें हा समानतेचा दर्जा मान्य करून कायद्याचा पूर्ण उपयोग केला हें आपल्याला ठाऊक आहे. डी. व्हॅलेरा हा साम्राज्यांतून वाटेल त्या घटकेला आयर्लंडला मुक्त करूं शकेल. तो तसें करीत नसेल तर त्याला कायद्याची आडकाठी आहे म्हणून नव्हे, पण स्वतःच्या देशाला इंग्लंडशीं संबंध ठेवण्यानें फायदा होतो म्हणून होय. त्याची आरमारी, लष्करी व वैमानिक तयारी पूर्ण झाली म्हणजे तो १९२१ चा तहहि पूर्णपणें झुगारून देऊं शकेल व त्याचें तें कृत्य कायद्याशीं विसंगत आहे असें कायदेपंडीतहि म्हणूं शकणार नाहींत. हा प्रश्न आयरिश पार्लमेंटमध्यें आला, तेव्हां ऑर्थर ग्रिफिथ म्हणाले त्याप्रमाणें नुसत्या शब्दाकरतां (quibble of words) डी. व्हॅलेरापक्ष भांडत होता हेंच खरें. हिंदुस्थानांतहि अशीं भांडणें होणार नाहींत असें नाहीं. कॉंग्रेसमध्येंहि कांहींजण असें म्हणणारे निघतील कीं, आमच्या किनाऱ्याचें रक्षण आम्ही करूं किंवा दुसऱ्या राष्ट्राच्या सहाय्यानें करूं; पण इंग्रजांच्याबरोबर आम्ही तह करणार नाहीं.

तथापि आम्ही आत्मसंरक्षणपर होण्यास आम्हाला कोणाच्या तरी रक्षणाची जरूरी लागणार हें उघड आहे. दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राचें आमच्या संरक्षणाला सहाय्य घेतलें तर आम्ही त्या राष्ट्राच्या गुलामगिरींत पडणार नाहीं असें नाहीं. रशियासारखा लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता देशसुद्धां पोलंड व फिन्लंडमध्यें काय करीत आहे, तें आपण पहातोंच. तेव्हां जगांतील कोणत्याहि देशावर हिंदुस्थाननें आपल्या रक्षणाकरतां अवलंबून राहू नये हेंच चांगलें. स्वतःच्या अंगांत ही शक्ति येण्यापूर्वीं आपण इंग्लंडच्याबरोबर करावयाच्या तहांत पांच वर्षांची किंवा दहा वर्षांची मुदत घालून घ्यावी. आयर्लंडनें अशीच मुदत घालून

घेतली आहे. इंग्लंडनें आम्हाला इतके दिवस परतंत्र ठेवून आत्मरक्षणपर केलें नाहीं आणि साम्राज्यांत रहाण्यास भाग पाडलें ही अप्रिय गोष्ट असली तरी ती सत्य आहे. हिंदुस्थानला वसाहतींचा दर्जा मान्य करावयास लागणार असला तर ती स्वेच्छेची गोष्ट नसून नाइलाजाची गोष्ट आहे. आम्ही स्वतःचें संरक्षण म. गांधी म्हणतात त्याप्रमाणें अहिंसेच्या मार्गानें करण्यास समर्थ असतो, तर ही पाळी येतीच ना. पण त्यांतून निश्चितपणें आपण पार पडणार आहों आणि जर्मनी जपानप्रमाणें स्वातंत्र्य उपभोगूं शकणार आहों. हा समानतेचा दर्जा कानडा ऑस्ट्रेलिया, द. आफ्रिका, आयर्लंड हीं राष्ट्रें गोरी असूनहि त्यांनीं मान्य केला. ही गोरीं राष्ट्रें विशेषतः द. आफ्रिका आपल्या ताब्यांतील निग्रोचें रक्त शोषण करून व त्यांना नागवून साम्राज्यशाहीच राष्ट्रें बनत आहेत असा एक आक्षेप म. गांधीनीं घेतला आहे. हा आक्षेप खरा आहे व त्यामुळें इतर वसाहती करीत असलेल्या नागवणुकीला आम्हीहि सहमत आहों असा त्याचा अर्थ होईल आणि आमच्या नीतिमत्तेबद्दल प्रश्न विचारले जातील. पण वसाहती करीत असलेल्या भल्याबुऱ्या गोष्टींवर आम्ही नियंत्रण ठेऊं शकूं अशी कायद्यांतच योजना नाहीं. उदाहरणार्थ हिंदुस्थानचा समानतेचा दर्जा मान्य झाल्यानें दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतींत हिंदी लोकांना अनिर्बंध प्रवेशाला अगर इतर हक्कांना मान्यता मिळेल असे होणार नाहीं. वसाहतींना कायद्याचें स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या जसें चांगले कायदे करूं शकतात तसें वाईटहि करू शकतात. तेव्हां हिंदुस्थान कॉमनवेल्थमध्यें गेला म्हणजे इतर वसाहतींच्या बऱ्यावाईट गोष्टींची बजाबदारी आपल्यावर घेऊं शकेल असें नाहीं. ह्या वसाहती सर्वच सारख्या आहेत असें नाहीं. ऑस्ट्रेलियासारख्या वसाहतींत समाजसत्तावाद्यांचें प्राबल्य आहे. वसाहतींत कोणत्या प्रकारचें राज्य असावें हें कांहीं ठरलेलें नाहीं. कोणतीहि वसाहत पूर्णपणें समाजसत्तावादी होऊं शकेल व त्याला ब्रिटिश सरकार कसा अडथळा करणार? खुद्द इंग्लंडमध्यें

समाजसत्तावादी सरकार आलें तर त्याला इंग्लंड काय करणार? तेव्हां प्रत्येक वसाहत ही स्वयंशासित व स्वतंत्र वसाहत असल्यामुळें तिला वाटेल त्या प्रकारची राज्यघटना तयार करतां येईल. ही घटना वेळोवेळीं घटनापरिषदा बोलावूनहि बनवितां येईल. रशियाच्या सोव्हिएट युनियन-प्रमाणें कॉमनवेल्थमधील वसाहती नाहींत; याचें कारण त्या युनियन-मधील सर्व घटक हे एकाच संस्थेचे सभासद आहेत व त्यांना समान हक्क आहेत. ब्रिटिशसाम्राज्यांतील सर्व वसाहतीना मिळून जर आपलें धोरण बदलतां आलें असतें तर वेगळा प्रश्न होता. उद्यां इंग्लंडची राज्यपद्धतीहि हिंदुस्थान, आयर्लंड वगैरे देशांनीं मताधिक्यानें बदलून टाकली असती व सर्वच वसहतींत भांडवलशाही व साम्राज्यशाही नष्ट करून समाजसत्ता-वाद अगर अन्य वाद प्रसृत करतां आला असतां. पण कॉमनवेल्थ-वेल्थमधील घटक हे समान दर्जाचे स्वतंत्र देश असल्यामुळें त्यांना आप-ल्यापुरतें वाटेल ते करावयास मुभा आहे, दुसऱ्यांच्या वसाहतींत अगर इंग्लंडच्या राज्यघटनेंत ढवळाढवळ करण्याची मुभा नाहीं. हें एका दृष्टीनें ठीक आहे. कारण रशियामध्यें एखाद्या घटकाला मध्यवर्ती सोव्हिएटचें धोरण अमान्य असलें तरी तो एकजिनसी सांघाडा असल्याकारणानें त्यांना फार तर बहुमताचा निर्णय अनिच्छेनें पत्करावा लागेल. तशी स्थिती वसाहतींमध्यें नाहीं. पण प्रत्येक पद्धतींत जसें कांहीं चांगलें आहे तसें वाईटहि आहे. हीं तुलना पुढील काळांत होणारच आहे तेव्हां आतांच ही चर्चा संपविण्यांत अर्थ नाहीं.

लोकशाही राज्यघटनेंत ज्या कांहीं अवश्यक गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांचा अंतर्भाव या वसाहतींच्या दर्जानें प्राप्त होणाऱ्या स्वराज्यांत होतो कां नाहीं हें आपण पाहूं. लोकशाही राज्यांत प्रथम एक लिखीत घटना लागते. अशी लिखित घटना घटनापरिषदेच्या परिषदेच्याद्वारा बनवावी असें तर आमचें मागणेंच आहे. (२) लोक-शाही राज्यानें आपल्या हक्कांची घोषणा करावयाची असतें व सरकारच्या क्षेत्राच्या मर्यादाहि सांगावयाच्या असतात. (३) बहुमतानें होणारा

राज्यकारभार आणि निवडून आलेल्या लोकांचा राज्यकारभारावर पूर्ण ताबा. (४) सरकारी सत्तेचें विभक्तीकरण. निरनिराळ्या सत्तांनीं परस्परांवर नियंत्रण ठेवणें व समतोलपणा राखणें, (५) लोकशाही सत्ता परिणामकारक रीतीनें चालण्याकरतां लोकांना शिक्षण देणें. या सर्व गोष्टी जितक्या प्रमाणांत करतां येतील. तितक्या प्रमाणांत तेथें लोकशाही आहे असें म्हणतां येईल. समान दर्जाच्या वसाहतींत लोकशाही स्थापन करतां येते आणि म्हणूनच इतर अल्पसंख्याक वर्गांना अगर पक्षांना अशा राज्यपद्धतीबद्दल तक्रार करण्यास जागा नाहीं.

वसाहतीच्या स्वराज्यांत आंतरराष्ट्रीय, आंतरवासाहतिक, आंतरसाम्राज्यविषयक व अंतर्गत कारभारांत किती स्वातंत्र्य आहे, हें आपण पाहिलें.

ही सर्व चर्चा तात्त्विक स्वरूपाची आहे हें तर सांगावयास नकोच. कारण सरकारनें नुसतें वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानला मिळणार एवढें जाहीर केलें आहे. दहा लाख रुपये एखाद्याच्या नांवावर बँकेंत आहेत असेंच सांगण्यापैकीं हा प्रकार आहे. हे पैसे भाऊबंद एकमताचे झाले तर त्यांना मिळणार आहेत असेंहि सरकारनें सांगितलें नाहीं. तुम्ही प्रथम आपलें मतभेद मिटवा एवढेंच ते म्हणत आहेत. पण हे मतभेद मिटले तर ताबडतोब स्वराज्य तुम्हाला मिळेल असें सरकार सांगत नाहीं. त्याचप्रमाणें हे मतभेद मिटविण्याकरतां आवश्यक असणारी घटनापरिषदेची मागणीहि त्यांनीं अद्याप मान्य केली नाहीं. त्यामुळें काय देणार व जें देणार तें केव्हां देणार याची कांहीं कल्पना न देतां नुसते मतभेद मिटवा असें सरकार सांगत आहे. हा त्यांचा जुनाच डाव आहे. पण कॉंग्रेस या डावाला बळी पडत नाहीं. कॉंग्रेसनें घटना परिषदेच्या मागणीचा उलट पेच सुंदर टाकला आहे. ही मागणी मान्य झाली तरच सरकारची सदिच्छा व प्रामाणिकपणा सिद्ध होणार आहे. महायुद्धाची आंच जर सरकारला लागली व हिंदुस्थानच्या सहाय्यावांचून निभत नाहीं असें त्यांना समजून आलें, तर ते कॉंग्रेसचें मागणें मान्य

पाने १९४+२
दा. नं........
शेत. राज १०३(३१)

करतील. कॉंग्रेसचें सहाय्य हें नैतिक स्वरूपाचें सहाय्यच आहे. पण तें सहाय्य त्यांनीं संपादन केलें तरच ब्रिटिश सरकारचा सत्पक्ष आहे व ब्रिटिश सरकार लोकशाहीकरतां लढत आहे असें आम्ही म्हणूं. अर्थात युद्धाच्या तीव्रतेवर आपल्या लोकशाहीचें प्रेम अवलंबून ठेवणें हें ब्रिटिश सरकारला भूषणावह नाहीं. पण लोकशाहीवरील प्रेमामुळें नसलें आणि परिस्थितीनें त्यांना या प्रेमाचा पान्हा फोडला तरी आमची हरकत नाहीं. पण हें झालें नाहीं तर? तर कॉंग्रेसचा मार्ग उघड आहे. कॉंग्रेस ही परावलंबी संस्था राहीली नाहीं. म. गांधींनीं या देशाला अहिंसेचा उज्ज्वल मार्ग दाखविला आहे आणि सत्याग्रहाचें परिणामकारक शस्त्र हातीं दिलें आहे. त्या शस्त्राचा उपयोग करण्याची पाळी आली तरी चांगलें आणि नाहीं आली तर कांहीं वाईट होणार नाहीं. सध्यांच्या युद्धाच्या वावटळीमुळें राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न निकरावर आला आहे; पण हें युद्ध झालें नसते तर आम्ही स्वस्थ बसलों असतो असें नाहीं. जोंपर्यंत आम्ही आमच्या साधनाच्या यशस्वितेबद्दल निश्चित आहों, तोंपर्यंत आम्हाला आमच्या पारतंत्र्याबद्दल भीति वाटत नाहीं. तें आज आलें नाहीं तर उद्यां खास येणार. आम्ही महाभारतात म्हटल्याप्रमाणें आहे. 'अलमेव शमायास्मि, तथा युद्धाय भारत!' या वृत्तीचे आहोंत. ब्रिटिशांचें युद्धहेतू शुद्ध नाहींत आमचे हेतु शुद्ध आहेत, त्यांचें साधन जगाचा उत्कर्ष करणारें नाहीं आमचे उत्कर्ष करणारें आहे, त्यांची राज्यशासनपद्धती पिळवणूक करणारी आहे, आमची शासनपद्धती तशी होणार नाहीं. यामुळें शेवटीं जय आमचाच होणार आहे यांत वाद नाहीं.

—समाप्त—

# सूची


| | |
|---|---|
| ॲपिलें | ४५ |
| ॲटर्नी जनरल | १२७,१२९ |
| आफ्रिका दक्षिण | १५ |
| आफ्रिका हिंदी प्रश्न | ११७ |
| आयर्लंड | १८,२१,१५३ |
| ऑस्ट्रेलिया | १२ |
| कानडा | ८ |
| गव्हर्नर जनरल | ३३ |
| गांधी | १२०,१२४,१७८,२८०,१९१ |
| ग्वायर | १८४ |
| घटना परिषद...... | २३,१५६ |
| ,, ,, | १६१ |
| ,, फ्रान्स | १६२-१६५ |
| ,, रशिया | १६६ |
| ,, पोलंड | १६७ |
| ,, ऑस्ट्रिया | १६७ |
| ,, झेकोस्लोव्हेकिया | १६८ |
| ,, जर्मनी | १६८ |
| ,, वसाहती | १६९ |
| हिंदुस्थान | १७८,१८१,१८२ |
| चॅनल आयलंड्स | ६, |
| झेटलंड लॉर्ड | १३६ |
| डरहॅम लॉर्ड | १० |
| डोमिनिअन स्टेटस | २६ |
| तह परिषद | ३० |

वसाहतीचे स्वराज्य / देवगिरीकर.




| | |
|---|---|
| नॉर्थ अमेरिका ॲक्ट | ११ |
| न्यू झीलंड | १५ |
| न्यू फौंडलंड | १२ |
| नेहरू | १७१,१८० |
| परक्या देशांतील प्रजाजन हक्क | ४७ |
| परराष्ट्रांत वकील | ७४ |
| बॉल्डविन | १३० |
| बिलें ( मंजूरी, राखीव, संमती ) | ३६-३७ |
| बोनर लॉ | १२८ |
| मूर विरुद्ध ॲटर्नी जनरल | ८४ |
| राजनिष्ठेची शपथ | ८१ |
| लॉईड जॉर्ज | १४४ |
| लेकशाही | १९३ |
| वसाहत संरक्षण | ५१, १०३ |
| " भांडणें | १०९ |
| वेस्ट मिन्स्टर कायदा | ५४,६३ |
| व्यापारी नौकानयन | ४२ |
| " सवलती | १०१ |
| व्हाईसरॉय घोषणा | १२३ |
| साम्राज्य परिषद | ३० |
| सोव्हिएट युनियन | १९२ |
| हिंदुस्थान घोषणा | ११२ |
| हेली माल्कम | १२० |
| होअर | १२६,१३४ |
| होमरुल बील | २० |


वाचनालय सातारा
पाने १९४+2
दा नं. ८११८
शं नं. (रा ज) ९४३ अ
३६ भवानी पेठ